
क्रांतिवीर

# नागनाथ अण्णा

- जयवंत अहिर (मामा)



पद्मभूषण क्रांतिवीर

डॉ.नागनाथअण्णा नायकवडी

भाग २-उत्तरार्ध

आटपाडी येथील पाणी परिषद

# संघर्ष पाण्यासाठी....





क्रांतिवीर

# नागनाथ

अण्णा

## भाग २ - उत्तरार्ध

लेखक

जयवंत अहिर - वाळवा.

@
सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

**प्रकाशक-**
क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी
गौरव समिती वाळवे, जिल्हा- सांगली.
पिन - ४१६ ३१३
फोन नं.-२६७५३८,२६७५४०,२६७५४१
फॅक्स -(०२३४२) २६७५३९
ई मेल - ast_hsl@bsnl.in, hutatmassk@gmail.com

**प्रथमावृत्ती** : १५ जुलै २०१५
**स्वागतमुल्य** : २५१/-

**मुद्रक : शिव ऑफसेट प्रिंटर्स**
जे. ७३/२ एम.आय.डी.सी., कुपवाड ब्लॉक,
सांगली-४१६ ४३६ फोन नं.०२३३/२६४४१२७

**प्रमुख वितरक-**
हुतात्मा बझार, वाळवा.

# अनुक्रमणिका


१) पुरस्कार.................................................... I to IV
२) लेखकाचे मनोगत.................................................VI to VIII
३) १५ ऑगस्ट१९४७.................................................. १
४) पुन्हा शिक्षण.................................................. २५
५) चरित्र नायक व हुतात्म्यांची स्मारके.......................... ९
६) महार वतने रयतावा करण्याचा संघर्ष.......................... १४
७) चरित्र नायक-स्वकीय सरकार बरोबर दोन हात.................. १६
८) चरित्र नायकाचे लग्न.......................................... २२
९) कर्मवीर व क्रांतिवीर.......................................... २७
१०) चरित्र नायक आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ.................... ३१
११) गोवा मुक्ती आणि क्रांतिवीर नागनाथ अण्णा..................... ३८
१२) तत्वनिष्ट अण्णा.............................................. ४०
१३) लिफ्ट इरिगेशनला सुरुवात (१९७१-७२)........................ ४७
१४) वाळव्याच्या विकासाला सुरुवात (१९७२-७३).................. ५२
१५) नागठाणे बंधारा (१९७४-७५).................................. ५८
१६) एमएचएम ६८२६ गाडी शेतकऱ्यांनी दिली......................... ६१
१७) पारधी समाजाला आधार........................................ ६४
१८) क्रांतिसिंह नाना पाटील वाळव्यात.............................. ६८
१९) हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना आणि
क्रांतिवीर नागनाथअण्णा.......................................... ७३
२०) राजकीय क्षेत्र १९८५ ची निवडणूक.............................. ९८
२१) हुतात्मा नानकसिंग स्मारक.................................... १०२

२२) वारणा धरणग्रस्त........................................................ १०६
२३) १९८८ कोयना धरणग्रस्त संघटना ........................................ ११३
२४) दलित आदिवासी ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलन१९८८............ ११६
२५) अण्णा आणि सोव्हिएट रशिया.......................................... १२०
२६) शेतमजूर कष्टकरी शेतकरी परिषद (२६ मे १९९३ किणी-वाठार).. १२५
२७) कृष्णा खोऱ्यातील ऐतिहासिक पाणी संघर्ष चळवळ..................... १२९
२८) पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा आणि आयकर चळवळ........ १४३
२९) पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णांचा पहिला वाढदिवस.......... १५१
३०) पारदर्शक कारभार........................................................ १६२
३१) पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा यांच्या विषयी थोराचे विचार... १६७
३२) पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णांची जीवनज्योत अनंतात विलीन... १८९
३३) आदरांजली................................................................ १९५
३४) पुरस्कार सूची............................................................ २०१
३५) आदरणीय नागनाथअण्णा यांचा उल्लेख केलेली ग्रंथसंपदा....... २०५
३६) संदर्भ ग्रंथ सूची ......................................................... २१०
३७) स्मरणगीत ............................................................... २११
३८) हस्ताक्षर ................................................................. २१३

# पुरस्कार
## डॉ. जयसिंगराव पवार

क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे जीवलग सहकारी व आमचे जिव्हाळ्याचे मित्र श्री.जयवंतराव अहिर यांच्या अण्णांवरील चरित्रग्रंथाच्या दुसऱ्या खंडाला पुरस्कार लिहितांना मला मनाला आनंद होतो आहे. हा आनंद दोन गोष्टींसाठी आहे. पहिली म्हणजे ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात प्राणाची पर्वा न करता भाग घेतला आणि सातारा जिल्ह्याचा इतिहास घडविला व ज्यांनी स्वातंत्र्यानंतर स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी अहोरात्र संघर्ष केला, त्या क्रांतिवीराचा इतिहास जयवंतराव सांगताहेत आणि दुसरी गोष्ट म्हणजे अशा प्रकारे एका इतिहास घडविणाऱ्या पराक्रमी पुरुषाचा इतिहास आपण वेळीच शब्दबद्ध करायला हवा, अशी समाजात सहसा न आढळणारी भावना जयवंतरावांनी या ग्रंथनिर्मितीच्या रुपाने व्यक्त केली आहे. मला या लेखकाचे कौतुक वाटते ते यासाठी. ते काही हाडाचे लेखक अथवा इतिहासाचे प्राध्यापक अथवा संशोधक नाहीत. तरीही त्यांना अण्णांनी निर्माण केलेला इतिहास भावी पिढीसाठी जतन करुन ठेवावा, असे वाटले, हे माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचे वाटते.

या चरित्रग्रंथाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे चरित्रग्रंथाच्या नायकाच्या कार्याचा लेखक हा प्रत्यक्ष साक्षीदार आहे. क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या सहवासात आल्यापासून ते अण्णा शेवटचा श्वास घेईपर्यंत लेखक त्यांच्या आस्तित्वाचा व त्यांच्या कार्याचा साक्षीदार आहे. त्यांनी अण्णांची सावलीप्रमाणे सोबत केली आणि शेवटी अण्णांचे चरित्र समाजासमोर मांडून या सावलीचे सोने केले.

क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणजे एक मोठे विलक्षण रसायन होते. अण्णा समजून घ्यायचे तर हे रसायन समजून घेतले पाहिजे. हे रसायन म.फुले, राजर्षी शाहू छत्रपती, म.गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, साने गुरुजी ह्या महापुरुषांच्या विचारांनी बनलेले होते. म्हणूनच या महापुरुषांच्या कार्यांच्या व विचारांच्या छटा अण्णांच्या कार्यात पाहावयास मिळतात.

अण्णांच्या लग्नाची कथा सांगताना लेखक लिहितो: ''रोजच्या नेसूच्या जुन्या कपड्यावर अण्णांचे व कुसुमताईंचे लग्न झाले. लग्ना अगोदर मंगल-अष्टका ऐवजी अय्यर सरांच्या (अण्णांचे शिक्षक) मुलीने सुंदर गाणे म्हटले. नवरा-नवरीने एकमेकांना हार घातले आणि लग्न झाले. लग्नाला ना मुहूर्त ना भटजीच्या मंगल-अष्टका ना तांदूळ टाकणे.'' अण्णांचे हे लग्न म्हणजे म.फुले व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचाराने प्रेरित झालेले लग्न होते. म.फुल्यांनी सत्यशोधक विवाहासाठी काही मंगलाष्टका रचल्या व त्या विवाहप्रसंगी वधुवरांसाठी उपस्थितांपैकी कोणीतरी शहाण्या-शिकलेल्या

माणसाने म्हणावयाच्या होत्या. नागनाथअण्णांनी म.फुल्यांच्या सत्यशोधकी लग्नाच्या पुढे १० पावले उडी टाकली. त्यांनी मंगलाष्टकाला फाटाच दिला अन् नेसूच्या वस्त्रांवरच स्वत:चे लग्न केले. गुरुभगिनीने एक सुंदर गीत गाइले अन् त्याच मंगलाष्टका झाल्या ! नागनाथ अण्णामधील सत्यशोधक असा होता. अण्णांनी स्वत:ला सत्यशोधक जाहीर केले नव्हते. ते कृतिवीर होते. वाचावीर नव्हे.

मी एक शाहूचरित्रकार असल्यामुळे क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे हे चरित्र वाचत असता मला अनेक ठिकाणी शाहूरायांची आठवण होत होती. महार लोकांना गुलामगिरीत टाकणारी, त्यांच्यावर वेठबिगार लादणारी महार-वतन पद्धती नष्ट करण्याकरिता अण्णांनी जी चळवळ केली ती वाचताना शाहूरायांनी आपल्या राज्यात महार-वतन खालसा करुन महारांना स्वतंत्र नागरिक म्हणून कसे हक्क बहाल केले, हे आठवल्याशिवाय कसे राहील ? त्या काळी फासे-पारधी ही गुन्हेगार जमात समजलीजात होती. शाहू महाराजांनी त्यांना जवळ घेतले. पोटाशी धरले, त्यांच्यासाठी लहानसहान कामे काढली. कष्टाची भाकर कमवण्याची शिकवण दिली. त्यांच्या मुलांना शाळेत घातले. त्यांच्या जेवणाची सोय केली. थोडक्यात, महाराजांनी पारध्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले.

असेच प्रयत्न क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी केल्याचे पाहिल्यावर शाहू राजाचा संस्कार त्यांच्यावर कसा झाला होता, हे जाणवते अण्णांनी पारध्यांना, नंदीवाल्यांना जवळ केले. त्यांच्या मुलामुलींना शाळेत घातले. त्यांच्यासाठी वसतिगृह बांधले. ही मुलेमुली शिकल्यावर आपल्याच कारखान्यात त्यांना नोकरीवर ठेवले. त्यांना माणसांत आणण्याचा प्रयोग केला आणि तो यशस्वी करुन दाखवला. ज्यांना समाजकारण करायचे असते, त्यांना सतत प्रयोगशील राहावे लागते. शाहू महाराज असे प्रयोगशील राजे होते! नागनाथ अण्णा त्यांच्या विचाराचे असे वारसदार होते!

स्वातंत्र्य लढ्यात म. गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस व क्रांतिसिंह नाना पाटील ही त्यांची प्रेरणा स्थाने होती. १९४२ साली ८ ऑगस्टला म.गांधींनी 'करेंगे या मरेंगे' चा नारा देशाला दिला. पण ब्रिटिशांनी त्यांच्यासह जवळजवळ सर्व नेत्यांना तुरुंगात टाकून दडपशाही सुरु केली. तेव्हा सातारच्या बहादुर स्वातंत्र्यसैनिकांनी हातात शस्त्रे घेऊन 'प्रतिसरकार' स्थापन केले. म.गांधीपेक्षा नेताजींना त्यांनी जवळ केले. गांधीजींना त्यांनी सोडले नाही. पण नेताजींचा मार्ग त्यांना प्राप्त परिस्थितीत योग्य व एकमेव वाटला. या बहादुर सैनिकांत क्रांतिवीर नागनाथअण्णा हे आघाडीवर राहिले. त्यांचे दोन जीवलग सहकारी किसन अहिर व नानकसिंग हे ब्रिटिशांशी लढताना धारातिर्थी पडले. हुतात्मा झाले. अण्णा त्यांना अखेरपर्यंत विसरले नाहीत. सभेत बोलायला उभे राहिलेकी या दोन हुतात्म्यांना अभिवादन करुनच ते आपल्या भाषणाला सुरुवात करत असत. अशी निष्ठा, अशी कृतज्ञता आम्ही तर कुठेच पाहिलेली नाही !

पुढे हुतात्मा किसन अहिर यांच्या नावाने क्रांतिवीर अण्णांनी वाळव्याला साखर कारखाना उभा केला. लेखकाने या साखर कारखान्याच्या स्थापनेचा, त्यासाठी अण्णांनी केलेल्या जिद्दीच्या संघर्षाचा, साधंत इतिहासच सादर केला आहे. शेवटच्या टप्प्यात अण्णा दिल्लीतच मुक्काम करुन राहिले. त्यांनी प्रतिज्ञा केली होती की, ''एक तर कारखान्याचे लायसन्स घेऊन वाळव्याला जाईन नाहीतर या नागनाथाचे प्रेत वाळव्याला येईल'' अशी कठोर भीष्म प्रतिज्ञा महाराष्ट्रातील कोणी सहकार क्षेत्रातील पुढाऱ्याने केल्याचे आमच्या तरी कानावर नाही. कारण अशी प्रतिज्ञा करण्यासाठी एक वेगळेच रसायन लागते.

हा साखर कारखाना म्हणजे महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातील एक फार मोठा सामाजिक प्रयोग होता. या प्रयोगात काही गोष्टी प्रथमच घडत होत्या. कारखाना- लायसन्स काढण्यासाठी लागणारा निधी हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील शिक्षकांनी शेअर रुपाने उभा केला. जयवंतराव म्हणतात, ''आजपर्यंत साखर कारखान्यांनी शाळा काढल्या. परंतु हे देशातील एकमेव उदाहरण असेल. की शाळेने साखर कारखाना काढला !''

आठ वर्षांच्या भगीरथी प्रयत्नानंतर अण्णांना लायसन्स मिळाले. वाळव्याच्या लोकांनी आपले गायरान विनामोबदला कारखान्यासाठी दिले. कारखान्याचा मुहूर्त एका वडार समाजातील कामगाराच्या हस्ते झाला. अल्पावधीत थोर क्रांतिकारक हुतात्मा किसन अहिर यांच्या नावाने कारखाना उभा राहिला. गाळप सुरु झाले. साखर बाहेर पडू लागली. सर्वांना आनंद झाला. अण्णांच्या आई लक्ष्मीबाई हजर होत्या. त्यांनी चिमुठभर साखर अण्णांच्या हातावर ठेवली. पुढे काय झाले ? जयवंतराव सांगतात, ''साखर बाहेर येत असताना आईंनी अण्णाच्या हातात साखर ठेवण्याचा प्रयत्न केला. आईच्या समाधानासाठी तिच्या हातातला साखरेचा एक कण जिभेवर ठेवला आणि आईचे लक्ष दुसरीकडे गेल्यावर तो जिभेवरचा कण थुंकून टाकला. ह्या त्यांच्या निरपेक्ष भावनेचा मी लेखक जयवंत अहिर साक्षीदार आहे. ज्या दिवशी साखर पडली त्या दिवशी कारखान्याच्या गेटमधून अण्णा बाहेर पडले ते, ते हयात होते तोपर्यंत कारखाना गेटच्या आत कधीही गेले नाहीत'' असा कुणी साखर कारखान्याचा संस्थापक महाराष्ट्रात आढळेल का ?

आजूबाजूला अनेक साखर कारखाने अस्तित्वात असता आणखी नवा कारखाना चालविणे म्हणजे आव्हान होते. अण्णांनी हे आव्हान केवळ स्वीकारले नाही तर त्यांनी साखर कारखान्याच्या इतिहासात नवनवे प्रयोग करुन विक्रम प्रस्थापित केले. उच्चांकी रिकव्हरी व उच्चांकी दर ते शेतकऱ्यांना देऊ लागले. कामगारांसाठी उच्चांकी बोनस दिले. त्यासाठी त्यांनी अनेक नवनवे प्रयोग केले. सर्वत्र हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याचा बोलबाला झाला; आणि मग आदर्श साखर कारखान्यासाठीचे एक प्रारुप 'हुतात्मा पॅटर्न' या नावाने निर्माण झाले.

नागनाथ अण्णांनी अनेक सामाजिक प्रयोग केले. ऊस तोड करणाऱ्या कामगारांना घेरे बांधून दिली, थंडीपासून बचाव व्हावा म्हणून गरम कपडे दिले; दोन रुपयांत पोटभर जेवणाची सोय केली. त्यांच्या मुलांसाठी साखर शाळा सुरु केल्या. मुलींची मोफत वसतिगृहे स्थापन केली. ग्रामीण भागातील मुली उच्च शिक्षण घेऊ लागल्या साखर कारखान्याच्या माध्यमातून अण्णांनी अनेक चळवळी चालविल्या. धरणग्रस्त व दुष्काळग्रस्तांच्या हक्कांसाठी व हक्काच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांच्या मोठमोठ्या परिषदा घेतल्या. आंदोलने केली. दलित, विद्रोही, ग्रामीण, आदिवासी साहित्य संमेलने भरविली. त्यावरुन सामाजिक समतेचे व न्यायाचे प्रश्न मांडले. अशा किती गोष्टी सांगाव्यात ? साखर कारखाना हा सत्ता व मत्ता यांचे केंद्र न बनवता ते विचारांचे प्रेरणास्थान बनवले. समस्त बहुजन समाज, शेतकरी वर्ग, त्याकडे नव्या आशेने पाहू लागला.

क्रांतिवीर नागनाथअण्णा हे जसे म.फुल्यांचे अनुयायी होते तसे म.गांधींचेही अनुयायी होते. साखर कारखान्याने निर्माण केलेली समृद्धी ही आपली वैयक्तिक मालमत्ता नसून ती समाजाच्या मालकीची आहे, आपण तिचे 'विश्वस्त' आहोत, ही गांधीजींची शिकवण प्रत्यक्षात अमलात आणणारे अण्णा होते. म्हणूनच कारखान्याच्या परिसरात तयार होणारे आंबे कारखान्याच्या परिसरातील प्रत्येकाच्या घरी अण्णा पोहोचते करत होते. प्रत्येक शिक्षकाच्या व विद्यार्थ्याच्या हाती एकेक आंबा दिला जात असे.

जयवंतराव लिहितात, ''आंबे वाटून झाल्यावर अण्णा म्हणायचे, ''अरे दत्ता, जया, पवार सर, सर्वांना आंबे वाटून झाले का ?'' आम्ही झाले म्हणून सांगितल्यावर म्हणायचे, ''आता त्यातले दोन आंबे इकडे आणा. त्याच्या समान आठ फोडी करा.'' त्यातील सात फोडी भेटायला आलेल्या मंडळींना द्यायचे व आठवी फोड ते हुतात्म्यांचा प्रसाद समजून खायचे '' सर्व आमराईच लुटून खाणाऱ्या आजच्या युगात आठवी फोड खाणारे 'नागनाथ अण्णा' आज कुठे सापडत असतील तर त्यांनीही शोधून काढून त्यांचीही चरित्रे आजच्या पिढीसमोर मांडली पाहिजेत.

क्रांतिवीर अण्णांचे चरित्र दोन खंडात समाजासमोर मांडून जयवंतराव अहिर यांनी तीन प्रकारच्या सेवा केल्या आहेत. समाजसेवा, साहित्यसेवा व इतिहाससेवा. माझ्या दृष्टीने त्यांची इतिहास जतन करुन ठेवण्याची सेवा फार मोलाची आहे. त्यासाठी त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

शाहूजयंती : २६ जून २०१५
कोल्हापूर.

# मनोगत

## जयवंत अहिर

क्रांतिवीर नागनाथअण्णा यांच्या चरित्रग्रंथाचे प्रकाशन १५/७/२००८ रोजी अण्णांच्या ८६ व्या वाढ दिवसी माजी न्यायमूर्ती कोळसे पाटील यांच्या हस्ते व आ.ह.साळुंखे, प्रा.पी.बी.पाटील, डॉ.एन.डी.पाटील, स्वत: अण्णा, सौ.वहिनी(माई), मा.कल्लाप्पाण्णा आवाडे माजी खासदार, मा.सदाशिवराव मंडलिक खासदार, मा.प्रकाश आवाडे, निवेदिता माने, वैभव नायकवडी व स्वत: लेखक (जयवंत अहिर) यांच्या उपस्थितीत झाले. हा प्रकाशन झालेला ग्रंथ अण्णांच्या १५/७/१९२२ या जन्म दिनापासून १५ ऑगस्ट १९४७ पर्यंतच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानावर आहे. वाचकांच्या हातात ग्रंथ पडल्यानंतर त्यांच्या कडून इतका प्रतिसाद मिळाला की, पहिली दोन हजार प्रतींची आवृत्ती हातोहात संपली. तुफान प्रतिक्रिया आल्या. पुढे क्रांतिवीर नागनाथ अण्णा या ग्रंथाच्या एकूण पाच आवृत्या काढाव्या लागल्या. ग्रंथाबद्दल क्रांतिअग्रणी जी.डी.बापू म्हणतात, ''या ग्रंथात क्रांतिवीर नागनाथअण्णा यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील तेजस्वी सहभागाची वास्तव माहिती आहे हे पुस्तक इतिहासाने दखल न घेतलेल्या स्वातंत्र्ययोध्याच्या कर्तृत्वाचा दस्तऐवज आहे. इतिहासक,अभ्यासक,ध्येयवादी तरुणांना व क्रांतिकारक विचारांचे कार्यकर्ते यांना हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल.'' पुढे प्रा.पी.बी.पाटील म्हणतात, ''या चरित्रपुस्तिकेचे लेखक जयवंत अहिर हे कुणी धंदेवाईक बुध्दिजीवी लेखक नाहीत पण लहानपणापासून नागनाथ अण्णांचा सहवास लाभलेले व अण्णांचा विश्वास मिळवलेले निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. या त्यांच्या जवळकीचा अत्यंत चांगला उपयोग करून अण्णांच्या प्रखर देशभक्तीची कारकीर्द तपशीलवार प्रकाशात आणली आहे. भूमिगत चळवळीतील कितीतरी रोमांचक थरारक गोष्टी अजूनपर्यंत अंधारात होत्या. त्या नीटपणे प्रकाशात आणण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम श्री.जयवंत अहिर यांनी केले आहे. मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. जातिपातीच्या डबक्यातील गारगोट्यांना हिरे म्हणून रंगवून ठेवण्याच्या बाजारात जयवंत अहिर यांनी समाजसागरातील अस्सल तेजस्वी हिरा कसा असतो त्याची एक झलकच क्रांतिवीर नागनाथअण्णांचे अस्सल चरित्र लिहून नव्या पिढीपुढे ठेवले आहे.'' ग्रंथ प्रकाशित झाल्यावर क्रांतिवीर नागनाथ

अण्णांना वाचून दाखवला त्या वेळी ते एकच वाक्य बोलले, ''अरे जया, हे पुस्तक फार गाजणार आहे. ना.सुशीलकुमारजी शिंदे-ऊर्जा मंत्री, भारत सरकार हे म्हणतात,''क्रांतिवीर अण्णांचे १९४२ लढ्यातील प्रसंग अतिशय उत्कंठतेने शब्दबद्ध करण्यात जयवंत अहिर यशस्वी झाले आहेत. भाषेचा कोणताही डामडौल न आणता अत्यंत सहज आणि थेट भिडणाऱ्या प्रसंगांमुळे पुस्तक एकदा हातात घेतले की संपवल्याशिवाय खाली ठेववत नाही. सरकारी खजिना लुटीचे, स्वातंत्र्यासाठी फौज तयार करून त्या फौजेचे योगदान पोर्तुगीजांच्या राज्यातली शस्त्रे, काडतुसे जंगल मार्गाने आणण्याचे प्रसंग हे सगळे एखाद्या चित्रपटात शोभावे असेच आहे. स्वत: प्रकाशक माजी न्यायमूर्ती कोळसे पाटील म्हणतात, ''आपल्या देशाचा घडला तसा इतिहास लिहला गेला नाही. कारण ज्यांनी इतिहास लिहावयास हवा होता त्यांना लिहणे वाचण्याची कायद्यानेच बंदी होती. ज्यांनी लिहला तो त्यांच्या हितासाठी खोटा इतिहास लिहला. त्यामुळे देशाचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे. क्रांतिवीर नागनाथअण्णांचा चरित्र रूपाने जयवंतरावांनी घडला तसा इतिहास लिहून एक आदर्श निर्माण केला आहे. नि:स्पृह माणसाने लिहिलेला हा इतिहास (खरे चरित्र) पुढील पिढीला मार्गदर्शक ठरावा. ''क्रांतिवीर नागनाथअण्णांचे मित्र पी.डी.गुणे साहेब म्हणतात, '' क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या ४२ सालाच्या क्रांतिलढ्यातील अलौकिक कार्याचा इतिहास पुस्तकरूपाने लिहिला तो मी तत्काळ वाचून काढला वाचताना अनेक वेळा अंगावर काटे उभे राहिले. लिखाणातील भाषा सोपी, ओघवती व रचना एखाद्या कादंबरी सारखी आहे. पुस्तक उत्तमच झाले आहे.'' पी.डी.गुणे साहेबांच्या पत्नी सौ.अरुणाताई म्हणतात, ''पुस्तक वाचले. प्रथम असे अगदी खऱ्या घटना लिहून पुस्तक फारच आकर्षक झाले आहे. एक घटना वाचून झाली की आता पुढे काय झाले काय केले असे प्रश्न मनात येऊन पुस्तक कधी एकदा सर्व वाचते असे झाले.'' मा.डॉ.जयसिंगराव पवार कोल्हापूर ते म्हणतात, ''क्रांतिवीर अण्णा हा चरित्रग्रंथ एका दमात वाचून काढला. अतिशय प्रासादिक व ओघवत्या भाषाशैलीत तो उतरवला आहे. अण्णांचे चरित्र आजच्या पिढीलाच नव्हे तर भावी पिढ्यानाही प्रेरणादायी ठरावे.'' या ग्रंथासाठी प्रस्तावना देताना आ.ह.साळुंखे म्हणतात, ''क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या चरित्रातील असंख्य रोमहर्षक आठवणी जयवंत अहिर यांनी नोंदवल्या आहेत. त्या आठवणी अंगावर शहारे आणतात आणि मनाला थरारूनही सोडतात. एका महान चरित्राने आपण भारावले जातो. आज अण्णांच्या त्या महान त्यागमय चरित्रापुढे विनम्रपणे नतमस्तक होताना एक समाधान आहे.

वरील प्रमाणे अनेकांनी पत्र पाठवून माझं कौतुक केलं त्यांपैकी काही नावांचा उल्लेख करावासा वाटतो. कॉ.किशोर ढमाले, कवी इंद्रजित भालेराव, साखार आयुक्त मा.श्री.विश्वास धुमाळ, मा.डॉ. अप्पा साहेब माने, मा.श्री.व्ही.पी.राणे माजी साखर आयुक्त, प्राचार्य विश्वास सायनाकर, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नातू ॲड.सुभाष भगवान पाटील, प्रा.बाबासाहेब पाटील ऋणानुबंधकार, डॉ.बाबा आढाव, मा.श्री.रावसाहेब शिंदे चेअरमन रयत शिक्षण संस्था, स्वातंत्र्य सैनिक मा.श्री.धोंडीराम बापू माळी, प्रा.डॉ.माणिकराव साळुंखे कुलगुरू शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, क्रांतिवीर नागनाथअण्णांचे प्राथमिक शाळेतील वर्ग मित्र मा.श्री.ग.गा.बाबर गुरूजी, मा.श्री.व्ही.वाय.पाटील आबा, आचार्य शांताराम गरुड, कांही सामान्य माणस फार सरळ असतात त्यापैकी माझे मित्र संजय जोंजाळ त्यांच्या पत्नीच्या वाचनात अण्णांचा ग्रंथ आला. त्यांना तो खूप आवडला. कांही कामानिमित्त मी संजयच्या घरी गेलो असता त्यांनी अण्णांच्या पुस्तकाबद्दल खूप कौतुक केले. प्रत्यक्ष भेटीत आर.आर.पाटील गृहमंत्री महाराष्ट्र राज्य म्हणाले, ''अण्णांच्यावरचे पुस्तक छान आहे. यावर चित्रपट काढण्याचा विचार आहे.'' अशी अण्णांच्यावर प्रेम करणारी माणसं भेटल्यामुळे नवीन लिखान करायला बळ आलं.

वरील सर्व मंडळींच्या कौतुकामुळे मला फार बळ आले. त्यातून मी मनासी ठरवले अण्णाचा दुसरा भाग जो रचनात्मक कामाचा आहे तो 'क्रांतिवीर नागनाथ अण्णा' ह्या ग्रंथासारखाच तुल्यबळ लिहायचा. माझा अल्पसा परिचय अण्णांचा १९५७ मध्ये झाला. पण पुढे १९६४-६५ पासून अतिशय निकटचा व दाट परिचय झाला. त्यांच्या प्रत्येक कामाचा मी साक्षीदार आहे. नेहमी त्यांच्या सहवासात म्हणजे अगदी अण्णांनी लीलावती हॉस्पिटल मध्ये २२ मार्च २०१२ रोजी दुपारी ४.०० वा. शेवटचा श्वास घेतला त्यावेळी त्यांच्या जवळच उभा होतो. पुस्तकाच्या पानांत क्रांतिवीर अण्णांना बंद करण्याइतपत त्यांचं मर्यादित कार्य नाही आणि त्यांना पूर्णपणे शब्दरूपात मांडण्या इतपत माझा अवाका नाही. तरी मी ठरवले होते पहिल्या ग्रंथापेक्षा दुसरा ग्रंथ अण्णांचा गाजेल असाच लिहायाचा. उत्साह दांडगा होता. लिहायला सुरुवात केली. अण्णांच्या हयातीत तो प्रकाशित करण्याचा मानस होता. तो राहून गेला. त्याचे माझ्या मनाला दुःख आहे. पण त्याला मी एकटा जबाबदार नाही, त्याला आजूबाजूची परिस्थिती, पोषक उत्साही वातावरण, असावं लागतं. हे सारं खरं असलं तरी माझ्याकडून लिखाण करायच राहून गेले. पुन्हा प्रयत्न सुरू केला. अनुभव चांगला नाही परंतु त्याच दरम्यान ''तरुण सागर महाराजाच

पुण्यनगरी पेपर मधल्या बुधवार १२ नोव्हेंबर १४ च्या अंकातील कटुसत्य वाचनात आलं. गर्दीत माणसांच्यात माणूस शोधतोय मी अशी अवस्था आज झाली आहे. याचे कारण शोधायला दूर भटकायची गरज नाही. आजूबाजूला डोळे उघडून पहा. आपोआप दिसेल प्रत्येकाला पैसा, सत्ता, संपत्ती आणि अधिकार हवा आहे.'' पण माणूस कुणालाच नको आहे. केवळ माणूसकी घेऊन उदो उदो करण्यापेक्षा पैसा मिळावा अशीच धारणा बनत आहे. वेळीच सावध व्हा. नाही तर माणसाचा कानूस (पशू) होईल. तरुण सागर महाराज यांचे विचार वाचले मनाला पटले तसा लिहण्याचा निर्णय पक्का होता. माणसातले माणूस म्हणून क्रांतिवीर नागनाथअण्णा यांचे जमेल तसे रचनात्मक कामाच्या पुस्तिकेचं लिखाण करनाऱ्या माझ्यासारख्या सामान्य लेखकाला वाटतय क्रांतिवीर नागनाथअण्णांचे काम इतके मोठे आहे की ते एका दुसऱ्या पुस्तिकेत लिहता येणार नाही. मी तसा प्रयत्न केला असला तरी ह्या पुस्तिकेत पूर्णपणे अण्णांच्या कार्याचा व विधायक आणि रचनात्मक कामाचा उल्लेख केला असा माझा दावा नाही. पुढे मागे आणखी एकादी पुस्तिका लिहण्याचा विचार आज माझ्या मनात आहे.

ही पुस्तिका लिहताना अनेक मंडळींनी मला मदत केली. त्यात वैभवकाकांचे नाव आर्वजून घ्यावेसे वाटते. त्याचप्रमाणे नेहमी आनंदाने शुद्ध लेखन तपासण्याचे काम श्री. ढवण सर सातारा व श्री.मुलाणी सर, टाईपिंगचे काम श्री.माणिक कुलकर्णी व माझे मित्र प्रवीण कांबळे यांनी मनापासून केले. तसेच दुसरा भाग लवकर लिहा म्हणून मला वरचेवर तगादा करणारे आ.ह.साळुंखे मा.प्राचार्य यशवंत पाटणे सातारा, प्रा.दिनकर विष्णू पाटील कीर्ती प्रकाशन कोल्हापूर, कादंबरीकार बी.बी.चौगुले पन्हाळा, श्री.विनय गजानन पाटील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग संचालक (गोटखिंडी), सौ.रंजनाबाई विश्वास मुळीक माझी मुलगी सौ.जोत्स्ना मनोज कदम व पत्नी सौ.जयश्री जयवंत अहिर तसेच हुतात्मा संकुलातील सर्व कामगार, अधिकारी, कार्यकर्ते हुतात्मा किसन अहिर विद्यालय, क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, जिजामाता विद्यालय सर्व शिक्षक, शिक्षिका आणि इतर स्टाफ , शिपाई या सर्वांचा मी आभारी आहे.





स्वातंत्र्य सैनिक रामचंद्र नायकवडी
(बापू)

क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी
(आईसाहेब)

बहुजन समाजातील कष्ट करणारा, राबणारा समाज
गुलामिमुक्त, भयमुक्त व शोषणमुक्त करण्यासाठी
आपल्या सर्वस्वाचे बलिदान करणाऱ्या
पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा
या महान पुत्राला जन्म देणाऱ्या
क्रांतिमाता सौ. लक्ष्मीबाई व पिता रामचंद्र नायकवडी
यांना

## ।। भावपूर्ण अर्पण ।।



हुतात्मा किसन अहिर



क्रांतिसिंह नाना पाटील


पिडित त्यांना धरीले हाती, पीडक ते झोडले ।
शुध्दचरित ते जथ्यास अपुल्या प्रीतीनें जोडले ।

शौर्य, धैर्य, साहस, निर्भयता,
आत्मविश्वास, निर्धार, कष्ट,
निर्णय क्षमता, संघटन कौशल्य,
त्याग, सजगता आणि ध्येय निष्ठा
यांचे मुर्तिमंत प्रतिक म्हणजे...

पद्मभूषण क्रांतिवीर

**डॉ.नागनाथअण्णा नायकवडी**




॥ दीपस्तंभ ॥
वाऱ्यासमही पसरत राहो,
दाही दिशातून उदंड कीर्ती..!
पिढ्यान्‌पिढ्यांना मिळत राहूदे,
जगास तुमची अखंड स्फूर्ती..!!




हुतात्मा किसन अहिर अर्धपुतळा उद्‌घाटनप्रसंगी **मा. बाबूराव जाधव, मा. रावसाहेब कळके, क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी ना. यशवंतराव चव्हाण, कॉ. दत्ता देशमुख व क्रांतिवीर नागनाथअण्णा. २५ फेब्रुवारी १९७१**




**मा. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील आणि क्रांतिवीर नागनाथअण्णा**




**क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी** यांचे समवेत बाकावर बसलेले डावीकडून **दत्तोपंत कुलकर्णी, पंडीत मानेसाहेब, ए.डी. मोटे, आवटी साहेब** शिक्षण उपसंचालक, कवी सुधांशू प्रिन्स शिवाजी बोर्डींग, खाली बसलेले डावीकडून **चाऊस सर, दिनकरराव आजगावकर, दादासाहेब पाटील** व इतर सहकारी



कारखाना साईट भेटी प्रसंगी **क्रांतिवीर नागनाथअण्णा** समवेत जिल्हाधिकारी **रत्नाकर वाघ,** सब रजि. **एन.वाय मुजावर,** अण्णांचे बंधू **शामराव नायकवडी** व चेअरमन **शामराव सव्वाशे**





दिल्ली येथील **महात्मा गांधींच्या समाधीवर** फुले वाहताना
**क्रांतिवीर नागनाथअण्णां** समवेत वाळवा येथील **स्वातंत्र्यसैनिक व शेतकरी**




रशिया दौऱ्यावर जाताना **क्रांतिवीर नागनाथअण्णा**
यांना शुभतिलक लावताना **क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी** (सन १९८८)

किर्लोस्कर कंपनीचे ११ ट्रॅक्टर प्रदान करतेवेळी **श्रीमती राधाक्का,** पंढरपूरचे संत **पुरूषोत्तम रंगाचार्य, क्रांतिवीर नागनाथअण्णा, मा. गुणे साहेब, क्रांतिसिंह नाना पाटील** व **परूळेकरसाहेब** (२-११-१९७३)







किर्लोस्कर कंपनीचे ११ ट्रॅक्टर बँक ऑफ इंडियाच्या अर्थसहाय्याने दिले ते लाभधारक शेतकरी. (२-११-१९७३)



मार्गदर्शन करताना **क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी (आईसाहेब)**



मार्गदर्शन करताना **क्रांतिवीर नागनाथअण्णा**



**क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी**
व पंतप्रधान **मा. व्ही. पी. सिंग**
कराड येथे
प्रचार सभा प्रसंगी (सन १९९०)




पुणे विद्यापीठाला राजर्षि शाहू महाराजांचे नाव दिलेच पाहिजे या विराट मोर्चा प्रसंगी
**क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी व मा. कांशीराम**




समाजवादी पक्षाचे नेते **मा. मधू दंडवते** यांचे
वाळवा येथे स्वागत करताना **क्रांतिवीर नागनाथअण्णा** (सन १९९०)



साखर कामगार परिषद, वाळवा येथे **क्रांतिवीर नागनाथअण्णा, मा. ना. आर. आर. पाटील** ग्रामविकास मंत्री, यांचा सत्कार करताना व्यासपिठावर **मा. शंकर धोंडी पाटील, कॉ. किशोर पवार, मा. बी. आर. पाटील, कॉ. दिघे, इंदूताई पाटणकर, कॉ. नाना शेटे** इ.



प्रचार सभा, कराड
**क्रांतिवीर नागनाथअण्णा**
**मा. ना. मुलायमसिंग यादव**
मुख्यमंत्री उत्तर प्रदेश
**मा. हुसेन दलवाई,**
**कॉ. बाबूराव गुरव** इ.



**क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी** सह **मा. खा. राज बब्बर** व **न्या.बी.जी. कोळसे-पाटील** हुतात्मानगर (सोनवडे), ता. शिराळा



आर.पी.आय. पक्षाचे खासदार निवडून आलेनंतर त्यांचा सत्कार करताना
**क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी**
डावीकडून- **खा. प्रकाश आंबेडकर, ना.पतंगराव कदम, खा. जोगेंद्र कवाडे, खा.रामदास आठवले**



संगम विद्यालय,डोंगरगांव या संस्थेच्या नुतन वास्तूचे उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष पदावरुन मार्गदर्शन करताना **क्रांतिवीर नागनाथअण्णा** व उद्घाटक **मा. सुशिलकुमार शिंदे**



श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संस्था कार्यालय इमारत उद्घाटन प्रसंगी **क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी** डावीकडून : **वसंतराव पंदारे, रा.कृ.कणबरकर, वणेरे सर, शंकरराव नलवडे, दादासाहेब पाटील, राजाभाऊ अतिग्रे** व इतर





हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना **'सातारचे प्रतीसरकार'** या विषयावर मार्गदर्शन करताना **क्रांतिवीर नागनाथअण्णा**




**क्रांतिवीर नागनाथअण्णा** यांच्या नेतृत्वाखाली **कॉ. नाना शेटे, प्रा. बाबूराव गुरव, आ. प्रा. शरद पाटील, मा. देशमुख सर, कॉ. जालिंदर जमदाडे** यांच्या समवेत शेतमजूर कष्टकरी शेतकरी संघटनेचा सांगली कलेक्टर कचेरीवर मोर्चा (२६ जून २०००)



**क्रांतिवीर नागनाथअण्णा** सांगली जिल्हाधिकारी कचेरी समोर धरणग्रस्तांच्या मेळाव्यापुढे मार्गदर्शन करताना. (सन २०००)


















आटपाडी येथे पाणी संघर्ष परिषदेत
मार्गदर्शन करताना
क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी,
मा. कुसुमताई नायकवडी,
मा. वैभवकाका नायकवडी,
मा. आ. गणपतराव देशमुख,
ना. पतंगराव कदम
साथी निळू फुले,
प्रा.शरद पाटील




क्रांतिसिंह नाना पाटील पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करताना
**मा. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील,** सोबत **क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी,**
**सौ. कुसुमताई नायकवडी, ना. शरदचंद्रजी पवार, ना. पतंगरावजी कदम,**
**ना. बाळासाहेब थोरात, ना. मदन पाटील,**
**मा. आर. आर.(आबा) पाटील, व वैभवकाका नायकवडी.**



हुतात्मा किसन अहिर पुर्णाकृती पुतळ्याचे
अनावरण समारंभ प्रसंगी
**क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी**
समवेत **मा. आर.आर. पाटील,**
**मा. पतंगराव कदम, मा.एन.डी.पाटील,**
**मा.वैभवकाका नायकवडी,**
**मा.पी.बी.पाटील**
**सौ, कुसुमताई नायकवडी** इत्यादी




अण्णांच्या ८६ व्या वाढदिवस प्रसंगी **''क्रांतिवीर नागनाथ अण्णा''(भाग-१ पुर्वार्ध)** या चरित्र ग्रंथाचे प्रकाशन करताना माजी न्यायमुर्ती **बी.जी. कोळसे-पाटील,** उजवीकडून - **एन. डी. पाटील, सौ. कुसुमताई नायकवडी, क्रां. डॉ. नागनाथ अण्णा,** लेखक : **जयवंत अहिर, प्राचार्य पी.बी. पाटील, आ. ह. साळुंखे, प्रकाश आवाडे, निवेदिता माने, मा. वैभवकाका नायकवडी**



**आईसाहेब यांच्या २६ व्या स्मृतिदीनी क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी** ग्रंथाचे प्रकाशन करताना डावीकडून - **भगवान(भाऊ) पाटील, महादेव कांबळे, मा.वैभवकाका नायकवडी, लेखक जयवंत अहिर,वसंत भोसले, मीनाताई शेषु**

# पुरस्कार स्वीकारताना



पद्मभूषण




डी. लिट्. पदवी



समाजभूषण



महाराष्ट्र गौरव



आर्यभूषण



भाई माधवरावजी बागल

# शुभेच्छा भेटी प्रसंगी












# पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि; नागनाथअण्णानगर, वाळवे

ता. वाळवा, जि. सांगली.

संस्थापक



**क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी**

## चेअरमन

सन १९८१ ते १९८६



मा. श्री. शामराव ज्ञानू सव्वाशे

सन १९८६ ते १९९१



मा. श्री. तातोबा भाऊ वाजे

सन १९९१ ते १९९७



मा. श्री. महादेव शिवाप्पा कांबळे

सन १९९७ ते २००२



मा. श्री. अजिज रहिमान चाऊस

सन २००२ ते २००७ पर्यंत



मा. श्रीमती निलावती महादेव माळी

सन २००७ पासून



मा. श्री. वैभव नागनाथ नायकवडी



खुर्चीवर बसलेले डावीकडून : काकी-हौसाबाई, सौ. कुसुमताई, क्रांतिवीर नागनाथअण्णा,
खाली बसलेले डावीकडून : नातू-दिग्विजय कदम, गौरव नायकवडी, जयदीप कदम, मोहिल पाटील,
नात- सुप्रिया कदम, प्रतिमा नायकवडी
उभे राहिलेले डावीकडून : नातू-वीरधवल, चि. वैभव, सून-नंदिनी, सून-सुषमा, नातू-अभिजित,
चि. अरुण, मुलगी-प्रगती, जावई-उमाजी पाटील, सून-सुमन, नातू-केदारज्योती,
चि. किरण, मुलगी-विशाखा, जावई-सुरेश कदम



मा. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या कुटुंबियांसमवेत

# अखेरचा प्रवास...



















विनम्र अभिवादन



पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांचा प्रथम स्मृतिदीन कार्यक्रम प्रसंगी अभिवादन करताना खा.मुलायमसिंह यादव, ना.पृथ्वीराजजी चव्हाण, ना.आर.आर.पाटील, ना.डॉ.पतंगरावजी कदम, ना.हर्षवर्धन पाटील, ना.राधाकृष्ण विखे पाटील, मा.वैभवकाका नायकवडी.



पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांच्या जयंती प्रसंगी समाधीस्थळी पुष्पांजली वाहताना सि अभिनेते राज बब्बर, सोबत मा.ना. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. वैभवकाका नायकवडी व इतर मान्यवर



पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांच्या तृतीय स्मृतिदीन कार्यक्रम प्रसंगी अभिवादन करताना ॲड.उज्वल निकम, डॉ. प्रतापसिंह जाधव, मा.वैभवकाका नायकवडी, मा.गौरवभाऊ नायकवडी व इतर मान्यवर



क्रांतिवीर अण्णांचे अखेरचे
वास्तव्य असलेली साखर शाळेची वास्तू




क्रांतिवीर अण्णांच्या
नेहमीच्या वापरातील वस्तू




क्रांतिवीर अण्णांचे विश्रांती कक्ष.



क्रांतिवीर अण्णांचा
अस्थिकलश

# १५ ऑगस्ट १९४७

नागनाथ अण्णा नायकवडी यांनी आपल्या वयाच्या आठव्या वर्षापासून क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याकडून स्वातंत्र्यलढ्याचे बाळकडू घेतले. त्यांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र होईपर्यंत इंग्रजी सत्तेविरोधात अखंड १९४२ ते १९४७ पर्यंतचा ५ वर्षांचा काळ लढ्यात घालविला. त्यांच्या आईवडिलांना, धाकट्या भावांना तुरुंगवास भोगावा लागला. हे सारे त्यांनी सोसले, भोगले ते अखंड भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी. क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी जे भोगले ते अनेक क्रांतिकारकांनी, लाखो, कोट्यवधी भारतीय जनतेने भोगले. हुतात्मा भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, किसन अहिर, हुतात्मा नानकसिंग सारख्या अकरा हजार हुतात्म्यांनी बलिदान दिले. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, राजेंद्र प्रसाद, लाला लजपतराय, क्रांतिसिंह नाना पाटील, राजूताई पाटील, क्रांतिमाता लक्ष्मीबाई, इंदूताई पाटणकर, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांति अग्रणी जी.डी.(बापू)लाड, वसंतदादा पाटील, लोकमान्य टिळक यांच्या सारख्या अनेक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेत्यांच्या व भारतीय जनतेच्या उठावाने इंग्रजी सत्ताधारी हादरले. म्हणून १४ फेब्रुवारी १९४७ रोजी ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांनी भारताला स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली आणि जाता जाता अखंड हिंदुस्थानचे दोन तुकडे करून आपली कुटिल राजनीती जगाला दाखवून दिली. भारत पाकिस्तान अशी त्यांनी फाळणी केली. त्या फाळणीला गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी सर्व प्रथम मान्यता दिली. भारतीय जनतेला व स्वातंत्र्यासाठी लढलेल्या क्रांतिवीरांना देशाचे तुकडे करून स्वातंत्र्य नको होते.

त्यांपैकी क्रांतिवीर नागनाथ अण्णा हे एक होते. अण्णां त्यावेळी आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले, "१९४२ ला स्वातंत्र्याची चळवळ इतक्या टोकाला आली होती की, सारी भारतीय जनता रस्त्यावर आली आहे अशा वेळी  काँग्रेस श्रेष्ठींनी फाळणीची तडजोड मान्य केली नसती तर इंग्रजी सत्ताधारी राज्यकर्त्यांनी संगिनीच्या जोरावर आणखी जास्तीत जास्त चार दोन वर्षे राज्य केले असते आणि पुढे शेवटी भारतीय जनतेने अखंड हिंदुस्थानचे स्वातंत्र्य तर मिळविले असते पण त्यावेळी भारतातून एकही गोरा माणूस इंग्लडला (मायदेशी) जीवंत गेला नसता."

इंग्रज हुशार होते. त्यांनी ते ओळखले होते आपण आता भारतावर जास्त काळ राज्य करू शकणार नाही. आपण सुखरूप मायदेशी परत जायचे असेल तर भारताला स्वातंत्र्य दिलेच पाहिजे. हे ओळखूनच त्यांनी जाता जाता कुटिल नीतीचा उपयोग करून ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेत्यांच्या गळी फाळणीची योजना भारताचे शेवटचे व्हाइसरॉय लॉर्ड माउंट बॅटन पती-पत्नींनी उतरविली. त्यांनी त्यावेळी राजकीय पक्षांची जी बैठक बोलविली त्या बैठकीला पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, राम लोहिया, जयप्रकाश नारायण, मुस्लीम लीगचे बॅरिस्टर महंमद अल्ली जीना इत्यादी अनेक नेते हजर होते. सदर मीटिंगला महात्मा गांधी उपस्थित होते. त्यांना पंडित नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल या दोघांचा फाळणीच्या बाजूने कल दिसल्यामुळे नाइलाजास्तव महात्मा गांधी यांनी भारत पाकिस्तान फाळणीस उशिरा मान्यता दिली आणि बहुतांश क्रांतिकारकांना व जाणत्या भारतीय जनतेला नको असलेली तडजोडीची फाळणीचे स्वातंत्र्य काँग्रेस श्रेष्ठीनी स्वीकारले.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. त्यावेळचे भारताचे शेवटचे व्हाइसरॉय लॉर्ड माउंट बॅटन यांच्या हस्ते १४ ऑगस्ट १९४७ रोजी रात्री बरोबर १२ वाजता दिल्लीच्या लाल किल्ल्यावर दीडशे वर्षे फडकत असलेले "युनियन जॅक" हे निशाण खाली उतरविले. आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी बरोबर १२ वाजून १ मिनिटांनी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते दिल्लीच्या लाल किल्ल्यावर भारताचे तिरंगी निशाण डौलाने फडकविले. पंडित नेहरू व लक्षावधी भारतीय जनतेचे डोळे आनंदाश्रूंनी ओघळत होते. सर्वांनी भारावलेल्या अंत:करणांनी आपल्या राष्ट्रीय ध्वजाला सलामी दिली त्याच आपल्या तिरंगी राष्ट्रध्वजाला लॉर्ड माउंट बॅटन यांनी सलामी दिली. ज्या ११ हजार हुतात्म्यांनी आपले बलिदान दिले त्यांच्या आत्म्याला शांती मिळाली. देशभर क्रांतिकारकांनी, भारतीय जनतेने स्वातंत्र्याचा आनंद उत्सव साजरा केला. खेड्यापाड्यांत, वाड्या वस्त्यांवर लोकांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली. गांवोगावी

क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांती अग्रणी जी.डी.लाड, स्वातंत्र्यसेनानी यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, किसन वीर, पांडू मास्तर, बर्डे गुरूजी, बाबूजी पाटणकर, शेख काका, क्रांतिवीरांगणा राजुताई पाटील, क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी, इंदूताई पाटणकर, धोंडीराम माळी यांच्या सारख्या प्रमुख क्रांतिकारकांच्या हस्ते ध्वजवंदन करून ध्वजाला सलामी दिली. असे देशभर कार्यक्रम चालू होते. एका बाजूला भारतीय जनता आनंदाउत्सवात मग्न होती. तर दुसऱ्या बाजूला इंग्रज मायदेशात भारत पाकिस्तान फाळणीचा आनंद साजरा करत होते. त्यांच्या कुटिल नीतीला यश आले आणि देशभर हिंदू मुस्लिमांचे दंगे सुरू झाले. त्यातून लाखो हिंदू मुस्लिमांचे मुडदे पडले. स्त्रियांच्या व लहान मुलांच्यावर ज्या पद्धतीने कत्तली केल्या त्यांचे वर्णन अंगावर शहारे आणणारे व मनाला सुन्न करणारे होते. माणूसकीला काळिमा फासणारे होते. कित्येक माता काळजावर धोंडा ठेवून आपल्या मुलांना स्टेशनहून सुटणाऱ्या रेल्वेच्या डब्यात फेकून देत होत्या. त्या मनात म्हणत असतील 'जा. पाखरा जा कुठे नाहीतर कुठेतरी तुला असरा मिळेल तिथे तू सुखात रहा.' अशा माय बहिर्णींच्या मनाची अवस्था काय होत असेल याची कल्पनाच करता येणार नाही. या व्यतिरिक्त पाकिस्तानातून येणारे निर्वासितांचे लोंढे, त्यांची व्यवस्था करता करता सरकारची नाकेनऊ होत होती. कित्येक प्रेतांची विल्हेवाट लावणेही अवघड झाले होते, त्यातून पसरणारी रोगराई अशा दुष्टचक्रात अडकलेला स्वतंत्र भारत. इंग्रज मात्र नामानिराळे राहिले आणि त्यांनी हिंदू मुस्लिमांत पिढ्यान्‌पिढ्यांचे वैर पेरून भारताची कोट्यवधी रुपयांची, सोने नाण्यांची, हिऱ्या मोत्यांची लूट इंग्लंडला मायदेशी घेऊन गेले.

इकडे हिंदु मुस्लिमांचे पेटलेले दंगे शांत करण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी दोन्ही जमातींला शांत करण्यासाठी वणवण फिरत होते. आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. शांतता प्रस्थापित करण्याचे महात्मा गांधीजींचे अहोरात्र चाललेले काम म्हणजे खऱ्या माणूसकीचा साक्षात्कार होता. लोकांचे आणि केवीलवाणी अवस्थेतील स्त्रियांचे दु:ख पाहून या महामानवाचे काळीज करपत होते. १५ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र्य दिनी दिल्ली समारंभाला हजर राहण्यापेक्षा त्यांना हिंदु मुस्लिमांचे अश्रू पुसण्याचे काम महत्त्वाचे वाटले म्हणून महात्मा गांधी नवखाली भागात, गावागावांत वणवण फिरून झोपडी पर्यंत जाऊन गरिबांची दु:खे निवारण्यासाठी अविश्रांत फिरले आणि हिंदु मुस्लिमांना शांत केले. कसले हे स्वातंत्र्य? असल्या तडजोडीच्या आणि फाळणी मान्य केलेल्या बेगडी स्वातंत्र्यासाठी आम्ही लढलो नाही. मागे उल्लेख केल्याप्रमाणे भारतीय जनतेला व अनेक क्रांतिकारकांना हे फाळणीचे स्वातंत्र्य अभिप्रेत नव्हते. त्यांपैकी क्रांतिवीर

नागनाथअण्णा एक होते. परंतु ते झाल्या गत गोष्टींचा शोक करत बसणाऱ्यापैकी नव्हते. त्यांनी परत खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यासाठी पुन्हा लढण्याच्या तयारीला लागले आणि त्या स्वातंत्र्याचे सुराज्य करण्याचे मनात शपथ घेतली. प्रथम त्यांनी आपल्या जिवाभावाचे परम मित्र वसंतरावदादा यांना सांगितले, ''दादा, मी या बेगडी स्वातंत्र्याच्या सत्तेच्या राजकारणात न अडकता खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यासाठी जनतेबरोबर राहण्याचा निर्णय घेतला आहे.'' त्यावेळी दादा अण्णांना म्हणाले, ''आपण दोघे हाडाचे कार्यकर्ते आहोत. स्वातंत्र्याच्या चळवळीत चुकून जगलेलो आहोत. आपण दोघेही शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराचे पक्के पाईक आहोत, त्यांनी उपेक्षित शेतकरी, शेतमजूर, कामगार, गरीब जनता, दलित आणि पीडित समाजाच्या भल्यासाठी केले. तेच आपण करणार. तू जनतेबरोबर राहणार म्हणतोस तर ठीक. पण (गड्या) मला पहिल्यासारखी धावपळ जमणार नाही म्हणून मी सत्तेत राहून तू जे करणार म्हणतोस तेच मी करणार आहे.'' अण्णा दादांना म्हणाले, ''ठीक, आहे दादा. मी बाहेरून रेटा देतो तुम्ही आतून द्या आणि बहुजनांसाठी खरेखुरे स्वातंत्र्य आणू या.'' असा अलिखित करार दोघांमध्ये ठरला आणि त्याप्रमाणे दोघेही कामाला लागले.

क्रांतिवीर नागनाथ अण्णांना खऱ्या-खुऱ्या स्वातंत्र्यसाठी पुन्हा स्वकीयांच्या बरोबर संघर्ष करावा लागला तरी करायचा, या निर्धाराने ते कामाला लागले. खरे-खुरे स्वातंत्र्य म्हणजे कसले होते. माझ्या समजुतीप्रमाणे अजूनही बहुजन समाजातील स्त्रिया भावाला ओवाळताना आणि त्याला आशीर्वाद देताना त्या म्हणतात, ''इडा पिडा टळू दे, बळी राज्य येऊ दे'' या बळीच्या राज्यासाठीच क्रांतिवीर नागनाथअण्णा, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांति अग्रणी जी.डी.बापू, कॉ.दत्ता देशमुख, संतराम पाटील, जीवनराव सावंत, कर्मवीर भाऊराव पाटील, कॉ.यशवंतराव चव्हाण, डॉ.एन.डी.पाटील, माजी आमदार शरद पाटील कुपवाड, दाजीबा देसाई, उद्धवराव पाटील उस्मानाबाद यांच्या सारख्या असंख्य महामानवांनी अगदी ध्येयवेडं होऊन आपापल्या मार्गांनी खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यासाठी शेवटपर्यंत लढत राहिले. पण........?

अण्णांच्या पणचा अर्थ होता. बहुजन समाजातील कष्ट करणारा, राबणारा समाज गुलामीमुक्त व भयमुक्त होऊन स्वतंत्र झाला पाहिजे. श्रमाची व श्रमिकांची प्रतिष्ठा व समताधिष्ठित समाजरचना त्यांना अभिप्रेत होती. ही अण्णांच्या स्वातंत्र्याची संकल्पना होती. स्वकीय शासनकर्त्यांनी शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी आणि शूद्र स्त्री, पुरुष वर्गासाठी रचनात्मक समाज उन्नतीचे कार्य करावे, यासाठी अण्णांचा स्वातंत्र्योत्तर लढा होता.

***

# पुन्हा शिक्षण

१९४२ साली शिक्षणाचा त्याग करून नागनाथ अण्णा देशाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत पडले, त्या वेळी ते मॅट्रिकच्या वर्गात शिकत होते. देश स्वतंत्र झाल्याशिवाय पुढे शिक्षण घ्यायचे नाही आणि लग्न सुद्धा करायचे नाही अशी मनोमन त्यांनी शपथ घेतली होती. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला आणि क्रांतिवीर नागनाथअण्णांनी पुन्हा राजाराम हायस्कूल मध्ये मॅट्रीकच्या वर्गात प्रवेश घेतला, पुढे त्यांनी दररोज शाळेला जायला सुरुवात केली. ही गोष्ट अय्यर सरांना कळाली, तेव्हा ते आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले, ''नागनाथांचे १९४२ च्या स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे शिक्षणाचे नुकसान झाले आहे. खरं तर नागनाथ हा हुशार विद्यार्थ्यांच्या यादीतील एक विद्यार्थी आहे. एके काळी त्यांनी राजाराम हायस्कूलमध्ये पहिला नंबर मिळवून पाच रुपयांची स्कॉलरशिप पटकावली होती. त्या काळात एका पेक्षा एक हुशार विद्यार्थी होते. त्यांत पहिला नंबर काढणे ही बाब फार अवघड होती. ही अवघड बाब नागनाथांनी शक्य करून दाखविली. तसे ते माझे आवडते व हायस्कूलमध्ये आर्दश विद्यार्थी होते.''

एक दिवस अय्यर सरांनी अण्णांना घरी बोलावून घेतले आणि म्हणाले, ''नागनाथ तुम्ही मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याचा निर्णय घेतलात हे योग्य केलेत. तुम्ही माझ्या घरी दोन तास यायचं, मी आपली इंग्रजी व गणित यादोन विषयांची तयारी करून घेणार आहे.'' त्या प्रमाणे नागनाथ अण्णा अय्यर सरांच्या घरी दररोज दोन तासासाठी जायला लागले. त्यांच्या अवघड दोन विषयांचा प्रश्न मिटला असला तरी बाकीच्या विषयांचा प्रश्न होता. तो त्यांचे मित्र नानासाहेब घाटगे यांनी मिटवला. ते


दररोज रात्री मालती बंगल्यावरील अण्णांनी घेतलेल्या भाड्याच्या खोलीवर जाऊन इतर विषयांची तयारी करून घेत होते. १९४२ ते १९४७ या स्वातंत्र्य लढ्याच्या काळात शिक्षणामध्ये खंड पडल्यामुळे परत अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करणे सुरुवातीला अण्णांना जड जात होते. अभ्यासाला बसले की त्याच्या डोळ्यांपुढे बेचाळीसचे प्रसंग उभे रहायचे. नानासाहेब घाटगे मन लावून त्यांना शिकवायचे पण त्यांचे मन त्या जुन्या काळात असायचे. त्यामुळे त्यांच्या डोळ्यांवर सतत झापड यायची आणि ते अधेमधे झोपायचे. नानासाहेब त्यांना कधी हळूवारपणे तर कधी रागवायचे आणि म्हणायचे,''तुम्ही झोपणार असाल तर मी जातो'' लटक्या रागाने दरवाज्यापर्यंत उठून जायचे. पायात चप्पल घालता घालता म्हणायचे ''आता परत तुम्ही झोपणार नाही ना ?'' अण्णा म्हणायचे,'नाही.' परत नानासाहेब यायचे आणि त्यांना शिकवायला लागायचे. परत अण्णांना झोप आलेली असायची. नानासाहेब परत रागवायचे, जातो म्हणायचे असे काही दिवस चालले होते. नानासाहेबांना माहीत होते त्यांच्या शिक्षणात पडलेला पाच वर्षांचा खंड त्यामुळे त्यांचे अभ्यासाकडे मन लागत नाही. ते हुशार आहेत. त्यांचं कार्य मोठे आहे. याच नागनाथांनी एके काळी गणित, भूमिती, सारख्या अवघड विषयांत १०० पैकी शंभर गुण मिळवले होते. तेव्हा आपण चिकाटी सोडायची नाही असे डॉ.नानासाहेब घाटगेंनी ठरवले होते. त्यांच्या चिकाटीला यश आले आणि नागनाथ अण्णा मनापासून अभ्यास करायला लागले. तो काळ १९४८-४९ चा होता. त्यांची मॅट्रिकच्या परीक्षेची पूर्ण तयारी झाली होती.

परीक्षेचा दिवस उजाडला, परीक्षा सुरू झाली एक एक विषयाचे पेपर क्रांतिवीर अण्णांनी दिले. झालेल्या विषयांचे पेपर तसे बरे गेले होते. उद्या गणिताचा पेपर होता म्हणून ते आपल्या खोलीत अभ्यास करत बसले होते. ते गणित सोडविण्यात मग्न होते. योगायोगाने म्हणा नाहीतर काही म्हणा, गणिताचा पेपर फुटला होता. त्या पेपरची प्रश्न पत्रिका कोणाकडून तरी अण्णांच्या मित्राला मिळाली होती. त्याने विचार केला आपल्या मित्राच्या शिक्षणाचे चळवळीमुळे नुकसान झाले आहे. तसं म्हणाल तर गणिताचा पेपर अवघड होता. तेव्हा हा पेपर अण्णांच्याकडून सोडवून घ्यावा असे मित्राच्या मनात आले. परंतु नागनाथअण्णांचा मित्राला स्वभाव माहीत होता. प्रश्नपत्रिका द्यायला गेलो तर ते घेणार तर नाहीतच, शिवाय त्यांचा राग माझ्यावर कायमचा राहणार. मित्राने विचार केला आणि आपल्या कुमार नावाच्या मित्राला त्यांच्याकडे पाठवावयचे ठरवले. हे बघ कुमार, तू नागनाथ

अण्णांच्या खोलीवर जायचं. ही उद्याच्या गणिताची फुटलेली प्रश्नपत्रिका पण लक्षात ठेव त्यांना यातलं काहीही बोलायचे नाही. फक्त एक एक गणित त्यांच्याकडून हुशारीने सोडवून घे. त्याप्रमाणे कुमार अण्णांच्या खोलीवर आला त्यांच्या जवळ बसता बसता म्हणाला, ''काय, उद्याच्या पेपराची तयारी चालली वाटते.'' अण्णा म्हणाले, ''होय कुमार, उद्या गणिताचा पेपर आहे म्हणून गणित सोडवत बसलोय'' ''अस्स होय, मग मी एक गणित सांगू का ? सोडवाल का ? अण्णा म्हणाले,'' ''सोडवतो सांग.'' कुमारने प्रश्न पत्रिकेतले पहिले गणित सांगितले, ते अण्णांनी बरोबर सोडविले. कुमार म्हणाला, ''ते गणित सोपे होते म्हणून सोडविलंसा. दुसरे एक अवघड गणित सांगू का ?'' अण्णा म्हणाले, ''सांग'' मग त्याने प्रश्नपत्रिकेतल्या दुसऱ्या प्रश्नातील गणित सांगितले, तेही गणित अण्णांनी बरोबर सोडवले. कुमार म्हणाला, ''ठीक आहे. आता तिसरे गणित घ्या सांगतो, तेवढे सोडवा बघु'' असे कुमार म्हटल्या बरोबर नागनाथ अण्णांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली, त्यांना कुमारचा संशय आला. त्यांनी रागातच कुमारला दरडावले, 'काय भानगड आहे ? कुमार खरं सांग. एक गणित सोडवले, दुसरे सोडवले तरी आणखी तिसर गणित सांगतो म्हणतोस. खरं सांग काय भानगड आहे ?. तसा कुमार लटपटला. गयावया करत म्हणाला, ''उद्याच्या गणिताचा पेपर फुटलाय, तुम्ही तो पेपर घेणार नाही तेव्हा तुम्हाला यातलं काहीही समजू न देता तुमच्याकडून एक एक गणित सोडवून घ्या, म्हणून तुमच्या मित्राने पाठवले आहे.'' असे सांगत कुमार खिशात हात घालून प्रश्नपत्रिका बाहेर काढणार येवढ्यात अण्णा त्याच्यावर इतके जोरात कडाडले की खिशातली प्रश्नपत्रिका काढण्याअगोदर त्याचा हात तसाच खिशात कोंबला आणि त्याला रागावून म्हणाले, ''ऊठ इथून, पहिला चालता हो.'' असे म्हणत त्याला दंडाला धरून खोलीतून बाहेर काढले. पुन्हा इकड फिरकलास तर बघ असे म्हणत खोलीचे दार लावले आणि परत शांत मनाने गणित सोडवीत बसले.

सकाळी लवकर उठून आंघोळ पाणी, न्याहरी करून परत त्यांनी परीक्षेच्या वेळेपर्यंत तयारी केली. वेळेवर पेपरला जायचं म्हणून खोलीवरून बाहेर पडले. रस्त्यातच बी.टी.कॉलेज जवळच करीआप्पाची खानावळ होती, तिथे जेवले आणि राजाराम हायस्कूलच्या हॉलमध्ये आपल्या बैठक क्रमांकाच्या जागेवर येऊन बसले. थोड्याच वेळात घंटा झाली. परीक्षक सुपरवायझर प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका घेऊन आले. पहिल्यांदा ओळीनं उत्तर पत्रिका हॉलमधील सर्व मुलांना दिल्या. उत्तर पत्रिकेनंतर त्याच क्रमाने प्रश्नपत्रिकाही सर्वांना दिल्या. प्रश्नपत्रिका हातात पडताच अण्णांनी प्रश्न पत्रिका

वाचायला सुरुवात केली. पहातायत तर पहिला प्रश्न कुमारने सांगितलेला. दुसरा प्रश्नही कुमारने सांगितलेला. संपूर्ण प्रश्नपत्रिका वाचली. एकूण प्रश्न दहा होते आणि प्रश्नपत्रिकेवर सूचना होती दहा पैकी कोणतेही आठ प्रश्न सोडवा, स्वत:च्या मनाला प्रामाणिक राहून जीवन जगणाऱ्या अण्णांनी प्रश्नपत्रिकेतील अगोदर समजलेल्या प्रश्नांना खाट मारली. समजलेले प्रश्न सोडवयाचे नाहीत, भले ते आपल्या बुद्धीने सोडवले असले तरी प्रश्न आपणाला अगोदर समजलेत ही बाब त्याच्या मनाला खटकली होती. म्हणून त्यांनी अगोदर समजलेले पहिले दोन प्रश्न न सोडवता, राहिलेले आठ प्रश्न सोडवले व चांगल्या मार्कानि पास झाले. अण्णांच्या सारखी स्वत:शी प्रामाणिक राहणारी माणसे फार दुर्मीळ आहेत. अण्णा आपल्या मित्रांना व कार्यकर्त्यांना म्हणायचे, ''आपणाला जगाला फसवणे सोपे आहे पण स्वत:च्या मनाला फसवणं फार अवघड आहे. म्हणून मी तुम्हांला एवढच सांगतो, तुम्ही स्वत:च्या मनाला प्रामाणिक राहून काम करा. तुमच्या जीवनात अपयश कधीच येणार नाही. हा माझा अनुभव आहे.''



मॅट्रीक परीक्षार्थी विद्यार्थी

**नागनाथ नायकवडी**

सन- १९४९

# चरित्र नायक व हुतात्म्यांची स्मारके

हुतात्मा किसन अहिर व हुतात्मा नानकसिंग यांचा पहिला स्मृतिदिन २५ फेब्रुवारी १९४७ रोजी वाळव्यात अण्णांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहाने साजरा केला. त्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे साने गुरूजी होते. शिराळा पेठा व वाळवा आणि आसपासच्या खेड्यांतून हजारो शेतकरी स्त्री पुरुष या सभेला जमले होते. सारे स्वातंत्र्य सैनिक हजर होते. सभेत एकमुखाने हुतात्म्यांची स्मारके लवकरात लवकर उभा करण्याचे ठरले.

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर नागनाथ अण्णांनी राजाराम कॉलेजमध्ये एफ.वाय. च्या वर्गात प्रवेश घेतला. आपल्या शिक्षणाबरोबर स्वातंत्र्याच्या चळवळीत हुतात्मा झालेल्या आपल्या सहकाऱ्यांच्या स्मारकाच्या कामासाठी त्यांनी पहिल्या स्मृतिदिनात सांगितल्याप्रमाणे हालचाल सुरू केली. स्मारक कुठल्या स्वरूपाचे असावे ते जनतेच्या कसे उपयोगी पडेल, याचा सारा विचार त्यांनी करून ठेवला होता. तो विचार आपल्या बेचाळीसच्या सहकाऱ्यांना आणि शेतकऱ्यांना सांगण्यासाठी ते वाळव्यात मीटिंग घेण्याच्या उद्देशाने आले होते. अण्णा आलेत म्हटल्यावर जुने-नवे सर्व कार्यकर्ते मीटिंगसाठी जमले होते. नागनाथ अण्णा सर्वांना उद्देशून म्हणाले, ''आपणाला मिळालेले स्वातंत्र्य फसवे आहे. यातून बाहेर पडण्यासाठी बहुजन समाजाला शहाणं करण्याशिवाय तातडीचा दुसरा कोणताही पर्याय नाही. लोकशाहीचा मुख्य आधार म्हणजे सर्व सामान्य जनता जेवढ्या प्रमाणात शहाणी होईल तेवढ्या प्रमाणात लोकशाही यशस्वी होईल. प्रामुख्याने खेडेगावांमध्ये मुख्य उणीव ही माध्यमिक

शिक्षणाची आहे आणि सर्वच ठिकाणी ताबडतोबीने सरकारही शिक्षणाची सर्वत्र सोय करू शकत नाही. खेडेगावातील शेतकऱ्यांची व सामान्य जनतेची इच्छा असूनही त्यांना आपल्या मुलांना पुढील शिक्षणासाठी शहरात पाठविणे, खर्चाकडून परवडत नाही अशी अवस्था आहे. अशी परिस्थिती आज सर्व खेड्यांची आहे. या परिस्थितीवर मार्ग काढण्याचा प्रयत्न कुवतीप्रमाणे कार्यकर्ते ठिकठिकाणी करत आहेत.'' ते पुढे म्हणाले, ''आपण वाळवे आणि आसपासच्या परिसरातील भागाचा विचार करता आपल्या हुतात्मा झालेल्या सहकाऱ्यांच्या स्मारकाचा विचार करताना ते नुसते स्मारक न होता लोक उपयोगी व्हावे.'' म्हणून क्रांतिवीर अण्णांनी प्रथम हुतात्मा किसन अहिर यांच्या नावाने माध्यमिक विद्यालय व हुतात्मा नानकसिंग यांच्या नावे मुलांचे मोफत वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय सर्व लोकांना बरोबर घेऊन एकमताने घेतला. विद्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये वाळव्या बरोबर अहिरवाडी, पडवळवाडी, शिरगाव ही छोटी खेडी सामील करून घेतली. त्या शिक्षण संस्थेला 'किसान शिक्षण संस्था' असे नाव दिले. संस्थेची घटना तयार करत असताना कार्यक्षेत्रातील सामान्यांतील सामान्य माणसाला संस्थेचे सभासद होता आले पाहिजे म्हणून किसान शिक्षण संस्थेची सभासद वर्गणी फक्त चार आणे ठेवली. उद्देश एवढाच की ठरावीक मंडळीची संस्थेत मक्तेदारी न होता सर्वांसाठी संस्थेचे दार खुले असावे. प्रत्येकाला संस्था आपली वाटली पाहिजे. क्रांतिवीर अण्णा नेहमी म्हणत, ''कुठल्याही सहकारी संस्थेचे डबके न होता वाहता झरा झाला पाहिजे.''

प्रत्यक्ष कामाची मुहूर्तमेढ अण्णा व सहकाऱ्यांनी २६.२.१९४८ रोजी रोवली आणि दुसऱ्या दिवशी २७.२.१९४८ रोजी किसान शिक्षण संस्थेची कार्यकारिणी कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांच्या एकमताने निवड जाहीर सभेतून केली. ती कार्यकारणी पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. भाऊ गणपती कदम, | अध्यक्ष |
| २) | श्री. भरमा बाबाजी मगदुम, | उपाध्यक्ष |
| ३) | श्री. लक्ष्मण धोंडी नायकवडी, | संचालक |
| ४) | श्री. आकाराम भाऊ नायकवडी, | संचालक |
| ५) | श्री. संतू विठू भोई, | संचालक |
| ६) | श्री. जिनगोंडा देवाप्पा पाटील, | संचालक |
| ७) | श्री. नाना सिताराम परीट (शिंदे), | संचालक |
| ८) | श्री. भरमा दादा मगदूम, | संचालक |

९) श्री. हरी भाऊ पाटील, संचालक
१०) श्री. नबीसाहेब उस्मान मेवेकरी, संचालक
११) श्री. रामचंद्र हरी हर्डीकर, चिटणीस

अशा सर्वसामान्य लोकांना (शेतकऱ्यांना) बरोबर घेऊन आपल्या सहकाऱ्यांच्या स्मारकाच्या कामाला क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी सुरुवात केली आणि सर्व गावकऱ्यांच्या संमतीने किसान शिक्षण संस्थेच्या वतीने ''हुतात्मा किसन अहिर विद्यालय'' सुरू केले. तो दिवस पुराणकाली आदर्श त्यागमूर्ती श्रीराम यांच्या जन्मतिथी दिवशी म्हणजे रामनवमीस शके १८७१ दिनांक ७.४.१९४९ रोजी झाली. विद्यालयाची सुरुवात झाल्याबरोबर पहिली अडचण म्हणजे विद्यालयास योग्य अशी इमारतीची व जागेची. जागा शासनाची होती. ती संस्थेच्या ताब्यात नव्हती म्हणून कलेक्टर यांच्याकडून संस्थेच्या नावे केली. खेडे गांवात विद्यालयाची योग्य इमारत बांधल्याखेरीज इतर मार्गाने इमारत मिळणे अत्यंत कठीण असते म्हणून अण्णांनी व गावकऱ्यांनी प्रत्येकाच्या ऐपतीचा विचार करून एकरी दोन रुपयांप्रमाणे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या इमारतीसाठी वर्गणी जमवून उत्साहात काम सुरू केले. इमारतीच्या कामाचा आरंभ माजी जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष पूज्य त्यागमूर्ती श्री रामानंद भारती स्वामी यांच्या हस्ते दिनांक २४.१०.१९४९ रोजी केला. त्यावेळी हुतात्म्यांना रायफलच्या एकवीस बारांची सहकाऱ्यांनी सलामी दिली. पुढे इमारतीच्या कामाला चांगलीच गती आली. हुतात्मा किसन अहिर स्मारक समिती व गावकरी दिवसभर फिरून वर्गणी गोळा करत होते. गावात उत्साहाचे वातावरण होते. इमारतीच्या कामासाठी वाळव्यातील प्रत्येक घरा-घरातील घटकांनी त्याला शक्य तेवढी मदत केली. तरी इमारतीला फंड अपुरा पडत होता. मध्यंतरी बांधकाम निम्म्यावर आल्यावर पैशा अभावी बंद पडले. ते काम क्रांतिमाता सौ. लक्ष्मीबाई नायकवडी यांनी आपले सर्व दागिने देऊन सुरू केले. कार्यकर्त्यांत पुन्हा उत्साह आला. पुढे नव्या उमेदीने क्रांतिवीर नागनाथ अण्णा प्रमुख मंडळींना घेऊन सांगलीतील व्यापाऱ्यांकडून व इतर मित्र मंडळींकडून निधी गोळा करत होते. तरी निधी अपुरा पडत होता. म्हणून शेवटी १९४९ साली अण्णांनी स्मारक समितीतील कार्यकर्त्यांसह मुंबई गाठली. मुंबईत त्यांना पान बाजारमध्ये, कोहिनूर मिल चाळीत, लालबाग, मुलुंड, टाटा मिल कामगार व इतर मित्रांनी स्वत: देणग्या तर दिल्याच शिवाय इतर ठिकाणांहून ही निधी जमवण्याच्या कामात उत्साहाने साहाय्य केले.

इमारतीच्या शेवटच्या टप्प्यात काम आले त्या वेळी श्री.शिवाजीराव उर्फ अप्पासाहेब थोरात सरकार यांनी पूर्ण इमारतीवर बेंगलोरी कौले घालण्यासाठी साहाय्य केले आणि इमारतीचे चार खोल्यांचे काम पूर्ण झाले. थोड्याच दिवसांत हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या इमारतीचे उद्‌घाटन दोन तपे ज्ञानसत्र चालू ठेवणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शुभहस्ते २५ फेब्रुवारी १९५२ रोजी केले. क्रांतिवीर नागनाथ अण्णा उद्‌घाटन कार्यक्रमात बोलताना म्हणाले, ''हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या स्मारकाच्या कामासाठी वाळव्यातील जनतेने जसे भरभरून सहकार्य केले तसेच सहकार्य बाहेरीलही जनतेने माझ्या मित्रांनी वेळोवेळी साहाय्य करून हे ज्ञानसत्र चालू ठेवण्याचे कार्य केले. त्या सर्वांचा वैयक्तिक नामोल्लेख करणे आभार मानणे स्थलाभावास्तव शक्य नाही. तथापि इमारतीचा प्लॅन तयार करून देणारे इंजिनिअर श्री.सोहनी, बांधकामाच्या अडीअडचणीत मार्गदर्शन करणारे रयत शिक्षण संस्थेचे श्री.माने, श्री.अय्यर गुरूजी व शाळेच्या कार्यासंबंधी गावातील महिला समाजात जागृती करणाऱ्या डॉ.कु.चंद्राताई शेणोलीकर भिलवडी व या भागातील सर्वच सार्वजनिक कार्यात आपुलकीने भाग घेणारे श्री.शंकर भाऊ किर्लोस्कर यांचा निर्देश करून या संस्थेच्या बाहेरील सर्व हितचिंतकांबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.'' कर्मवीर भाऊराव अण्णांनी आपल्या उद्‌घाटनपर भाषणात हुतात्मा किसन अहिर विद्यालयाची भरभराटी होओ असा आशीर्वाद देऊन, 'मी या संस्थेच्या पाठीशी सतत असल्याचे जमलेल्या जनसमुदायाला सांगितले.' पुढे ते म्हणाले, ''नागनाथ अण्णांनी स्वातंत्र्य लढ्यातील आपल्या सहकाऱ्यांची आठवण ठेवून लोक उपयोगी जे स्मारक केले ते कौतुकास्पद आहे. मुळात नागनाथअण्णांचा पिंड हा शैक्षणिक कार्य करणारा आहे. १९३९-४० मध्ये कोल्हापूरला शिक्षण घेत असताना त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने डोंगराळ दुर्गम भागातील मुलांच्यासाठी व्हॉलंटरी शाळा काढल्या होत्या असा हा दूरदृष्टी असणारा नागनाथ या संस्थेच्या पाठीशी आहे. एक दिवस महाराष्ट्रात या संस्थेचे नाव होईल. अशी माझी खात्री आहे. बोलण्या सारखे खूप आहे. पुढच्या भेटीत बोलू. धन्यवाद. जय महाराष्ट्र.'' अत्यंत चांगल्या प्रकारे कार्यक्रम पार पडला.

हुतात्मा किसन अहिर स्मारक समितीचे प्रमुख सदस्य शंकर हरी परुळेकर यांनी आपल्या आभारपर भाषणात बोलताना, 'विद्यालयाचे सुरुवातीपासून ज्या निरनिराळ्या व त्यातल्या त्यात शैक्षणिक व्यवसायातील ज्या ज्या व्यक्तींची आम्हांस वेळोवेळी जी मदत झाली त्या बद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. या शिवाय बाहेरील व्यक्तींनी वैयक्तिक अडीअडचणींना तोंड देऊन शहर वस्तीपासून दूर

असलेल्या खेडे गावामध्ये जे ज्ञानदान केले त्याबद्दल येथील गावकरी त्यांचे कायमचे ऋणी आहेत. आतापर्यंत सौ.सरलाबाई वसंतराव नाईक बी.ए.बी.टी., श्री.एम.जी. कुलकर्णी व विद्यमान मुख्याध्यापिका सौ.सुमित्रा संतराम पाटील बी.ए.बी.टी. या बाहेरील व्यक्तींचे बहुमोल मार्गदर्शन आमच्या संस्थेला लाभले आहे. स्थानिक मंडळीत श्री.बी.ए.भिलवडे इंटर आर्ट्स, श्री.शेटे बी.एस्सी., श्री.मोटे ए.डी.बी.एस्सी. यांचीही मदत फार होत आहे. या कार्याचा जास्तीत जास्त बोजा येथील लोकांनीच उचलावा हा हेतू मनात धरून श्री.अे.डी.मोटे सर यांना संस्थेने मुद्दाम बी.टी. च्या अभ्यासक्रमासाठी या वर्षी संस्थेच्या खर्चाने पाठवले आहे. आज या संस्थेत नवव्या इयत्तेपर्यंत वर्ग चालू आहेत व पुढील सालापासून दहावी व अकरावी चालू करण्याची जिद्द आहे. या कार्यक्रमासाठी अनेक अडचणी बाजूला सारून कर्मवीर भाऊराव पाटील कार्यक्रमाला हजर राहून आपणाला बहुमोल मार्गदर्शन केले त्या बद्दल संस्थेच्या व तुम्ही सर्व गावकऱ्यांच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो. आपण सर्व गावकरीही वेळात वेळ काढून या कार्यक्रमाला आलात त्याबद्दल तुमचे आभार मानतो. चुकून माकून कुणाचे आभार मानायचे राहिले असतील तर मला त्यांनी माफ करावे धन्यवाद.' आभार मानून झाल्यानंतर कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले. पुढे क्रांतिवीर नागनाथअण्णा महारवतन रयतावा करणाऱ्या चळवळी पाठीमागे लागले.




हुतात्मा किसन अहिर पुतळा उद्घाटन प्रसंगी भाषण करताना क्रांतिसिंह नाना पाटील उपस्थित मा. नागनाथ अण्णा, कॉ. दत्ता देशमुख, मा. वसंत दादा पाटील, मा. यशवंतराव चव्हाण व मान्यवर.

# महार वतने
# रयतावा करण्याचा संघर्ष

हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या कामानंतर क्रांतिवीर नागनाथअण्णांनी आपले दुसरे सहकारी हुतात्मा नानकसिंग यांच्या नावे मुलांचे मोफत वसतिगृह सुरू केले. या शैक्षणिक कामाबरोबर इतर सामाजिक कामांमध्ये मैल कुली कामगारांची संघटना बांधायचे काम हातात घेतले. त्यासाठी प्रथम संपूर्ण तालुक्यातील प्रत्येक गावात पायी जाऊन तिथल्या शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या अडचणी समजून घेतल्या. त्याच बरोबर मैल कुलींना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली आणि त्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा केला व त्यांची नवीन संघटना बांधली. अशा अनेक कामांत अण्णा स्वत:हून गुंतवून घेत होते. त्याचाच एक भाग म्हणून त्या कामाबरोबर महारवतनातून येणाऱ्या गुलामगिरीच्या विरोधात तासगाव तालुका, वाळवे तालुक्यातील ऐंशी एक गावी पायी प्रवास करून गावोगावी दलितवस्तीत जाऊन जाहीर सभेतून लोकांची जागृती केली आणि महारवतनातील जमिनी रयतावा झाल्याच पाहिजेत म्हणून लोकांना संघर्षाला तयार केले. या लढ्याची तयारी म्हणून ऐंशी गावातील जनतेची एक मोठी परिषदेत वाळव्यात घेऊन महार वतनाच्या जमिनी रयतावा करण्याचा एकमताने ठराव मांडला. तो ठराव सर्वांच्या टाळ्यांच्या गजरात पास करून घेतला. त्याच सभेत क्रांतिवीर अण्णांनी लोकांना आवाहन केले. जो पर्यंत सरकार आपली मागणी मान्य करत नाही तो पर्यंत हा लढा चालूच ठेवावयाचा. या परिषदेतून दलितसमाजात जागृती झाली, घटनेने दिलेले समानतेचे हक्क मिळालेच पाहिजेत म्हणून ते लढायला तयार झाले. अशा पद्धतीने उसंत न घेता क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे पीडित लोकांना न्याय मिळवून

देण्यासाठी निरनिराळ्या स्तरांवर लढे चालूच होते. त्याचाच एक भाग म्हणून ब्राह्मण, क्षेत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ग समाजाचे पडून विषमतेचे बीज हजारो वर्षांपूर्वी मनुस्मृतीने समाजात पडले होते. ते उखडण्यासाठी बहुजन समाजाला जाणते करून या रूढीच्या परंपरेला संपविण्यासाठी नागनाथ अण्णांनी पुढाकार घेतला. अशा चालीरीतींचा नायनाट करण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांनी आपल्या हयातीत अनेक प्रयत्न केले होते. परंतु या वर्णव्यवस्थेची मूळं अगदी खोलवर रुजलेली होती. ती उपटण्यासाठी सर्व बहुजन समाजाला जागे करण्यासाठी अनेक समाजसुधारक पुढारी आपापल्या परीने कामाला लागले होते. त्याच प्रमाणे नागनाथ अण्णाही त्या कामात कार्यरत होते.

महारवतनाच्या बेड्यातून दलितांना मुक्त करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिल्यांदा १९ मार्च १९२८ रोजी ब्रिटिश कौन्सिलमध्ये महारवतने खालसा करून रयतावा करण्यासाठी बील मांडले. त्याला इंग्रजी सरकारने फार मोठा विरोध करून ते बील हाणून पाडले. तरी डॉ.आबेडकरांनी चिकाटी सोडली नाही. पुन्हा त्यांनी १७.९.१९३७ रोजी तेच बील मांडले परंतु त्याला पाठिंबा न मिळाल्यामुळे ते त्यांना परत घ्यावे लागले. छत्रपती शाहू महाराजांनी मात्र कोल्हापूर संस्थानातील महारवतने खालसा करण्याची क्रांती केली.

१५ ऑगस्ट १९४७ देश स्वतंत्र झाला. आता तरी आपणाला न्याय मिळेल असे दलित समाजाला वाटत होते. पण तसे झाले नाही म्हणून त्यांना स्वकीय सरकार बरोबर झगडावेच लागेल. १९४७ साली तासगाव तालुक्यातील पलूस या गावी श्री.बी.सी.कांबळे यांनी दलित लोकांनी सुवर्णाची कामे बदं करावीत व महार वतनी जमिनी रयतावा करावीत म्हणून आंदोलन छेडले होते. त्यासाठी नागनाथ अण्णांनी त्यांना पाठिंबा दिला होता. त्या पाठिंब्यामुळे त्या कामाकडे सरकारचे लक्ष वेधले. सरकार बरोबर सतत क्रांतिवीर नागनाथ अण्णांना संघर्ष हा करावाच लागत होता. परंतु अण्णांचा संघर्ष लोकशाही मार्गाने चालला होता. तोडफोडी मार्गाचा त्यांनी कधीही वापर केला नाही. परंतु संघर्ष करून लोकांचे प्रश्न मात्र त्यांनी बरेच सोडवून घेतले होते. शेवटी संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यानंतर यशवंतराव चव्हाण सरकारने कनिष्ठ महारवतन खालसा करण्याचे बील विधानसभेत मांडले व ते पासही झाले.

***

# चरित्र नायक–स्वकीय सरकार बरोबर दोन हात

सन १९४९ साली क्रांतिवीर नागनाथ अण्णा राजाराम कॉलेजमध्ये एफ.वाय.बी.ए.च्या वर्गात रुजू झाले. आपल्या शिक्षणाबरोबर हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी लागणारा निधी लोक वर्गणीतून जमा करत होते. सहकाऱ्यांच्या मदतीने विटा घालणे, चुनखडी गोळा करणे, त्याची भट्टी लावणे वगैरे कामात स्वत: राबत होते. माती कालवण्यापासून भट्टीत चुनखडी टाकण्याच्या कामगार, शेतकरी, कार्यकर्ते यांच्या माळेत उभे राहून डोक्यावर पाट्या वहात होते. गवंड्याच्या हाताखाली विटा, चुना देण्याचे काम करत होते. त्यांना कुठल्याही कामात कमीपणा वाटत नव्हता.

एका बाजूला कॉलेजचा अभ्यास तसेच दुसऱ्या बाजूला शेतमजूर, कामगार,कष्टकरी शेतकऱ्यांचा न्याय मागणीसाठी स्वकीय सरकार बरोबर शांततेच्या मार्गाने लढे करत होते. स्वातंत्र्य मिळाले तरी दक्षिण साताऱ्यातील सुडाचे राजकारण चालूच होते. सातारा जिल्ह्यामध्ये शांततेचे व सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे म्हणून प्रमुख स्वातंत्र्यसैनिकांची बैठक मुंबई इलाख्याचे गृहमंत्री मोराजी देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत गृहमंत्र्यांचे पार्लमेंटरी सेक्रेटरी यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकाराने गृहमंत्र्यांच्या मलबार हिल वरील सह्याद्री बंगल्यावर बोलविली होती. त्या बैठकीत सर्वश्री क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी वाळवा, वसंतदादा पाटील सांगली, बाबूजी पाटणकर कासेगाव, शेख काका येळगाव पाटण, किसन वीर सातारा, धन्वंतरी वैद्य कासेगाव, डी.जी.देशपांडे इस्लामपूर, पांडू बोराटे खानदेश ही सर्व मंडळी सह्याद्री

बंगल्यावर पोहचली. बैठकीची व्यवस्था अर्ध गोलाकारमध्ये वेताच्या खुर्च्या ठेवून केली होती. शिष्ट मंडळातील सर्व प्रतिनिधी खुर्च्यावर जाऊन बसले होते. सर्वजण दिसतील अशा पद्धतीने गृहमंत्री मोरारजी देसाई यांची खुर्ची ठेवली होती. गृहमंत्री मोरारजी देसाई यांना पूर्वीपासूनच साताराच्या प्रतिसरकार व त्यामध्ये काम करणारे नाना पाटील व त्यांचे सहकारी नागनाथ अण्णा, जी.डी.बापू वगैरे सर्वच सातान्यातील भूमिगतांच्या बद्दल मनात आकस होता. थोड्या वेळातच गृहमंत्री आले आणि आपल्या खुर्चीवर बसले. यशवंतराव चव्हाण यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या ओळखी करून द्यायला सुरुवात केली. त्या प्रसंगाची आठवण सांगताना अण्णा म्हणाले,"प्रथम वसंतदादांची ओळख करून दिली. दुसरा नंबर किसन वीरांचा झाला. तिसरा नंबर धन्वंतरी वैद्यांचा झाला." पुढे यशवंतराव चव्हाण म्हणाले, "हे वाळव्याचे नागनाथ नायकवडी" माझे नाव ऐकल्याबरोबर मोरारजी देसाई उपरोधाने म्हणाले,"हा आपणच नागनाथ नायकवडी ?"

मी तेवढ्याच आवेशात म्हणालो, "होय मीच नागनाथ नायकवडी"

मोरारजी देसाई म्हणाले, "आपण मोठे पुढारी झालात."

मी म्हणालो, "आपण कशावरून म्हणता आहात ?"

मोरारजी देसाई, मी इस्लामपूरला आलो त्यावेळी आपण मला भेटला नाही.

मी म्हणालो, तुमच्या पुढे भूमिगतांची बाजू आचार्य जावडेकर मांडणार होते.

मोरारजी देसाई म्हणाले, "आपण का भेटला नाही."

मी म्हणालो, "मला पुढाऱ्यांना भेटायची सवय नाही."

असे माझ्यात व मोरारजींच्यात संवादाचे खटके होत होते. यशवंतराव चव्हाण, गृहमंत्र्यांच्या खुर्ची पाठीमागे उभे होते. ते मला गप्प बसा म्हणून आपल्या ओठावर बोट ठेवून सांगत होते. परंतु मला राग आवरता येईना, शेवटी मी एकदम बैठकीतून रागाने उठलो. खुर्ची सरकन मागे सरकवली आणि चालायला लागलो. माझ्याप्रमाणे सर्व शिष्टमंडळ एकदम उठले. त्यांनीही माझ्यासारख्या खुर्च्यां भर्रकन मागे सरकवल्या व माझ्या बरोबर सर्वजण सह्याद्री बंगल्याच्या पायऱ्या उतरायला लागले. माझ्या जवळ वसंतरावदादा आले. त्यांनी माझ्या पाठीवर धाप मारली आणि म्हणाले, "वारे बहाद्दरा ! ठीक केलस सातान्याच पाणी कोणी नाही कोणी दाखवायला पाहिजे होतं, ते तू दाखवलस."

मुंबईहून परत आलेले अण्णा कोल्हापूरला राजाराम कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थी मित्रांना भेटून त्यांच्याकडून एफ.वाय.च्या नोट्स घेऊन परत वाळव्याला आले. हुतात्म्यांच्या स्मारकाच्या कामासाठी आर्थिक अडचणी खूप होत्या. तरी पण लोकांच्यात जोश आणि उत्साह दांडगा होता. शेतकऱ्यांनी अण्णांना वर्गणीसाठी एक

तोडगा सुचविला. गावात हायस्कूलसाठी वर्गणी गोळा करावयाची तर सर्वांची परिस्थिती सारखी नाही, तेव्हा मागे ठरल्याप्रमाणे शेतकऱ्यांच्याकडून वर्गणी घेताना जमिनीच्या क्षेत्राप्रमाणे एकरी दोन रुपये वर्गणी बसवूया, म्हणजे सर्वांना सारखा न्याय मिळेल. त्याप्रमाणे गावात सर्वत्र जमिनीच्या क्षेत्राप्रमाणे वर्गणी उत्साही वातावरणात गोळा होऊ लागली. गावाच्या मानाने खर्चाचा आवाका मोठा होता. शेतकरी आनंदाने वर्गणी देत होते. अण्णांच्या पाठीमागे कॉलेजच्या पहिल्या वर्षाचा अभ्यास आणि सहकाऱ्यांच्या शैक्षणिक स्मारकाचे काम, समाजकारण, राजकारण, कामगार संघटनेची कामे, मैल कुलीच्या संघटनेचे काम, महारवतने, रयतावकरणी इत्यादी कामे करता करता नागनाथ अण्णांची चांगली धावपळ होत होती. गाववर्गणीतून विद्यालयाची इमारत पुरी होऊ शकत नव्हती, म्हणून नागनाथ अण्णा सांगलीला वखार भागातील आपल्या व्यापारी मित्रांच्याकडे वर्गणी गोळा करण्यासाठी फिरत होते. दुपारची सुमारे ३.३० ची वेळ होती. वसंतदादांना पोलीस खात्यातील मित्रांच्याकडून नागनाथ अण्णांच्यावर मोरारजी सरकारने पकड वॉरंट काढल्याची बातमी समजली. वसंतदादांना नागनाथ सांगलीत आहेत हे माहिती होते पण ते नेमके कोठे आहेत हे त्यांना माहीत नव्हते. वसंतदादा अण्णांना सावध करण्यासाठी त्यांचा शोध घेत होते. त्यांना नामदेव कराडकरांच्याकडून नागनाथ सांगलीच्या वखार भागात असल्याचे समजले. तिथे अण्णांची व वसंतराव दादांची भेट झाली. त्यांनी अण्णांना बाजूला बोलावून घेतले, 'अण्णा, परवाचा आपला मुंबईचा पराक्रम नडला. तुझ्यावर मोरारजी सरकारने पकड वॉरंट जारी केले आहे. तुझं इथे थांबणे धोक्याचे आहे. आजचा दिवस मी कसातरी निभावून नेतो. उद्या सांगलीत येऊ नकोस' वसंतदादांनी अण्णांना सावध केले व ते आपल्या कामाला निघून गेले.

पुढे अण्णा भूमिगत राहून हुतात्मा विद्यालयाची कामे करत होते. चार-आठ दिवसांनी वसंतराव दादांनी अण्णांना सांगलीला बोलावून घेतले. तसेच पद्माळेहून आपले थोरले बंधू शामरावदादांना बोलावून घेतले. वसंतदादा आपल्या थोरल्या भावाला दादाच म्हणत होते. वसंतरावदादांनी आपले थोरले बंधू शामराव व अण्णांची भेट घातली आणि ते भावाला म्हणाले, ''दादा, विनाकारण (आकसाने) मोरारजी सरकारने नागनाथ अण्णांच्यावर पकड वॉरंट काढून अन्याय केलाय. तुम्ही त्यांना आपल्या घरातच ठेवायचे. बघू पुढे काय करायचे ते.'' शामरावदादा वसंतराव दादांना म्हणाले. ''वसंता, तू बिलकूल काळजी करू नकोस. मी नागनाथला आपल्या घरी ठेवतो आणि बघतो त्याला पकडायला आपल्या घराकडे कोण येतं ते !'' नागनाथअण्णांनी दोघा भावांचे आपल्यावरचे प्रेम जाणले. ते दादांना म्हणाले, ''अहो दादा, मला तुमच्या

घरात राहायला अडचण नाही, पण माझ्या सहकाऱ्यांच्या स्मारकाचे काय? दादा, तुम्हांला माहीतच आहे, मी आणि तुम्ही १९४२ चे कार्यकर्ते आहोत, मला काय तुम्हांला काय भूमिगत राहण्याची चांगली सवय आहे. मी माझ्या सहकाऱ्यांच्या स्मारकाचे कामही चालू ठेवणार आणि भूमिगतही राहणार. दादा, तुम्ही माझी कसलीही चिंता करू नका !''

क्रांतिवीर अण्णा सांगलीत दादांना भेटून वाळव्यात आले. परीक्षा जवळ आली म्हणून विधायक कामातून थोडीफार सवड काढून अभ्यासाच्या पाठीमागे लागले होते. परीक्षा दोन दिवसांवर आली होती. प्रिंसिपॉल खरडेकर सर यांना भेटून रिसीट घेण्यासाठी कोल्हापूरला राजाराम कॉलेजवर आले. प्रिंसिपॉलला भेटून परीक्षेचे टाईम टेबल विचारले. त्यावेळी प्रिंसिपॉल म्हणाले, ''नागनाथ, हे परीक्षेचे टाईम टेबल घ्या, रिसीटही घ्या. परंतु आज सकाळी कॉलेजवर सी.आय.डी.आला होता. त्यांनी तुमची संपूर्ण माहिती व परीक्षेचा बैठक क्रमांक विचारला आणि तो स्वत: बैठकीची जागा बघून गेला आहे. तेव्हा तुम्हांला सावध राहिले पहिजे.'' अण्णा म्हणाले, ''ठीक आहे'' दुसऱ्या दिवशी परीक्षा चालू असताना अचानक पोलिसांनी राजाराम विद्यालयात छापा टाकला पण उपयोग काहीच झाला नाही. पूर्व कल्पनेमुळे अण्णा परीक्षेला आलेच नाहीत. पोलीस पाय आपटत निघून गेले. ही बातमी मित्रांच्याकडून कळली. अण्णांनी त्याच दिवशी शिक्षणाला रामराम ठोकला. ते सरळ वाळव्याला निघून आले.

हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचे व हुतात्मा नानकसिंग वसतिगृहाच्या पहिल्या टप्प्याच्या कामातून अण्णा रिकामे झाले असले, तरी पोलिसांचा ससेमिरा त्यांच्या पाठीमागे होता. तसे अण्णा भूमिगत राहून आपल्या विधायक कामात मग्न असायचे. एक दिवस असा उगवला. किर्लोस्करवाडीच्या कामगारांच्या प्रश्नासाठी त्यांनी आणि कामगार पुढाऱ्यांनी एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीचे सूत्रधार नागनाथ अण्णा असल्याची बातमी गुप्तचर खात्याकडून सांगली डी.एस.पी.ला समजली होती. त्यांनी अण्णांना पकडण्याची जय्यत तयारी केली होती. बैठक सुरू झाली, कामगारांचे निरनिराळे प्रश्न होते ते कसे सोडावयाचे त्याचे विश्लेषण करत होते. पोलीस साध्या गणवेशातील बैठकीत सामील झाले होते. काही पोलिसांनी लक्षात न येईल अशा पद्धतीने हळूहळू बैठकीच्या ठिकाणाचा फास आवळायला सुरुवात केली. कामगारांची ती बैठक कसली जाहीर सभा असल्यागत मोठ्या संख्येने कामगार हजर होते. या वेळी मात्र पोलिसांनी अण्णांना पकडण्यासाठी चांगलीच तयारी केली होती. त्यांना वरून तशा सूचनाच केल्या होत्या. म्हणून कसल्याही परिस्थितीत नागनाथ

नायकवडींना पकडायचेच असा पोलिसांचा निर्धार होता. सुरुवातीला साध्या गणवेशातील गुप्त पोलिसांनी बैठकीच्या ठिकाणाला सर्व बाजूंनी वेढा घातला. तो पोलिसांचा कावा अण्णांच्या लक्षात आला, पण त्याला खूप उशीर झाला होता. ड्रेसमध्ये पोलीस संगिनी रोखून जसं जसे अण्णांच्या दिशेने यायला लागले, तसं तसे बैठकीतील साध्या वेशातील पोलिसांनी अण्णांच्यावर एकदम झडप घातली. तरी सहजासहजी आपण पोलिसांच्या हाताला लागायचे नाही या जिद्दीने क्रांतिवीर नागनाथअण्णांनी शेजारची एक भिंत उडी मारून पार केली. काही अंतरावर दुसरी एक चार फूट उंचीची भिंत होती त्या भिंतीवरून उडी मारून अण्णा मोकळ्या मैदानात आले. चारही बाजूला नजर टाकली. मैदानाला चारही बाजूंनी तारेचे कंपौंड होते. अण्णांच्या पाठोपाठ पोलीस होतेच. त्यांनीही त्याच गतीने भिंतीवरून उड्या मारून मैदानात आले. पोलीस व अण्णांच्या मध्ये फारसे अंतर नव्हते. तरी मागचा पुढचा विचार न करता सात पदरी तारेच्या कंपौंडवरून अण्णांनी उडी मारली. उडी यशस्वी झाली परंतु दुर्दैव आड आले. धोतराचा सोगा तारेत अडकला तो सोडून घेईपर्यंत राखीव तुकडीच्या पोलिसांनी त्यांच्यावर झडप घातली आणि अण्णांना जेरबंद केले. हाताला बेड्या ठोकल्या, दंडाला काडण्या लावल्या, पोलीस अण्णांना घेऊन पोलीसगाडीत बसले. एवढ्यात कामगारांनी एकच हल्लाबोल केला. कामगारांची आक्रमक भूमिका बघून हवेत गोळीबार करून अण्णांना कडक बंदोबस्तात सांगलीला आणून सबजेलमध्ये ठेवले. ही घटना सन १९४९ मध्ये घडली.

दिवस मावळतीकडे वाटचाल करत होता. किर्लोस्कर कारखाना सुटल्याचा भोंगा झाला. कामगार गेटमधून बाहेर पडत होते. क्रांतिवीर नागनाथअण्णांना पकडल्याची बातमी हा-हा म्हणता सर्व कामगारांना समजली. ती बातमी त्यांच्याकडून वाळवा आणि शिराळा पेठ्याच्या शेवटच्या टोकापर्यंत डोंगर कपारीतील वाड्या वस्त्यांपर्यंत जाऊन थडकली. एकच हाहाकार उडाला. सह्याद्रीचा रांगडा शेतमजूर,कष्टकरी शेतकरी जागा झाला. घराघरांतला कर्ता पुरुष खांद्यावर घोंगडे, पाठीवर भाकरी, हातात मिळेल ते हत्यार घेऊन सांगलीच्या कलेक्टर कचेरीवर निघाला. ना गाडी, ना घोडं, ना कोणी नेता, असा हा रांगडा समाज पायी चालत निघाला. एका पाठोपाठ एक अशा शेतकऱ्यांच्या तुकड्या कलेक्टर कचेरीच्या आवारात आल्या. एकंदरीत दहा एक हजार शेतकऱ्यांचा जमाव जमला. त्या जमावाचे नेते, मोर्चाचे नेते तेच होते.

कलेक्टर कचेरीच्या मोकळ्या मैदानात सर्वांनी ठिय्या आंदोलन सुरू केले. घोषणांची आतिषबाजी केली. ''मोरारजीभाई देसाईंच्या अन्यायी सरकारचा निषेध असो. क्रांतिवीर नागनाथअण्णांचा विजय असो. नागनाथअण्णांची ताबडतोब सुटका झाली

पाहिजे.'' गगनभेदी घोषणांचा मारा कलेक्टर कचेरीवर शेतकऱ्यांनी एकसारखा सुरू केला. शेतकऱ्यांचा जोश बघून आणि अचानक आलेल्या शेतकऱ्यांचा जमाव बघून कलेक्टर ऑफिस हादरले. त्यावेळी सुकटणकर साहेब कलेक्टर होते, ते अत्यंत हुशार व जबाबदारीने वागणारे होते. मोर्चात आलेले शेतकरी स्वयंस्फूर्तीने या जमावात आलेले आहेत. यात कोणीही पुढारी नाहीत, यांना कोण नेता नाही, नागनाथअण्णांच्यावर निष्ठा व प्रेम असणारा, आसा हा शेतकरी जनसमुदाय आहे. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांना सोडल्याशिवाय हा शेतकरी माघारी फि रणार नाही, हे कलेक्टर साहेबांनी ओळखले. आपल्या वरिष्ठांना मुंबईला फोन केला. फोन कोणाला केला व फोनवर काय बोलले हे त्यांना व फोन ऐकणाऱ्यांना माहीत. परंतु शेतकऱ्यांना त्यांनी सांगितले,''आम्ही तुमच्या म्हणण्याप्रमाणे विना अट उदईक नागनाथअण्णांना सोडून देतो, तुम्ही सर्वजण शांततेने परत जावा.'' शेतकरी ऐकण्याच्या मूडमध्ये नव्हता त्यांनी एकाच आवाजात सरकारी अधिकाऱ्यांना सांगितले, ''आम्ही नागनाथअण्णांना सोडल्याशिवाय जाणार नाही, परत जाणार ते त्यांना बरोबर घेऊनच.''

जाणकार प्रमुख काही मंडळींनी उद्या अण्णांना सोडणार का याची खात्री करून घेतली आणि सर्व शेतकऱ्यांना बरोबर घेऊन स्टेशनचौकात जाहीर सभा घेतली. त्या सभेत नागनाथअण्णांचे १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामातील सहकारी रावसाहेब कळके यांनी सरकारला उद्देशून जाहीर भाषण केले. त्या भाषणात त्यांनी सरकारला सांगितले, ''तुम्ही सांगितल्याप्रमाणे उद्या नागनाथअण्णांना सोडले नाहीतर आपण एवढे ध्यानात ठेवावे आज वाळवा आणि शिराळा पेठ्याचा शेतकरी या मोर्चात आला आहे. परवाला सांगली जिल्ह्यातील सर्व शेतकरी कलेक्टर कचेरीवर चालून येईल आणि त्यावेळी मात्र सब जेलचा एकही दगड किंवा वीट जागेवर राहणार नाही. हे सरकारने लक्षात ठेवावे.''

क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणजे एक विचार आहे. त्यांनी शिक्षणापासून राजकारणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात जे कृतीतून विचार मांडले होते ते आजही चिरंतन आहेत. मांडलेला विचार त्यांनी विचारपूर्वक मांडला होता. म्हणून ते सर्व अर्थाने परिपूर्ण होते. महात्मा गांधींनी माणसांतील हिंसावृत्ती दूर करण्याचा व शांततेने, संयमाने वागण्याचा विचार मांडला तो त्यांनी अंगीकारला होता. अण्णा हे फुले, शाहू, आंबडेकर यांच्या कार्यपद्धतीने चालले होते. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, बाबू गेनू , हुतात्मा किसन अहिर, सुभाषचंद्र बोस यांना ते आदर्श मानत होते.

ठरल्याप्रमाणे सरकारने विनाअट क्रांतिवीर नागनाथअण्णांना सन्मानाने सोडून दिले.

***

# चरित्र नायकाचे लग्न

जानेवारी १९५० साल उजाडले. मोरारजीभाई सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे क्रांतिवीर नागनाथअण्णांना आपले शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागले. आता शिक्षण बंद झाले आहे तर त्यांच्या आई क्रांतिमाता लक्ष्मीबाई व वडील रामचंद्र नायकवडी (बापू) या दोघांनी अण्णांच्या मागे लग्नाचा लकडा लावला होता. आता मात्र क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या पुढे लग्नाला नकार देण्यासारखं कारण काहीच नव्हते. त्यांनी लग्नाला होकार दिला आणि आईला सांगितले ''तू मुलगी बघ. तुला जी मुलगी पसंत पडेल त्या मुलीला मी पाहायला जाईन.'' आईने मुली पाहायला सुरुवात केली. एक दोन मुली पाहिल्या पण त्या त्यांच्या मनाला आल्या नाहीत. एक दिवस जक्राईवाडीचे गंगाराम गायकवाड हे १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यातील अण्णांचे सहकारी मित्र, आईंना भेटण्यासाठी वाळव्यात आले होते. त्यावेळी आईंनी त्यांच्याकडे अण्णासाठी मुलगी पाहण्याचा विषय काढला. त्यावेळी त्यांनी आईला सांगितले, ''भिलवडी स्टेशनजवळ बुरुंगवाडी हे छोटसं खेडं आहे. तिथं माझी चुलत बहीण दिली आहे, तिनं मला परवाच सांगितले यशवंत गोविंद कदम नावाचे गृहस्थ मिरजेत रेल्वे स्टेशनवर आर.एम.एस. ऑफिस मध्ये पोस्टमास्तर म्हणून नोकरी करतात. त्यांची मुलगी ११ वीच्या वर्गात शिकतिया. मुलगी चांगली आहे. तुम्ही ती पाहिजेतर बघून या.'' एक दिवस आई मिरजेला जाऊन गंगाराम गायकवाडच्या सांगण्याप्रमाणे मुलगी बघायला गेल्या होत्या. आई मिरजेत मुलीच्या घरी आगंतुक गेल्यामुळे त्या दिवशी मुलीचे आई वडील कोणीच त्यांना भेटले नाहीत. परंतु मुलीची लहान भावंडे होती.त्यातल्याच एका कळत्या मुलाला

घेऊन आई मुलीच्या शाळेत गेल्या. तिथं त्यांनी मुलीला पाहिलं. त्यांना मुलगी पसंत पडली. आईनी त्या मुलीकडूनच तिचे नाव, गाव, सारा पत्ता लिहून घेतला आणि तिला सांगितले आमचाही पत्ता लिहून घे आणि तुझ्या वडिलांना येत्या रविवारी मुलगा बघायला बोलविलय म्हणून माझा निरोप दे. हे सारं त्या मुलीला बैजवार सांगून, आई वाळव्याला परत आल्या. रात्री जेवण झाल्यावर अण्णांच्या हातात त्या मुलीनं दिलेला कागद दाखवला. अण्णांनी तो कागद वाचला. मुलीचे नाव कुसुम यशवंत कदम. गाव बुरुंगवाडी. वाचताना ते मधेच म्हणाले, ''आई, हा कागद मुलीने लिहलाय का ? कुणाकडून लिहून घेतलाय ?'' आई म्हणाल्या, ''माझ्यासमोर त्या मुलीनं स्वत: लिहिला आणि माझ्या हातात दिला.'' अण्णा म्हणाले, ''आई, तसं काय नाही. मुलीचं अक्षर चांगलं आहे.'' त्यावर आई म्हणाल्या, ''तिच अक्षर चांगलं आहे. तशी मुलगीपण चांगली आहे. मला पसंत पडलिया पावण्यांना उद्याच्या रविवारी घरदार, मुलगा बघायला यायला सांगितलं. तुम्ही रविवारी कुठही जायचं नाही.'' अण्णा म्हणाले, ''ठीक आहे.''

शाळा सुटल्यानंतर कुसुमताई घरी गेल्या आणि वडील आल्यानंतर त्यांच्या हातात मुलाचा पत्ता दिला आणि त्या वडिलांना म्हणाल्या, ''मुलाची आई स्वत: मला शाळेत येऊन बघून गेलीया. त्यांनी तुम्हांला मुलगा बघायला वाळव्याला रविवारी बोलावले आहे.'' वडील म्हणाले, ''ठिक आहे.''

रविवारी यशवंत कदम वाळव्याला नागनाथ अण्णांना बघण्यासाठी आले. साधारण चार पाचच्या दरम्यान सुतारमेट्याच्या रस्त्यात देवळाच्या समोरुन गेले आणि कोपऱ्यावर वळून पश्चिमेकडे नायकवडी गल्लीत गेले. धोतर, शर्ट, कोट डोक्यावर काळी गोल टोपी, हातात छत्री घेतलेली नवीनच व्यक्ती गेलेली अण्णांनी पाहिली. ते त्या वेळी शाळेच्या बांधकामासाठी लागणाऱ्या चुन्याची घाणी काढण्याचे काम कार्यकर्त्यांच्यासह करत होते. त्यांचे चुन्याच्या फक्कीमुळे डोक्यापासून पायापर्यंत सारे अंग पांढरे शुभ्र झाले होते. त्यांचे काम चालू असले तरी बेचाळीसच्या चळवळीत अंगवळणी पडलेल्या सवईमुळे डोक्यात संशयाचे काहूर सुरू झाले. त्यांनी आपल्या एका सहकाऱ्यास चौकशीसाठी पाठविले. तो कार्यकर्ता अण्णांना म्हणाला, ''पाहुणे तुमच्या घरात गेलेत.'' एवढ्यात घराकडून आईचा निरोप आला 'तुम्हाला बघायला पाहुणे आलेत. ते पुढच्या सोप्यात बसलेत. तुम्ही पाठीमागच्या दाराने या.' आईच्या निरोपाप्रमाणे अण्णा पाठीमागच्या दाराने घरात आले. आईनं अण्णा येईपर्यंत हांडाभर पाणी तापवून ठेवलं होतं. घरात अण्णा आल्याबरोबर आईनी त्यांना आंघोळ करायला सांगितली. आंघोळ झाल्यावर स्वच्छ कपडे घालून अण्णा माजघरातून सोप्यात आले

आणि 'रामराम पावण' म्हणून त्यांच्या समोर बैठकीवर येऊन बसले. इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी झाल्या. कांदापोहे, चहापान झालं. पावण्यांना हाच मुलगा म्हणून अण्णांची ओळख करून दिली. कदम पावण्यांना नमस्कार करत त्यांना अण्णा म्हणाले, ''पावणं, मी जरा स्पष्ट बोलतो. मी आहे बेचाळीसच्या चळवळीतला कार्यकर्ता. चळवळीत काम करताना मला अनेक शत्रू झालेले आहेत. कवा काय घडेल आणि माझ्यावर काय प्रसंग येईल हे मी सांगू शकत नाही.मी जे तुम्हांला सांगितलं ते तुम्ही तुमच्या मुलीला सांगा. तिने समंती दिली तर आम्ही मुलगी पहायला येऊ.'' येवढं अण्णा म्हटल्याबरोबर कदम पावण्यांनी खुंटीला अडकवलेला कोट झाडला आणि काही न बोलता गावाकडची वाट धरली.

वाळव्यातून बुरुंगवाडीला पोहचायला रात्र होईल म्हणून श्री.कदम यांनी शिरगांवच्या पावण्यांच्याकडे मुक्काम केला. वाळवा आणि शिरगावच्यामध्ये कृष्णा नदी. अलीकडं वाळवा आणि पलीकडे शिरगाव. तरी वाळव्याच्या वरच्या टोकापासून नदीपर्यंत चालत यायचं म्हटलं तरी एक मैलाचं अंतर होतं. तेथून नदी पार करून कदम पावण्यांना शिरगावात पावण्यांच्या घरी पोहचायला दिवे लागण झाली होती. कदम पावण्यांना बघताच शिरगावकर चटकन उठून दोन पावलं त्यांच्या स्वागताला पुढे गेले. ''कसंकाय पावणं वाट चुकलात? जत्रेला या म्हणून कितीडाव सांगावा धाडला पण मुलानाच पाठवलत, तुम्ही आला नाही.'' असे म्हणत त्यांच्या हातात चूळ भरायला पाण्याचा तांब्या दिला. बैठकीवर बसल्यावर सुखदु:खाच्या दोन गोष्टी केल्या. रात्रीचे जेवण झाले आणि पान खात बोलत बसले होते. एवढ्यात शंकरराव जाधव आले. ते बुरुंगवाडीच्या कदम पावण्यांना चांगलं ओळखत होते. ते खाली बैठकीवर बसत म्हणाले, ''काय पावणं, काय बेत काढलाय?'' त्यावर कदम पावणे त्या दोघांना म्हणाले, ''बेत-बीत काय नाही. थोरली मुलगी कुसुमला स्थळ बघायला वाळव्याला गेलो होतो.'' शंकरराव म्हणाले, ''वाळव्यात कोणाकडे गेला होता.?'' त्यावर पावणे म्हणाले, ''रामू नायकवडींचा थोरला मुलगा नागनाथला पहायला गेलो होतो.'' शिरगांवचे पावणे आणि शंकरराव जाधव एकाच सुरात म्हणाले, ''काय म्हणताय ? नागनाथ अण्णा आणि लग्न करतायत.?'' कदम पावणे म्हणाले, ''होय. ''म्हणून तर मी त्यांना पाहायला गेलो होतो.'' शिरगांवचे पावणे म्हणाले, ''मग पुढे काय झाले, मुलगा पसंत पडला का.? त्यांना मुलगी बघायला यायला सांगितलं का .नाही ?'

यशवंत कदम जरा रागातच म्हणाले, ''अहो, पावणं तुम्हांला काय सांगायचे? ते तर भलतंच बोलत होते. मी चळवळीचा कार्यकर्ता आहे, मला चळवळीत काम

करताना खूप शत्रू झालेत आणि कवा काय होईल आणि तुमच्या मुलीच्या पुढे काय प्रसंग ओढवेल हे मला सांगता येत नाही. तुम्ही तुमच्या मुलीच्या कानावर हे सर्व घाला. मुलीची तयारी असली तर पुढे तुमचा निरोप आला तर आम्ही मुलगी बघायला येऊ.' शिरगांवचे शंकरराव जाधव कदम पावण्यांना म्हणाले, "मग तुम्ही काय सांगितलतं?" कदम पावणे म्हणाले, "मी काहीही न सांगता उठलो आणि गावचा रस्ता धरला. बुरुंगवाडीला पोहचायला वेळ होईल म्हणून तुमच्याकडे मुक्कामाला आलोय."

शंकरराव जाधव आणि शिरगावचे पावणे कदम पावण्यांना म्हणाले, "अहो पावणं, नागनाथ अण्णा खरं तेच बोलले. खरं बोलणे हा काय गुन्हा आहे ? अहो पावणं असलं स्थळ शोधून सापडायच नाही. तुमच्या मुलगीचं नशीब चांगल म्हणून आयतं स्थळ तुमच्याकडे चालून आलय" अशी तिघांची चर्चा झाल्यावर कदम पावणे म्हणाले, "असे आहे तर तुम्ही त्यांना येत्या रविवारी बुरुंगवाडीला मुलगी बघायला या म्हणून सांगा" दुसऱ्या दिवशी सकाळी शंकरराव जाधव वाळव्याला आले आणि नागनाथ अण्णांना म्हणाले, "कदम पावण्यांनी तुम्हांला येत्या रविवारी मुलगी बघायला बुरुंगवाडीला यायला सांगितले आहे." शंकररावांना अण्णा म्हणाले, "कालतर पावणे काही न बोलताच गेले आणि आज तुमचा हा निरोप. आम्ही काय समजायचे ?" शंकरराव जाधव तसे अण्णांचे जिवलग मित्रच होते. ते म्हणाले, "काही समजायचे नाही. रविवारी मुलगी बघायला जायचे." अण्णा म्हणाले, "बरं, ठीक आहे."

निरोपाप्रमाणे अण्णा स्वत:, त्यांचे मित्र खंडू (दाजी)शेळके, नारायण कदम, रामचंद्र अहिर (मास्तर), शंकरराव इनामदार (आप्पा), सखाराम घोरपडे (काका) ही सारी मंडळी बुरुंगवाडीला मुलगी पहायला गेली. त्यावेळी फारसी वहानांची व्यवस्था नव्हती म्हणून बैलगाडीतून गेले होते. साधं दगडमातीचं घर, त्यावर कुंभारी कौलं बघून परिस्थिती गरिबीची आहे. अण्णांचं प्रथम दर्शनी मत चांगलं झालं. अण्णांना प्रस्थापितांची मुलगी करायची नव्हती. त्यांना गरीब घरातली मुलगी करायची होती. कांदेपोहे, चहा पानानंतर मुलगी बघण्याचा कार्यक्रम झाला. मुलगी पसंत पडली. अण्णांनी बसल्या बैठकीत मुलीच्या वडिलांना सांगितले, "आम्हांला मुलगी पसंत आहे. आमचं स्थळ तुम्हांला पसंत असेल तर चार दिवसांत १३ तारखेला कोल्हापूरला अय्यर सरांच्या घरी मुलगी आणि नारळ घेऊन या. तिथं त्यांच्या घरी लग्न करायचं आहे. योगायोगानं यशवंत कदमही नागनाथ अण्णांच्याप्रमाणे अय्यर सरांचे आवडते माजी विद्यार्थी होते. ठरल्याप्रमाणे १३ फेब्रुवारी १९५० रोजी यशवंत कदम मुलीला घेऊन अय्यर सरांच्या घरी आले. रोजच्या जुन्या नेसूच्या

कपड्यावर अण्णांचे व कुसुमताईंचे लग्न झाले. लग्नाअगोदर मंगलअष्टका ऐवजी अय्यर सरांच्या मुलीने एक सुंदर गाणे म्हटले. नवरा नवरीने एकमेकांना हार घातले आणि लग्न झाले. लग्नाला ना मुहूर्त ना भटजीच्या मंगलआष्टका ना तांदूळ टाकणे. लग्नात मुलीचे वडील, थोरला भाऊ बाळू, अण्णांचे घरचे तर कोणच नाहीत. फक्त चार मित्र बाळकू बिरनाळे, माधवराव गायकवाड,राजूताई पाटील, श्री.अय्यर सर त्यांच्या पत्नी व मोठी मुलगी अंजू. अण्णा पुढे सांगतात "लग्नानंतर अय्यर सरांच्या पत्नीने मला आणि पत्नी कुसुमला जेवायला वाढले. माझ्या आई वडिलांना आणि मुलीच्या आईवडिलांना लग्नासाठी म्हणून काहीही खर्च आला नाही. लग्नानंतर मात्र अय्यर सरांच्या घरापासून आम्ही दोघे पतिपत्नी टांग्याने राजारामपुरीतील माझ्या खोलीवर आलो. त्यासाठी एक रुपया टांगाभाडे द्यावे लागले."

अण्णा कार्यकर्त्यांना म्हणतात, "लग्नासाठी पैशाची गरज नाही, मुहूर्त पाहण्याची गरज नाही, लग्नाला भटजीची गरज नाही, मंगलअष्टकांची गरज नाही, पत्रिका बघण्याची गरज नाही. नव्या कपड्यांची गरज नाही. ह्या सर्व बाबी बाजूला ठेऊन मी लग्न केलं. आमचा प्रपंच व्यवस्थित चाललाय. आमच्या मुलाबाळांचही ठीक चाललय. आज माझ्या लग्नाला ६० वर्षे झाली आणि मी अठ्ठ्याऐंशी वर्षांचा आहे, माझी पत्नी सौ.कुसुम अठ्ठ्याहत्तर वर्षांची आहे. ह्या वयापर्यंत आम्हां दोघांत कधीही भांडणतंटा झाला नाही. आमचा संसार सुखात आहे म्हणून मी म्हणतो, "लग्नासाठी ना मुहूर्ताची गरज ना भटजीची गरज ना मंगलअष्टकांची गरज ना नव्या कपड्यांची गरज ना पैशा अडक्याची गरज." असे क्रांतिवीर नागनाथअण्णांचे आचारविचार होते आणि समाजातील रचनात्मक काम होते. ते त्यांनी स्वत:च्या कृतीतून लोकांच्या समोर ठेवले.



क्रांतिवीर नागनाथअण्णा व पत्नी सौ.कुसुमताई(माई)

# कर्मवीर व क्रांतिवीर

कापील ता.कराड येथे १९४६ साली क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या पुढाकाराने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेला एक लाख रुपयाचा निधी देण्यासाठी विद्यार्थिपरिषद भरवली. त्या परिषदेत एक मताने लाखाच्या निधीचा ठराव पास झाला. त्या निधी संबंधी सविस्तर माहिती 'क्रांतिवीर नागनाथ अण्णा' या चरित्र ग्रंथात दिली आहे. पुढे निधी जमवण्याचे काम चालू होतेच. परंतु १९४८ मध्ये महात्मा गांधींचा नथुराम गोडसे यांनी वध केला. त्या हत्येमुळे भावनेच्या भरात ब्राह्मण मंडळींच्या घरादारांची जाळपोळ, लुटालूट झाली. त्या निंदनीय प्रकाराचा कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, क्रांतिसिंह नाना पाटील, जी.डी.बापू लाड या नेते मंडळींनी निषेध केला आणि त्यांनी लोकांना आवाहन केले ''तुमच्या या अशा घाणेरड्या कृत्यामुळे महात्मा गांधींच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. आपण बहुजनांनी संयम व शांततेने वागले पाहिजे'' असे सांगून बहुजनांना शांत केले.

परंतु मुख्यमंत्री ना.बाळासाहेब खेर यांनी ८ फेब्रुवारी १९४८ रोजी शनिवार वाड्यापुढे पुण्यात जे भाषण केले त्या भाषणात ते म्हणतात, ''माझ्या अंगात रक्ताचा शेवटचा थेंब असे पर्यंत मी ब्राह्मण समाज्याचे रक्षण करणार.'' ना.बाळासाहेब खेर हे एकट्या ब्राह्मण समाज्याचे प्रतिनिधित्व करत नाहीत. ते राज्यातील सर्व समाज्यांचे प्रतिनिधित्व करतात. तेव्हा मुख्यमंत्री पदावर असणाऱ्यांनी असे जाहीर भाषण करणे कितपत योग्य आहे ? मुख्यमंत्र्यांच्या या बोलण्याचे कर्मवीर भाऊरावांसारख्या पुरोगामी विचारवताला फार दु:ख झाले. त्यावेळी खरे पहाता भाऊरावांनी कळून येईल असे

वस्तुनिष्ठ, योग्य असे भाषण केले होते. परंतु काही मंडळी भाऊरावांच्या विरोधात होती. त्यांनी भाऊरावांच्या भाषणाचे वृत्त तिखट-मीठ लावून वेगळेच केले. पराचा कावळा झाला आणि अखेर ना.बाळासाहेब खेर, मोरारजी देसाई यांच्या सरकारने लेखणीच्या एका फटकाऱ्याने रयत शिक्षण संस्थेचे अनुदान बंद केले. खरंतर कर्मवीर भाऊराव पाटील हे आपल्या भाषणात काय म्हणाले होते ? बाळासाहेब खेरांच्या अंगात ४ नाहीतर पाच शेर रक्त असेल. ते रक्त किती ब्राह्मण समाजाचे संरक्षण करेल ? त्यातलं सत्य हे आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाजच ब्राह्मण मंडळींच रक्षण करणार आहे. हे सत्य होत तेच कर्मवीर बोलले. सरकारच्या चुकीच्या निर्णयामुळे बहुजनसमाज सरकारच्या विरोधात झाला.

खरं म्हणजे रयत शिक्षण संस्था म्हणजे आम्हा बहुजनांचा आधार. त्या आधारावर सरकारने घाव घातला म्हटल्यावर स्वयंभू जनतेतून उठाव झाला आणि ज्याला जे शक्य होते ते प्रत्येकाने केले. रयत शिक्षण संस्थेकडे मदतीचा ओघ चालू झाला. क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी गावा-गावांतून धान्य गोळा करून ट्रक/ट्रॅक्टर भरून सातारला धान्य पाठवले. निधी गोळा करण्याच्या कामाला गती देऊन मागे उल्लेख केल्याप्रमाणे क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी ग्रंथातील उल्लेखा प्रमाणे २७ नोव्हेंबर १९४८ रोजी धनिणीच्या बागेत सद्गुरू गाडगे बाबांच्या हस्ते एक लाखाचा निधी विद्यार्थिपरिषदेचे प्रमुख क्रांतिवीर नागनाथ अण्णा, बापूजी साळुंखे वगैरेंच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडे सुपूर्द केला.

पुढे स्वत: कर्मवीर भाऊरावअण्णा, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, बापूजी साळुंखे, क्रांतिसिंह नाना पाटील अशा अनेक हितचिंतकांनी रयत शिक्षण संस्थेची बाजू मांडून एक जोरदार जनशक्ती रयत शिक्षण संस्थेच्या पाठीमागे उभी केली. शेवटी जन आंदोलनाच्या रेट्यानं सरकारने रयत शिक्षण संस्थेचे अनुदान सुरू केले.

क्रांतिवीर नागनाथ अण्णांना, शैक्षणिक, सामाजिक, विधायक कामाबरोबर कष्टकरी शेतकरी कामगार, शेतमजूर, कारकून, शाळा मास्तर, मैलकुली इ.समाजांतील दुबळ्या घटकांच्या आर्थिक गोष्टीबरोबर योग्य दृष्टिकोण असलेले राजकारण करायचे होते. अजून ते कोणत्याही राजकीय पक्षाच्या दावणीला बांधले गेले नव्हते. समाजवादी पक्षाचे साथी एस.एम.जोशी (अण्णा) यांचे नागनाथ अण्णांचे खूप जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या बद्दल मनात आदरभावनाही होती. परंतु त्यांनी नागनाथअण्णांना समाजवादी पक्षात येण्याबद्दल विचारणा केली. त्यावेळी त्यांना नागनाथ अण्णा म्हणाले,

''एस्.एम्.अण्णा, जो पर्यंत मला स्वतंत्रपणे फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांशी, आचरणाशी बांधील राहून उपेक्षित समाज ग्रामीण भागातील दुर्बल घटक, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर आणि खेड्यातून पोट भरण्यासाठी शहरात गेलेला कामगार, शिक्षक, कारकून, बारा बलुतेदार यांच्या सर्वांगीण विकासासाठी धर्मनिरपेक्ष विरहित कोणता पक्ष प्रामाणिकपणे काम करतोय हे मला पटल्याशिवाय मी कोणत्याही पक्षात जाणार नाही.'' योगायोगाने त्याच सुमाराला समाजवादी पार्टीचे राष्ट्रीय नेते जयप्रकाश नारायण पतिपत्नी वाळव्याला आले होते. त्यावेळी त्यांनीही नागनाथअण्णांना पक्षात येण्याचे व सक्रिय काम करण्याबद्दल आग्रहाने सांगितले होते. परंतु अण्णांनी एस.एम.जोशीं (अण्णा) ना जे सांगितले तेच जयप्रकाश नारायण यांनाही सांगितले.

अण्णा विचारपूर्वक प्रत्येक पाऊल टाकत होते. परिस्थितीवर मात करत होते. तत्त्वाचे राजकारण त्याना मान्य होते. कॉ.दत्ता देशमुखांच्या राजकारणावर अण्णांचा विश्वास होता. म्हणून त्यांना वाटायचे सर्वसामान्य जनतेने लढून, आणि अनेक हुतात्म्यांनी आपले प्राण देऊन जे स्वातंत्र्य मिळवले ते स्वातंत्र्य कॉंग्रेस सरकारने भांडवलदार, मोठे जमीनदार, संस्थानिक यांच्या हिताच्या राजकारणासाठी उपयोगात आणले आहे. या उलट शेतमजूर, कामगार व कष्टकरी शेतकऱ्यांची लोकशाही सत्ता आणण्यासाठी क्रांतिसिंह नाना पाटील, भाई डांगे, अत्रे, जेधे, जवळकर, मोरे, कॉ.दत्ता देशमुख, उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, डॉ.एन्.डी.पाटील, जी.डी.लाड(बापू) प्राध्यापक शरद पाटील सारखे अनेक नेते हिरिरीने आपापल्या पक्षाच्या अधीन राहून निवडणुका लढत होते. जिंकतही होते. या नेते मंडळींपैकी नागनाथअण्णा एक असे होते ज्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या चळवळी बरोबर राजकीय चळवळ सुरू केली आणि या लढ्याचा भाग म्हणून कॉ.दत्ता देशमुखांच्या विचाराने कामगार किसान पक्ष आणि डावा समाजवादी पक्षा (मार्क्सवादी लेनिनवादी) च्या आघाडीच्या वतीने १९५२ ची निवडणूक लढवली. त्याच वेळी पुरोगामी आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या आपसातील मतभेदातून येलूरचे बोगर वकील यांनी निवडणुकीचा अर्ज भरला. साहजिकच मतांची विभागणी झाली आणि निकाल लागायचा तोच लागला. अण्णांची व बोगर वकिलांची मते एकत्र केली. त्या मतांची बेरीज निवडून आलेल्या कॉंग्रेसच्या उमेदवारापेक्षा जास्त होती. या निवडणुकीत नागनाथ अण्णा एकटेच उभे असते तर नक्कीच निवडून येत होते. पण हे नियतीला मान्य नसावे.

१९५२ च्या निवडणुकीचा निकाल काय लागणार हे अण्णांना अगोदरच माहीत होते. त्याचा फारसा विचार न करता ते पुन्हा आपल्या विधायक कामाच्या मागे नेटाने लागले. त्याच सुमारला सरकारने शेतकऱ्यांच्यावर अन्यायकारक लेव्ही बसवली होती. त्या लेव्ही विरोधी जन आंदोलन छेडले. त्यासाठी गावो-गावी जाऊन शेतकऱ्यांना व कार्यकर्त्यांना जागृत केले आणि पुढे मे १९५२ मध्ये वाळवे तालुक्यातील जुनेखेड येथे शेतकऱ्यांची भव्य परिषद आयोजित केली. या परिषदेला दहा हजारांच्यावर त्या काळात जुनेखेड मध्ये शेतकरी समुदाय जमला होता. अशा या भव्य परिषदेला क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ.दत्ता देशमुख, कॉ.यशवंतराव चव्हाण या मंडळींना आमंत्रित केले होते. परिषदेचे अध्यक्ष क्रांतिसिंह होते तर उद्‌घाटक कॉ.दत्ता देशमुख होते आणि प्रमुख पाहुणे कॉ.यशवंतराव चव्हाण होते. परिषदेचे संघटक क्रांतिवीर नागनाथ अण्णा होते. या चारीही पुढाऱ्यांच्या स्फूर्तिदायी मार्गदर्शनाने शेतकरी पेटून उठला होता. सरकारला लेव्ही वसूल करणे अवघड झाले होते. नुसते अवघड नाही तर शेतकऱ्यांनी सरकारला लेव्ही वसूल करु दिली नाही.



**क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील**
सह कार्यकर्ते **क्रांतिवीर नागनाथअण्णा** व इतर

# चरित्र नायक आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ

पुढे १९५५ ला संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली. ती १९६० अखेर अखंड चालूच होती. त्यावेळी प्रत्येक प्रांतातील शेतकरी आणि सामान्य जनता भाषावार, प्रांत रचना सरकारने करावी म्हणून संघटितपणे लोकशाही मार्गाने सरकारशी लढत होते आणि आपली मागणी रेटून धरत होते. त्याच वेळी तेलंगु नेते पोट्टी रामल यांनी स्वतंत्र तेलंगु भाषिक राज्यासाठी आमरण उपोषण केले होते. ते ८० दिवस चालले होते. शेवटी ऐंशीव्या दिवसी त्यांनी प्राण सोडला पण उपोषण मागे घेतले नाही. पोट्टीरामनच्या मरणाने वा त्यागाचे, दिल्ली सरकारला काहीही वाटले नाही. परंतु पोट्टी रामल यांच्या बलिदानाने उठलेल्या जनसमुदायापुढे सरकारला मान झुकवावीच लागली. मराठी भाषिक जनतेने सुद्धा द्विभाषिक राज्याविरोधी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी चळवळ सुरू केली. मुंबई वगळून महाराष्ट्राचा प्रांत करण्याचा भारत सरकारचा डाव मराठी माणसाने उधळला. मराठी माणसाच्या, कामगाराच्या, घामातून, त्यागातून वाढलेली मुंबई मराठी जनतेपासून (माणसांपासून) तोडण्याचे दृष्ट कटकारस्थान सरकारने रचले होते. या कटकारस्थानाच्या विरोधात महाराष्ट्रातला छत्रपती शिवरायाने घडवलेला मराठी माणूस व मुंबईचा कामगार जिवाची पर्वा न करता रणमैदानात उतरला. खेड्यापाड्यांतील वाड्यावस्त्यांवरील जनतेच्या लक्षात ही अन्यायकारक गोष्ट आणण्यासाठी क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ.दत्ता देशमुख, कॉ.यशवंतराव चव्हाण, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, एन.डी.पाटील, संतराम पाटील, दाजीबा देसाई, डांगे, प्रल्हाद केशवअत्रे, लिमये, अण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर, अमर शेख,

कृष्णराव धुळप, केशवराव धोंडगे, उस्मानाबादचे उद्धवराव पाटील, रावसाहेब कळके, रंगराव पाटील (दादा), जीवनराव सावंत,एस.एम.जोशी (अण्णा) अशा अनेक नेत्यांनी आपल्या जाहीर सभेतून, शाहिरांनी शाहिरी पथकातून सारा महाराष्ट्र पिंजून काढला, ढवळून काढला. साऱ्या मराठी जनतेचा आवाज एक केला आणि बेळगाव,कारवार, निपाणी हुंबरगावसह 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' हा एकच नारा दिला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर मराठी माणूस पेटून उठला. खेड्यापाड्यांत, गावांत, वाड्यावस्त्यांवर, शहरात हजारो स्त्रीपुरुष रस्त्यावर आले आणि संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर संघटितपणे आपापल्या भागातून फेऱ्या काढत होते, सभा घेत होते असे निर्धारपूर्वक जनतेचे व नेत्यांचे लढे संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मिटेपर्यंत चालूच होते.

मराठी माणूस इतका निकराचा लढा देत होता,तरी ना.भाऊसाहेब हिरे व यशवंतरावजी चव्हाण संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर खंबीर भूमिका घेत नव्हते. ही मंडळी दिल्ली मधील वरिष्ठ नेत्यांच्या दडपणाखाली होती. क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ.दत्ता देशमुख, श्री.डांगे, सेनापती बापट, कॉ.यशवंतराव चव्हाण, प्र.के.अत्रे, एम.एम.जोशी, ना.ग.गोरे, जयवंतराव टिळक, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड(बापू), एन.डी.पाटील, भगवानराव सूर्यवंशी, भगवान पाटील (बप्पा), रावसाहेब कळके, रंगराव पाटील(दादा), जीवनराव सावंत इत्यादी नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न धसाला लावला. श्री.एस.एम.जोशी(अण्णा)यांच्या अध्यक्षतेखाली वरील नेते मंडळींनी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करून त्यांनी लढ्याचे काम चालूच ठेवले.

संयुक्त महाराष्ट्राची द्विभाषिक प्रांतरचना करण्याची शिफारस १० ऑक्टोबर १९५५ रोजी जाहीर झाली. या निर्णयाचा निषेध करण्यासाठी १८ नोव्हेंबर १९५५ रोजी सेनापती बापट व प्रल्हाद केशव अत्रे यांनी विधिमंडळावर मोर्चा काढला होता. तो मोर्चा पोलिसांनी आडविला. बेफाम झालेली मराठी माणसे पोलिसांना जुमानीत नव्हती. अखेर पोलिसांनी मोर्चावर गोळीबार केला आणि त्याच दिवशी द्विभाषिक विरुद्ध महाराष्ट्रीय जनतेने रणसिंग फुंकले. मराठी माणूस लोकशाही मार्गाने आपली मागणी मागत असताना सरकारने त्यांच्यावर गोळीबार केला. त्या गोळीबाराचा निषेध करण्यासाठी २१ नोव्हेंबर १९५५ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ.दत्ता देशमुख, कॉ.यशवंतराव चव्हाण, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, जी.डी.बापू लाड, एन.डी.पाटील इ.प्रमुख नेत्यांनी मुंबईच्या कामगारांना उठवले. त्यावेळी पोलिस व निदर्शकांमध्ये मोठी चकमक झाली. पोलिसांच्या गोळीबारास लोक दगड.विटा,व सोड्याच्या बाटल्यांनी

प्रत्युत्तर देत होते. त्या दिवशी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर पंधरा महाराष्ट्रीयन शूरवीर हुतात्मा झाले. या रणधुमाळीत सीताराम बनाजी पवार हा पहिला हुतात्मा ठरला.

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सरकार बिकट करत होते. न्याय्य मार्गांनी प्रश्न सोडवण्या ऐवजी जास्तच अडचणीत टाकत होते. श्री.यशवंतराव चव्हाणांनी सातारा जिल्हा कॉंग्रेस कमिटी बैठक २ डिसेंबर १९५५ रोजी घेतली होती. त्या बैठकीत त्यांनी जाहीर केले ''पंडित जवाहरलाल निष्ठा आणि महाराष्ट्र निष्ठा'' यांपैकी आपण नेहरू निष्ठा पसंत करू. या वक्तव्याचा तमाम मराठी माणसांनी निषेध केला. त्यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील म्हणाले, ''आपला पैलवान मैदानातून पळाला.'' नाना पाटलांच्या प्रमाणे अनेक नेत्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. क्रांतिवीर नागनाथ अण्णा म्हणाले, ''सायबांच्या या वक्तव्याने मराठी माणसांची मने सुन्न केली, त्यांच्या बद्दलची आदरभावाची व निष्ठेची भावना संपली.''

पंडित जवाहरलाल नेहरूंनी महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करण्याचा निर्णय १६ जानेवारी १९५६ रोजी आकाशवाणीवरून जाहीर केला. त्या निर्णयाने मुंबईमध्ये त्याच रात्री ज्वालामुखी फुटला आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून मराठी माणूस मुंबईला यायला लागला. क्रांतिवीर नागनाथ अण्णा त्या वेळी लाल निशान पक्षाच्या ऑफिसमध्ये होते. प्रथम बातमी आली ती गोरेगावमध्ये गोळीबाराला सुरुवात झाली आहे. त्या रात्री अनेक आंदोलनाच्या नेत्यांना अटक केली. आपणही पकडले जाऊ म्हणून अण्णा दादरला आपल्या मित्राकडे आले आणि त्यांना बरोबर घेऊन गिरगावला गेले. तर तिथे पोलिस आणि लोकांच्यात मोठी धुमश्चक्री चालू होती. जखमी लोकांना मदत करणाऱ्या ग्रुपमध्ये अण्णा व त्यांचे मित्र सामील झाले. इकडे लोकांना नेत्यांना पोलिसांनी पकडल्याची बातमी समजली. त्यामुळे लोक चेतून उठले.मुंबईत तुफान वादळ उठले. निदर्शक आणि पोलिसांमध्ये फ्लोरा फाउंटन येथे जोरदार रणधुमाळी झाली. मोरारजी देसाईंनी गोळीबार करण्याचा स्पष्ट आदेश पोलिसांना दिला होता. त्यातून पोलिसांनी १०५ कामगारांचे मुडदे पाडले.

मोरारजी सरकारने १०५ कामगारांचे मुडदे पाडले. क्रांतिसिंह नाना पाटील, सेनापती बापट, प्र.के.अत्रे, श्री.डांगे, एस.एम.जोशी, कॉ.दत्ता देशमुख, ना.ग.गोरे, जयवंतराव टिळक, नागनाथ अण्णा, एन.डी.पाटील, जी.डी.(बापू) लाड, कॉ.यशवंतराव चव्हाण या नेत्यांना जेव्हा कळाले तेव्हा त्यांच्या मनाला काय यातना झाल्या त्या त्यांनाच माहीत.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत २१ नोव्हेंबर १९५६ च्या गोळीबारात झालेले हुतात्मे.

१)सीताराम बनाजी पवार २)जोसेफ डेव्हिड पेजारकर ३) चिमनलाल डी.शेट ४)भास्कर नारायण ५)रामचंद्र सेवाराम ६)शंकर खोटे ७)मीनाक्ष मोसेकर ८)धर्माजी नागवेकर ९)चंद्रकांत लक्ष्मण १०)के.जे.झेविअर ११)पी.एस.जॉन १२)शरद जी.वाणी १३)वेदिसिंग १४)रामचंद्र भाटीया १५)गंगाराम गुणाजी

मुंबईत प्रचंड वादळ निर्माण झाले. 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' ही मागणी करणारे निदर्शक व पोलिस यांमध्ये तुंबळ युद्ध फ्लोरा फाउंटन येथे सुरू झाले होते. दिसेल त्याला गोळी घाला असा स्पष्ट आदेश मुख्यमंत्री श्री.मोरारजी देसाई यांनी दिला होता. ता.१५ ते २१ जानेवारी १९५६ अखेर रणकुंडात हुतात्मा झालेल्या कामगार व इतरांची नावे खालील प्रमाणे आहेत.

जानेवारी १९५६ चे हुतात्मे

१६)बंडू गोखले १७)निवृत्ती विठोबा मोरे १८)आत्माराम रावजी पालवणकर १९)बालण्णा मुतण्णा कानाठी २०)धोंडू लक्ष्मण फरडुले २१)भाऊ सखाराम कदम २२)यशवंत बाळाजी भगत २३)गोविंद बाबूराव जोगल २४)नाव मिळाले नाही २५)पांडुरंग धोंड घावडे २६)गोपाळ चिमाजी कोरडे २७)पांडुरंग बाळाजी जाधव २८)बाबू हरी वाते २९)अनुप महावीर ३०)विनायक पांचाळ ३१)सीताराम गणपत म्हात्रे ३२)सुभाष भिवा तोस्कर ३३)गणपत रामा जानकर ३४)गणपत जायदिन ३५)गोरखनाथ रावजी जगताप ३७)तुळशीदास पुंजाजी बेलसरे ३८)देवजी सखाराम पाटील ३९)शामलाल जेठानंद ४०)सदाशिव महादेव भोसले ४१)भिकाजी पांडुरंग रंगारे ४२)वासुदेव सूर्याजी मांजरेकर ४३)भिकाजी बाबू बावरकर ४४)सखाराम श्रीपत ढबाले ४५)नरेंद्र प्रधान ४६)शंकर गोपाळ कुष्ट ४७)दत्तात्रय कृष्णा सावंत ४८)बबन बापू बरगुडे ४९)विष्णू सखाराम बने ५०)सीताराम धोंडू शिंदे ५१)तुकाराम धोंडू शिंदे ५२)विठ्ठल गंगाराम मोरे ५३)रामा लखन विंदा ५४)एडवीन आमरोझ साळवी ५५)बाबा महादू सावंत ५६)वसंत द्वारकानाथ ५७)विठू दौलत साळुंखे ५८)रामनाथ पांडुरंग अमृते ५९)परशुराम आंबाजी देसाई ६०)घनशाम बाबू कोलार

६१)धोंडू रामकृष्ण सुतार ६२)मुनीमजी बलदेव पांडे ६३)मारुती विठोबा मस्के ६४)भाऊ कोंडीबा भास्कार ६५)धोंडो राघू पुजारी ६६)दारजेसिंग ६७)पांडू महादू अवरीकर ६८)शंकर विठोबा राणे ६९)विजयकुमार सदाशिव बेडेकर ७०)कृष्णाजी

गणू शिंदे ७१)रामचंद्र विठ्ठल चौगुले ७२)धोंडू भागू जाधव ७३)रघुनाथ सखाराम बेनगुडे ७४)काशिनाथ गोविंद चिंदरकर ७५)करपैसा गोविंद देवेंद्र ७६)चुलाराम मुंबराज ७७)बाळ मोहन ७८)आनंता ७९)रत्नू गोदिवरे ८०)सय्यद कासम ८१)भिकाजी दाजी ८२)अनंद गोलतकर ८३)किसन वीरकर ८४)सुखलाल रामलाल बंसकर ८५)पांडुरंग विष्णू वाळवे ८६)फुलवारी मणरू ८७)गुलाब कृष्णा खवळे ८८)बाबूराव देवदास पाटील ८९)लक्ष्मण नरहरी थोरात ९०)उमाबाई विठ्ठल सूर्यभान ९१)गणपत रामा भुते ९२)मुन्सी वझीर अली ९३)दौलतराव मथुरादास ९४)सीताराम घाडीगावकर ९७ ते ९८ नांवे सापडली नाहीत. ९९)मारुती बेन्नाळकर १००)मधुकर बापू वारेकर १०१)लक्ष्मण गोविंद गावडे १०२)महादेव बारीगडे १०३)सौ.कमलाबाई मोरे-निपाणी १०४,१०५ नावे मिळत नाहीत.

केंद्र सरकार मधील कॉंग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांनी केलेली द्विभाषिकांची प्रांत रचना महाराष्ट्रातील जनतेला पसंत नव्हती असे नसून ती गुजराती जनतेलाही मान्य नव्हती. गुजरातमध्येही या प्रश्नावर तीव्र जनआंदोलन छेडले होते. त्या दंगलीतही चौदा लोक ठार झाले आणि अनेक लोक जखमी झाले.

संयुक्त महाराष्ट्राच्या लोकआंदोलनात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी प्राणाची बाजी लावून हजारो सभांमधून ही रास्त मागणी लोकांना पटवून दिली होती आणि संयुक्त महाराष्ट्राचा वणवा पेटत ठेवला होता. तसेच या लढ्यात 'मराठा' वर्तमानपत्राचे संस्थापक श्री.प्रल्हाद केशव अत्रे यांचेही योगदान मोठे होते.त्याबरोबर श्री.एस.एम. जोशी, श्री.डांगे, ना.ग.गोरे, जयवंतराव टिळक, उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, नागनाथअण्णा नायकवडी, जी.डी.(बापू)लाड, प्रा.एन.डी.पाटील, भगवानराव सूर्यवंशी, कॉ.दत्ता देशमुख, संतराम पाटील, रावसाहेब कळके, रंगराव पाटील(दादा), बाबा आढाव इ. नेत्यांशिवाय शाहीर अमर शेख, शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर वि.ना.गव्हाणकर वगैरे यांच्या शाहिरी पथकांनी या प्रश्नाला चांगली धार आणली होती. तसेच अनेक लहान मोठी शाहिरी पथके या कामात आपल्या परीने काम करत होती.

१९५७ च्या निवडणुका तोंडावर आल्या होत्या. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नामुळे कॉंग्रेस पक्षाबद्दल जनमत उलटे झाले होते. क्रांतिसिंह नाना पाटील कम्युनिष्ट पार्टी तर्फे उत्तर साताऱ्यातून श्री.दादासाहेब आळतेकर या निष्णात वकिलाला हरवून १,२७,००० मते मिळवून खासदार म्हणून निवडून आले होते. वाळवे तालुक्यातून क्रांतिवीर नागनाथअण्णा कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते एस.डी.पाटील यांना पराभूत करून निवडून आले.

संयुक्त महाराष्ट्र समितीची लाट होती. हा भाग खरा असला तरी नागनाथअण्णा यांची समाजामध्ये असलेली लोकप्रियता या यशाला कारणीभूत आहे. तसेच क्रांतिअग्रणी जी.डी.लाड (बापू), वाय.सी.पाटील, व्ही.एन.पाटील, संतराम पाटील इ. समितीचे उमेदवार प्रचंड मतांनी विजयी झाले होते. या निवडणुकीत विधानसभेच्या १३३ जागांपैकी १०१ जागेवर प.महाराष्ट्रात समितीचे उमेदवार भरपूर मते मिळवून निवडून आले होते. यावरून संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न किती तीव्र आहे हे काँग्रेसच्या दिल्ली श्रेष्ठींच्या लक्षात आले.

प.महाराष्ट्रातून१९५७ च्या निवडणुकीत काँग्रेसला मोठे अपयश मिळाले होते. पण गुजरात, मराठवाडा आणि विदर्भ या ठिकाणांहून बहुमत मिळाल्यामुळे शेवटी विशाल द्विभाषिक राज्यात काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आले आणि या राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण झाले. संयुक्त महाराष्ट्राचा कारभार श्री.यशवंतराव चव्हाण आपल्या कुशल कर्तबगारीने पुढे तारून चालले होते. यशवंतरावांनी पंडित नेहरू आदी काँग्रेस नेत्यांमध्ये आदराचे स्थान मिळवले होते. त्यामुळे त्यांच्या शब्दाला आता चांगलेच वजन प्राप्त झाले होते. दिल्ली श्रेष्ठींचा नूर बघून योग्य संधी साधून महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीची त्यांच्या मनात पेरणी करून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र करण्याची जनतेची तीव्र इच्छा त्यांच्या लक्षात आणून दिली. ज्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने आपण विशाल द्विभाषिक राज्य चालवायचे त्याच नेत्यांचे हातपाय गारठले तर हे राज्य कसे चालणार ? हे दिल्लीच्या काँग्रेस नेत्यांनी ओळखून श्री.यशवंतराव चव्हाणांच्या सांगण्यावरून आणि महाराष्ट्रातील जनतेच्या रेट्याला भिऊन अखेर मुंबईसह व विदर्भ, नागपूर, मराठवाड्यासह, स्वतंत्र महाराष्ट्र राज्य करण्याचा व गुजरात राज्यही स्वतंत्र करण्याचा निर्णय घेतला आणि तशी घोषणा करून दिल्ली येथे श्री.यशवंतराव चव्हाणांच्या हातात मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश सुपूर्द केला. यशवंतरावजी चव्हाण तो मंगल कलश आपल्या हातात घेऊन मुंबईला अगदी गर्जत आले. महाराष्ट्रीय जनतेच्या आनंदाला उधाण आले. तो शुभदिवस १ मे १९६० होता.

ज्या आनंदमय सुदिनाची महाराष्ट्रातील जनता आतुरतेने वाट पहात होते. तो शुभदिवस पहाण्याचे भाग्य सर्वांना लाभले परंतु मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून फ्लोरा फाउंटन जवळ ज्या १०५ वीररत्नांनी आपल्या रक्ताचे पाट वाहिले होते. त्या अमर हुतात्म्यांच्या आठवणीने साऱ्या महाराष्ट्रातील जनतेच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. सर्वश्री क्रांतिसिंह नाना पाटील, एस.एम.जोशी, श्री.अ.डांगे, सेनापती

बापट, आचार्य अत्रे, ना.ग.गोरे, उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, नागनाथ नायकवडी (अण्णा), एन.डी.पाटील, वाय.सी.पाटील, जी.डी.लाड (बापू), नाथाजी लाड, दत्ता देशमुख, संतराम पाटील, रावसाहेब कळके, रंगराव पाटील वगैरे मंडळींनी धारातीर्थी पडलेल्या ठिकाणी जाऊन त्या १०५ हुतात्म्यांना आदरांजली वाहिली व अभिवादन केले. तसेच अश्रूपूर्ण डोळ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. श्री.यशवंतराव चव्हाणांच्या हातातील मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा मंगल कलश फ्लोरा फाऊंटनला सांडलेल्या हुतात्म्यांच्या पवित्र रक्तातून आणि ज्ञात अज्ञात अशा लक्ष्यावधी महाराष्ट्राच्या तमाम जनतेच्या त्यागातून मिळाला होता. तसेच सत्याग्रह करून तुरुंगवास भोगलेल्या सत्याग्रहींचा त्यात सिंहाचा वाटा होता.

***

# गोवा मुक्ती आणि क्रांतिवीर नागनाथ अण्णा

भारताला इंग्रजांच्याकडून स्वातंत्र्य मिळाले. मात्र भारताचा एक भाग गोवा हा पोर्तुगिजांच्या ताब्यात होता. इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले. परंतु गोव्यावर पोर्तुगिजानी ४५० वर्षे राज्य केले. गोव्यातील जनता स्वतंत्र होण्यासाठी फार आसुसलेली होती. इ.स.१५०० पासून गोवा पोर्तुगिजांच्या ताब्यात होता.१९५२ पासून गोवा विमोचन समितीचे आणि नॅशनल काँग्रेस(गोवा)ह्या संघटनांचे कार्यकर्ते गोव्यातील पोर्तुगिजांची राजवट उलथून टाकण्याचा प्रयत्न करत होती. गोवा स्वतंत्र व्हावा म्हणून लढत होती.

१५ ऑगस्ट १९५४ चे साल उजाडले आणि भारतभरातून आणि विशेषत: महाराष्ट्रातून गोवा मुक्ती सत्याग्रहिंच्या तुकड्या दाखल होऊ लागल्या. क्रांतिसिंह नाना पाटील हे या तुकड्यांचे सरसेनापती होते. त्यांच्या खांद्याला खांदा लावून एन.डी.पाटील, कॉ.यशवंतराव चव्हाण, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड, बबन जाधव, भगवानराव सूर्यवंशी, भगवानराव पाटील(बप्पा) इ.पट्टीचे कार्यकर्ते शर्तीने लढत होते. क्रांतिसिंहाच्या मातोश्री गोजाबाई पाटील व कन्या हौसाबाई पाटील या गोवा मुक्तीच्या महिला फळीचे नेतृत्व करत होत्या.

कारवारकडून जाणाऱ्या मार्गाने नॅशनल काँग्रेसचे सरचिटणीस श्री.अँथनी डिझुझा यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या गोवामुक्ती सत्याग्रहींपैकी ना.ग.गोरे, मधु लिमये या आघाडी वरील नेत्यांना पोर्तुगीज सरकारने पकडून त्याना १० वर्षांची कारावासाची शिक्षा दिली त्यांना तुरुंगात डांबून ठेवणे. त्या प्रमाणे गायतोंडे, श्री.मोहन

रानडे, नाना पाटील, गोजाबाई पाटील, हौसाबाई यांना कडक शिक्षा केल्या, त्यांना तुरुंगात ठेवले. गोवा स्वतंत्र व्हावा म्हणून माडगावच्या भर बाजारात सौ.सुधाताई जोशी यांनी जाहीर सभेत गोवा मुक्ती बद्दल जोशपूर्ण भाषण केले. त्यांना भाषण करतानाच पोतुगीज सरकारने अटक केले आणि तुरुंगात टाकले. सौ.सुधाताई यांच्या अटकेचा लोकांच्यावर चांगला परिणाम झाला आणि जनतेचे लोंढे रस्त्यावर येऊ लागले. भारत देशातून चोहोंकडून पोतुगीज सरकारचा निषेध होऊ लागला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून कार्यकर्त्यांच्या तुकड्या गोव्यात घुसू लागल्या.

दाजीबा देसाई, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड, जयवंतराव टिळक, कॉ.चितळे, एन.डी.पाटील, बी.डी.पाटील, कॉ.यशवंतराव चव्हाण, बबनराव जाधव, भगवानराव सूर्यवंशी इ.नेते व कापूरवाडीचे व महादेव वाडीच्या पैलवान मंडळीसारखे अनेक कार्यकर्ते चिवटपणे लढत होते. क्रांतिसिंह नाना पाटलांना पोतुगीज सरकारने तुरुंगात डांबले असले तरी त्यांच्या नुसत्या नावाच्या घोषणेने जनता पेटून उठत होती.

सर्व भारतीय जनतेला गोव्याला स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे असे वाटत होते. शेवटी जागतिक परिस्थितीचा अंदाज घेऊन भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९ डिसेंबर १९६१ रोजी मिलिटरी कारवाई करून गोवा स्वतंत्र केला. सर्व भारतीय जनतेला आनंद झाला. मात्र क्रांतिसिंह नाना पाटील, उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड इ.नेत्यांना गोवा महाराष्ट्रात विलीन न होता केंद्रशाशित आहे याची मनाला खंत आहे.

गोवा,बेळगाव सह संयुक्त महाराष्ट्र करण्याचे क्रांतिसिंह नाना पाटलाचे स्वप्न अजून अधुरे आहे. हे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी भावी पिढीची आहे.

***

# तत्वनिष्ट अण्णा

मला अजून आठवतय साल होतं १९५७, लोकसभेच्या व विधानसभेच्या मतदानाचा दिवस होता. सूर्य मावळतीकडे झुकला होता. मतदानाची वेळ संपलेली नव्हती. हजारो कार्यकर्ते हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणाच्या लगतच्या गावतळ्याच्या काठावर बसले होते. काही कार्यकर्ते इस्लामपूर रस्त्याने अण्णांच्या येण्याकडे लक्ष देऊन होते. आम्ही दहाह्नबारा वर्षांची मुलंही तिथं होतो. त्यांपैकी मी एक(जयवंत अहिर)त्यात होतो. लांबवर धूळ दिसायला लागली. हळू हळू धूळ जवळ यायला लागली. तसी धुळीच्या पुढे धावणारी टॅक्सी दिसायला लागली. बघता बघता काही मिनिटांतच टॅक्सी हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या दारात आली. गाडीचा वेग कमी करत ड्रायव्हर गाडी उभा करण्याच्या नादात होता. परंतु अण्णांनी त्याकडे लक्ष न देता सरळ चालत्या मोटार गाडीतून उडी टाकली आणि पळतच शाळेत मतदान करण्यासाठी गेले. मतदान केले असेल एवढ्यात मतदानाची वेळ संपलेली बेल(घंटा)झाली. दोन एक हजार शेतकरी अण्णांची वाट बघत बाहेर थांबले होते. अण्णा बाहेर येताच सर्वजण त्याच्याभोवती जमले. साऱ्या कार्यकर्त्यांच्या समवेत अण्णांनी संपूर्ण गावातून फिरून लोकांना भेटी दिल्या. अण्णा चालत होते. आम्हांला मात्र पळावे लागत होते. अशी राजधानी एक्सप्रेस सारखी त्यांची चाल होती. नंतर कार्यकर्त्यांच्याकडून मतदानाचा आढावा घेतला. बैठक संपली आणि अण्णा कोल्हापूरला गेले.

अण्णांच्या वयाची पस्तीशी असताना अशी चपळता होती. तर १९४२ च्या सालातील वयाच्या विशीतील चपळता काय असावी, हे क्रांतिवीर नागनाथअण्णा चरित्र भाग १ मधील घटनांवरून लक्षात आल्या शिवाय रहात नाही. आजचा प्रसंग मतदान करण्याचा होता. मतदानाची वेळ संपण्याच्या आत मतदान केंद्राच्या आवारात पोहचणे गरजेचे होते. म्हणून चालत्या गाडीतून उडी मारली, उडी मारली नसती तर मतदान चुकले असते.

निवडणुका संपल्या, निकाल लागले. मंत्रिमंडळाची निवड झाली. श्री.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. संयुक्त महाराष्ट्राचा लढा चालूच होता. त्यासाठी सर्व पक्षीय समिती स्थापन केली होती आणि तिचे अध्यक्ष एस.एम.जोशी(अण्णा)होते. या समितीत जातीयवादी संघटनांना सामावून घेतल्याचे नागनाथअण्णांना खटकत होते. ते आपले नेते कॉ.दत्ता देशमुख यांना वरचेवर सांगत होते. परंतु भाषिक प्रांत रचनेचा प्रश्न ऐरणीवर होता. तूर्त शांत रहाणे गरजेचे आहे. म्हणून ते शांत होते. परंतु मध्यंतरी विधानपरिषदेच्या निवडणुका लागल्या होत्या. संयुक्त महाराष्ट्र समितीतून सर्व पक्षीयांशी चर्चा करून प्रत्येक पक्षाच्या ताकदीप्रमाणे त्याच्या वाटणीला आलेल्या उमेदवार राज्यसभेच्या निवडणुकीसाठी उभे राहिले. संयुक्त महाराष्ट्राच्या समितीच्या बॅनर खाली असणाऱ्या आमदारांनी कुणाला मते द्यायची हे प्रत्येक आमदारांना सांगितले. अण्णांचा जातीयवादी संघटनेला कडाडून विरोध होता. परंतु मुद्दाम खोडसळपणा म्हणा नाहीतर योगायोग म्हणा अण्णांच्या वाट्याला जातीयवादी संघटनेचे प्रतिनिधी भिडे हे आले होते. अण्णांनी उघडपणे समितीच्या प्रमुखांना सांगितले मी जातीयवादी संघटनेच्या उमेदवाराला मत देणार नाही. त्या नेत्यांनी समजूतदारपणाने अण्णांच्यासाठी दुसऱ्या उमेदवाराचे नाव सुचवायचे ते सोडून कॉ.दत्ता देशमुख यांच्याकडून दबाव आणून भिडेनांच मत दिले पाहिजे म्हणून सांगण्यात आले आणि पक्ष शिस्त पाळलीच पहिजे, अजून ती पक्ष शिस्त म्हणारी नेते मंडळी दत्ता देशमुखांच्या जवळ होती. अण्णा सुद्धा त्या वेळी तिथे होते. अण्णांनी कॉ.दत्ता देशमुखांच्या समोरच त्या नेते मंडळींना सांगितले मला पक्षशिस्तीपेक्षा तत्त्व महत्त्वाचे वाटते. माझा हात तुटला तरी चालेल पण जातीयवादी संघटनेच्या प्रतिनिधीला मी मत देणार नाही आणि गैरहजर राहून मत बुडविणार नाही. मी माझे मत योग्य त्या व्यक्तीला देणार आहे. दुसऱ्या दिवशी विधान परिषदेत हजर राहून मतदान केले, ते एन.डी.पाटलांना. त्याचंबी असं, झालं. अण्णा म्हणाले,''मी मतदान करण्यासाठी उभा होतो, एवढ्यात एन.डी.पाटील माझ्या मागे येऊन उभा राहिले. त्यांनाही उत्सुकता असावी खरंच अण्णा कुणाला मतदान करतायत ते त्यांना

बघायचं होतं,'' मी बरोबर ओळखलं आणि त्यांना म्हणालो, ''नारायण असच मत करायचं असतं नव्हं?'' असे म्हणत त्यांच्या नावापुढे फुली मारली. (ही गोष्ट स्वत: अण्णांनी सांगितलेली आहे)''

मतदान करताना एन.डी.पाटील माझ्या पाठीमागे येऊन उभे राहिले, त्यांचा मला फार मोठा आनंद निदान एक साक्षीदार आपल्याला मिळाला. नाहीतर गुप्त मतदान. कुणी कुणाला दिले समजत नाही.

निवडणुकीच्या राजकारणात अण्णांना कधीच रस नव्हता. परंतु कॉ.दत्ता देशमुखांच्या राजकारणावर त्यांचा विश्वास होता. १९५२ च्या निवडणुकीत निकाल काय लागणार आहे हे अगोदरच अण्णा माहीत होते. तरी कॉ. दत्ता देशमुखांच्या आग्रहाने त्यांनी निवडणूक लढवली, पराभव झाला. पुढे १९५७ ची दुसरी पंचवार्षिक निवडणूक जाहीर झाली. निवडणुकीच्या राजकारणात रस नसला तरी अण्णांच्या मनात १९५२ च्या निवडणुकीच्या पराभवाचं उट्टं काढायचं. म्हणून १९५७ च्या विधानसभेच्या निवडणुकीत उभा राहण्याची इच्छा होती. परंतु काही मंडळिनी कॉ.दत्ता देशमुखांना सांगितलं नुसतं सांगितलं नाही, तर अगदी आग्रहानं सांगितलं. 'अहो, दत्ता देशमुख, नागनाथ यांना यावेळीतरी तिकीट देऊ नका. त्यांच्याबद्दल लोकमत फारसं चांगलं नाही. ते निवडून येणारच नाहीत.' दत्ता देशमुख महाराष्ट्राचं राजकारण करणारे द्रष्टे नेते होते. तसेच अचूक परिस्थितीचा अंदाज करणारे होते. त्यांनी ओळखले. हे स्वार्थी आपमतलबी लोक नागनाथबद्दल अनादर असणारे आहेत. त्यांना त्याच वेळी दत्ता देशमुखांनी ठणकाऊन सांगितले. वाळवे तालुक्यातून नागनाथांनाच तिकीट दिलं जाणार आहे. १९५७ ची अण्णांची निवडणूक मात्र अण्णा नेहमी सांगत, एन.डी.पाटलांनी आपण स्वत: या निवडणुकीला उभा राहिलो आहोत. अशा पद्धतीने निवडणुकीच्या प्रचाराची यंत्रणा राबवली होती. तसे मतदार संघातील गावोगावचे कार्यकर्ते, वाळव्यातील माझे स्वातंत्र्य चळवळीतील सहकारी काका घोरपडे, इनामदार आप्पा, खंडू शेळके, रामू मास्तर, धाकटे अण्णा, थोरले अण्णा, बापूसाहेब वलांडकर, महादेव जाधव इ.त्यांच्या बरोबर होतेच. एच.के.पाटील, बी.डी.पाटील ही वकील मंडळी रंगराव पाटील सारखे कार्यकर्तेही आघाडी सांभाळत होते. एन.डी.पाटलांना मदत करत होते.

१९५७-६२ विधानसभेच्या काळात संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबरोबर अण्णांनी शक्य तेवढे शेतकरी, कामगार, शेतमजूर, मैलकुली वगैरे बहुजन समाजातील पीडित जनतेसाठी जेवढं काम करता येईल तेवढं केलं. पुढे निवडणुकीच्या

राजकारणापासून लांब रहायचं ठरवलं. एकूण परिस्थितीचा विचार करता त्यांनी ठरवलं,आपणाला आपल्या तत्त्वाचे गोरगरिबांच्या हिताचं राजकारण कराचे असेल तर तूर्त या सार्वजनिक निवडणुकांच्या पासून लांब राहिले पाहिजे. निवडणुका पैशाशिवाय इथूनपुढे लढणे शक्य नाही आणि सत्यानं वागून , खरं बोलून राजकारण करता येणं अशक्य आहे. मतांसाठी चुकीची कामं करणे, माणसं सांभाळून राहणं, खोटं हसणं, खोटं बोलणं, खोटं वागणं, अप्रामाणिक रहाणं हे आपणाला शक्य नाही. म्हणून नागनाथ अण्णांनी शेतकऱ्यांच्या सामुदाइक प्रश्नाबरोबर विघायक कामात जास्त गुंतून राहयचे ठरवले आणि शिक्षणसंस्थोत जास्त लक्ष देण्यासाठी ते हुतात्मा किसन अहिर विद्यालयात ठाण मांडून बसले. ग्रामीण भागातील मुलांना तांत्रिक शिक्षण घेता यावे, म्हणून १९६२ जून मध्ये हुतात्मा किसन अहिर विद्यालयात शेती विषया बरोबर टेक्निकल विषयाची सुरुवात करून हुतात्मा विद्यालय हे मल्टिपर्पज स्कूल सुरू केले.

ग्रामीण भागात स्त्रियांच्या बद्दलचे शिक्षण आणि चालीरीती, मागासलेपणा दूर करण्यामध्ये अहोरात्र झटणाऱ्या नागनाथ अण्णांनी मुलींच्या शिक्षणावर भर देण्यासाठी जून १९६३ साली मुलींच्यासाठी छत्रपती शिवाजीराजेंच्या मातोश्री जिजामातेच्या नावे स्वतंत्र मुलींची माध्यमिक ५ वी ते १० वी पर्यंत शाळा सुरू केली. त्याचा परिणाम चांगलाच झाला. शेतकऱ्यांनी मुलींची शाळा स्वतंत्र आहे म्हटल्यावर मुलींना मोठ्या प्रमाणात शाळेला पाठवण्यास सुरुवात केली. सुरुवातीला १९४९-५० साली मुलांच्या शाळेत फक्त एक मुलगी शिकत होती. आणि ती सामान्य शेतकऱ्याच्या घरातली नव्हती. १९५०-५१ ला दोन मुली, तर १९५१-५२ ला तीन मुली शाळेला येत होत्या. हळू हळू मुलींची संख्या वाढत होती हे जरी खरे असले तरी अण्णांनी मुलींच्या शिक्षणाचे स्वतंत्र दालन सुरू केल्यानंतर ती संख्या एकदम पन्नास साठच्या घरावर गेली आणि ती वेगाने वाढत होती. आज जिजामाता विद्यालयात ५ वी ते १० पर्यंतची संख्या पाचशेच्यावर आहे. अकरावी, बारावीची विद्यार्थी संख्या शंभरच्या घरावर आहे. ज्या मुलींची शिकण्याची इच्छा आहे त्या मुलींना शाळेत पाठवण्याची पालकांचीही इच्छा आहे. परंतु आर्थिक परिस्थितीने ते शक्य नाही. अशा मुलींचा सर्व्हे करून क्रांतिवीर अण्णांनी अशा मुलींची संपूर्ण जबाबदारी शिक्षण संस्थेने घ्यायची आणि त्यासाठी जून १९६५ रोजी त्यांनी सावित्रीबाई फुलेंच्या नावे मुलींच्यासाठी स्वतंत्र मोफत वसतिगृह सुरू केले. त्या वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी अर्जही मोफत दिला जातो आणि मुलींची

जेवणाखाण्याची, पुस्तकांची सारी जबाबदारी संस्था घेते. अशी अनेक कामे करत असताना मुलांच्या जडणघडणीचा, त्यांच्या आरोग्याच्या बारीक सारीक गोष्टीकडे अण्णा स्वत: लक्ष घालत होते. चांगली होतकरू मुलं की ज्या मुलांची आवड-निवड बघून तो मुलगा त्याच्या आवडीच्या क्षेत्रात तरबेज कसा होईल याकडे ते स्वत: लक्ष देत होते. हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील मुलांचा खो-खो चा संघ, तसेच मुलींचा बास्केट बॉलचा संघ चांगला आहे. ते दोन्हीही संघ जिल्ह्यात पहिले आलेत, हे त्यांना कळल्यावर त्यांनी हे संघ महाराष्ट्र राज्य क्रीडा स्पर्धेत प्रथम कसे येऊ शकतील त्या दृष्टीने ते स्वत: मुला-मुलींच्या संघांची तयारी करून घेण्यासाठी सकाळी ५.३० वाजता व संध्याकाळी ५.३० वाजता घोंगड टाकून कार्यकर्त्यांसह स्वत: ग्राउंडवर हजर राहायला लागले. त्या खेळाडू मुला मुलींना संस्थेमार्फत खुराक म्हणून त्यांना दूध व अंडी चालू केली. पोष्टिक आहार आणि सराव या दोन्ही गोष्टींतून राज्य स्तरावरच्या खेळाडूंच्यावर मात केली. सर्व सामान्य शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्यात चैतन्य निर्माण केले आणि महाराष्ट्रात मुलींचा थ्रो बॉल व मुलांचा खो-खो या दोन्ही संघांचा महाराष्ट्र राज्यात प्रथम नंबर आला. अण्णांनी केलेली सुरुवात व पाहिल्या नंबरची परंपरा आज तशीच चालू असून आज हुतात्मा किसन अहिर विद्यालय, जिजामाता विद्यालय व क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातील मुलं-मुली राष्ट्रीय पातळीवर खेळत आहेत, नंबर मिळवत आहेत.

एकवेळ सकाळी ८.३० वाजता नागनाथअण्णा बागेत 'पुढारी' पेपर वाचत बसले होते, काही कार्यकर्ते तिथंच आसपास बसले होते, त्यांनी पेपर वाचून बाजूला ठेवला आणि ते कार्यकर्त्यांना म्हणाले, ''येणाऱ्या २५ फेब्रुवारी १९७१ ह्या स्मृतिदिनाला हुतात्मा किसन अहिर यांना शहीद होऊन पंचवीस वर्षे होत आहेत. दिवस कसे भराभरा गेले हे आपल्या ध्यानातही आले नाही. तेव्हा आपण येणाऱ्या पंचविसाव्या स्मृतिदिन मोठ्या प्रमाणात साजरा करावयाचा व विद्यालयाच्या प्रांगणात हुतात्मा किसन अहिरांचा अर्धपुतळा बसवण्याचा निर्णय अण्णांनी शेतकऱ्यांना सांगितला. ते कामाला लागले. पैसा तर एक जवळ नाही. त्यात पाऊसकाळ कमी. शेतकरी अडचणीत. या साऱ्या परिस्थितीवर मात करून मुंबईला व्ही.शांतारामबापूंचे राजकमलचे आर्ट डायरेक्टर बाबूराव जाधव यांच्याकडे पुतळ्याचे काम सोपवले आणि यशवंतराव चव्हाणांना भेटले. (त्यावेळी यशवंतराव संरक्षण मंत्री होते) त्यांना म्हणाले, ''यशवंतराव मी तुम्हांला सांगणार आहे, ते तुम्ही फक्त ऐकून घ्या. त्याच्यावर आपण काहीही बोलू नका. मी हुतात्मा किसन अहिरांचा पुतळा वाळव्यात विद्यालयाच्या प्रांगणात बसवतोय. येत्या २५ फेब्रुवारी १९७१ रोजी पुतळ्याच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम

घ्यायचा आहे. तुम्ही उद्‌घाटक, क्रांतिसिंह नाना पाटील अध्यक्ष, कॉम्रेड दत्ता देशमुख स्वागताध्यक्ष व मी संघटक एवढंच बोलले आणि निघून आले. यशवंतरावांना विचार करायला वेळ दिला, अशा पद्धतीने चार महिन्यांच्या अवधीत चार वेळा यशवंतरावांना भेटले आणि शेवटी उद्‌घाटनाच्या अगोदर पंधरा दिवस अवकाश असताना यशवंतरावांना कराडला भेटले. अण्णा यशवंतरावांना ज्या ज्या वेळी पुतळ्याच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यासाठी भेटले. त्या त्या प्रत्येक भेटीच्या वेळी मी(जयवंत अहिर)अण्णांच्या सोबत होतो. अण्णा यशवंतराव चव्हाणांना म्हणाले, ''साहेब, अजून एक आठवडा तुम्हांला विचार करायला सवड आहे. पाहिजेतर तुम्हांला तालुक्याच्या आमदारांचे पत्र देतो. नाहीतर त्यांना तुम्हांला समक्ष आमंत्रण देण्यासाठी घेऊन येतो.'' त्या दिवशी मात्र यशवंतराव चव्हाण अण्णांना म्हणाले, ''नागनाथ, तुम्ही निवांत कामाला लागा, मी उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाला येणारच.'' कार्यक्रमाची पत्रिका जयवंतकडून पाठवा. एखादा कार्यक्रम घाई गडबडीने ठरवावयाचा आणि प्रमुख पाहुणां ऐनवेळी उपस्थित राहू शकत नाही, अशी गोष्ट आजपर्यंतच्या घेतलेल्या कार्यक्रमांत कधीही घडली नाही.अशी अण्णांची कामाची पद्धत होती.

२५ फेब्रुवारी १९७१ ला हजारोंच्या उपस्थितीत हुतात्मा किसन अहिरांच्या पुतळ्याचा उद्‌घाटनाचा कार्यक्रम झाला. तिन्ही पक्षांचे महान नेते नागनाथ अण्णांनी एका स्टेजवर उपस्थित ठेवण्याची किमया केली होती. निवडणुकांचा प्रचार चालू होता, मतदानाचा दिवस जवळ आला होता. तिन्ही नेत्यांची भाषणे एकापेक्षा एक उत्कृष्ट झाली. परंतु तोंडावर आलेल्या निवडणुकीच्या राजकारणाबद्दल कोणी एक शब्द काढला नाही. तिन्ही नेते सभा संपल्यानंतर आपापल्या पक्षाच्या निवडणुकीच्या प्रचार सभेला निघून गेले. यशवंतरावांची सांगलीला सभा होती, दत्ता देशमुखांची कोल्हापूरला सभा होती आणि नाना पाटलांची सातारला सभा होती. 'न भूतो न भविष्यति' असा कार्यक्रम झाला. क्रांतिसिंह नाना पाटलांनी आपल्या भाषणात नागनाथअण्णांचा उल्लेख करताना ते म्हणाले, 'आज वाळव्यात नागनाथअण्णांनी तिन्ही नेत्यांना एकत्रित करून तासगावच्या माळ्याची सर्कस केली.' क्रांतिसिंह नाना पाटलांना काय म्हणायचे होते ते लोकांनी ओळखले आणि त्यातून एकच हशा झाला. यातून अण्णांची राजकारणातील सामाजिक दृष्टी आणि राजकीय नेत्यांच्या मनावरील त्यांचा प्रभाव जाणवितो.अण्णा माणसं जोडणारे होते. त्याच बरोबर माणसांची कदर करणारे सुद्धा होते.

क्रांतिवीर अण्णांच्या दूरदृष्टीचा अनुभव आम्हां साऱ्या कार्यकर्त्यांना आला. तो सांगताना मलाअण्णा काय आहेत हे समजलं. हुतात्मा किसन अहिर यांचा पुतळा करायचा कधी आणि कुठे हे त्यांनी २५ वर्षापुर्वीच ठरवले होते हे आम्हांला आज कळाले. इमारतीचा प्लॅन कागदावर नव्हता त्यावेळी तो प्लॅन कसा असावा हे त्यांनी ठरवले होते. राजाराम हायस्कूल कोल्हापूर सारखा प्लॅन तो वाळव्यात शाळेची इमारत बांधत असताना ती इमारत कशी असेलत्या इमारतीच्या सेंटरमध्ये येणारा पोर्च आणि त्या पोर्च पुढे २५ वर्षांनि पुतळा बसवायचा हे कोणाला न सांगता त्यांनी मनात होते. वाळव्यातून कामासाठी बाहेर पडताना पोर्च पुढच्या मोकळ्या जागेला उजवी घालून बाहेर पडायचे आणि बाहेरुन आले तरी त्या जागेला उजवी घालुन यायचे असे पंचवीस वर्षे त्यांची तशी तपश्चर्या चालू होती. हे आम्हाला आज पुतळ्याच्या उद्‌घाटनावेळी कळाले. अण्णांनी यशवंतराव चव्हाणांच्या हाताला धरुन हुतात्मा किसन अहिरांच्या पुतळ्याला उजवी घालून समोर घेऊन गेले आणि त्यांच्या हातात उद्‌घाटनासाठी दोरी दिली. यशवंतरावांनी दोरी ओढताच पडदा बाजूला होऊन हुतात्मा किसन अहिर यांचा पुतळा दिसताच हजारो प्रेक्षकांनी फुले उधळली, घोषणा दिल्या.



**महाराष्ट्र राज्य "खो-खो" स्पर्धेत "प्रथम क्रमांक" मिळविणारे**
**हुतात्मा किसन अहिर विद्यालय,वाळवे चे खेळाडू व कोच समवेत अण्णा**

**खाली बसलेले डावीकडून :** बाबा मुसळे,कोच-लेमनराव निकम,क्रांतिवीर नागनाथअण्णा,कोच-मस्के सर रामचंद्र लोहार,खंडू शिंदे

**उभे राहिलेले डावीकडून :** वसंत पोतदार,दत्ता शेळके,भिमराव साळुंखे,हंबिर मोटे,जगन्नाथ जाधव,जयवंत अहिर

# लिफ्ट इरिगेशनला सुरुवात (१९७१ – ७२)

एकोणीशे एकात्तर साल संपलं. हुतात्मा किसन अहिर विद्यालयात ऑफिसमध्ये क्रांतिवीर नागनाथअण्णा बसले होते. त्यांच्या बरोबर इनामदार अप्पा, काका घोरपडे, तुकाराम नाना खोत(वस्ताद)किसान शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हे सर्वजन चर्चा करत होते, मी (जयवंत अहिर) वर्तमानपत्र वाचत बसलो होतो व दत्ता शेळके (दादा) अण्णांनी सांगितलेले पत्र टाईप करत होते. आईसाहेब नाष्ट्याचा डबा घेऊन आल्या होत्या(त्या काळात अण्णांना लवकर जेवायची सवय नव्हती)ऑफिसमध्ये अण्णांची बसण्याची जागा ठरलेली होती. वाळवा 'इस्लामपूर रस्ता. रस्त्याच्या दक्षिणेला शभंर फूट जागा सोडून विद्यालयाची इमारत, इमारतीच्या पुढे सोडलेल्या जागेत फुलझाडांची बाग. अण्णा ऑफिसमध्ये बसताना रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या काचेच्या खिडक्यांकडे पाठ करून बसायचे. त्यांच्या समोर पंधरा फुटांवर एक काचेचे कपाट होते. अण्णा कितीही कामात असले किंवा बोलण्यात व्यस्त असले तरी अधून मधून कपाटाकडे लक्ष असायचे, रस्त्याकडेला शाळेचे लोखंडी भाले मोठे गेट त्या गेटच्या आत येणारा माणूस पाहिल्यांदा अण्णांना त्या कपाटाच्या काचेत दिसायचा. त्या माणसाला ते बरोबर ओळखायचे आणि शिपायाला सांगायचे ''अरे पळपळ ते आमुख आलेत. त्याना घेऊन ये.'' ह्या गोष्टीचं शिपायला आश्चर्य वाटायचे आणि, त्या माणसालाही आश्चर्य वाटायचे. हया गोष्टीचं गुपित फक्त अण्णांना माहीत होतं.

१९७२ नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यातील रविवार होता. तसेच अण्णा नेहमीप्रमाणे ऑफिसमध्ये 'पुढारी' वर्तमानपत्र वाचत होते आणि त्यात आलेल्या बातमीवर

हवलदार सर, चाऊस सर, इनामदार अप्पा, काका घोरपडे, मी(जयवंत अहिर), कोंडूसकर, दत्ता शेळके आम्ही सर्वजन त्या बातमी बद्दल यांच्या बरोबर चर्चा करत होतो. येवढ्यात त्यांना काही शेतकरी गेट मधून आत येताना दिसले. ते मला म्हणाले, ''अरे जया, ती मंडळी का आलीत ते बघ. त्यांना आत घेऊन ये.'' मी त्याप्रमाणे सर्वांना ऑफिसमध्ये घेऊन आलो. त्यांमध्ये सर्वश्री शामराव अप्पा(अण्णांचे धाकटे बंधू),श्री.रामजी पाटील, भगवान शेळके, कोंडीबा माळी, काका माळी, किसन धोंडी अहिर, पांडू गावडे (देव) हे होते. त्यांना बसायला सांगून त्यांना विचारले, ''काय मंडळी काय काम काढलं आहे ?'' ती मंडळी म्हणाली, ''अण्णा, आम्ही शंभर एकरांचे इरिगेशन करायचं म्हणतोय, आम्हांला पाणी परवाना आणि बँकेचे कर्ज तेवढं तुम्ही मिळवून द्या, म्हणून सांगायला आलोय.'' अण्णा म्हणाले, ''ठीक आहे. तुम्हाला दोन दिवसात बोलावून घेतो.'' ती मंडळी गेल्यानंतर आम्हा सर्वांना अण्णा म्हणाले, ''इरिगेशन करायचं तर येवढं छोट्या क्षेत्रापुरतं करून परवडणार नाही.'' म्हणून अण्णांनी चारशे एकरांची स्कीम करायची ठरवली आणि त्याच वेळी त्यांनी ऑफिसमध्ये जाहीर केले आज तारीख २ डिसेंबर १९७२ आहे. आपण सर्वांनी चिकाटीने प्रयत्न करून येत्या २५ फेब्रुवारी दिवशी पाणी वर काढायचे म्हणजे आज पासून आपणाला पुरे, ऐंशी दिवस मिळातात. इरिगेशनचे काम सुरू करण्यापूर्वी अण्णांनी इरिगेशनचे पाणी पाडण्याची तारीख ठरविली होती. त्या इरिगेशनला किसान लिप्ट इरिगेशन नं.१ असे नाव दिले होते. योगायोगाने ८० वा दिवशी हुतात्मा किसन अहिर यांचा स्मृतीदिन २५ फेब्रुवारी १९७२ येत होता. तो दिवस पाणी पाडण्याचा नक्की ठरवून, पाणी पडल्यानंतर शेतकऱ्यांना जिलेबीचे जेवण द्यायचे ठरविले होते. सर्वजण कामाला लागले.

दुसऱ्या दिवशी आम्ही सर्वजण अण्णाच्यासह कृष्णा कारखान्यावर जाऊन चेअरमन जयवंतराव भोसल्यांना भेटलो. त्यांना अण्णांनी इरिगेशन बद्दल सविस्तर माहिती दिली. जयवंतरावांनी ताबडतोब कारखान्याचे इरिगेशन विभागाचे इंजिनिअर साळुंखे साहेबांना बोलवले व अण्णांची भेट घातली आणि त्यांना सांगितले. ''अण्णांच्या इरिगेशनसाठी जी मदत लागेल ती आपल्या कृष्णा कारखान्यामार्फत कारखान्याच्या खर्चाने करायची आहे. काही अडचण आली तर मला सांगा.'' साळुंखे सायबांच्या सहकार्याने इरिगेशनचे काम अण्णा नेटाने करत होते. इरिगेशनसाठी भू-विकास बँकेकडे कर्ज मागितले होते. या कामासाठी मॅनेजर बिरनाळे व स्वत: चेअरमन म्हैशाळचे आबासाहेब शिंदे यांनी अण्णांच्या इच्छेप्रमाणे तातडीने कर्ज दिले. एक वर्षापुर्वी अण्णांनी


वसंतरावदादांच्या मदतीने ६५०० एकरांचा पाणी परवाना घेतला होता. इरिगेशन कामाच्या सुरुवातीच्या अगोदरच पाणी पाडण्याची तारीख निश्चित केल्यामुळे कामाच्या घाईत क्रांतिवीर अण्णांचे दाढी करण्याचे ठरलेले दोन वार बुधवार आणि रविवार कधी आले आणि कधी गेले हे अण्णांच्या लक्षात आले नाही. त्यामुळे एक दोन आठवडे दाढी करावयाची राहून गेली. ती वाढलेली दाढी बघून साधा शेतकरी श्री.कोंडीबा माळी अण्णांचे कार्यकर्ते महादेव जाधव यांना म्हणाले,"अहो महादेवराव, इरिगेशनचे काम होईपर्यंत अण्णांची दाढी हातभर वाढेल." तसं इरिगेशनचे काम सोपं नव्हतं. नदीपासून २ मैल एक फर्लांगावर पाणी पाडायच होते. त्याला लागणाऱ्या सिंमेट पाईपची ऑर्डर द्यायची होती. ऑर्डर नंतर पाईप तयार होणार ! त्यासाठी पैशाची गरज होती. पाईप लाईन दोन मैल एक फर्लांगची खुदाई व्हायची होती. विजेची व्यवस्था, मोटार पंपाची व्यवस्था, हे सर्व व्हायचे आहे आणि अण्णा म्हणतात ऐंशी दिवसांत पाणी वर काढायचे हे कसं शक्य आहे ? म्हणून ते महादेव जाधवांना म्हणाले, "ती गोष्ट महादेव जाधवांनी जशीच्या तशी अण्णांना सांगितली. त्यादिवशी बुधवार होता. दाढी करण्यासाठी आलेला कारागीर अण्णांनी परत पाठविला. अण्णा नुसते हसले आणि महादेवला म्हणाले, "महादेव, कोंडीबा माळ्यांना सांगा २५ फेब्रुवारी पर्यंत धीर धरा." अण्णा भराभर निर्णय घेत होते. एका बाजूला पाईप लाईन आखून देऊन त्याचे काम ताबडतोब चालू केले. इंडियन ह्युम पाईप कंपनी मध्ये इरिगेशन मेन लाईनच्या पाईपची ऑर्डर दिली. पाईपची साईज मोठी होती. तरी आम्ही प्रयत्न करून लवकरात लवकर तुम्हांला पाईप पुरवतो म्हणून सांगितल्यामुळे त्यांना ऑर्डर दिली आणि मोटार पंपासाठी किर्लोस्कर कंपनीत ऑर्डर दिली. तिथं त्यांचे मित्र प्रभाकर गुणे साहेब होते. त्यांनी अण्णांना सांगितले बारमाही ४०० एकरांची स्कीम आहे. १०० एच.पी.च्या दोन मोटार, त्याला लागणारे पंप, स्टार्टर,केबल, ट्रान्समिटर वगैरे. पाणी ८० दिवसांत पाडायचा अगोदरच निर्णय झालाय म्हणताय. त्यावेळी गुणे साहेब म्हणाले, "ठीक आहे. आमच्या कामाची कसलीच काळजी करू नका. आम्ही सर्व तुम्हांला वेळेवर देतो. तुम्ही इतर कामाचे काय ते बघा. साऱ्या स्तरावर अण्णांनी टीम कामाला लावली होती, पहिल्यांदा सर्वे केला, लाईन आखणी, खुदाई केली. चेंबर बांधकाम करायला सुरुवात केली. परंतु मेन लाईनची पाईप वेळेवर मिळणार नाही असे इंडियन ह्युमच्या मॅनेजरने सांगितले.त्याच बरोबर त्यांनी दुसरा एक पर्याय अण्णांना सांगितला. 'दुसऱ्या एका इरिगेशनची ऑर्डरची पाईप तयार आहे. पण ती पाईप महाग असून प्रिस्टेड पाईप आहे आणि त्याची साईज

५०० एम.एम.ची आहे. तुमच्या ऑर्डरच्या पाईप पेक्षा थोडी साईज कमी आहे. बघा तातडीने निर्णय घेतला तर उद्याच्या उद्या पाईप टाकायला सुरुवात करतो.' अण्णांनी लागलीच त्यांना निर्णय जागेवर दिला-आम्हाला हा व्यवहार मान्य आहे. आजच्या आज पाईप टाकायला सुरुवात करा. सारं गाव इरिगेशनच्या कामासाठी आपला वेळ देत होतं. पडेल ते काम कार्यकर्ते करत होते. या कामास सर्वश्री नागनाथअण्णा, दत्तोपंत कुलकर्णी, काका घोरपडे, किसन धोंडी अहिर, पांडुरंग बाबू मुळीक, इनामदार अप्पा, महामुद चाऊस, राजाराम जाधव, महादेव जाधव, पांडा देव, रामचंद्र अहिर, राम सुतार, धींगू मोटे, जालिंदर थोरात, माळी पाटकरी, जयवंत अहिर, शामराव सव्वाशे काका, जयवंत अहिर, वसंत पवार, दत्ता शेळके, जे.बी.पाटील, कृष्णा कारखान्याचे साळुंखे साहेब व त्यांची टीम, भू-विकास बँकेचे चेअरमन आबासाहेब शिंदे, बिरनाळे व त्यांचा सारा स्टाफ, किर्लोस्कर कारखान्याचे पी.डी.गुणे व त्यांचा सारा स्टाफ, (पांडुरंग बाबू मुळीक या शाळेच्या शिपायाचा इरिगेशन कामात एक पाय अधू झाला.) साऱ्यांची नाव आठवत नाहीत पण ज्यांना शक्य ते त्यांनी न सांगता केले. ज्यांची रानं पाणी पिणार होती त्यांनीही काम केले हे नैसर्गिक होतं पण ज्यांची रानंच कार्यक्षेत्रात येत नव्हती अशा अनेक वाळव्यातील शेतकरी, कार्यकर्त्यांनी हिरीरीने या किसान नं.१ इरिगेशनचं काम केले. खूप त्रासाने, हिरिरिने लोकांनी कामे केली. आणि २५ फेब्रुवारी १९७२ रोजी बरोबर ८० व्या दिवशी काम पूर्ण झाले होते म्हणून मोटारी चालू केल्या. परंतु टेक्नीकल अडचणीने त्या दिवशी इरिगेशनचे पाणी वर आले नाही. अण्णांनी २५ फेब्रुवारीला रात्री ११.५९ मिनिटांपर्यंत पाण्याची वाट बघितली. पाणी पडत नाही म्हटल्यावर अण्णा दर्ड्याला तिथंच गाढ झोपले. रात्रभर सारे कार्यकर्ते व गुणे साहेब धडपडत होते. गुणे साहेब रात्रीत तीन वेळा किर्लोस्कर कारखान्यात साहित्य बदलून आणण्यासाठी गेले होते. त्यांच्या सोबत त्यांचे दोन इंजिनिअर होते. त्याला साक्षीदार मी (जयवंत अहिर) त्यांच्या बरोबर किर्लोस्करवाडीला गेलो होतो. जिलेबी तयार होती परंतु कोणीसुध्दा एक तुकडाही तोंडात घातला नाही.

शेवटी साऱ्यांच्या निरनिराळ्या प्रयत्नांने त्यात सिंहाचा वाटा किर्लोस्कर कंपनीचे श्री.पी.डी.गुणे साहेबांचा होता. २५ फेब्रुवारी ऐवजी दुसऱ्या दिवशी २६ फेब्रुवारीला सकाळी ८ वाजता इरिगेशनचे पाणी पडले. त्यानंतर क्रांतिवीर अण्णांनी संबंधित शेतकऱ्यांना सांगितले. ''तुम्ही आम्हांला कामाला जुंपले. आम्ही ते काम पूर्ण केले. आता नदीतून वर काढलेले पाणी अडवून शेताला पाजा.'' नाही तर ?

अण्णांचा स्वभाव असा विचित्र होता. एकवेळ कामाची जबाबदारी घेतली म्हटलं की ते काम पूर्ण केल्याशिवाय थांबायचं नाही. मग संबंधित कोण बरोबर येवो न येवो. कुणी मदत करो न करो. कार्यकर्ते बरोबर घ्यायचे आणि काम पूर्ण करायचे. या किसान नं.१ इरिगेशनच्या कामाबाबत एक अण्णांचा कार्यकर्ता पांडुरंग ज्ञानू गावडे अंगठे बहाद्दर(धनगर समाजातील शेतकरी)अण्णांना म्हणाला, ''अण्णा, या इरिगेशनच काम इतकं भक्कम झालय की याला डुयान् डुया धक्का लागणार नाही.''

येणाऱ्या २५ फेब्रुवारी २०१५ ला किसान नं. १ इरिगेशनला ४३ वर्षे संपून ४४ वर्षात पदार्पणा वेळी क्रांतिवीर नागनाथअण्णा हयात नाहीत पण इरिगेशन आहे तस भक्कम आहे.



कृष्णा नदी पासून ३ कि.मी. अंतरावर किसान लिफ्ट इरिगेशनच्या पाण्याच्या हौदावर सहकार्यांच्या बरोबर पाहणी करताना
**क्रांतिवीर नागनाथअण्णा**

# वाळव्याच्या विकासाला सुरुवात (१९७२-७३)

हुतात्मा किसन अहिर पुतळ्याचे उद्‌घाटन होऊन, आठ एक दिवस झाले होते. रविवारचा दिवस होता. सकाळी सकाळी नागनाथअण्णा विद्यालयाच्या बागेत पुतळ्या समोर पेपर वाचत बसले होते. काही शेतकरी व कार्यकर्ते अण्णांना भेटण्यासाठी आले होते. त्यापैकी महादेव जाधव म्हणाले, "अहो ! अण्णा, आपल्या वाळवा-इस्लामपूर रस्त्याच्या कामाचं काय ते बघा." अण्णांना वाळव्याच्या रस्त्याची दुरावस्था माहीत होती. वाळव्याहून इस्लामपूरला एस.टी.जात असताना शेवटच्या बाकावर बसलेल्या एखाद्‌या माय बहिणीचं मांडीवर असलेले लहान मूल इस्लामपूरला जाताना लागणाऱ्या खड्ड्यात एस.टी.चे चाक आपटले की उडून टपाला लागत होते. अशी दुरवस्था रस्त्याची होती. ती वाळव्याच्या जनतेने अनेक वर्षे सहन केली होती. आज देश स्वतंत्र होऊन २५ वर्षे झाली तरी सरकार वाळव्याच्या रस्त्याचा विचार करत नव्हते. वाळव्याच्या चारही दिशेचे रस्ते नागठाणे-वाळवा, पडवळवाडी-वाळवा, खेड-वाळवा, साखराळे-वाळवा यां रस्त्यांची अवस्था तर विचारायची सोय नाही. अशी होती. साऱ्या रस्त्यावरती कमी जास्त धक्के खात उन्हाळ्यात घर तर घावत होते. पण पावसाळ्यात या रस्त्याने यायचे म्हणजे काय होत होते हे त्या काळात या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्यालाच माहीत. चारी बाजूंचे ओढे पाण्यानं दोन्ही काठांने व्हायचे, पाणी उतरल्या शिवाय गाव घावायचे नाही. तासनंतास ओढ्याचे पाणी कधी उतरतय याची वाट बघत बसावे लागत होते. पावसाळ्यात वाळव्याला एस.टी.घेऊन येणाऱ्या ड्रायव्हरना

नुसते आकाशात ढग दिसले तरी ते एस.टी.आणायला का-कू करत होते. तर काही बहाद्दर ड्रायव्हर पसार होत होते.

एक वेळचा पावसाळ्यातला प्रसंग आठवतोय. असेच पावसाचे दिवस होते. कोल्हापूरहून महामूद चाऊस या कार्यकर्त्यांचे मेव्हुणे, बहीण व तिची तीन मुले वाळव्याला येत होती. कोल्हापूरहून ते इस्लामपूरला आले. पुढे इस्लामपूरहून एस.टी.ने वाळव्याला येणार होते. परंतु त्या दिवशी पाऊस होता म्हणून वाळव्याची एस.टी.रद्द केली होती त्यामुळे ते सर्व कुटुंब वाळव्याच्या इतर प्रवाशांच्या बरोबर इस्लामपूर-सांगली एस.टी.ने पडवळवाडी स्टॉपला उतरून वाळव्याला पायी येत होते. पाऊस पडत होता. वाळव्याला येणारी माणसं तशी कमीच होती. त्यांच्याबरोबर हे कुटुंबपण येत होते. पहिला लहान ओढा ओलांडून सर्व प्रवासी पुढे आले. पुढे मोठा ओढा होता. तो ओढा पार करतअसताना त्यांच्या जवळचे साहित्य व मुलंबाळं यांना एका वेळेला पलीकडे जाता येईना म्हणून महामूदभाईंचे मेव्हणे पत्नीला म्हणाले, ''तू इथच मुलांना घेऊन थांब. मी पलीकडे साहित्य ठेवून परत येतो आणि नंतर आपण जाऊ.'' वाळव्यातील काही मंडळींच्या मदतीने साहित्य घेऊन पाहुणे पलीकडे निघाले. ओढ्यामध्ये गेल्यानंतर ओढ्याचे पाणी वाढायला लागले. कसे बसे ते पलीकडे गेले. पाणी इतके वाढले की त्या पाहुण्यांना, बायका-मुलांना आणण्यासाठी परत येता आले नाही. दिवस तर मावळलेला ? आता काय करायचे. त्यांच्या सोबत कोणीही नाही. अशा अवस्थेत वाळव्यातील काही मंडळींनी महामूद भाईंच्या बहिणीला सांगितले, ''तुम्ही मुलांना घेऊन मागे जाऊन पडवळवाडी गावात मुक्काम करा.'' मुले लहान होती. एक कडेवर, दोघांच्या हाताला धरून चालत त्या बाई पाठीमागे पडवळवाडीला जाण्यासाठी मागे फिरल्या. तोपर्यंत पाठीमागच्या ओढ्याचेही पाणी वाढले होते. धड मागे जाता येईना धड पुढे जाता येईना. अंधार पडला किर्र झाडी आणि पाऊस तुफान पडायाला लागला. ओढ्याचे पाणी इतके वाढायला लागले की विचारायची सोय नाही. पाणी वाढले तश्या त्या बाई मुलांना घेऊन चढावर एका झाडाला धरुन उभा राहिल्या ओढ्याच्या काठावरुन महामूद भाई व त्यांच्या भावबंधानी त्या बहिणीचे नाव घेऊन मोठ-मोठ्याने आवाज दिला परंतु प्रतिसाद मिळाला नाही. त्यात ओढ्याचे पाणी धाड-धाड आवाज करत जोराने वाहत होते. वीज कडाडत होती. पावसाच्या सरी आभाळ फुटी झाल्यागत पडत होत्या आम्हाला त्या बाईच्याबद्दल काहीच सुगावा लागला नाही. तशा त्या बाई धाडशी होत्या. अण्णांसह आम्ही सर्व कार्यकर्ते व स्वत: महामूद भाई विद्यालयाच्या ऑफिसमध्ये

बसलो होतो. साऱ्या ओढ्याला तुफान पाणी. रस्ते-नाले पाण्याने तुडुंब भरून वहात होते. आम्हाला त्याची काहीही कल्पना नव्हती अचानक महामूदभाईंचा चुलत भाऊ महामूद भाईंना बातमी देण्यास आला. त्याला नीट बोलता येत नव्हते, की नीट सांगता येत नव्हते. कसेबसे त्यांनी महामूदभाईंना सांगितले. ''तुमची कोल्हापूरची बहीण आणि तिची तीन मुले पडवळवाडीच्या ओढ्यात अडकल्यात.' काय झालय कुणास ठावे. महामूदभाई तर कोलमडून पडले. धाय-धाय रडायला लागले. अण्णांनी त्यांना शांत केले आणि पट्टीचे पोहणारे कार्यकर्ते आणि स्वत: अण्णांचेसह आम्ही सर्वजन पडवळवाडीच्या ओढ्याकाठी आलो. समोर पाहिलं तर ओढ्याला तुफान पाणी आले होतेच ते पाणी पात्राच्या बाहेर दोन-तीन फर्लांग पर्यंत पसरले होते. आम्ही येताना बरोबर दोन गॅसबत्त्या आणल्या होत्या. पाणी वाढलं तसं महामूदभाई यांची बहीण मागे मागे सरकत चढावर जाऊन एका बाभळीच्या झाडाच्या फांदीला धरून दोन मुलं खाद्यांवर आणि एकाला कडेवर घेऊन उभ्या राहिल्या होत्या. परंतु अंधार इतका होता की त्या कोणालाही दिसत नव्हत्या. पण त्यांना बत्तीचा उजेड दिसल्यामुळे अलीकडची आमची हालचाल दिसत होती. पाण्याच्या आवाजामुळे एकमेकांना मारलेल्या हाका ऐकता येत नव्हत्या. बत्तीच्या उजेडाची हालचाल त्यांनी पाहिली आणि त्यांना चांगलाच धीर आला. (हे आम्हांला त्यांनी सांगितल्यामुळे समजले.) अलीकडच्या तिरावरून अहमद बंडू चाऊस व ज्ञानू सखाराम पेशवे हे पट्टीच्या पोहणाऱ्यांनी भोपळ्याच्या सांगडी घालून पाण्यात उड्या मारल्या. पाण्याला ओढ दांडगी. अंधारात पुढचे काहीच दिसेना. शिवाय पोहताना पाण्यात बुडलेली बाभळीच्या झुडपाचे काटे पायाला आणि पोटाला ओरबडू लागले. त्या जोडीला फारसं काहीच करता आला नाही. ती परत आली आणि अण्णांना सत्य परिस्थिती त्यांनी सांगितली. सगळ्यांची खात्री झाली. दोन्ही ओढे एक झालेत. पाऊस तर तुफान पडतोय. पाणी आणखीन वाढायला लागलय. आता अशा परिस्थितीत काहीच करता येत नाही. सर्वांना वाटले आता महामूद भाईंची बहीण पाण्यातून वाहून गेली असावी. परंतु अण्णांचा तिथून पाय निघेना. त्यांचे मन त्यांना सांगत होते ''त्या बाईजवळ मुलं आहेत. तेव्हा मुलांच्या ओढीनं ती तग धरणारच.'' शेवटी नाइलाजास्तव अण्णांनी दोन कार्यकर्त्यांना दोन घोंगडी आणि दोन चांगल्या छत्र्या दिल्या व त्यांना निक्षून सांगितले 'तुम्ही दोघांनी गॅसबत्त्या घेऊन दिवस उगवेपर्यंत इथं थांबायचे. थोड्याच वेळात आणखीन चार कार्यकर्ते आणि त्यांच्याबरोबर दोन बत्त्या व तुमच्यासाठी चहा पाठवतो. परंतु कसल्याही परिस्थितीत

तुम्ही बत्ती विझू द्यायची नाही.' आणि एका जागी न बसता ओढ्याच्या काठावरुन इकडे तिकडे उजडे पर्यंत फिरत रहायचे आणि बघा दैव बलवत्तर असेल तर काय होऊ शकते हे त्या बाईंच्याकडूनच ऐका.

''सायंकाळी सहा वाजता मी आणि माझी मुलं ओढ्याच्या अलीकड राहिलो आणि माझे यजमान पलीकडे कसेबसे पोहचले. पाणी वाढायला लागलं. दिवं लागण्याची वेळ, पुसट-पुसट दिसत होते. मी माझ्या तिन्ही मुलांना घेऊन पडवळवाडीला जायचं म्हणून माघारी फिरले. तो मागच्या ओढ्याला पाणी इतकं वाढलं होतं मी पलीकडे जाऊ शकले नाही. काळाकुट्ट अंधार, पाऊस तुफान पडतोय. एक मूल कडेवर, दोन मुलं हाताला धरून पाणी वाढल तशी मी मागे मागे सरकत चढावर येऊन एका झुडपाच्या आडुशाला थांबले. पाऊस वाढतच होता. पाणी वाढत होतं. हळूहळू पाणी माझ्या गुडघ्यापर्यंत आलं तसं दोन मुलं मी खांद्यावर घेतली. त्यांना झाडाच्या फांद्या पकडायला सांगितल्या. पाणी वाढतच होते. हळूहळू ते माझ्या कमरेपर्यंत आलं त्याच वेळी चुकून एक मूल माझ्या हातून निसटले. ते पाण्यात पडलं काळजाच पाणी पाणी झालं कसंबसं त्याला उचलून पुन्हा कडेवर घेतलं. दोन मुलं खांद्यांवर. पाणी तर चढत होतं. एवढ्यात मला बत्त्यांचा उजेड दिसला. बत्त्यांच्या उजेडात माणसांची हालचाल दिसली. तसा मला धीर आला. आता माणसं येतील मग येतील, या आशेवर मी बत्तीच्या उजेडाकडे बघत रात्र काढली. हळू-हळू पाणी उतरायला लागले तसं मी चढावर मोकळ्या जागेवर मुलांना घेऊन बसले. रात्रभर उभा राहून चांगलाच कड आला होता. पहाट होता होता तांबडं फुटल. आता ओढ्याच पाणी चांगलच कमी झाल होतं. आम्हांला माणसांनी पाहिलं आणि सारी पळतच माझ्याकडे आली. माझ्या भावानं तर मला मिठी मारली आणि ओक्साबोक्सी रडू लागला. मी माझ्या मुलांसाठी न भिता खंबीर होते परंतु बत्तीच्या उजेडान मला इतका धीर आला सांगायला माझ्याकडे शब्द नाही.''

'बत्तीच्या उजेडानं धीर दिला' या बाईंच्या एका वाक्याने अण्णांची दूरदृष्टी कार्यकर्त्यांच्या लक्षात आली. कसल्याही परिस्थितीत उजडेपर्यंत बत्ती विझू द्यायची नाही हे वाक्य आमच्या कानात घुमू लागले.ह्या सत्य घटनेचा साक्षीदार मी (लेखक) आहे. त्यावेळी अण्णांच्या बरोबर ओढ्याच्या काठावर उभा होतो.

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी महामूद भाईंच्या त्या बहिणीचा (जिचे नाव खातूनबी) जाहीररीत्या एक धाडसी बाई म्हणून साडी चोळी देऊन हुतात्मा किसन अहिर विद्यालयात शेतकरी व विद्यार्थी/विद्यार्थिनी शिक्षक, शिक्षिका, कार्यकर्ते वगैरे साऱ्यांच्या उपस्थितीत सत्कार केला.

वरील घडलेल्या सत्य प्रसंगावरून वाळव्याच्या रस्त्याची कल्पना वाळव्या बरोबर जवळच्या पंचक्रोशीत सर्वांना माहीत आहे. देश स्वतंत्र होऊन आज २५ वर्षे लोटली तरी अजून खेड्यापाड्यांतील रस्त्यांची ही अशी दुरवस्था आहे. या सरकारला अर्ज, विनंत्या करून आपला रस्ता होणार नाही असे स्पष्टपणे अण्णांनी भेटायला आलेल्या कार्यकर्त्यांना सांगितले. रस्ताच पाहिजे असेल तर याला एकच मार्ग. (नाक दाबल्या शिवाय तोंड उघडत नाही) या सरकारला वठणीवर आणायचे असेल तर साराबंदी शिवाय दुसरा पर्याय नाही आणि हा निर्णय एकमुखी व्हायला पाहिजे. अण्णांना भेटायला आलेले शेतकरी व कार्यकर्ते त्यांना म्हणाले, ''उद्या आम्ही सारं गाव हायस्कूलच्या पटांगणावर जमवतो. तुम्ही साऱ्या गावाला विचारून निर्णय घ्या.''

दुसऱ्या दिवशी कार्यकर्त्यांनी गावात फेरी काढून लोकांना सांगितले. वाळवा-इस्लामपूरच्या रस्त्याच्यासाठी आज रात्री हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणावर क्रांतिवीर नागनाथअण्णांची जाहीर सभा आहे. तरी सर्व गावकऱ्यांनी सभेसाठी हजर राहावे असे आवाहन केले. वाळव्यातल्या आम जनतेला रस्त्यांची गरज होती. सर्व मतभेद विसरून शाळेच्या पटांगणावर चार एक हजार शेतकरी व तेवढ्याच स्त्रिया जमल्या होत्या. साऱ्यांच्या पुढे वाळवा इस्लामपूर रस्त्याचा प्रश्न होता. अनेक कार्यकर्त्यांनी आपली मते सरकारच्या विरोधात आणि रस्त्याच्या प्रश्नावर चळवळीच्या बाजूने ठाम मांडली. शेवटी अण्णांनी मुद्द्याची गोष्ट सांगून रस्ताच पाहिजे असेल आणि तो डांबरी पाहिजे असेलतर साऱ्या गावानं एकमुखी साराबंदीचा निर्णय घ्यायला पाहिजे. तो योग्य आहे असे साऱ्या गावकऱ्यांना मान्य असेलतर सर्वांनी हात वर करावेत. साऱ्या शेतकऱ्यांनी हात वर करुन संमती दिली. पुढे साराबंदीचा निर्णय अण्णांनी जाहीर केला. दोन घोषणा अण्णांनी दिल्या. 'आधी रस्ता-मगच सारा', 'वाळवा इस्लामपूर रस्ता-झालाच पाहिजे. झालाच पाहिजे.' हुतात्मा किसन अहिर की जय या घोषणेनंतर सभेचा कार्यक्रम संपला.

अनेक प्रकारे राजकीय दबावतंत्र पोलिसांच्या कवायती आणि बंदुकांना न घाबरता रस्त्याच्या प्रश्नावर दोन हजार स्त्री-पुरुष रस्त्यावर येऊन गावभर फेऱ्या काढायचे. असे एक नव्हे दोन नव्हे सलग चार वर्षे साराबंदीची चळवळ शेतकरी चिवटपणाने लढत होते. त्या वेळच्या सरकारने चळवळ मोडून काढण्याचा सातत्याने प्रयत्न केला. सरकारने चार वर्षांच्या साराबंदीच्या काळात शेतकऱ्यांची चळवळ मोडून काढण्यासाठी जेवढा खर्च केला तेवढ्या खर्चात रस्ता झाला असता. शेवटी नाइलाजाने

का होईना रस्त्याचा नारळ फोडावा लागला. त्यात पण स्थानिक डावपेच. वाळव्याच्या बाजूनं रस्त्याचं काम न सुरू करता इस्लामपूरच्या बाजूने सुरू केले. वाळव्याचा शेतकरी मोठ्या मनाचा होता. त्याचं एकच मत होतं. आमचा वाळवा इस्लामपूर रस्ता डांबरी करा. मग कुठल्या का बाजूने काम होऊ दे. रस्ता झाला म्हणजे काम झाले. अशा ह्या रस्त्याच्या कामात अनेक अनुभव आले आणि या वाळवा-इस्लामपूर रस्त्यानेच पुढचा विकासाचा रस्ता दाखवला असे जाहीर उद्गार क्रांतिवीर नागनाथअण्णांनी काढले.

साराबंदीच्या चळवळीत क्रांतिमाता लक्ष्मीबाई(आईसाहेब)आघाडीवर होत्या. त्यांनी या चळवळीत आपली सून सौ.कुसुम नायकवडी यांना भाग घेण्यास सांगितले. तसेच आपली थोरली नात विशाखा नायकवडी यांनाही आघाडीवर काम करायला सांगितले. क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या घरातल्या प्रमुख तीन स्त्रिया साराबंदी चळवळीत आघाडीवर काम करत होत्या. त्यामुळे गावातील बहुतेक घरातील स्त्रिया रस्त्यासाठी रस्त्यावर आल्या होत्या. साराबंदीचा निर्णय वाळव्यातील शेतकऱ्यांनी १०० टक्के यशस्वी केला. त्या अगोदर १९२७ साली ब्रिटिश सरकारने गुजरात राज्याचा २५% शेतसारा वाढवला म्हणून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर साराबंदीचा बारडोलीला देशात वल्लभभाई पटेल यांनी पहिला प्रयोग यशस्वी केला. त्या आंदोलनाने वल्लभभाईना सरदार पदवी मिळाली. त्यानंतर दुसरा प्रयोग हा क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी वाळव्यात यशस्वी केला.

क्रांतिवीर अण्णांच्या सारा बंदीच्या आणि वाळवा इस्लामपूर डांबरी रस्त्याची मागणी गावकऱ्यांनी डोक्यावर घेतली. हजारो स्त्री-पुरुष रोज वाळव्यास रस्त्याच्या प्रश्नावर फेऱ्या काढत होते. त्याच प्रमाणे दीनदलित मंडळींनी मोठं योगदान दिलं त्यास आबा लोंढे व त्यांची बहिण सतत फेरीत अघाडीवर होते तशी रस्त्याच्या प्रश्नांवर तळातूनच जागृती असल्यामुळे लढा यशस्वी झाला.

***

# नागठाणे बंधारा
# (१९७४-७५)

नागनाथ अण्णांनी डोक्यात कामाचा मास्टर प्लॅन कधी करून ठेवला होता, कुणास ठावे ! परंतु एक काम झाले की लगेच दुसऱ्या कामाची जोडणी केलेली आहेच. ते झोपेतून जागे झाले की, कामाच्या पाठीमागे लागलेच म्हणून समजा. १९४२ साली घर सोडले ते परत घरी गेले नाहीत. घरादारातून बायको, मुलांपासून संन्यास घेतलेल्या संन्याशासारखे जिवंत हुतात्म्यांचे जीवन जगणाऱ्या क्रांतीवीराने आपल्या प्रपंचाकडे कसलेही लक्ष न देता हुतात्मा किसन अहिर विद्यालयात ठाण मांडून सतत विधायक कामात स्वत:ला वाहून घेतले होते.

२५ फेब्रुवारी १९७२ रोजी किसान लिप्ट इरिगेशन नं.१ चे काम ८० दिवसांत पूर्ण केले. दुसऱ्याच दिवसी शेतकऱ्यांची व प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली. ते शेतकऱ्यांना उद्देशून म्हणाले, ''आज २६ फेब्रुवारी इरिगेशनचे पाणी वर काढण्यास आपण सारे यशस्वी झालो. या इरिगेशन मध्ये साऱ्या गावाची जमीन पाण्याखाली येऊ शकणार नाही. तेव्हा अजून लहान मोठी अनेक इरिगेशन आपणाला करावी लागतील. आता शेतकरी गप्प बसणार नाही. तेव्हा भविष्यात लिप्ट इरिगेशन स्कीमना पाणी कमी पडू नये त्यासाठी बोरगाव पासून खाली नागठाणे गावापर्यंत कृष्णेच्या पात्रात सतत पाणी भरून रहावे म्हणून नागठाणे येथे कोल्हापूर पद्धतीचा बंधारा व्हावा यासाठी आपण साऱ्यांनी प्रयत्न करायचा आहे. तुमच्या साऱ्यांच्या पाठिंब्यामुळे हे काम फारसं अवघड नाही.''

नागठाण्याच्या बंधाऱ्यामुळे कितीतरी क्षेत्र ओलिताखाली येईल तसेच या परिसराचा कायमचा दुष्काळ कसा हटेल वगैरे चोहो बाजूंनी अण्णांनी विचार केला. आणि ही गोष्ट महाराष्ट्र सरकारच्या लक्षात यावी म्हणून संबंधीत खात्याला सविस्तर माहिती अगोदरच पुरवली होती. ती शासनाला पटवून सांगण्यासाठी आणि नागठाणेच्या बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान कसे उंचावणार आहे हे ध्यान्यात आणून देण्यासाठी नागनाथअण्णा शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ घेऊन मुंबईला गेले. प्रथम वसंतदादांना बंधाऱ्याची पूर्ण कल्पना दिली. दादांना अण्णांचे म्हणणे पटले. स्वत: दादा इरिगेशन मंत्री असताना त्यांनी असे अनेक बंधारे केले होते. योगायोग त्या वेळी संगमनेर भागातील श्री.खताळ पाटील इरिगेशन मिनिस्टर होते. ते कॉ.दत्ता देशमुख, वसंतराव दादा व नागनाथ अण्णा यांच्या चांगल्या परिचयाचे होते तसेच मंत्री महोदयांचे आणि दत्ता देशमुखांचे फारच घनिष्ठ संबंध होते. कॉ.दत्ता देशमुख, अण्णा व वसंतराव दादा या तिघांचे १९४२ पासूनचे संबंध होते.अण्णा व दत्ता देशमुख एकाच पक्षात काम करीत होते. म्हणून त्या शिष्टमंडळात दत्ता देशमुखांनाही अण्णांनी बरोबर घेतले होते. ठरल्याप्रमाणे सर्व शिष्टमंडळ खताळ पाटलांना भेटले. अण्णांनी व दत्तांनी अभ्यासपूर्ण अशी माहिती मंत्रिमहोदयांना दिली. मंत्रिमहोदयांचा योग्य सामाजिक दृष्टिकोण होता. त्यांनी शेतकऱ्यांच्या कामात राजकारण न आणता ताबडतोब नागठाण्याच्या बंधाऱ्याच्या कामाला मंजुरी दिली.

नागठाणे बंधाऱ्याच्या मंजुरी नंतर ते काम चांगले आणि मजबूत व्हायचे असेल, तर ह्या बंधाऱ्याचे काम कोल्हापूरचे कॉंट्रॅक्टर शंकरराव नलवडे यांनी घ्यायला पाहिजे, म्हणून अण्णांनी शंकरराव काकांना आग्रहाने ह्या कामाचे टेंडर भरा म्हणून सांगितले. त्या प्रमाणे काकांनी टेंडर भरले. शंकरराव नलवड्यांना या कामातील अनुभव खूप होता. त्यांनी कोल्हापूर टाईपचे अनेक बंधारे बांधले होते. त्यांचे काम चोख आणि भक्कम असल्याचा सरकारी अधिकाऱ्यांना अनुभव होता. त्यामुळे शंकररावांची त्या खात्यात पत होती, त्या शिवाय अण्णांचे प्रयत्न यातून बंधाऱ्याचे काम शंकरराव काकांना मिळाले. काम सुरू असताना अनेक वेळा अण्णा त्या कामावर जाऊन थांबत असत. काही वेळा तर बंधाऱ्याच्या कामाच्या ठिकाणी मुक्कामाला रहात होते. त्यावेळी त्यांच्या सोबत जयवंत अहिर, दत्ता शेळके, पवार सर, नागठाण्याचे महाराज व ईश्वर मांगलेकर(बापू) वगैरे कार्यकर्ते असत. अण्णांच्या उपस्थिती मुळे कामगारांत एक प्रकारचा उत्साह निर्माण व्हायचा. तसे बंधाऱ्याचे काम लवकर चांगले आणि भक्कम झाले. आता या बंधाऱ्याच्या कामाला पस्तीस एक वर्षे होत आली पण बंधाऱ्याला अजून तरी कसलाही डग लागलेला नाही.

बंधारा झाला. लहान मोठी इरिगेशन झाली. भरपूर प्रमाणात शेती ओलिताखाली यायला लागली. बागायत शेतीला लाग लागवडीसाठी आर्थिक चणचण भासत होती. त्यासाठी बँकांना विनंती करून शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यास सुरुवात केली. शेतीतील वाढता कामाचा व्याप शिवाय शेतीची वेळच्या वेळी मशागत मेहनत व्हावी म्हणून सामुदायिकरीत्या प्रयत्न करून एका वेळेला किर्लोस्कर कंपनीचे जर्मन कंपनी बरोबर कोल्याबोरेशन केलेले डायड अकरा ट्रॅक्टर शेतकऱ्यांना घ्यायला लावले. त्याचे वाटप पंढरपूरचे महाराज पुरुषोत्तम रंगाचार्य यांच्या हस्ते केले. यावेळी क्रांतिमाता लक्ष्मीबाई, राधाक्का, क्रांतिवीर नागनाथअण्णांच्यासह हजारो शेतकरी उपस्थितीत होते. या कामात अण्णांचे मित्र किर्लोस्कर कंपनीचे विश्वस्त आणि प्रमुख पदाधिकारी असलेले प्रभाकर गुणे यांनी विशेष लक्ष घातले. ट्रॅक्टर ओरिजनल जर्मनचे होते. विनोद म्हणून म्हणा किंवा तुमच्या मनाला समाधान वाटावे म्हणून म्हणा गुणे साहेब अण्णांना हसत हसत म्हणाले, ''नागनाथ, या ट्रॅक्टरच्या चाकातील हवा सुद्धा जर्मनी मध्ये भरलेली आहे.''



**नागठाणे बंधारा**

# एमएचएम ६८२६ गाडी शेतकऱ्यांनी दिली.

वाळव्यातील प्रमुख शेतकरी कार्यकर्त्यांनी अनेक वर्षांची शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी अण्णांची चाललेली धावपळ, त्यात रात्री-अपरात्री करावा लागणारा प्रवास, अण्णांनी वयाची ओलांडलेली पन्नाशी आणि त्या जुन्या काळात वाळव्यातून रात्री जाण्यासाठी वाहनाची सोय काहीच नव्हती. अण्णा बऱ्याच वेळा पडवळवाडी, अहिरवाडी, पेठनाका, किर्लोस्करवाडी रेल्वे स्टेशन कधी चालत तर कधी बैलगाडीतून प्रवास करत होते. अण्णा हे उन्हात चालणारे कार्यकर्ते होते. त्यांना होणारा त्रास प्रमुख कार्यकर्ते व काही शेतकऱ्यांच्या लक्षात आला होता. पण वेळ आली नव्हती. एक दिवस सर्व कार्यकर्ते एकत्र आले आणि त्या सर्वांनी ठरवले. अण्णांना एक ॲम्बेसिटर गाडी घेऊन देऊ. सर्वांना ही योजना पसंत पडली. पैसे गोळा करायला सुरुवात केली. सुरुवातीला आठ एक हजार रुपये जमले.

अण्णा नुकतेच कोल्हापूरहून आले होते. मी(जयवंत अहिर), दत्तादादा शेळके, वसंत पवार, शाळेत होतोच. एवढ्यात पांडा देव, महादेव जाधव, काका घोरपडे, इनामदार अप्पा हे ऑफिसमध्ये आले आणि अण्णांना त्यांनी सांगितले शेतकऱ्यांनी तुम्हांला ॲम्बेसिटर गाडी प्रदान करायचं ठरवलय. आतापर्यंत हे आठ हजार रुपये जमलेत ते घ्या आणि किर्लोस्करवाडीला तुमचे मित्र प्रभाकर गुणे साहेबांच्याकडे द्या आणि त्यांना गाडीची ऑर्डर द्यायला सांगा. तो पर्यंत बाकीचे पैसे जमा होतायत. शेतकऱ्यांनी अण्णांच्या जवळ पैसे दिले आणि पुढले पैसे गोळा करायला सुरुवात केली. हे सगळं खरं असलं तरी अण्णासाहेबांनी गाडीसाठी दिलेले पैसे प्रभाकर गुणे साहेबांच्याकडे दिलेच नाहीत. त्यांना आपल्या गाडी पेक्षा वसतिगृहाची अडचण महत्त्वाची वाटली. मुलांना, मुलींना वेळच्या वेळी जेवण मिळाले पाहिजे. गाडीमुळे ताबडतोब काही

नडलेले नाही. असा विचार करुन अण्णांनी, शेतकऱ्यांनी दिलेले गाडीचे सर्व पैसे वसतिगृहाच्या धान्यासाठी खर्च केले.

इकडे अण्णांना गाडी भेट द्यायची म्हटल्यावर शेतकरी भराभर पैसे देत होते. त्या काळात ॲम्बेसिटर गाडीची किंमत २५ हजाराच्या आसपास होती. शेतकऱ्यांनी चारच दिवसात अण्णांच्याकडे गाडीला ऑर्डर दिली का? म्हणून चौकशी केली, त्यावर अण्णा कार्यकर्त्यांना म्हणाले, ''अजून धावपळ करायची माझ्यात ताकद आहे. गाडीची काही गरज नाही, वसतिगृहाची अडचण म्हणून तुम्ही दिलेले सारे पैसे तिकडेच खर्च झालेत.'' शेतकरी हुशार ते अण्णांना म्हणाले, '' ठीक आहे.'' पुढे गाडीसाठी जमलेले पैसे श्री.महादेव जाधव, काका घोरपडे, दत्तोपंत कुलकर्णी वगैरे मंडळी सरळ किर्लोस्करवाडीला प्रभाकर गुणे साहेबांच्याकडे गेली. त्यांना भेटून आपल्या मनातील कल्पना सांगितली आणि त्यांना विचारले, ''साहेब, ॲम्बेसिडर गाडीला किती पैसे लागतील?'' गुणे साहेबांनी घाडगे पाटलांना फोन केला. किंमत विचारली. ते म्हणाले, ''पंचवीस एक हजार लागतील''. शेतकरी तयारीनेच गेले होते. त्यांनी ताबडतोब गुणे साहेबांच्याकडे २५ हजार रुपयांची रोख कॅश दिली आणि त्यांना सांगितले साहेब १५ ऑगस्टला तुम्ही गाडी वाळव्यात घेऊन आला पाहिजे. तुमच्या हस्ते क्रांतिवीर नागनाथअण्णांना गाडी प्रदान करण्याचे वाळव्याच्या सर्व शेतकऱ्यांनी ठरविले आहे. गुणे साहेबांनी आलेल्या शिष्टमंडळाला स्वत: उपस्थित राहण्याचा शब्द दिला.

वेळ कमी होता. गाड्यांची चणचण होती. १५ ऑगस्टला वाळव्यात मी स्वत: गाडी घेऊन येतो, म्हणून गुणे साहेबांनी शेतकऱ्यांना सांगितले. शेतकरी गेल्यानंतर गुणे साहेबांनी घाडगे पाटील कंपनीत कोल्हापूरला फोन लावला. फोनवर वसंतराव घाडगे भेटले. त्यांना सर्व माहिती सांगून १५ ऑगस्टला गाडी पाहिजे. त्या मंडळींनी रोख पैसे माझ्याकडे दिले आहेत. तुम्ही आजच्या आज ऑर्डर करा आणि गाडीची व्यवस्था करा. वसंतरावांनी हिंदुस्थान कंपनीत फोन करून गाडी देण्याविषयी विनंती केली परंतु कंपनीतून सांगण्यात आले की, कितीही गडबड केली तरी येत्या १५ ऑगस्टला गाडी मिळणे फार अवघड आहे. वसंतराव घाडगे गुणे साहेबांना म्हणाले, ''कंपनीतून गाडी मिळन अशक्य आहे. परंतु गुणे साहेब, एक मार्ग आहे. मी एक गाडी माझ्या पत्नीच्या नावावर बुक केली आहे. ती गाडी कालच आली आहे. त्या गाडीच बुकिंग पासिंग आर.सी.आहे. बुक गाडी ट्रान्स्फर होईपर्यंत आमच्याच नावावर रहाणार हे पार्टीला चालतय का बघा.''

अण्णा आणि गुणे साहेब यांच्यातला गेल्या कित्येक वर्षांचा एकमेकांच्या बद्दलचा परस्परांचा विश्वास इतका घट्ट होता की, अण्णांना न विचारता गुणे साहेबांनी वसंतरावांना सांगितले. तुमच्या पत्नीच्या नावावर गाडी असली तरी आम्हांला चालेल, परंतु गाडी १५ ऑगस्टला पाहिजेच. वसंतराव घाटके म्हणाले, ''आदल्या दिवशी मी

गाडी तयार ठेवतो आपण पाहिजे त्या वेळी घेऊन जावा.''

वसंतरावांचे निरोपाप्रमाणे गुणेसाहेब कोल्हापूरला किर्लोस्करवाडीहून परस्परच स्वत:च्या गाडीतून आदल्या दिवशी गेले, गाडी किर्लोस्करवाडीला आपल्या बंगल्यावर आणली. १५ ऑगस्टला गुणे साहेबांच्या पत्नीने गाडीचे पूजन केले आणि गाडी घेऊन गुणे साहेब स्वत: सकाळी वाळव्याला हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पुतळ्यापुढे आले. साऱ्या शेतकऱ्यांच्या हजेरीत गाडीच्या किल्ल्या अण्णांच्या हातात स्वत: प्रभाकर गुणे साहेबांनी दिल्या. दोघांनी एकमेकांना मिठ्या मारल्या. वाळव्याच्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. गाडीचा नंबर एमएचएम ६८२६ होता. गाडीचं पासिंग कोल्हापूरचं होतं. गाडी आमच्या संस्थेच्या नावावर ट्रान्स्फर करा म्हणून क्रांतिवीर अण्णांनी गुणे साहेब किंवा घाडगे पाटील यांना कधीही तगादा केला नाही. दहा वर्षांनंतर घाडगे पाटलांनी गुणे साहेबांचा गाडी ट्रान्सफर करून घ्या म्हणून अण्णांना तगादा होता. शेवटी पंधरा वर्षांनंतर अध्यक्ष किसान शिक्षण संस्थेच्या नावावर गाडी ट्रान्स्फर करून घेतली. त्या एम.एच.एम. ६८२६ गाडीनं शेतकऱ्यांच्या खऱ्या-खुऱ्या स्वातंत्र्यासाठी इतकं काम केलं, इतकं काम केलं त्या गाडीन हुतात्मा किसन अहिर कारखाना आणला ती गाडी आठवण म्हणून आज पर्यंत सांभाळून ठेवली आहे. ही गाडी चालवण्यासाठी पगारी असा स्वतंत्र चालक नव्हता. क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे अत्यंत जवळेचे विश्वासू कार्यकर्ते जयवंत अहिर, चंदर लोहार, दत्ता शेळके, महेश कांबळे हेच बिन पगारी चालकाचे काम करत होते.



**क्रांतिवीर नागनाथअण्णा** यांना
गाडीच्या किल्या प्रदान करताना **श्री.पी.डी.गुणे साहेब**

# पारधी समाजाला आधार

अनेक वर्षांच्या सहवासातून पूर्ण अण्णा अजूनही कुणालाही कळले नाहीत, अण्णांचे विचार, आचार इतरांच्यापेक्षा अगदी अगळे वेगळे होते. त्यांच्या प्रत्येक कृतीत फुले, शाहू, आंबेडकर होते. त्यांना साऱ्या गरीब व रंजल्या गांजलेल्या, आधार नसलेल्या दीन दलितांचा उद्धार करायचा, मनोमनच त्यांनी ठरविले होते. ते करत असताना योग्य वेळ, बघून तसेच बरोबरीच्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन काम करायचे म्हणजे अगदी तारेवरची कसरत. क्रांतिवीर नागनाथअण्णा कोणत्याही कामास हळूवारपणे पाउल टाकायचे पण ते पाउल दमदार असायचे त्यामुळे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास बळावत होता, त्याचाच एक भाग म्हणून फासेपारधी समाजाला माणसांत आणायचे व त्यांची संघटना बांधून त्यांच्या अडीअडचणी शासनाच्या ध्यानात आणून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याच्या संधीची वाट पहात होते. तसं पाहिलंतर ही जात लोकांच्या जवळ येत नाही, त्यातून गावाच्या बाहेर कुठंतरी लांब रानात पालं घालून राहणारा हा पारधी समाज. शिकार करणे आणि पोटासाठी लूटमार, चोऱ्या करणे हा उद्योग करतात म्हणून गावागावांतले गावकरी या जमातीला गावातच येऊन देत नाहीत आणि गावाच्या आसपासही त्यांना राहून द्यायच नाही. अशारीतीने गावोगावची रयत फासे पारध्यांच्या बरोबर वागत होती. गावकऱ्यांच त्यात काहीच चुकीचं नव्हतं आणि आजची वस्तुस्थिती जी आहे खरंतरं ही जबाबदारी सरकारची आहे. परंतु सरकार या गोष्टीकडे फारसं लक्ष देत नाही. म्हणून समाजातील साऱ्यांनीच त्या समाजाला जवळ केलं नाही. त्यातून सामान्य जनता व पारधी समाजामध्ये आदराच व प्रेमाच नात

राहिल नाही. हे बरोबर नाही, म्हणून कार्यकर्त्यांच्या लक्षात आणून अण्णांनी पारध्यांच्या पुनर्वसनासाठी लक्ष घातले आणि शासन दरबारात अनेक वेळा पारधी समाजाच्या पुनर्वसनाबद्दल सांगितले. ते शासनाला म्हणायचे, ''या समाजाला सुधारायचे असेल तर प्रथम यांची मुलं यांचे पासून बाजूला घेऊन त्या मुलांची संपुर्ण शिक्षणाची, राहण्याची, कपड्यांची, जेवणाची व त्यांच्यावर चांगले संस्कार करण्याची पुर्ण जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे आणि त्या मुलांच्या आई वडिलांना काम देऊन त्यांच्या उपजीविकेची व्यवस्थाही शासनाने करावी. त्यासाठी ठीक ठिकाणी सुधारगृहांची व्यवस्था करुन त्यांच्यावर नजर ठेवावी. शक्यतो त्यांना लांडी-लबाडी, चोरी करणे, वाटमारी करणे या पासून परावृत्त करावे. त्यासाठी गरज पडलीतर त्यांना शासनही करावे.'' पुढे ही जबाबदारी मधुकर यशवंत वायदंडे या शिक्षक कार्यकर्त्यांवर सोपविली. ते सर मात्र अण्णांच्या निष्ठेपोटी आणि त्यांनाही पारध्यांच्या पुनर्वसनाची बाब ही योग्यच आहे. मनोमन पटल्यामुळे ते आजपावेतो त्या समाजाला मदत करत आहेत.

क्रांतिवीर अण्णा व पारध्यांच्या पहिल्या भेटीचा प्रसंग मला आठवतोय हुतात्मा किसन अहिर यांचा २५ फेबुवारीला स्मृतिदिनाचा कार्यक्रम होता, अण्णा वाळव्यातच होते. २५ फेब्रुवारीच्या कार्यक्रमाला जोडून विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाचा, करमणुकीचा आणि भोजनाचा कार्यक्रम होता. जेवणाचा मुख्य मेनू जिलेबी होता. अण्णा बागेत पुतळ्याजवळ कार्यकर्त्यांसह चर्चा करत बसले होते आणि आत शाळेत मुलांच्या जेवणाच्या पंगतीवर पगंती उठत होत्या, त्याच वेळी काही फासे पारध्यांची आठ दहा वर्षांची मुलं, मुली उरलंसुरलं काहीतर आपल्याला वाढतील म्हणून केवीलवाणा चेहरा करून गेटवर थांबली होती. अण्णांचे सहज लक्ष त्या मुलांच्याकडे गेले, त्यांनी आम्हांला हाक मारली, ''ये जया, दत्ता, पवार सर, हवलदार सर अगोदर इकडं या'', आम्ही त्यांच्या जवळ गेलो. त्यांनी आम्हांला सांगितले. ती समोर गेटजवळ पारध्यांची मुलं मुली उभी आहेत त्यांना आत घेऊन जावा आणि पोटभर जिलेबीचे जेवण वाढा. आम्ही त्या मुलांना बोलवण्यास गेलो खरं, पण ती मुलं आमच्यावर विश्वास कसा ठेवणार? आजपर्यंत त्यांना असा अनुभव कधीच नव्हता. ज्या गावात जावं तिथं मारझोड, कावा-कावी हाकलून देणे, राहिलं सायलं उष्टं पत्रावळीवरचं अन्न मिळाल तर नशीब आणि इथं सरळ ''चला जेवायला'' बोलवतायत, हा काय प्रकार ? त्यांचा विश्वास बसेना. उलट ती मुलं भिऊन आपल्या आईवडलांच्याकडे गेली. शेवटी त्यांच्या पालकांसह त्यांना जेवायला वाढायला अण्णांनी सांगितले. हा हा म्हणता हे साऱ्या

पारध्यांना कळाले. मग काय विचारता म्हातारी कोतारी तरुणांसह सर्व पारधी जेवायला शाळेत आली. अण्णांचा आदेश साऱ्या पारध्यांना पोटभर जिलेबी वाढा. अण्णांना नकार कोण देणार? सारे पारधी मुले मुली धरून ५० एक असतील. त्या सर्वांना पोटभर जिलेबी वाढली. शाळेतील सारी मुलं व्यवस्थित जेवली. शेवटी वाढपी आणि काही प्रमुख कार्यकर्ते राहिले होते, जेवण संपले. कार्यत्यांना आपापल्या घरी जाऊन जेवावे लागले. तरी सुद्धा ते कार्यकर्ते अत्यंत समाधानी होते. अण्णांच्यातला हा गुण बघून कार्यकर्त्यांना खूप आनंद झाला होता. तसे पाहता क्रांतिवीर नागनाथअण्णा तर आमच्या जेवणात कधीच नसतात. शाळेत गॅदरिंगसाठी कधी बासुंदी पुरी, कधी जिलेबी, कधी लाडू असे जेवणं असायचे. अण्णांचे मात्र रोजच्या प्रमाणे जेवण भाजी भाकरीचे असायचे जेवणाचे ताट घराकडून येत ते जेवण बागेत बसून कार्यकर्त्यांच्या बरोबर जेवत असत. एखादा कार्यकर्ता अण्णांना स्नेहसंमलेनाच्या जेवणातला एखादा पदार्थ वाढायला गेला तर ते अगदी नाईलाजास्तव एखादा जिलेबीच्या कडयातला एक बारीक तुकडा घेऊन खात तो पण त्या वाढणांऱ्याच्या समाधानासाठी.

अण्णा हात धुण्यास आणि चुळ भरण्यास वऱ्हांड्यात उभे होते, येवढ्यात गेटवर काहीतर कालवा चालला होता तेथूनच अण्णांनी साऱ्यांना बोलवले आणि विचारले 'कायरे कसली गडबड चाललीया ? ते पारध्याच पोरग का रडतय? त्याला घेऊन इकडं या.' त्या प्रमाणे सारेजण बागेत जमले अण्णांनी एका एकाला विचारले, 'त्या पोरांना कुणी मारले'? त्यावर एक शिपाई म्हणाला, 'अहो अण्णा, तुमच्या सांगण्याप्रमाणे साऱ्याना पोटभर जिलेबी वाढली तरी ह्या पोरानं जिलेबी चोरून घेतलीया' येवढ म्हटल्याबरोबर तो मुलगा म्हणाला, अहो अण्णा, 'मी चोरली नाही हो माझा धाकटा भाऊ पालावर आजारी आहे तो आमच्या बरोबर आला नाही म्हणून त्याच्यासाठी ही बघा चार कडी घेतल्यात.' येवढचं तो मुलगा म्हटला. आमच्या काळजाचं पाणी पाणी झालं. त्या मुलानं मात्र आमच्या साऱ्याची मन जिंकली.

अण्णांच्या या चांगुलपणामुळे पुढे ती पारधी जमात हुतात्मा संकुलाच्या जवळ आली त्यांची लहान मुलं-मुली साधारण तीस एक संख्या असेल त्या सर्वांना अण्णांनी शाळेला घालायचे ठरविले त्यासाठी त्यांना प्रथम पाट्या पुस्तक, नवीन प्रत्येकी दोन ड्रेस देऊन मुलींना सावित्रीबाई फुले व मुलांना हुतात्मा नानकसिंग वसतीगृहात प्रवेश दिला आणि त्या मुला-मुलींची मराठी शाळेत नावे घातली. पुढे त्यातली काही मुलं शिकली, काही आडाणी रहायली, शिकलेल्या चार दोन मुलांना

अण्णांनी सुरवातीला शाळेत शिपायाची नोकरी दिली. त्यापैकी एक चंदाबाई पवार म्हणून स्त्री होती, इकडे मुलांचा शाळेचा प्रश्न मिटला थोडाफार कुटुंबाचा पोटापाण्याचा प्रश्न मिटला. ती माणसं माणसात राहून माणसांत मिसळायला लागली. परंतु संपूर्ण महाराष्ट्रातील फासेपारधी समाजाचा प्रश्न हुतात्मा संकुलातून पुर्ण होवू शकत नव्हता. म्हणून अण्णांनी हा प्रश्न शासनामार्फत धसाला लावण्याचे काम मनावर घेतले. अण्णांच्या पुढे अनेक कामे होती. यापैकी हे एक काम त्यांनी घेतले होते.

फासेपारधी मुला मुलींच्या शिक्षणाचं काम चालू होते मुलांना शिक्षणांची गोडी लागली होती. परंतु सारीच मंडळी वाळव्यात राहू शकत नव्हती. त्यांच्या सोईप्रमाणे काही कुटुंबे बाहेर गेल्यामुळे त्यांची मुलही त्यांच्याबरोबर गेली. राहिलेल्या कुटुंबांपैकी कांही मुली-मुलं १०, ११. १२ वी पर्यंत शिकली. चंदाबाई पवार या फासेपारधी बाईची मुलगी डी.एड. पर्यंत शिकली. त्या मुलीनं आपल्या मुलालाही शिकवलं आणि तो आता डी.एड. झाला आहे. सर्व्हिससाठी भटकतोय. क्रांतिवीर अण्णांनी मात्र सुरुवातीला शाळेत शिपाई म्हणून सुकन्या काळे व चंदाबाई पवार या पारध्यांना घेतले. या मंडळींनी प्रामाणिकपणे काम केले. ती आज सर्व्हिसमधून रिटायर्ड असली तरी त्यांना आज खर्चापुरती पेन्शन मिळते. ही कुटुंबे त्यांच्या सोईप्रमाणे स्थायिक झाली आहेत. अजून एक त्यांच्यापैकी भिमऱ्या पवार हा सर्व्हिसमध्ये आहे. अण्णांचा विचार मोठा होता. त्यांनी अशा अनेक गोष्टी केल्या. ते कोणाच्या सांगण्याने नव्हे, प्रसिद्धीसाठी तर अजिबात नाही. त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून, कर्तव्य म्हणून केले आणि त्यांच्या बोलण्यात सातत्याने अशा अनेक भटक्या समाजासाठी आपणाला जे शक्य आहे ते आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत जमेल तेवढे काम केलं. हुतात्मा कारखाना अण्णांनी वाळव्यात काढला. त्यात भटक्या जमातीच्या नंदीवाले या समाजातील एकूण २५ एक तरुण मुलांना त्यांनी बोलावून नोकऱ्या दिल्या. ते कामगार महिना १८ हजार पगार ४० टक्के बोनस घेतात. क्रांतिवीर नागनाथअण्णांचा विचार नुसता बोलण्याचा नव्हता प्रत्यक्ष कृतीचा होता.

***

# क्रांतिसिंह नाना पाटील वाळव्यात

२५ फेब्रुवारी हुतात्मा किसन अहिर व हुतात्मा नानकसिंग यांच्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम होता. कार्यक्रमा नंतर एक कार्यकर्ता क्रांतिवीर नागनाथअण्णांना म्हणाला, ''अहो अण्णा, क्रांतिसिंह नाना पाटील हे पंढरपूरला रामबागेत पुरुषोत्तम रंगाचार्य महाराजांच्याकडे राहायला गेलेत.'' हे ऐकल्याबरोबर अण्णांना फार दु:ख झाले.

जुना इतिहास डोळ्यापुढ आला. १९३० सालापासून १९४२ सालाअखेर १२ वर्षे ज्या क्रांतिसिंह नाना पाटलांनी देश स्वातंत्र्यासाठी लोकांच्या मनाची लढण्याची तयारी केली, त्या वेळी सातारची जनता नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मरणाच्या तयारीने उतरली. पुढे ४२ ते ४७ नाना पाटील भूमिगत राहिले आणि आम्हाला म्हणाले, (क्रांतिवीर नागनाथ अण्णांना व क्रांती अग्रणी जी.डी.बापूंना) तुम्ही भारतमातेच्या पारतंत्र्याच्या बेड्या तोडण्यासाठी जे जे तुम्हांला करता येईल तेवढ करा आणि त्याचं जे काही सोसावे लागेल ते मी सोसेन. सारे गुन्हे तुम्ही माझ्या नावावर जमा करा. इतक्या तयारीने ज्या क्रांतिसिंहाने इंग्रजांच्या विरोधात डरकाळी फोडली, त्या क्रांतिसिंह नाना पाटलांना म्हातारपणी पंढरपूरला आसरा घ्यावा लागला हा प्रतिसरकार स्थापन करणाऱ्या नेत्याचा आपण अपमान करतोय, हा सातारच्या क्रांतिकारकांचा पराभव आहे, आपली यात नामुष्की आहे, असे विचार क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या डोक्यात घोळत होते ते त्यानी वाळव्यातल्या शेतकऱ्यांच्या पुढे अगदी पोट तिडकीने मांडले. आपण वाळव्यात नाना पाटलांना आणू, हुतात्मा किसन अहिर विद्यालयात त्यांची राहण्याची सोय करु आणि मरेपर्यंत त्यांना सांभाळू. सकाळ,

संध्याकाळ नाना पाटलांचे गरम गरम जेवण माझी आई आणून देईल किंवा शाळेतील एकादा शिपाई आईंच्याकडे घरी पाठवून त्यांचं जेवण आणता येईल, एवढं सांगितले आणि ताबडतोब अण्णा पंढरपूरला जायला निघाले. सोबत व्ही.टी.पवार सर, जयवंत अहिर, चंदर लोहार होते. अण्णांना शेतकऱ्यांनी दिलेली ॲम्बेसिडर गाडी होतीच. साधारण दुपारी तीन वाजता आम्ही पंढरपूर जवळ क्रांतिसिंह नाना पाटील ज्या रामबागेत राहत होते तेथे पोहचलो. नाना पाटलांची चौकशी केली त्यावेळी आम्हांला रामबाग मठातील एका नोकराने सांगितले. सध्या आंब्यांचा सिझन असल्यामुळे कासेगावच्या हद्दीतील ६०० एकरांच्या महाराजांच्या मळ्यात नाना पाटील आहेत. तिथं महाराजपण आहेत. एवढं समजल्यानंतर आम्ही त्या मळ्यात गेलो. तिथं पोहचल्यावर आम्ही बघितल एक उत्कृष्ट अशी झोपडी. त्या झोपडीत नाना पाटील आणि महाराज बोलत आंबे खात बसले होते.आम्ही त्यांना भेटलो. आम्ही साऱ्यांनीच क्रांतिसिंहाना व महाराजांना नमस्कार केला.

पुरुषोत्तम महाराज हे रामबागेचे मठाधिपती होते, त्यांना सर्व 'बाबाजी' म्हणत होते ते बाबाजी क्रांतिसिंहांच्या समोरच्या आसनावर बसले होते. बाबाजींची नाना पाटलांनी नागनाथअण्णांची ओळख करून दिली आणि आमचेकडे बोट दाखवून म्हणाले, ''हे अण्णांचे सहकारी आहेत.'' आम्ही बाबाजींना नमस्कार केला इकडच्या तिकडच्या चर्चेनंतर नागनाथ अण्णांनी मूळ विषयाला हात घातला. क्रांतिसिंहांना नागनाथ अण्णा म्हणाले, ''अण्णा, येवढा सारा वाळवा गाव तुमचा असताना तुम्ही शेवटच्या काळात आम्हांला कसलीही कल्पना न देता पंढरपूरला आलात. ह्याचा दोष सारा महाराष्ट्र आम्हाला देणार त्यातून आमची साऱ्यांची नामुष्की होणार, तेव्हा झालं गेलं गंगेला मिळालं. आजच्या आज तुम्ही आमच्याबरोबर वाळव्याला यायचं. वाळव्याचे शेतकरी तुमची रहाण्याची व्यवस्था हुतात्मा किसन अहिर विद्यालयात स्वतंत्र अशी करणार आहेत. आमच्या घरून तुमचं रोज सकाळ संध्याकाळचे जेवण आणायचे काम एक शिपाई करेल. तेव्हा आम्ही तुम्हांला बरोबर घेऊनच वाळव्याला जाणार. काय असेल ती निघण्याची तयारी करा. उन्हं खाली झालं की आपण निघू.''

क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथअण्णांना 'अण्णाच' म्हणत होते. ते म्हणाले, ''अण्णा, मी तुम्हाला माझा राजकीय वारस मानतो. तुमच्याकडे यायला मला काहीच अडचण नाही. परंतु मी आता चार दोन महिने झाले बाबाजींकडे राहिलो आहे. त्यांनाही दुखवता येणार नाही. तेव्हा काही दिवस पंढरपूरला आणि काही दिवस

वाळव्यात मी राहीन. त्यासाठी मला पंढरपूरहून नेणे आणि वाळव्याहून परत यावे वाटेल तेव्हा पंढरपूरला सोडले पाहिजे. नागनाथअण्णा म्हणाले,''ठीक आहे. अण्णा, मला ही शेतकऱ्यांनी गाडी दिली आहे. तुम्ही सांगाल त्या वेळी हा जयवंत अहिर तुम्हांला पंढरपूरला आणून सोडेल आणि तुम्ही सांगाल त्या वेळी वाळव्याला घेऊन येईल.''

क्रांतिसिंहांनी नागनाथ अण्णांची चिकाटी आणि मनापासूनची तळमळ पाहून वाळव्याला यायचे मान्य केले त्याच दिवशी आम्ही त्यांना वाळव्याला घेऊन आलो. त्यांच्यासाठी जिमखाना हॉलमध्ये स्वतंत्र खोलीची व्यवस्था केली. त्यांच्या सेवेसाठी चोवीस तास त्यांच्याजवळ थांबणारा साताप्पा पुजारी नावाच्या अत्यंत विश्वासू अशा कार्यकर्त्याची अण्णांनी नेमणूक केली, नाना पाटलांच्या इतर अडीअडचणींची जबाबदारी वसंतराव पवार व अन्ता पाटील यांच्यावर सोपवली. औषध पाणी, दवाखाना आणि त्यांनी सांगेल त्या वेळी त्यांना पंढरपूरला सोडणे आणि आणणे कामाची जबाबदारी जयवंत अहिर व चंदर लोहार यांच्याकडे सोपवली. क्रांतिसिंहांचे पेन्शनचे पैसे बँकेतून आणणे व त्यांच्या पत्र व्यवहाराची, वर्तमानपत्राची जबाबदारी दत्ता शेळके यांच्यावर सोपवली क्रांतिसिंह नाना पाटलांना सकाळ-संध्याकाळ वेळच्यावेळी त्यांच्या आवडीप्रमाणे गरम जेवण आपल्या घरुन द्यायची महत्त्वाची जबाबदारी क्रांतिमातेवर सोपवली होती. आणि नाना पाटलांच्याकडे आलेल्या पै पाहुण्यांच्या जेवणाची व चहा पाण्याची जबाबदारी अंता पाटील, पांडू शेखर सर यांचेवर सोपवली अशा पद्धतीने सर्व व्यवस्था क्रांतिसिंहांची वाळव्यात नागनाथ अण्णांनी केली होती.

क्रांतिसिंह नाना पाटलांचा एकूण आठ वर्षांचा काळ वाळव्यात गेला. त्या काळात क्रांतिसिंहांची औषधपाण्याची व खर्चाची जबाबदारी क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी घेतली होती. नाना पाटील वर्षातील आठ महिने वाळव्यात व चार महिने पंढरपूरच्या रामबागेत पुरुषोत्तम रंगाचार्य महाराज यांच्याकडे असत. त्यावेळी राधाअक्का त्यांची जेवणाखाण्याची व्यवस्था करत होत्या. पंढरपुरात नाना पाटील वास्तव्याला असताना रामनवमीच्या कार्यक्रमाच्या जेवणाच्या पगंतीमध्ये लोकांना जेवायला वाढताना त्यांच्या पायाला अंगठ्याजवळ चोयटीने कापल्यामुळे जखम झाली. त्यांना मधुमेहाचा त्रास असल्यामुळे पायाजवळची जखम वाढली आणि त्यात पू झाला. अतिशय वेदना होत होत्या. पाय बरा करण्यासाठी ऑपरेशन केले पाहिजे असे पंढरपूरच्या डॉक्टरांचे मत पडले. ही बातमी वाळव्याला समजताच क्रांतिवीर नागनाथअण्णा, मी (जयवंत अहिर) व वसंत पवार तातडीने पंढरपूरला आलो आणि नाना पाटलांना मिरजेत

डॉ.आनंद गायकवाड यांच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. डॉ.गायकवाड, डॉ.ओव्हळ यांनी दीड ते दोन महिने प्रयत्न करून नाना पाटलांना वाचवले. परंतु गँगरीनमुळे त्यांचा पाय काढावा लागला. दीड दोन महिन्यांचे दवाखान्याचे बील डॉक्टरांनी घेतले नाही. उलट त्या काळात डॉक्टर गायकवाडांच्या पत्नी माणिकताई गायकवाड सकाळ, संध्याकाळचे जेवण आपल्या घरचे देत होत्या आणि आपल्या हाताने नाना पाटलांना पोटभर वाढत होत्या. त्याचे समाधान नाना पाटलांना होते. अनेक मंडळी त्या काळात नाना पाटलांना भेटायला येत होती. परंतु सातत्याने २४ तास क्रांतिसिंह नाना पाटलांच्या सेवेला स्वत: अण्णा त्यांचे कार्यकर्ते अंता पाटील, पुजारी सर, वसंत पवार, जयवंत अहिर हजर असत. दररोज वाळव्याहून दत्ता शेळके जेवण आणत होते. त्याच वेळी क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी रोज दवाखान्यात येऊन नाना पाटलांची अस्थेवाईकपणे चौकशी करत होत्या.

असेच दिवस जात होते. क्रांतिसिंह नाना पाटील वाळव्यात होते. त्यांची तब्येतही चांगली होती.त्यांच्या वयाची ७५ संपून ७६ वे वर्ष सुरू झाले होते. २३ नोव्हेंबर १९७६ रोजी पुरोगामी संघटनेचे नेते भाई संपतराव पवार यांच्या पुढाकाराने विटा येथे त्यांचा भव्य सत्कार व मिरवणूक त्यांचे जावई भगवानराव (बप्पा) पाटील व कार्यकर्त्यांनी काढली. त्यावेळी अचानक त्यांना अस्वस्थ वाटल्यामुळे त्या मंडळींनी मिरजेला नाना पाटलांना  मिशन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. डॉक्टरांनी नाना पाटलांना वाचविण्याचे शिकस्तीचे प्रयत्न केले परंतु त्यात त्यांना यश आले नाही. ६ डिसेंबर १९७६ ला क्रांतिसिंह नाना पाटील जगाला सोडून अनंतात विलीन झाले. मिशन हॉस्पिटल बील यशवंतराव चव्हाण व वसंतराव दादांनी शासनातर्फे भरले. क्रांतिसिंहांच्या दहनाचा कार्यक्रम शासकीय इतमामाने वाळव्यात पार पडला. हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटागणांवर त्यांच्या देहाला अग्नि दिला त्याच वेळी क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी मनात क्रांतिसिंहांचे स्मारक करायचे ठरवले होते. १९७६ नंतर मध्येतरी बराच काळ गेला. पुढे हुतात्मा साखर कारखाना झाल्याबरोबर योग्य घात बघुन त्यांनी क्रांतिसिंहाच्या स्मारकाला हात घातला. प्रथम क्रातिसिंहांच्या नावाने महाविद्यालय आर्टस् आणि सायन्स् १९९२ ला सुरु केले. महाविद्यालय उत्तम चालले आहे.

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने क्रांतिसिंह नाना पाटलांचा पूर्णाकृती पुतळा हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटागणांवर नाना पाटलांच्या देहाला ज्या जागेवर अग्नि दिला होता

त्या जागेवर उभा केला. त्या पुतळ्याचे अनावरण तारीख १९ फेब्रुवारी २००९ रोजी भारताच्या राष्ट्रपती महामहिम प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते केले. या वेळी ना.शरदरावजी पवार, ना.आर.आर.पाटील, मा.मदन पाटील, ना.बाळासाहेब थोरात, ना.जयंतराव पाटील, ना.पतंगराव कदम आणि स्वत: क्रांतिवीर नागनाथ अण्णा व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.कुसुमताई नायकवडी यांच्यासह दीड ते दोन लाख जनसमुदायाच्या साक्षीने आणि वैभव काका नायकवडी यांच्या स्वागतपर भाषणाने पार पडला. 'न भूतो न भविष्यति असा कार्यक्रम झाला. क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन वैभवकाकासह हुतात्मा संकुलातील कार्यकर्त्यांनी उत्तम केले होते. त्यामुळे सर्वांना कार्यक्रम व्यवस्थित पाहता आला, ऐकता आला.



क्रांतिसिंह **नाना पाटील** यांच्या प्रकृतीची चौकशी करताना वाळवे येथे **मा.यशवंतराव चव्हाण**-गृहमंत्री, **मा.वसंतदादा पाटील**-मुख्यमंत्री, **मा.रावसाहेब कळके** व **मा.नागनाथअण्णा**

# हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना आणि क्रांतिवीर नागनाथअण्णा

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याबद्दल अण्णा बोलताना नेहमी म्हणायचे, वाळवा इस्लामपूर डांबरी रस्त्यासाठी संघर्ष करावा लागला त्या रस्त्याने विकासाचा रस्ता दाखविला. त्याची पार्श्वभूमी अशी आहे. वाळव्याच्या शेतकऱ्यांनी वाळव्या ते इस्लामपूर रस्ता डांबरी व्हावा म्हणून १९७२ साली साराबंदीची ऐतिहासिक चळवळ केली. ती चळवळ १०० टक्के यशस्वी झाली. सरकारने चळवळीची धास्ती घेतली होती.असेच हे चालू राहिले आणि ह्या साराबंदी चळवळीची लागण ह्या गावातून पुढच्या गावात पसरायला लागली तर शासनाला कामकाज करणे अवघड होईल. असं राज्यकर्त्यांना वाटू लागले. त्यांनी चळवळ मोडण्यासाठी काहीही करावं लागलं तरी ते करायचे आणि वाळव्याच्या शेतकऱ्यांची रस्त्याची चळवळ दडपायची, मोडून काढायचीच असा निर्धार केला. त्यासाठी नोटिसा, पोलिसांकरवी धाकधपटशा, घरातील भांड्याकुंड्यांच्या जप्त्या, हे सारं करून पाहिलं पण वाळव्याचा शेतकरी काही केल्या दाद देईना. शेवटी भागातले पुढारी, पै पाहुणे, नात्यागोत्यांतील माणसे हाताशी धरली आणि पक्षपार्टीचा, स्थानिक कार्यकर्त्यांच्यावर दबाव आणला. त्यालाही कार्यकर्ते, शेतकरी सहजासहजी दाद देईनात. काही केल्या सरकारला वाळव्याच्या रस्त्याच्या चळवळीत फूट पाडता येईना. म्हणून राज्य सरकारने ज्या साखर कारखान्यांना वाळव्याच्या शेतकऱ्यांचा ऊस गेला होता त्या शेतकऱ्यांचे ऊसबिलातून संबंधित साखर कारखान्यांनी शेतसाऱ्याइतकी रक्कम कट करून घेऊन शासन तिजोरीत भरायला शासनाने आदेश दिला. वास्तविक साखर कारखान्यांनी विचार करायला पाहिजे होता. ही

शेतकऱ्यांची चळवळ आहे. एकतर शेतकऱ्यांना मदत करायला पाहिजे होती किंवा गप्प बसायला पाहिजे होते परंतु साखर कारखान्याने शासनाच्या आदेशाप्रमाणे शेतकऱ्यांच्या संमत्तीशिवाय परस्पर ऊसबिलातून साऱ्याची रक्कम कट करून शासनाला दिली तशी त्यांना मदतच केली. ही गोष्ट वाळव्याच्या स्वाभिमानी शेतकऱ्यांना आवडली नाही. शेतकऱ्यांनी निर्णय घेतला, शेतकऱ्यांची योग्य न्याय मागणीसाठी चाललेली चळवळ मोडणारे साखर कारखान्याने आपले नाहीत. तेव्हा आपण आपला वाळव्यातच एक नवीन साखर कारखाना शेतकऱ्यांना योग्य न्याय देणारा, काढायचा निर्णय क्रांतिवीर नागनाथअण्णांनी घेतला.

वरील रस्त्याच्या संघर्षाच्या पार्श्वभूमिकेच्या तयार झालेल्या परिस्थितीची बरोबर घात ओळखून योग्य वेळी योग्य गोष्ट करायची क्रांतिवीर नागनाथ अण्णांची हातोटी होती. ०४/०१/१९७२ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील वाळव्यात वास्तव्याला होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली रात्री आठ वाजता हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या मेनहॉलमध्ये चारशे एक प्रमुख कार्यकर्ते व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये क्रांतिवीर नागनाथअण्णांनी जाहीर केले. गोरगरिबांना, छोट्या शेतकऱ्यांना सामावून घेऊन आपण आपला ''हुतात्मा किसन अहिर'' यांचे नांवाने वाळव्यात साखर कारखाना काढायचा. त्यासाठी आपली सर्वांची मान्यता पाहिजे. जमलेल्या सर्व मंडळींनी एकमुखी अण्णांच्या निर्णयाला मान्यता दिली. त्यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील आपल्या समारोपाच्या भाषणात म्हणाले, ''हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना काढावयाला माझा पूर्ण पाठिंबा आहे. पण गड्यानो, माझ्या वयाच्या विचार करता धावपळीचे काम नागनाथ अण्णांच्यासह तुम्ही सर्वांनी करायचे आहे. मी तुमच्या कामाच्या पाठीमागे लिंबू धरून उभा आहे. माझी मामाची भूमिका कायमपणे तुमच्या पाठीशी आहे.''

क्रांतिवीर अण्णांना दूरदृष्टी होती, त्यांचे विचार काळाच्या पुढचे होते. इतर आसपास असणारे साखरकारखाने हेही शेतकऱ्यांचेच आहेत. त्या कारखान्यांना कोणतीही इजा न होता आपला साखर कारखाना काढायचा आहे. त्यासाठी कमीत कमी गावाचे कार्यक्षेत्र हुतात्मा कारखान्यासाठी अण्णांनी निवडले. त्यात रेव्हुन्यू गावे आठ आणि त्या गावांच्या खालच्या वाड्या सात असा पंधरा गावांचा हुतात्मा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात समावेश केला. त्यामध्ये वाळवा, पडवळवाडी, अहिरवाडी, गोटखिंडी, लोणारवाडी, गाताडवाडी, नवेखेड, जुनेखेड, मसूचीवाडी, आणि नदीच्या पलीकडची शिरगाव, नागराळे, पुणदी, पुणदीवाडी ही गावे त्यावेळी वाळवा तालुका साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील आणि शेतकरी साखर कारखाना सांगली

मधील नागठाणे व खोलेवाडी ही दोन गावे असे पंधरा गावांच्या कार्यक्षेत्रावर प्रपोजल तयार करण्यास आम्हा कार्यकर्त्यांना अण्णांनी सांगितले. ह्या गावांपैकी पडवळवाडी, अहिरवाडी, गाताडवाडी, लोणारवाडी या गावांत माणसांना, जनावरांना, पशुपक्ष्यांना पिण्यासाठी पुरसे पाणी नव्हते. तिथं ऊस अजिबात नव्हता. गोटखिंडी गांवात तुटपुंजं बागायत क्षेत्र तेही विहिरीवरचं तिथंही फारसा ऊस नव्हता. परंतु पंधरा गावांत पाण्याखाली न आलेलं भरपूर जमिनीचे कोरडवाहू क्षेत्र होतं. अण्णांना दिसत होतं. कोयनेच्या धरणाच्या पाण्यामुळे आणि होऊ घातलेल्या चांदोली धरणाच्या पाण्यामुळे उसाचे क्षेत्र एवढं वाढणार आहे की, पुढे मागे वाळवा तालुका कारखान्याला गळिताची कार्यक्षमता वाढवावी लागेल. तसेच हुतात्मा कारखान्यालाही वाढवावी लागेल. याशिवाय आष्ट्यासारख्या गावाला एखादा नवीन साखर कारखान्याला काढावा लागेल. हे क्रांतिवीर नागनाथअण्णा पुढचं दिसत होत तसेच वसंतरावदादा पाटील या द्रष्ट्या नेत्यालाही दिसत होते.

कोणतंही चांगलं काम करत असताना कुणाचा नाही कुणाचा विरोध होत असतोच, काही मंडळी राजकीय मतभेदातून विरोध करतात, तर काही मंडळी आपली संस्था अडचणीत येईल काय, यातून विरोध करतात तर काही मंडळी अपुऱ्या समजुतीने विरोध करतात. तशी विरोध करणारी मंडळी अत्यंत कमी असतात, परंतु चांगल्या कामाच्या बाजूने जास्त असतात ही वस्तुस्थितीचा अनुभव चांगले काम करणाऱ्या छ.शिवाजी महाराजांच्या पासून फुले, शाहू, आंबेडकर, सावित्रीबाई फुले या साऱ्यांनाच आलेला होता. तोच अनुभव क्रांतिवीर नागनाथ अण्णांनाही हुतात्मा कारखाना काढताना आला होता. आजपर्यंत काढलेले साखर कारखाने हे माझ्या माहिती प्रमाणे सर्व सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचेच होते. एकमेव हुतात्मा किसन अहिर सहकारी साखार कारखाना असा होता की तो सत्तेच्या विरोधी काम करणाऱ्या नागनाथ अण्णांसारख्या नेत्याने काढायचा ठरवला होता. त्यामुळे या साखर कारखान्याला दांडगा विरोध होता. तो विरोध जनसमुदायाच्या ताकदीवर क्रांतिवीर अण्णांनी मोडून काढला. तसा हुतात्मा कारखान्याचा इतिहास मोठा आहे. लिहायचे म्हटले तर स्वतंत्र पुस्तिका लिहावी लागेल. मी (जयवंत अहिर) ती पुस्तिका लिहिण्याचा प्रयत्न आपल्या साऱ्यांच्या सहकार्याने करणार आहे.

हुतात्मा किसन अहिर साखर कारखाान्याचे प्रपोजल तयार करण्यासाठी लागणारी माहिती व सरकारी खात्यातून लागणारे दाखले वगैर मिळवण्यासाठी अण्णांनी एक अलिखित कमिटी तयार केली. त्या कमिटीत १. स्वत: अण्णा, २. जयवंत अहिर (मामा), ३. दत्ता शेळके (दादा), ४. वसंतराव पवार (सर), ५.

चंद्रकांत बाळू लोहार, ६. शेतकरी म्हणून श्री.शामराव ज्ञानू सव्वाशे, ७. दत्तोपंत कुलकर्णी(काका), ८. राजाराम जाधव ही कमिटी पहिल्या दिवसापासून साखर पडेपर्यंत अस्तित्वात होती. या कमिटीने हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्यासाठी रात्रीचा दिवस करून अठरा अठरा तास काम केले ते नि:स्वार्थीपणे. कसल्याही पदाची, प्रसिद्धीची, पगाराची अपेक्षा न करता ध्येय एकच हुतात्मा कारखाना करायचा म्हणजे करायचाच. तीन एक महिन्यांच्या परिश्रमानंतर प्रपोजलसाठी लागणाऱ्या कागदपत्राची पूर्तता झाली. साखर कारखान्याचे प्रपोजल तयार करणारी जाणकार माणसं अण्णाना माहीत होती. त्यात सातारचे अप्पासाहेब भोसले, कृष्णेचे जयवंतराव भोसले, वारणा कारखान्याचे सेक्रेटरी नागठाणे गावचे श्री.शिवाजीराव गाडे या साऱ्यांच्याकडून प्रपोजल तयार करून सांगलीच्या वसंतरावदादांच्या कारखान्यात टंकलेखन व बाइडिंग करून त्या प्रपोजलच्या अकरा प्रती तयार केल्या. त्या कामात वसंतरावदादा, प्रभाकर भोसले व वसंतदादा साखर कारखान्याच्या सर्व स्टाफचे सहकार्य मिळाले.

एकदाचे हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याचे प्रपोजल तयार झाले. साखर कारखाना कशासाठी पाहिजे याचा उल्लेख क्रांतिवीर अण्णांनी मागणी पत्रात स्पष्ट केला होता. आम्हांला हुतात्मा कारखाना शिक्षण संस्थेच्या अडचणी आणि शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पाहिजे. पुढे थोड्याच दिवसांत हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याचे प्रपोजल पुण्याला डायरेक्टर ऑफ शुगर ऑफिसला पाठवले. सुरुवातीला राणे साहेब डायरेक्टर शुगर होते. त्यांनी प्रपोजलची छाननी केली. त्यात काही चुका होत्या. त्या चुका दुरुस्त करून प्रपोजल सादर केले. त्यावेळी निंबाळकर साहेब डायरेक्टर शुगर म्हणून होते. त्यांनी वाळव्याला भेट दिली. चार एक हजाराच्या जनसमुदायापुढे त्यांनी भाषण केले. त्यावेळी अण्णांनी शामराव सव्वाशे यांची शेतकऱ्यांच्या एकमुखी संमतीने चेअरमन म्हणून निवड केली. त्या ठरावाला नभिसाब मेवेकरी यांनी अनुमोदन दिले. वाळवे तालुका साखर कारखान्याच्या कार्यकर्त्यांनी डायरेक्टर ऑफ शुगर निंबाळकर साहेबांच्याकडे आमच्या कारखान्याला ऊस कमी पडतोय अशी तक्रार केली होती, म्हणून शेती अधिकारी अपराध यांनी आपल्या भाषणातून निंबाळकर साहेबांना सांगितले, ''अहो निंबाळकर साहेब या भागात इतका ऊस आहे शेजारचे आष्टा गाव एक कारखाना चालवेल अशी परिस्थिती आहे आणि हुतात्मा कारखाना तर पंधरा गावांचा आहे. या कारखान्यालाच काय आसपासच्या कारखान्यालाही ऊस कमी पडणार नाही.'' सभा संपल्यानंतर निंबाळकर साहेब पुण्याला गेले.

विश्वास साखर कारखाना, कृष्णा साखर कारखाना, वसंतदादांचा सांगली कारखाना या सर्व कारखान्यांची संमतिपत्रं मिळवली होती. वाळवा तालुका सहकारी साखर कारखान्याचे संमतिपत्र मिळायचे होते. योगायोगाने विधानसभेच्या सार्वजनिक निवडणुका लागल्या होत्या. वाळवा तालुका साखर कारखान्याचे संस्थापक राजारामबापू होते. बापू बाळव्याला विधानसभेच्या निवडणुक प्रचारासाठी आले होते. त्यावेळी शेतकरी बापूंना भेटले. क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी, दत्ता शेळके, जयवंत अहिर इ. कार्यकर्ते सोबत होते. सर्वांनी बापूंच्याकडे हुतात्मा कारखान्यासाठी संमतिपत्राबद्दल मागणी केली. त्यावेळी योगायोगानं बापूंच्यासोबत चेअरमन बाबासाहेब पाटील व बोरगावचे डायरेक्टर पाटील होते. त्यांच्या जवळ कारखान्याचे लेटरपॅडही होते. बापूंनी चेअरमन यांना संमतिपत्र द्यायला सांगितले. बाबासाहेब पत्र लिहीत होते. एवढ्यात दत्ता शेळके आणि माझ्याकडे(जयवंत अहिर)बापूंचे लक्ष गेले. ते म्हणाले, ''दत्ता, जयवंत इकडं या. तुम्हांला कसे पत्र पाहिजे तसं तुम्हीच लिहा.'' दत्ता शेळकेंनी पत्र लिहलं, बापू नको म्हणत होते तरी त्यांना पत्र वाचून दाखवले. त्या पत्रावर बाबासाहेब पाटील यांनी व डायरेक्टर पाटील यांनी सही केली. पत्र आमच्या हातात दिले त्या दिवशी वाळव्यात बापूंची सभा झाली. सभा संपल्यानंतर बापू पुढच्या सभेसाठी गेले.

दुसऱ्याच दिवशी अण्णांच्यासह आमचे शिष्टमंडळ पुण्याला डायरेक्टर ऑफ शुगर निंबाळकर साहेबांना भेटायला गेले. यापूर्वीच प्रपोजल बरोबर विश्वास कारखाना, कृष्णा कारखाना, वसंतरावदादा कारखाना या तिन्ही कारखान्यांची संमतिपत्रे जोडली होती. त्या प्रस्तावामध्ये राजाराम बापूंच्या कारखान्याचे संमतिपत्र राहिले होते. ते संमतिपत्र डायरेक्टर ऑफ शुगरना सांगून प्रपोजलला जोडले. निंबाळकर साहेबांनी अण्णांना सांगितले, ''हुतात्मा कारखान्याच्या प्रपोजल मध्ये आता काही उणीव नाही. आठ एक दिवसांत प्रपोजल शिफारस करून मुंबईला मंत्रालयात हॅण्ड डिलिव्हरीने पाठवतो. त्याप्रमाणे त्यांनी प्रपोजल मंत्रालय मुंबईला पाठवले.

हुतात्मा कारखाना व्हावा यासाठी वसंतराव दादाचे मोठे योगदान आहे. मंत्रालयात प्रपोजल गेले त्या वेळी वसंतदादा मुख्यमंत्री होते. अण्णा वसंतरावदादांना भेटले. त्या वेळी दादांनी अण्णांना सांगितले. गुढी पाडवा तोंडावर आलाय. पाडव्याच्या दिवशी वर्षा बंगल्यावर ये, अण्णा सहज त्यांना म्हणाले. गुढी पाडव्या दिवशी पुरणपोळीच जेवण देणार काय? त्यावर दादा म्हणाले, ''इथं पुरणपोळीचा स्वयंपाक कोण करणार तुझी माणसं किती येणार ते सांग. तुम्हांला पुरी

बासुंदीच जेवण देतो. आणि त्याच दिवशी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या प्रपोजलवर सही करतो.'' अण्णा म्हणाले, ''जया, दत्ता, पवार सर, शामराव सव्वाशे, दत्तोपंत कुलकर्णी, राजाराम जाधव, कॉ. दत्ता देशमुख आणि मी असे एकूण नऊजण येऊ.'' ठरल्या प्रमाणे गुढी पाडव्याच्या दिवशी वसंतराव दादांनी आम्हांला पुरी बासुंदीचे जेवण दिले. जेवणानंतर आमच्या समोरच हुतात्मा किसन अहिर सह.साखर कारखान्याच्या प्रपोजलवर सही केली आणि प्रपोजल विमानाने दिल्लीला केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठवले. प्रपोजलच्या पाठोपाठ अण्णा दिल्लीला गेले. संबंधित टेबलावर प्रपोजल पोहचल्याची खात्री केली आणि परत वाळव्याला आले. केंद्रात त्यावेळी जनतादलाची सत्ता होती. योगायोगाने नवीन साखर कारखान्याना तूर्त परवानगी देण्यासाठी ठरावीक काळासाठी बॅन होता तरी केंद्रात प्रपोजल टिकून रहाण्यासाठी यशवंतराव चव्हाण व अण्णासाहेब शिंदेंकडून प्रयत्न केला होता. त्यासाठी संबंधित मिनिस्टर बर्नाला यांना चार दोनदा अण्णासाहेब शिंदेंना सोबत घेऊन क्रांतिवीर अण्णा भेटले होते. त्यावेळी मा.ना.बर्नाला मंत्रिमहोदय म्हणाले, ''नवीन साखर कारखान्यांना तूर्त परवानगी देऊ नये म्हणून बॅन आहे. बॅन उठल्यानंतर तुमच्या हुतात्मा कारखान्याला परवाना देऊ. केंद्रातील जनतादलाचे सरकार तसे अल्पकाळ टिकले. थोड्याच दिवसांत परत लोकसभेच्या निवडणुका झाल्या आणि केंद्रात कॉंग्रेसची सत्ता आली. इंदिरा गांधी परत पंतप्रधान झाल्या. वसंतराव दादा खासदार म्हणून निवडून केंद्रात गेले. इंदिरा गांधी यांनी दादांच्यावर पक्षसंघटनेची महत्त्वाची जबाबदारी सोपवली.

केंद्रात वसंतदादा कॉंग्रेससत्तेच्या महत्त्वाच्या पदावर होते. त्यामुळे हुतात्मा कारखान्याची चांगली परिस्थिती तयार झाली होती. हुतात्मा कारखान्याच्या मंजूरीच्या कामासाठी दिल्लीला जाताना क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी कार्यकर्त्यांना दोन अटी घातल्या होत्या. त्यातली पहिली अट वसतिगृहातील मुलांच्या जेवणाची व्यवस्था करायची आणि दुसरी अट मला खर्चासाठी तार मनिऑर्डरने पैसे पाठविले पाहिजेत. तुमच्या हालगरजी पणामुळे जर एक दिवस वसतिगृहाची मुलं-मुली उपाशी राहिली तर मी सारं काम सोडून परत वाळव्याला येईन. आईंच्यासह आम्ही सर्वांनी जबाबदारी स्वीकारली. दुसऱ्याच दिवशी हुतात्मा विद्यालयातील शिक्षकांची मीटिंग घेतली त्या मीटिंगमध्ये अन्ता पाटील, अण्णांच्या आई व पांडू शेखर यांच्यावर वसतिगृहाची जबाबदारी सोपविली आणि अण्णांच्या खर्चाची जबाबदारी, दत्ता दादा, वसंत पवार आणि मी (जयवंत अहिर) आम्हां तिघांच्यावर टाकली. कामाला सुरूवात झाली वसतिगृहासाठी आई, अन्ता पाटील, पांडू शेखर व बच्चू पोरवाल

यांनी धान्य गोळा करण्याची मोहीम सुरू केली. आम्ही तिघांनी अण्णा मागतील तसे पैसे तार, मनिऑर्डरने पाठवू लागलो त्यासाठी शिक्षकांचे कडून शेअर्स रुपाने एक हजार रूपये गोळा करू लागलो. त्या काळात शिक्षकांचे पगार वेळेवर होत नव्हते हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील शिक्षक इच्छा असूनही पैसे देणार कुठून. त्यासाठी आम्ही एक मार्ग काढला आम्हा शिक्षकांची पतसंस्था होती. त्या पतसंस्थेतून शिक्षकांच्या नावे शेअर पुरते एक हजारचे कर्ज घेऊ लागलो. पहिला शेअर्स मिराबाई कांबळे या हरिजन बाईनं घेतला. त्या शाळेत शिपाई म्हणून काम करत होत्या. अशा पद्धतीने दिल्लीच्या खर्चाची तरतूद केली. हुतात्मा किसन अहिर विद्यालय व जिजामाता विद्यालय या दोन्ही माध्यमिक शाळांचा कारखाना उभारणीत सिंहाचा वाटा आहे. या शाळांनी फक्त शेअर पुरतच मर्यादित काम केलं नाही तर पडेल ते काम केलं. पगार मिळतोय म्हणून केलं नाही तर कर्तव्य म्हणून केलं
.

माझ्या माहितीप्रमाणे आजपर्यंत साखर कारखान्यांनी शाळा काढल्या परंतु देशातील एकमेव उदाहरण असेल की शाळेने हुतात्मा साखर कारखाना काढला. अण्णा कारखान्याच्या कामासाठी दिल्लीत होते. रोजच्या प्रगतीचा रिपोर्ट आम्हांला पत्राद्वारे अण्णा कळवत होते. हुतात्मा कारखान्याला परवानगी द्यावी म्हणून संबंधित खात्याचे मंत्री राव वीरेंद्रसिंग यांना ४५ खासदारांची पत्रे अण्णांनी दिली होती. खासदार बाळासाहेब माने, प्रमिला काकी, वसंतराव दादा, यशवंतराव चव्हाण, अण्णासाहेब शिंदे, केशवराव धोंडगे यांनी समक्ष भेट घेऊन राव वीरेंद्रसिंग यांना हुतात्मा कारखान्याच्या परवान्याबद्दल सांगितले होते. त्याशिवाय वसंतराव नाईक, हितेद्रभाई देसाई व देवरास अर्स या मुख्यमंत्र्यांची पत्रंही त्यांना दिली होती आणि समक्ष भेटूनही सांगितले होते. अण्णा दिल्लीला गेले की चार चार महिने तिथंच रहात होते. अण्णांचा दिल्लीतला खर्च फारसा नव्हता. जे.पी.नाईक यांनी अण्णांचा राहण्या जेवणाची सोय आय.आय. आर.ए. होस्टेलवर केली होती. ते होस्टेल शासन चालवत होते. तिथे एकवेळचा नाष्टा आणि दोन वेळचे जेवण फक्त ११ रु. खर्च ते होस्टेल भारतातून ट्रेनिंगला आलेल्या आय.ए.एस.ऑफिसरसाठी होते. त्यामुळे जेवणाचं, नाष्ट्याचं स्टॅण्डर्ड एक नंबरचे होते. क्रांतिवीर अण्णांच्या निरोपा प्रमाणे मी (जयवंत अहिर) व पवार सर दिल्लीला जात होतो. आठ-आठ दिवस अण्णांचे जवळ राहात होतो.

दिवसानं दिवस जात होते. वर्षं जात होती. १९७४ साल उजाडलं. क्रांतिवीर अण्णांचं दिल्लीहून पत्र आलं शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३०० वर्षे ६ जून

१९७४ रोजी होतायत. त्या निमित्त रायगडावर मोठा कार्यक्रम होणार आहे. त्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या इंदिरा गांधी आहेत. तेव्हा त्या कार्यक्रमाला जया, दत्ता, पवार सर, शामराव सव्वाशे, दत्तोपंत कुलकर्णी, राजाराम जाधव, बाळू चावरेकर आणि एक जन असे आठ कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ घेऊन गेलो होतो. इंदिरा गांधींना भेटून हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील ११०० मुलांच्या सह्यांचा अर्ज हुतात्मा कारखान्याला परवानगी द्यावी अशा आशयाचा तयार करून तो समक्ष इंदिराजींना भेटून त्यांच्या हातात द्या. अण्णांच्या पत्राप्रमाणे आम्ही रायगडावर वेळेवर पोहचलो तसं इंदिरा गांधींना भेटणं सोपं नव्हतं. रायगडावर आम्ही खासदार शालिनीताईना प्रथम भेटलो. त्यांना सर्व सांगितले. त्या म्हणाल्या सिक्युरिटी टाईट आहे. भेट घालणं शक्य नाही. एक अशा मावळली. परंतु इच्छा असेल तर मार्ग सापडतो म्हणतात त्याचा प्रत्यय त्या दिवशी आम्हांला आला. त्या कार्यक्रमाची जबाबदारी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन चिपळूणकर साहेबांची होती. अण्णांनी थोड्या दिवसांपूर्वी महाराष्ट्रातील शाळांचे सायन्स विषय शिकवणाऱ्या शिक्षकांचे दहा दिवसांचे शिबिर वाळव्याला घेतले होते त्या शिबिराच्या सांगता सभारंभासाठी चिपळूणकर साहेब आले होते. त्या वेळी त्यांची आमची चांगली ओळख झाली होती. त्या ओळखीवर अण्णांचे नाव सांगून त्यांना भेटलो. आमचे काम सांगितले. त्यावर ते म्हणाले, ''खासदार ए.टी.पाटील यांना भेटा ते तुमची इंदिरा गांधींची भेट घालतील, त्यांच्या सांगण्याप्रमाणे आम्ही ए.टी.पाटलांना अण्णांचे नाव सांगून भेटलो. तस अण्णांच्या दिल्लीहून आलेल्या पत्रात अनेक वेळा ए.टी.पाटलांचं नाव होतं. ते आपल्या हुतात्मा कारखान्याला चांगली मतद करतायत एवढ्या धाग्यावर खासदार ए.टी.पाटलांना आम्ही सांगितले. अण्णांचे दिल्लीहून पत्र आलय. हुतात्मा साखर कारखान्याला परवानगी द्यावी म्हणून ११०० विद्यार्थ्यांच्या सह्यांचा अर्ज आणलाय. तो समक्ष भेटून इंदिरा गांधींना द्यायचा आहे. लगेच ते म्हणाले, ''त्यात अवघड असं काहीच नाही. माझ्याबरोबर तुमच्या पैकी एकजण या. आम्ही प्रमुख मंडळी इंदिरा गांधींना अगोदर भेटतो आणि तुमची भेट घालून देतो. त्या वेळी तो अर्ज त्यांच्या हातात द्या. आमचे सर्व लोक ए.टी.पाटलांना म्हणाले, ''तुमच्याबरोबर जयवंत अहिर येतील.'' ठरल्या वेळी इंदिरा गांधी हेलीकॉप्टरने रायगडावर आल्या. त्यांच्यासाठी एक जीप गाडी चांगली फुलमालाने सजवलेली गडावर हेलीकॉप्टरने आणली होती. हेलीकॉप्टर मधून इंदिरा गांधी उतरल्या. प्रमुख सर्वांच्या भेटी झाल्या. ओपन जीप मध्ये त्या कार्यक्रमासाठी जाण्यासाठी बसल्या. त्या वेळी ए.टी.पाटलांनी माझी भेट घातली. मी त्यांच्या हातात विद्यार्थ्यांच्या सहीचा अर्ज दिला. आजही

मला इंदिरा गांधींची आठवण झाली तर तो रायगडावरचा प्रसंग, त्यांचा हसरा चेहरा, माझ्या डोळ्यांपुढ उभा रहातो. मी माझं भाग्य समजतो. मला क्रांतिवीर अण्णांच्या मुळे इंदिरा गांधींना भेटता आले. जुलैच्या शेवटच्या आठवड्यात विद्यार्थ्यांच्या सह्यांच्या निवेदनाला दिल्लीहून इंदिरा गांधी यांची सही असलेले पत्र एका मुलाच्या नावावर आले. त्या पत्रावरचा मजकूर तुमच्या हुतात्मा कारखान्याच्या परवाना मागणीच्या सह्यांचे निवेदन संबंधित खात्याकडे पाठवले आहे.

क्रांतिवीर नागनाथ अण्णा दिल्लीत सुचेल त्या मार्गाने हुतात्मा कारखान्याच्या परवान्यासाठी सातत्याने प्रयत्न करत होते. दिल्लीहून अण्णांचा पत्रव्यवहार चालूच होता. पुढं एक आलेल्या पत्रात कृषिमंत्री ना.राव वीरेंद्रसिंग यांच्या नावे हुतात्मा कारखान्याच्या परवानगीसाठी अकरा हजार शेतकऱ्यांच्या सह्यांचे निवेदन आठ एक दिवसांत तयार करून जयवंत अहिरला दिल्लीला पाठवा. दिल्लीला कसे यायचे? कुठे यायचे? हे पत्रात सविस्तर होते. मी तर पहिल्यांदाच दिल्लीला जाणार होतो. सह्यांचे निवेदन चार दिवसांत तयार केले. आणि मुंबईहून मी दिल्लीला स्टेशनवर पोहचलो. मला सारे नवीन होते. स्टेशन बाहेर येऊन टॅक्सी केली आणि अण्णांनी सांगितलेल्या ठिकाणी किर्लोस्कर ऑफिसमध्ये पोहचलो. तर अण्णा बाहेरच माझी वाट बघत उभा राहिले होते. अण्णांची भेट झाल्यानंतर माझा जीव भांड्यात पडला. नाही तर मी टेन्शनमध्ये होतो आणि तशी दिल्ली मला नवखी होती. अण्णा अर्ज बघून खूश झाले. तसे सह्यांचे निवेदन दत्ता शेळके(दादा)यांनी सजवले होते, नटवले होते अशा पद्धतीने प्रत्येक माणूस कारखान्याच्या कामासाठी मन ओतून काम करत होता. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर अण्णा उठले. मला उठवले. अंघोळ पाणी करून आम्ही आय.पी.ए.होस्टेलच्या पायऱ्या उतरून रस्त्यावर आलो. माझ्याकडे घड्याळ नाही अण्णांच्याकडे कधीच नव्हते. सारं सामसूम. रस्त्यावर एकही वाहन नाही. तसे अंदाजे तीन साडे तीन वाजले होते. अण्णा दिल्लीत असताना नेहमी नित्य नियमाने जवळच्या बंगाल साब गुरुद्वारमध्ये हुतात्मा नानक सिंगांची आठवण म्हणून जात होते. शेवटी चालत आम्ही गुरुद्वारमध्ये गेलो. त्या वेळी पहाटेचे चार वाजले होते. अण्णा जागे झाले की हुतात्मा कारखान्याचे काम इतका त्यांनी ध्यास घेतला होता. एकाएकी बोलताना गंभीर झाले आणि म्हणाले, ''अरे जया मी हुतात्मा कारखान्याच्या कामात इतका उतरलोय, एक तर लायसन्स घेऊन वाळव्याला येईन नाहीतर या नागनाथचं प्रेत वाळव्याला येईल.'' माझ्या अंगावर सर्रकन काटा आला आणि डोळ्यांचा बांध फुटला. मी ओक्सा-बोक्सी रडू लागलो आणि त्यांना म्हणालो,''अण्णा, असं म्हणू नका ओ. तुमचा इतका प्रयत्न व इतकं मोठं योगदान

आहे की, हुतात्मा कारखान्याला परवानगी नक्कीच मिळेल.'' आम्ही परत आय.पी.ए.होस्टेलवर आलो. नाष्टा करून बाहेर आलो नेहमीचा टॅक्सी ड्रायव्हर प्रेमसिंग आला होता. पुढे आम्ही खासदार प्रमिला काकींना बरोबर घेऊन कृषिमंत्री मा.राव वीरेंद्रसिंग यांना भेटलो. ११०० शेतकऱ्यांच्या सह्यांचे निवेदन स्वीकारले. कारखान्याच्या परवानगीसाठी एवढ्या लोकांची मागणी त्यांना तसे आश्चर्य वाटले. ते अण्णांना म्हणाले, ''नागनाथजी आपकी शुगर फॅक्टरी को जलदसे जलद परवाना मिलेगा. लेकीन आप मुझे एक बात बतावो ये किसन अहिर तो हमारी बीरादरीका आदमी, महाराष्ट्र मे इतने दूर कैसे पहुंचे?'' कारण राव वीरेंद्रसिंग हे अहिरच होते. त्यांना अण्णा म्हणाले, ''किसन अहिरांचे पूर्वज कधी काळी आले हे मला सांगता येणार नाही.

अण्णांच्या सोबत मी आठ एक दिवस दिल्लीत राहिलो. तस लायसन्स मिळेपर्यंत मी व पवारसर अण्णांचे सोबत जात येत होतो. अण्णांनी मला टॅक्सीत बसवून दिल्ली दाखवली. हा लाल किल्ला, इथे महात्मा गांधी समाधी स्थान, इथे कृषी भवन, हे राष्ट्रपती भवन, इथे इंदिरा गांधींचे निवासस्थान वगैरे वगैरे आणि ते मला म्हणाले, ''कारखान्याच्या परवानगी नंतर आपणाला दिल्लीला अनेक वेळा यावे लागेल. त्या वेळी तुला दिल्ली निवांत दाखवीन. अण्णांचे दिल्लीतल्या वास्तव्यामध्ये कृषी भवन मधले, मंत्र्यांच्या बंगल्यांवरचं राहण्याच्या ठिकाणावरचे अनेक मित्र होते. त्याप्रमाणे प्रेमसिंग नावाचा हिमाचल प्रांतातला टॅक्सीचा मालक होता तोच ड्रायव्हर होता. त्याला सारे दिल्लीतले पत्ते, रोड माहीत होते. १९६२-६३ पासून अण्णा ज्या ज्या वेळी दिल्लीत येत होते तेव्हापासून प्रेमसिंग यांची टॅक्सी भाड्याने वापरत होते. तो अत्यंत चांगल्या स्वभावाचा एका सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबतला होता. अण्णांच्यावर त्यांचे खूप प्रेम होते. प्रसंगाला तो अण्णाच्या पाठीशी ठामपणे उभा रहात होता. वाळव्याहून पैसे यायला वेळ झाला तर अण्णा त्याच्याकडून हजार दोन हजार उसनवार घेत होते. इतका त्या प्रेम सिंगाचा अण्णांच्यावर विश्वास होता.

दिल्लीत अण्णा कारखान्याच्या कामासाठी सातत्यान जात येत असत. कृषिभवनहून परत आय.आय.पी.ए.होस्टेल राहण्याच्या ठिकाणी जाता येता त्या रस्त्यात टिळक ब्रीज लागत होता. त्या ठिकाणी सिंगनल होता. तिथे हमखास टॅक्सी थांबायची त्यावेळी मीड-डे नावाचा पेपर दररोज वर्षेन वर्षे घेत होते. त्या पेपरचाही एक दिवस कारखान्याला उपयोग होईल हे अण्णांना माहीत नव्हते. एखादी गोष्ट सातत्याने करतो त्या गोष्टीचा कधीना कधी उपयोग होतोच. साल आठवत नाही.

अंदाजे १९७७-७८ असावे. भारत कृषक शेतकरी संघटनेचे अधिवेशन दिल्लीत टाल कठोरा गार्डनमध्ये होते. नेहमी प्रमाणे मीड-डे पेपर अण्णांनी घेतला. तर त्यांत वरच्याच पानावर भारत कृषक संघटनेच्या अधिवेशनाची बातमी होती. अण्णांचे कोल्हापूरचे मित्र सी.आर.पाटील त्या संघटनेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष होते. त्यांना भेटण्यासाठी त्या अधिवेशनला गेले होते. केंद्रीय मंत्रिमंडळातील लोकसभेचे जे सभापती असतात तेच भारत कृषक संघटनेचे अध्यक्ष असतात अशी घटना आहे. त्या प्रमाणे बलराम जाखर अध्यक्ष होते. अधिवेशनाचे दुपारचे सत्र अण्णा पोहचण्या अगोदर सुरू झाले होते. म्हणून अण्णांनी सी.आर.पाटलांना अधिवेशन संपल्यानंतर भेटायचे ठरवून लोकांच्यातच जरा बाजूला छोट्या टेकडीवर झाडांच्या सावलीत बसले होते. एक एक वक्ता आपले मनोगत मांडत होता. सी.आर.पाटलांचे मेव्हुणे जयसिंगराव आडनाईक हे बोलायला लागले. आजपर्यंत अनेक वर्षांपासून भारत कृषक संघटनेच्या मार्फत शेतकऱ्यांचे सरकार पुढे सातत्याने आम्ही प्रश्न मांडतोय. शेतकऱ्यांच्या गहू,ज्वारी,मका,कांदा,कापूस,ऊस इ. पिकांना खर्चाच्या आधारभूत भाव ठरवून द्या. पण सरकार कडून काही होत नाही असे बोलताना त्यांचे कसे काय अण्णांच्याकडे लक्ष गेले. ते अध्यक्षाचे नाव घेऊन म्हणाले, ''बलराम साहेब इथं समोरच टेकडीवर एक महान थोर स्वातंत्र्य सेनानी क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी बसले आहेत. ते महिनो महिने त्यांच्या हुतात्मा साखर कारखान्याच्या मान्यतेच्या कामासाठी दिल्लीत ठाण मांडून आहेत. आज तागायत सरकारनं त्यांच्या कामाकडे लक्ष दिल नाही आणि आपण म्हणतो सरकार आपलं आहे. शेतकऱ्यांचे आहे. मग अजून नागनाथ अण्णांना न्याय का मिळाला नाही ?

जयसिंगराव अडनायकांना मा.सभापती बलराम जाखर यांनी जवळ बोलावले आणि त्यांना सांगितल पहिले सत्र संपल्यानंतर नागनाथ नायकवडी यांना बोलाऊन घ्या. त्याची आणि माझी भेट घाला. सत्र संपल्यानंतर जयसिंग अडनाईक व सी.आर.पाटलांनी नागनाथ अण्णा व बलराम जाखरांची भेट घातली. सविस्तर हुतात्मा कारखान्यावर चर्चा झाली. कृषिमंत्री मा.ना. राव वीरेंद्रसिंगना फोन करून हुतात्मा कारखान्याला परवानगी द्यावी म्हणून आग्रहाने ना.बलराम जाखर यांनी सांगितले. शिवाय तसे पत्रही दिले. कामाला चांगलीच गती आली. मीड-डे वर्तमानपत्र दररोज सातत्याने वर्षानुवर्षे घेतल्याचा बघा असा हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याला उपयोग झाला. शासनही आता हुतात्मा साखर कारखान्याच्या मदतीला होते.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याला परवानगी देण्याचे काम अंतिम टप्प्यात आले होते. रहता राहिला प्रश्न तो दोन कारखान्यांमधला अंतराचा त्यासाठी कृषीमंत्री ना.राव वीरेंद्रसींग यांनी राजारामबापू सहकारी साखर कारखान्याला व हुतात्मा कारखान्याला आपापले म्हणणे मांडण्यासाठी दिल्लीला बोलावले होते. आमच्या हुतात्मा कारखान्याचे म्हणणे मांडण्यासाठी कॉ.दत्ता देशमुख व क्रांतिवीर नागनाथ अण्णा होते. त्यांच्या बरोबर मी जयवंत अहिर, दत्ता(दादा)शेळके, वसंतराव पवार सर, चंद्रकांत लोहार, शामराव सव्वाशे, दत्तोपंत कुलकर्णी(काका), पांडुरंग बाबू मुळीक असे नऊजण कृषिमंत्री राव विरेंद्रसिंग यांनी बोलवलेल्या मीटिंगला हजर होतो. राजारामबापू कारखान्याचे म्हणणे मांडण्यासाठी संचालक बोर्ड व सोबत त्यांनी दोन वकील आणले होते. सुरुवातीला राजारामबापू साखर कारखान्याचे म्हणणे राव वीरेंद्रसिंगांनी ऐकून घेतले. नंतर हुतात्मा कारखान्याला आपले म्हणणे मांडन्यास सांगितले त्यावेळी कॉ.दत्ता देशमुख यांनी म्हणणे मांडताना नगर मधल्या कारखान्याचा स्वत: तयार केलेला नकाशा मंत्रिमहोदयांना दाखवला आणि ते म्हणाले, ‘‘या नगर मधल्या दोन कारखान्यांमध्ये ५ ते ६ मैलांचे अंतर आहे. असे सहा ते सात कारखाने आज नगर मध्ये आहेत आणि ते उत्तम चाललेले आहेत. तेव्हा हुतात्मा कारखान्याचा अंतराचा प्रश्न आहे तो कारखान्याला परवानगी देताना अडचणीचा नाही. तेव्हा शासनाने हुतात्मा कारखान्याची अंतराची बाब विचारात घेऊ नये.’’ कृषिमंत्र्यांनी दोन्ही कारखान्यांच्या प्रतिनिधींचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि शेवटी म्हणाले, ‘‘अंतराचा विचार न करता जिथं जिथं ऊस आहे तिथं नवीन कारखान्याना परवानगी देण्याचे धोरण भारत सरकारचे आहे. येवढं बोलून मीटिंग संपल्याचे त्यांनी जाहीर केले.

स्वर्गातून भूतलावावर गंगा आणण्यासाठी भगिरताला जे प्रयत्न करावे लागेले आणि मग गंगा पृथ्वीवर आवतरली ही पुराणातली गोष्ट आहे. हे खरं खोटं मला माहीत नाही. मी येवढ्याचसाठी म्हणतो १९७२-७३ सालापासून १९८१ या आठ वर्षांच्या काळात क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यासाठी जे प्रयत्न केले ते भगिरती होते. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याला २६.३.१९८१ ला परवानगी मिळवली. क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी एकच निर्धार केला होता. दिल्लीहून भारत सरकार कडून हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे एक तर लायसन्स घेऊन येईन, नाहीतर दिल्लीहून नागनाथचे प्रेत वाळव्याला येईल याचे अनेक साक्षीदार आहेत. त्याच प्रमाणे कारखाना मागणीच्या पहिल्या कागदा पासून शेवटच्या परवानगीच्या कागदा

पर्यंत अण्णांच्या सातत्याने बरोबर असणारे जयवंत अहिर, पवार सर, दत्ता शेळके, चंद्रकांत लोहार, शामराव सव्वाशे, दत्तोपंत कुलकर्णी वगैरे आम्ही मंडळी पण साक्षीदार आहोत.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या परवानगी नंतर कारखान्याच्या कामाला क्रांतिवीर नागनाथअण्णांनी चांगलीच गती दिली. आदर्श कारखाना कसा असावा याचे गणित अण्णांनी मनात करून ठेवले होते. कारखाना कुठे काढायचा, कोणत्या ठिकाणी काढायचा याचा पक्का विचार मनात करून ठेवला होता. त्या मागे अण्णांची कसलीही अपेक्षा, कोणताही स्वार्थ नव्हता. निरपेक्ष भावनेने केलेले काम त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून लोकांच्या पुढे ठेवला. प्रथम महाराष्ट्र शासनाच्या मागे लागू साइड सिलेक्शन कमिटी कडून साइट सिलेक्शन निश्चित केले. ज्या जागेवर कारखाना उभा केला तिथल्या जमिनी शेतकऱ्याच्या संमतीने घेतल्या. त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांना जमिनीला जमीन पाहिजे होत्या. त्यांना दुसरीकडे घेऊन दिल्या. ज्याची बागायत जमीन असेल त्याला बागायत जमीन दिली. शिवाय त्यांच्या कुटुंबातील एका मुलाला साखर कारखान्यात कायमची नोकरी दिली. लोक सामाजिक कामासाठी पैशाची वर्गणी करतात. क्रांतिवीर नागनाथअण्णांनी बदल्या जमीन देण्यासाठी गावकऱ्यांच्या कडून जमिनीची वर्गणी गोळा केली. त्या वर्गणीमध्ये अण्णांचे निकटचे कार्यकर्ते सखाराम तुकाराम घोरपडे यांनी एक एकर जमीन फुकट देण्याचे प्रथम जाहीर केले. ज्या जमिनी अण्णांनी वर्गणी म्हणून गोळा केल्या त्या जमिनीला त्या वेळी एकरा भाव १०,०००/- रुपये असताना अण्णांनी शेतकऱ्यांना १६,५००/- रुपये भाव जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांना दिला. गावकऱ्यांनी कारखान्यासाठी अंदाजे १३.५ एकर जमीन चारा ठेवण्यासाठी होती ती वाळव्यातील शेतकऱ्यांच्या मालकीची होती. त्या जागेला सर्वजन गंजीखाना म्हणत होते. ती जमीन शेतकऱ्यांनी एकमुखी विना मोबदला दिली. परंतु ती जमीन आमची शासनाची आहे म्हणून शासनाने त्या जमिनीची किंमत जवळजवळ ३६ लाख रु. कारखान्याकडून वसूल केली. त्या जमिनीवर गाडी तळ करायचे म्हणून कारखान्याने लावलेल्या झाडांसह शासनाने पैसे वसूल केले. असे हे आपले म्हणणारे शासन आणि शासन कर्ते.

जमिनीच्या कामाबरोबर शेअर्स मोहीमही एका बाजूला चालू ठेवली. साखर कारखान्याची एक नंबरची मशिनरी बनवणाऱ्या बकाऊ वुल्फ कंपनीला मशिनरीची ऑर्डर दिली. शेअर्स मोहिमे बरोबर शासनाचे शेअर्स भांडवल मिळवणे आय.एफ .सी. आय.कडून कर्ज मिळवले. साऱ्या तरतुदी नंतर आमक्या तमक्या मंत्र्याच्या हस्ते कामाला शुभारंभ करण्यात वेळ न घालवता हजर असणाऱ्या एका

वडर समाजातील कामगाराच्या हस्ते दिवस उगवायच्या मुहूर्तावर २६ जानेवारी १९८३ रोजी नारळ फोडला आणि कामाला सुरुवात केली. कारखाना कार्यक्षेत्रातील पंचक्रोशीतला प्रत्येक घटक कारखाना कामाला मदत करत होता. स्वत: क्रांतिवीर नागनाथ अण्णा दिवसातल्या २४ तासांत सकाळ संध्याकाळ अंघोळ पाण्यासाठी दोनच तास हुतात्मा विद्यालयात जायचे त्यावेळी तेवढे कारखाना साइटवर नसायचे. नाहीतर बावीस तास साइटवर असाचे. जेवण तिथंच. झोपणं तिथंच एका झोपडीत असायचं. त्यांनी साखर कारखान्याच्या कामाला सुरुवात केल्या पासून बरोबर अकरा महिन्यांत साखर पाडली. १९८३ मध्ये साखर कारखान्याचे काम चालू असताना **नागठाणे**ची मंडळी- ज्ञानबा महाराज, ज्ञानदेव माने, ईश्वर(बापू) मांगलेकर, बोरगावकर मामा, वसंत मिस्त्री, भानुदास पाटोळे, वसंत बापू पाटील, सदाशिव जाधव(काका)ही रात्रभर कारखाना साइटवर नित्य नेमान असायची. सकाळी गावाकडं जाऊन शेअर्स मोहिमेच काम करत होते. असा साखर पडेपर्यंतचा त्यांचा नित्य नियम होता. त्यांना मदत म्हणून शिक्षक एच.डी.जाधव, कोंडूसकर जे.बी.सर होते. तसेच बाळकृष्ण जाधव गुरूजी, नागनाथ पाटील त्याच प्रमाणे इतर गावांतून शेअर्स गोळा करण्याच्या मोहिमेसाठी क्रांतिवीर अण्णांनी हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील दोन-दोन शिक्षकांना प्रत्येक गावासाठी दिले होते.
**गोटखिंडी-** प्रकाश अहिर व पी.बी.नायकवडी त्यांच्या सोबत गावातील कार्यकर्ते गणपती पाटील(मास्तर),बाबर गुरूजी, कुळरूपकर काका, शिवाजी पाटील (एस.टी.ड्रायव्हर), शंकर पाटील(भडक्बिकर),गजानन पाटील,दादासाहेब पाटील (चेअरमन,प्रिन्स शिवाजी बोर्डिंग), बी.आर.थोरात, नीळकंठ थोरात, महादेव पाटील (सेक्रेटरी), एन.के.पाटील.
**अहिरवाडी-** शिक्षक एल.टी.शिंदे, के.जी.झांबरे, आर.पी.तांबवेकर कार्यकर्ते राऊ नांगरे, तानाजी यादव, कृष्णा यादव, शंकर यादव,**पडवळवाडी-** शिक्षक एस.टी.खोत कार्यकर्ते तुकाराम नाना खोत(वस्ताद), देवास, रामचंद्र लाला कोकाटे (कवी), बाबूराव येवले, भाऊ कदम, शाम कुंभार, करमाळकर तात्या, मारुती बाड,
**वाळवा-** शिक्षक एस.पी. हवलदार सर, ए.आर.चाऊस (माजी चेअरमन), दत्ता शेळके(दादा)कार्यकर्ते दत्तोपंत कुलकर्णी, बाबूराव मगदूम, काका घोरपडे, महादेव जाधव, राजाराम जाधव, जगन्नाथ शिंदे, शेटे सर, मोटे सर, नेमीनाथ नवले, बाबुराव होरे, अण्णा चेअरमन, जिनू पेशवे, बाळू नाना मगदूम, चंपाअक्का, अप्पा गायकवाड, नामदेव शेळके, खंडू नाईक, बाजीराव थोरात, मकबुल वलांडकर, गणपती महाजन, बाळ महाजन, आनंदराव शाहिर,बापूसो थोरात(मास्तर), विश्वास थोरात, दत्ता माने, महामूद अल्ली चाऊस, विलास साळुंखे, गणू भाऊ येवले, वामन हर्डीकर,

एकनाथ देवर्डे, शिंदे अण्णा, तानाजी हरी खोत, गणपती साळुंखे(तासगावकर), नबीसाब मेवेकरी, अल्लाबक्ष मेवेकरी, शंकर घबक, लाडखान, भिकू झेंडे, रहिमान काझी, दत्तोपंत तांदळे, सखाराम गायकवाड, काशिनाथ नायकवडी(अण्णा), गुलाब वलांडकर, वसंत आडीलकर, बापूसो वलांडकर, निवृत्ती माने, विश्वास मुळीक, पी.बी.मुळीक, किसन धोंडी अहिर, शिवाजी पाटील, शामराव सव्वाशे, तुकाराम गावडे, पांडू देव, निवृत्ती गावडे, **शिरगाव-** शिक्षक महाडिक सर, वसंत वाघमारे कार्यकर्ते- पंढरीनाथ माने,भानुदास माने,किसन हवलदार(शेठजी), धोंडीराम पाटील, एकनाथ वाघमारे, विठ्ठल चौगुले, **नवेखेड-** शिक्षक-डी.डी.पाटील, व्ही.डी.गोवडे, कार्यकर्ते- दिनकर उर्फ नारायण यशवंत गुंजवटे, मारुती जोती गुंजवटे (आबा), पांडुरंग हिंदुराव थोरात, वासू गोपाळ चव्हाण, **जुनेखेड-** शिक्षक-एस.आर.पाटील, जमादार सर, कार्यकर्ते- शामराव पाटील(अप्पा), जींतीकर अण्णा, राजाराम जाधव (बापू), पोपट दादू जाधव, रामचंद्र शामराव निकम, कै.दत्तात्रय पाटील. तसेच आम्ही शेअर्स गोळा करत असताना जुनेखेडातील देवळात बसत होतो. त्यावेळी महादेव सुबराव पाटील या नावाचा मुलगा पाण्याची कळशी व तांब्या घेऊन आमच्यासाठी येत होता, तोच मुलगा पुढे कारखान्याचा डायरेक्टर झाला. **मसुचीवाडी -**शिक्षक-के.के.नायकवडी, जी.एन.पाटील, कार्यकर्ते- दत्तू रत्तू खोत, बापूराव भाऊ खोत, विष्णू राऊ खोत, विष्णू राऊ खोत-कदम(डॉक्टर), भीमराव कृष्णा कदम, भाऊसाहेब नारायण कदम, कै.नामदेव गटकुळ, कै. आनंदराव केशव डुके, कै. किसन गोविंद कदम, दिनकर ज्ञानू शेळके, भगवान चंद्रू खोत, रामचंद्र निवृत्ती खोत **नागराळे-**शिक्षक-ए.वाय.पवार, सी.डी.पाटील, कार्यकर्ते-यशवंत रामचंद्र बाबर, मधुकर केशव पाटील, दिलीप कृष्णराव पाटील(काका), भिमराव रामचंद्र गायकवाड (बापू), **पुणदी-** शिक्षक-व्ही.डी.सूर्यवंशी, कार्यकर्ते- कुंभार (सेक्रेटरी), सोन्या बापू **पुणदीवाडी-** शिक्षक -बी.एस.ठाणे, कार्यकर्ते- मनोहर तुकाराम जाधव **गाताडवाडी व लोणारवाडी-** कै.रामचंद्र बापू खोत, कै.कृष्णा गोविंद खोत, कै.रामचंद्र कृष्णा शेटे, कै. विठ्ठल धुळाप्पा चौगुले, बापू गणू खोत

**खोलेवाडी-** शिक्षक-एन.पी.पवार, बी.बी.पाटील, एम.एस.पाटील, कार्यकर्ते मारुती जाधव, तातोबा बाजी सूर्यवंशी, गणपती खोले, पांडुरंग सूर्यवंशी, एकनाथ सूर्यवंशी, सर्जेराव सूर्यवंशी, गंगाराम सूर्यवंशी याशिवाय ज्ञात अज्ञात आसपासच्या व वाळव्यातल्या आयाबायांनी हुतात्मा कारखान्याकडे गारवा आणून कामगारांच्यात उत्साह निर्माण केला. प्रत्येकाची नाव लिहणं शक्य नाही आणि नावं लिहावी म्हटलं तर नावांचच एक स्वतंत्र पुस्तक होईल. हुतात्मा कारखाना या विषयावर स्वतंत्र पुस्तक लिहताना सर्वांची नांवे आणण्याचा प्रयत्न करू. तसं पाहिलं तर कारखाना कार्यक्षेत्रातील प्रत्येक घटकांनी आपल्याला शक्य आहे त्या प्रमाणे कारखान्याच्या

कामाला हातभार लावला आहे. पंधरा गावांमधले स्थानिक कार्यकर्ते शेअर्स मोहिमेचे काम चोख करत होते. त्यांच्या मदतीला हुतात्मा विद्यालयातील शिक्षक, शिक्षिकांची टीम होती. त्याच प्रमाणे कारखान्याच्या कामामध्ये सुरुवातीपासून साखर पडेपर्यंत क्रांतिवीर अण्णांचे मामा बाबासाहेब साळुंखे व त्यांचे सहकारी जगन्नाथ खोत हे दोन मिरजवाडीचे कार्यकर्ते कसलिही अपेक्षा न करता रात्रंदिवस राबत होते. पहिल्या ट्रायल सीझनचे क्रशिंग ३९२०० झाले. दर मात्र अण्णांनी सर्वांत जास्त काढला तो रु. २४५ चा होता.

हुतात्मा साखर कारखाना म्हणजे क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा एक विचार होता. त्या मागे एक तत्त्व होते. चांगले चाललेले साखर कारखाने कशामुळे डबघाईला का आले? हे अण्णांना माहीत होतं. त्यांनी कारखान्यात राजकारण शिरू दिल नाही. मतभेदाला कुठही वाव ठेवायचा नाही. त्यांनी दार बंद करून कधीच डायरेक्टर बोर्डाची मीटिंग घेतली नाही. प्रत्येक मीटिंगला साहित्य खरेदीच्या निगोशिएशनला डायरेक्टर बोर्डाच्या मीटिंगला १५०० ते २००० शेतकरी हजर रहात होते. कामगार भरती शेअर संख्येच्या प्रमाणात गावोगावच्या शेतकऱ्यांच्यावर सोपवली. त्यासाठी एक नियमावली बनवली होती. कामगार भरती वेळी सारं गाव सार्वजनिक ठिकाणी जमा झाल्यावर जाहीर सभेतून निवड करायची. ज्या कुटुंबातील मुलगा घ्यायचा त्या कुटुंबात कोणी नोकरीला नसावा. त्या कुटुंबात बागायत जमीन नसावी. तो मुलगा व्यसनी नसावा. त्या मुलाची कष्ट करायची तयारी पाहिजे. अशा




**क्रांतीवर नागनाथअण्णा** यांचे समवेत हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत सक्रीय असलेले हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील शिक्षक कर्मचारी

पद्धतीने गावकऱ्यांनी आपल्या गावातून गरजू मुलांचीच कामगार म्हणून भरती करावी अशा पद्धतीने गावागावांतून कामगार भरले आणि त्यांना आपला कारखाना उभा राहीपर्यंत त्यांचे ग्रुप करून आसपासच्या साखर कारखान्यात ट्रेनिंगला पाठवले. तसेच तज्ज्ञ कामगाराची भरती तज्ज्ञ कामगारांच्यातूनच केली. असा व्यवहार करुन अण्णांनी कोणत्याही संशयाला वाव ठेवला नाही.

स्वत: अण्णांनी मात्र त्यावेळी जाहीर केले. मी माझ्या घरातल्या कोणा व्यक्तीला जवळच्या नातलगांना, पैई पाव्हने यांपैकी कोणालाही कारखान्यात नोकरीत घेणार नाही. संचालक पदाबद्दल ते म्हणाले, ''माझ्या दृष्टीने सारेच सभासद संचालक आहेत. परंतु सरकारी नियमाप्रमाणे संचालक घ्यावे लागतात व त्यांची नावे संचालक म्हणून सरकारला कळवावी लागतात. हे खरं असलं तरी त्या संचालक मंडळ निवडीचे काम तुम्ही गावोगावच्या शेतकऱ्यांनी करायचे आहे. संचालक निवडीच्या आदल्या दिवशी व निवडीच्या दिवशी गावातून स्पीकरची गाडी पुकारण्याचे काम करेल. आज चार वाजता तुमच्या गावातील संचालक निवडीची सभा आहे. तुम्ही सर्वजण सभेच्या ठिकाणी हजर रहावे. मग तो सभासद असो नसो. सारा गाव एकत्र जमल्यानंतर तुम्हांला निवडीचे निकष वाचून दाखवले जातील. त्या निकषा प्रमाणे तुम्ही गावकरी एक मुखी जे नाव द्याल तो संचालक. निकष खालील प्रमाणे होते. १. कारखान्याचा सभासद असला पाहिजे. २.कारखान्याच्या कामाला वेळ देणारा असावा ३. तो निर्व्यसनी असावा ४. तो गावातील इतर सार्वजनिक संस्थेत चेअरमन नसावा तसेच ग्रामपंचायतमध्ये सरपंच, सदस्य नसावा. यातूनही तुम्ही साऱ्या गावानं पदावर असणाऱ्या व्यक्तीची निवड केली तर त्या व्यक्तीने संचालक होण्या अगोदर गावातील पदाचा राजीनामा दिला पहिजे. ५. संचालक निवडीसाठी जात पात, धर्म, पक्षपार्टी अशी कोणतीही अट असणार नाही. अशा पद्धतीने संचालक निवडले जातील. एक वेळ संचालक बोर्डात संचालक किंवा चेअरमन झाल्यानंतर त्यांना पुढे कधीही संचालक बोर्डात किंवा चेअरमन म्हणून घेता येणार नाही. पहिल्या संचालक बोर्डाने आणि क्रांतिवीर नागनाथअण्णांनी अशी अलिखित नियमावली केली आहे. प्रत्येक पांच वर्षांनी नवीन संचालक, नवीन चेअरमन. हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याच्या संचालक निवडीच्या वेळी कार्यक्षेत्राच्या प्रत्येक गावात नागनाथअण्णा स्वत: हजर राहत होते. त्यांच्या बरोबर मोटे सर, शेटे सर, वसंत पवार, जयवंत अहिर, दत्ता दादा, हे कार्यकर्ते हजर असत. गावागावांतील काही शेतकरी मंडळी स्वत: भाषणे करून लोकांना कारखान्याबद्दल सांगत होते. त्यात नागठाण्याचे गजाआबा शिंदे हे वक्ते होते.

त्यांचं ग्रामीण भाषेतील वक्तव्य वाखाणण्यासारखं होते. त्यावेळी नागठाण्याचे जाधव गुरूजींनी एक सुंदर काव्य केलं होतं. त्या काव्यातील पहिली ओळ शेतकऱ्यांनो उसाचं कांडन् कांड हुतात्म्यालाच घालायचं असं होतं. दुसरं एक काव्य जयवंत अहिर यांनी केलं होतं त्या काव्याची पहिली ओळ ''शेतकऱ्यांनो उसाला भाव तुम्ही मागाल तेवढा.''

क्रांतिवीर नागनाथअण्णा दिलदार होते. तसे मनानंही मोठे होते. सुरुवातीला शेअर्स गोळा करताना काही विरोधी मंडळींनी अण्णांना विरोध म्हणून शेअर्स घेतले नव्हते. अण्णा एका जाहीर सभेत बोलले. मोठ्या मनाने बोलले. मला तुम्हांला विरोध करायचा असला किंवा माझ्या विरोधी पॅनेल करायचे असलं तर तुम्ही कारखान्याचे सभासद असाल तरच तुम्हांला शक्य आहे. म्हणून मी तुम्हांला जाहीर आवाहन करतो मला विरोध करण्यासाठी तरी शेअर्स घ्या. अण्णांनी असे त्या मंडळींच्या ध्यानात आणून दिले. त्यानंतर मग मात्र साऱ्या मंडळींने शेअर्स घेतले. याच पद्धतीने कामगार भरतीच्या वेळी गावकऱ्यांच्याकडून खरोखरचं एकादया गोर गरिबाच्या मुलावर अन्याय झाला असेल त्या मुलाची योग्य केस असताना त्यांना कामगार भरतीतून चुकून माकून डावलेले असेल तर त्या मुलांना संधी देण्यासाठी क्रांतिवीर नागनाथअण्णांनी एका जनरलबोर्डाच्या सभेतून त्या मुलांना आवाहन केले. शिक्षणाची अट नाही, वयाची अट नाही, जात धर्मांची अट नाही, पक्ष पार्टीची अट नाही, ज्याला नोकरी पाहिजे अशा कार्यक्षेत्रातील मुलांना एकच अट त्यांनी दोन सीझन हुतात्मा साखर कारखान्यासाठी ऊस तोडण्याचे काम करायचे. त्यांना हुतात्मा कारखान्यात कायमची नोकरी दिली जाईल. खूप मुलं येतील असं अण्णांना वाटत होतं पण प्रत्यक्षात १५ गावांतून फक्त १४० मुलांनी ऊस तोडण्याचे काम केले. त्यांना कायमची नोकरी दिली. आता ते कामगार १८ ते २० हजार रुपये महिना पगार व ४० टक्के बोनस घेतात.

हुतात्मा साखर कारखान्याबद्दल अजूनही खूप लिहण्यासारखं आहे. मागे उल्लेख केल्या प्रमाणे पुढं मागं हुतात्मा पॅटर्न म्हणून एखादं स्वतंत्र पुस्तक लिहू. क्रांतिवीर नागनाथअण्णांची मनोमन इच्छा होती. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या उद्घाटनाचा कार्यक्रम मोठा घ्यायचा आणि त्यासाठी इंदिरा गांधींना बोलावयाचे परंतु कारखान्याची साखर पडण्या अगोदरच इंदिरा गांधींचा खून झाला. त्यामुळे शक्य झाले नाही. म्हणून कारखान्याच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला फाटा देऊन विना उद्घाटनाचा हुतात्मा किसन अहिर साखर कारखाना दिनांक २९.१.१९८४ रोजी चालू केला. तो आजतागायत खुट न होता उत्तम चालू आहे.

असे अण्णांचे अनेक गुण आहेत. साखर कारखाना काढण्या मागचा नि:स्वार्थीपणा अण्णांचा किती होता ते कारखान्याचे सभासद जाणीवपूर्वक झाले नाहीत. शेतकरी त्यांचा अभिनंदनाचा ठराव करत असताना तो करू दिला नाही. साखर कारखान्याच्या कामासाठी जात असताना जेवण खाण व्यक्तिगत. भाडे स्वत:च्या आमदारकीच्या पेन्शन मधून करत होते. साखर पडल्यानंतर बाहेर येत असताना आईंनी अण्णांच्या हातात साखर ठेवण्याचा प्रयत्न केला. आईच्या समाधानासाठी आईच्या हातातला साखरेतला एक कण जिभेवर ठेवला आणि आईचं लक्ष दुसरीकडे गेल्यावर तोही जिभेवरचा कण थुंकून टाकला. हा त्यांच्या निरपेक्ष भावनेचा मी लेखक जयवंत अहिर साक्षीदार आहे. ज्या दिवशी साखर पडली त्या दिवशी कारखान्याच्या गेट मधून अण्णा बाहेर पडले ते हयात होते तो परत साखर कारखान्याच्या गेटच्या आत कधीही गेले नाहीत.

हुतात्मा कारखान्याच्या गेटच्या बाहेर राहून कारखाना पूर्ण कार्यक्षमतेने चालण्यासाठी आणि लवकरात लवकर कर्ज मुक्त होण्यासाठी प्रयत्न करत होते. प्रत्येक गोष्टीत स्वत: लक्ष घालत होते. ऊस तोड ही नियमाप्रमाणे पक्व उसालाच दिली पाहिजे. कुणाचाही ऊस वशिल्याने तोडायचा नाही. त्यासाठी सक्त ताकीद होती. ऊस तोड तळापासून खालच्या कांडीला घासून केली पाहिजे. स्वच्छ व पक्वच ऊस गळीताला आला पाहिजे, उसातली जास्तीत जास्त साखर मिळवली पाहिजे, कारखान्यात रसाची कुठेही गळती किंवा साडलवंड होता कामा नये. साखरेचा कणनकण साखर पोत्यात गेला पाहिजे. एक चिमूटभरही साखरेचे मातरे होता कामा नये. या साऱ्या गोष्टी त्यांनी तंतोतत अमलात आणल्या. त्यासाठी ऊस मालक, शेतकरी, कामगार आणि ऊस तोडण्याची सांगड घातली. प्रत्येकाने आपले कर्तव्य चोख पार पाडले. त्यामुळे कारखान्याला जास्तीत जास्त उच्चांकी रिकव्हरी १३.५० पर्यंत मिळू लागली. साहजिकच टनाला १३५ किलो साखर मिळायला लागली. त्यामुळे साखरेला भरपूर पैसे मिळू लागले. त्यातून क्रांतिवीर नागनाथअण्णांनी उसाला उच्चांकी दर देऊन जास्तीत जास्त भाव देण्याची प्रथा पाडली. साखर कामगारांना जास्तीत जास्त ४० टक्के बोनस दिला. ऊस तोडीला नियमापेक्षा जास्त मजुरी दिली. त्याच प्रमाणे ऊस तोडप्यांना व गाडीवानांना स्वेटर दिली. व त्यांच्या मुलांच्यासाठी सर्वांत प्रथम साखर शाळा सुरू केली. वाहतूक कंत्राटदारांना वाहतुकीचे दर जास्त दिले. ऊस तोडणाऱ्या मजुरांना रहाण्यासाठी पक्की ४०० घरं बांधून दिली, साइटवर सर्वांसाठी दोन रुपयांत पोटभर जेवणाची सोय केली, साखर कामगारांच्या वेतनाबद्दल मोर्चे काढणाऱ्या मधुकर कात्रे सारख्या कामगार पुढाऱ्याला बोलावून

त्यांनी त्यांच्या इच्छेप्रमाणे हुतात्मा कारखान्यातील कामगारांचे वेज बोर्ड प्रमाणे पगार, ग्रेड ठरवून दिली. ती तंतोतंत अमलात आणली. साखर कारखान्याची कर्जाची मुदत पाच वर्षे असताना तीन वर्षांत कारखाना कर्ज मुक्त केला. त्याशिवाय पंधरा गावांतील गल्लीबोळ रस्ते डांबरी केले. शैक्षणिक संस्थांना लाखो रुपयांच्या देणग्या दिल्या, सामाजिक, दलित चळवळी, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, भूंकपग्रस्त यांचे प्रश्न कारखान्याच्या माध्यमातून मार्गी लावले. दलित आदिवासी, ग्रामीण विद्रोही, बंधुता सारखी साहित्य संमेलनं घेऊन त्यांना स्वत:चे मत मांडण्यासाठी खुले व्यासपीठ तयार करून दिले. शेतकऱ्यांच्या ठेवीला १५ टक्के व्याज दिल. एनआरडी सारख्या ठेवी ज्या कधीच परत द्यायच्या नसतात त्या गेटकेनच्या शेतकऱ्यांच्या ठेवी एका रकमेत परत दिल्या. कारखाना कर्ज मुक्तीचा आनंद दिवस म्हणून साजरा केला आणि घरोघरी वाड्या वस्त्यावर प्रत्येक घरातल्या घटकाचे पोट भरेल एवढी जिलेबी त्यांच्या घरपोच केली. ऊस तोडणी मजूर, कामगार, ट्रक ड्रायव्हर यांच्या अंघोळ पाण्याची सोय केली. अशा कितीतरी गोष्टी क्रांतिवीर नागनाथअण्णांनी केल्या. त्याबद्दल अण्णा नेहमी म्हणायचे, "असा खर्च करुन कारखाने अडचणीत येत नाहीत साखर कारखाने अडचणीत का येतात त्याबद्दल ते क्रांतिसिंह नाना पाटलांच्या गोष्टीचे उदाहरण द्यायचे ते असे. विहिरीत पाणी आहे बैल मोट ओढतायत. पाणी मोटवानात पडतच शेतकरी रानात पाणी धरण्यासाठी थांबलाय पण शेतात पाणी कुठं येतय. असं का होतय म्हणून शेतकरी पाटातून मोटंपर्यंत गेला तर त्याला वहिरीतून येणारं सारं पाणी उंदरांच्या बिळात जातय. ती बीळं लिपली पाहिजेत पाणी पाजणारा शेतकरी हुशार होता. त्यानं पाटातली सारी उंदराची बीळं लिपली आणि मोट हाकण्याला सांगितली. मोट सुरू झाली. पाणी मोटवानात पडलं. सरळ पाटान धूम धडाक्यात रानात आलं. हुतात्मा कारखान्याचे संस्थापक क्रांतिवीर नागनाथअण्णा दुरदृष्टीचे असल्यामुळे सुरुवातीपासून त्यांनी अशी दक्षता घेतली होती की उंदरांचा कारखान्यात शिरकाव होऊ दिला नाही. त्यामुळे आजतागायत हुतात्मा कारखाना उत्तम चालला आहे आणि इथून पुढेही चालेल. शेतकऱ्यांनी, कामगारांनी चालकांनी क्रांतिवीर अण्णांचा विचार जोपासला पाहिजे. अण्णांनी पाडलेल्या वाटेने सर्व शेतकरी, कामगार, कार्यकर्ते, संचालक बोर्डाने जायला पाहिजे. तरच सर्व शक्य आहे.

क्रांतिवीर नागनाथअण्णांचा हुतात्मा साखर कारखाना काढण्यामागे शुद्ध हेतू होता. साखर कारखाना एक मोठी शक्ती आहे. तो पारदर्शकपणे चालविला तर यातून मिळणारे उत्पादन इतके अफाट आहे की, त्यातून सर्वांचा विकास करता

येईल. बेरोजगारांना रोजगार देता येईल. दीन दलितांच्या, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्तांच्या, कष्टकरी शेतकरी कामगारांच्या, भटक्या जमातींच्या या सर्वांचे संघटन बांधून त्यांच्या प्रश्नांना योग्य न्याय देता येईल.

क्रांतिवीर नागनाथअण्णांनी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना चांगला चालविला. शेतकऱ्यांच्या उसाला सर्वांत जास्त भाव दिला, कामगारांना ४० टक्के बोनस. शिवाय रिकव्हरी वाढ म्हणून २००० हजार रुपये बक्षीस, ऊस तोडणाऱ्या कामगारांना ऊस तोड मजुरी पेक्षा जादा रिकव्हरी म्हणून त्यांना मजुरीत वाढ दिली जात होती. अल्पशा कालावधीत कारखाना कर्ज मुक्त केला. अशा अनेक वैशिष्ट्यांमुळे देशाच्या नकाशावर हुतात्मा पॅटर्न म्हणून हुतात्मा कारखान्याचे नाव आले. या सर्व गोष्टी क्रांतिवीर अण्णांनी केल्या आणि त्यांनी महाराष्ट्रातील कारखान्यांच्या पुढे आदर्श ठेवला. हे जरी खरं असलं तरी अण्णांचे विचार हे मर्यादित नव्हते. हुतात्मा कारखान्याशिवाय महाराष्ट्रात जे इतर सहकारी साखर कारखाने आहेत ते पण शेतकऱ्यांचे, कामगारांचे, मजूराचे आहेत. तेही कारखाने हुतात्मा कारखान्याप्रमाणे आदर्श चालले पाहिजेत. यासाठी त्यांनी प्रयत्न करण्याचे मनोमन ठरवले होते. त्याची सुरुवात त्यांनी १९८९ साली निफाड जि.नाशिक येथील सहकारी साखर कारखान्यावर महाराष्ट्रातील तमाम साखर कारखाना कामगारांची दोन दिवसांची परिषद घेतली. त्यासाठी झालेल्या खर्चाचा सर्व भार हुतात्मा कारखान्याने उचलला. त्या परिषदेमध्ये क्रांतिवीर अण्णां कामगारांना म्हणाले, तुम्ही आज वेगवेगळ्या युनियनच्या झेंड्याखाली विखुरले आहात. यातून आपल्या मागण्यांना फारसा जोर राहत नाही. तेंव्हा सर्व कामगारांनी एकाच झेंड्याखाली येऊन आपल्या मागण्यांसाठी एकसंघ असा लढा दिला तर ती मोठी ताकद आहे. यातून सरकारला आपल्या मागण्या मान्य करणे भाग पडेल. सर्व कामगारांना अण्णांचे म्हणणे पटले होते. त्यांनी अण्णांच्या आवाहनाला टाळ्यांच्या गजराने दाद दिली. युनियनच्या पुढाऱ्यांनी आपले मत मांडताना महाराष्ट्रातील बऱ्याच साखर कारखान्यांत गैर कारभार व भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे निम्म्यापेक्षा जास्त कारखाने डबघाईला आलेत. तर काही बंद पडलेत. आणि चालू असलेल्या साखर कारखान्यात भ्रष्टाचाऱ्यांची लागण झालेली आहे. त्यांचीही गत तीच आहे.

साखर कारखाने चांगले चालावेत म्हणून महासंघाच्या वतीने नागनाथअण्णांचे महाराष्ट्रातील विशेषत: खानदेश, मराठवाडा, विदर्भ, सोलापूर या ठिकाणी त्यांचे दौरे आयोजित केले. शेतकऱ्यांचे, कामगारांचे प्रचंड मेळावे भरवले. भव्य परिषदा भरवल्या. त्यावेळी अण्णा आपल्या भाषणात म्हणाले, ''सुरुवातीला ज्या नेत

मंडळीनी शेतकऱ्यांना एकत्र करून साखर कारखान्याने काढले त्यामागे त्याचा शुद्ध हेतू होता. कष्टातून उभे केलेले कारखाने त्यांनी चांगले चालविले, चांगले चालतही होते. मग आज या कारखान्यांची परिस्थिती अशी का झाली याचा विचार आपण साऱ्यांनी केला पाहिजे. व त्यांना साथ करणाऱ्या भ्रष्टाचारी मंडळींना आणि कारखान्यातील त्यांचे सगेसोयरे पै पाहुणे, जावाई, मेव्हुणे या सर्वांना बाजूला काढून चांगल्या नि:स्वार्थी मंडळींनी कारखाना कामकाजात भाग घेतला पाहिजे. तरच ते कारखाने चांगले चालतील. त्या शिवाय साखर कारखान्याला येणाऱ्या उसाची तोड घासून केली पाहिजे. तुटलेला ऊस स्वच्छ व लवकरात लवकर गाळपासाठी कारखान्यावर आणला पाहिजे. कारखान्यातील लहान मोठ्या गळत्या थांबविल्या पाहिजे हे सर्व करण्याने साखर उतारा जास्तीत जास्त मिळतो. त्यातून शेतकऱ्यांच्या उसाला जास्त भाव देता येईल. कामगारांना चांगला बोनस देता येईल. भागाचा विकास करता येईल. बेकाराना काम देता येईल. अशा पद्धतीने क्रांतिवीर अण्णांनी कामगार संघटनेच्या साहाय्याने सारा मराठवाडा, खानदेश, विदर्भ, सोलापूर या भागांतील साखर कारखान्यांतील कामगार, शेतकऱ्यांच्यात जागृती केली. त्यावेळी मधू कात्रे, बी.आर.पाटील, आर.बी.शिंदे, माणिकराव जाधव, साहेबराव कुंवर सारखे साखर कामगार पुढारी अण्णांच्या दौऱ्याच्यावेळी हजर होते.

साखर कामगार युनियनचे कोषाध्यक्ष साहेबराव कुंवर म्हणाले, "अण्णांनी या भागात दौरे करून मनापासून मार्गदर्शन केले. शेतकरी, कामगार, संचालक बोर्ड यांनी अण्णांचे आनंदाने स्वागत केले. परंतु अण्णांनी पाट फिरविल्यावर संचालक मंडळ पुन्हा तेच करायला लागले. शेवटी व्हायचे तेच झाले. १९९१ नंतर उदारीकरणाचे धोरण आल्यानंतर धडाधड सहकारी साखर कारखाने बंद पडू लागले. कामगारांचे दोन दोन वर्षांचे पगार थकले. शेतकऱ्यांना बाहेरच्या साखर कारखान्यांवर अवलंबून राहण्याची वेळ आली. पुन्हा एकदा क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली बंद कारखाने सुरू करावेत अशी चळवळ सुरू केली. मा.दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या मराठवाड्यातील औरंगाबाद येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीवर महाराष्ट्रातील सर्व शेतकरी व साखर कामगारांचा प्रचंड मोर्चा नेण्यात आला. साखर कामगार महासंघाने बंद कारखाने सुरू करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक मंडळ मा. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन करावे. त्यासाठी एक हजार कोटी द्यावेत सुरू झालेल्या कारखान्यांनी ते नंतर हप्त्याने परत करावेत अशी योजना तयार करून महाराष्ट्र सरकारकडे दिली असता मा.मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी अण्णांना

शब्द दिला. ते म्हणाले, ''अण्णा, योजना चांगली आहे. मदत करायला काहीच हरकत नाही. विचार करू.''

पुढे आम्हांला काँग्रेसच्या जबाबदार लोकांच्याकडून बातमी समजली की, मा.नागनाथ अण्णा बंद कारखाने निश्चितपणे सुरू करतील. साखर कारखाने फायद्यात आणतील. पण त्या भागातला शेतकरी आम्हांला दारात उभा करणार नाही. असे राजकारण्यांनी सरकारला बजावले. कारखाने बंद राहिले तरी चालतील परंतु नागनाथअण्णांना चालवायला द्यायचे नाहीत. या पुढाऱ्यांच्या हेकेखोरपणामुळे ते बंद पडले आणि आता बंद कारखाने ज्यांनी बंद पाडलेत तेच लोक बँकेच्या थकीत कर्जांच्या नावाखाली कवडीमोल किमतीला विकत घेत आहेत. मालमत्ता माती मोल भावाने हडप करत आहेत. बरेच कारखाने कायमचे बंद झालेत कधीही सुरू न होण्यासाठी.

पुढे साहेबराव कुंवर म्हणतात, ''अण्णांच्या बरोबर मी मराठवाडा, विदर्भ, खानदेश भागात बंद साखर कारखाने सुरू व्हावेत म्हणून खूप दौरे केले. कोणत्याही कारखान्यात चुकूनही अण्णांनी सत्कार स्वीकारला नाही.'' ते म्हणायचे हे माझे कर्तव्य आहे. मला तुम्ही हारतुरे घालण्यापेक्षा मी सांगतो ते ऐका आणि त्याप्रमाणे तुमचे साखर कारखाने चालवा. माझा विश्वास आहे. साखर कारखाने चांगले चालतील. परंतु त्यावेळी महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्रातील धुरंधरांनी क्रांतिवीर नागनाथअण्णांचे लाख मोलाचे विचार ऐकले असते तर एकही साखर कारखाना बंद पडला नसता व आज कामगार देशोधडीला लागला नसता. शेतकऱ्यांच्यावर आत्महत्या करण्याची पाळी आली नसती. परंतु वेळ निघून गेली आहे. आणि आज आपल्यात क्रांतिवीर नागनाथअण्णा नाहीत.

क्रांतिवीर अण्णांचे कडून कारखान्याच्या माध्यमातून लोकांना चांगलाच न्याय मिळाला. त्यांनी सर्व शेतकऱ्यांना समानतेची वागणूक दिली. ज्या काही सवलती दिल्या त्या सर्वांचेसाठी होत्या प्रत्येक गोष्ट त्यांची अत्यंत विचारपुर्वक होती. त्यांनी हुतात्मा साखर कारखान्याचा व्यवहार अत्यंत स्वच्छ व पारदर्शक केला. ते म्हणायचे, ''गंमत म्हणून एकाद्यान शंभर रुपयाची नोट कशी जळतीया तिच्या जळण्याचा रंग कसा आहे हे बघण्यासाठी केलेलं कृत्य एक वेळ मी क्षम्य करीन पण  एका रुपयाची लांडी-लबाडी करुन भ्रष्टाचार केला तर त्याला घर गाठावं लागेल.'' असे ते अनेक वेळा जाहीर व कार्यकर्त्यांच्या बैठकीतही बोलत असत. प्रामाणिकपणे काम करणाऱ्याच्या पाठीवर शाब्बासकीची थाप मारायचे ज्याच्या त्याच्या कष्टाच माप त्यांच्याकडे असायचे. एकवेळ कामगार पुढारी श्री. बी.आर.पाटील,

शिंदे, मधू कात्रे हे अण्णांना भेटण्यास वाळवा येथे साखर शाळेत आले होते मी (जयवंत अहिर), पवार सर हजर होतो. विषयाने निरनिराळ्या विषयावर बोलता बोलता ते अण्णांना म्हणाले, ''अण्णा, तुंम्ही खुप त्रास घेऊन कारखाना काढलात, ऊसकरी शेतकऱ्यांना न्याय दिलात.'' त्यावेळी ते पवार सर व माझ्याकडे बोट करुन कामगार पुढाऱ्यांना म्हणाले, ''हुतात्मा कारखाना काढण्यात माझे कष्ट जास्त आहेत हे मला मान्य आहे. परंतु हे पण तुम्ही लक्षात घ्या कारखान्याच्या कामामध्ये जयवंत अहिर व वसंत पवार यांचेही मोठे योगदान आहे त्याच प्रमाणे कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी मनापासुन सहकार्य केले. हे तुम्ही लक्षात घेतल पाहिजे.'' असे अण्णांचे मन मोठे होते. ते क्रांतिवीर होते म्हणजे कोणत्याही गोष्टीत ते क्रांती करायचे. शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घ्यायचे म्हणून ते कधीच घेत नसत त्यांच्या विचारांचे ते वारस होते. त्यांचे विचार प्रत्यक्ष आचरणात आणत होते. हुतात्मा कारखान्याच्या अगोदर शंभरभर साखर कारखाने झाले परंतु कोणीही साखर कारखान्यांत बौद्ध मागासवर्गीय समाजातील चेअरमन केल नाही . पण नागनाथ अण्णांनी हुतात्मा साखर कारखान्यात श्री. महादेव शिवाप्पा कांबळे नावाच्या एका बौद्ध व्यक्तीस चेअरमन करुन क्रांती केली. जशी शाहू महाराजांनी एका कांबळे नावाच्या हरीजनाला चहाचे हॉटेल काढून दिले व त्या हॉटेलात स्वत: चहा घेऊन इतरांनाही चहा पाजत होते. अशा या महामानवाला आमचा क्रांतिकारक लाल सलाम,लाल सलाम.

क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या हयातीतच अण्णांचे चिरंजीव अरुण भैय्या नायकवडी यांनी कारखान्याच्या कामकाजात चांगलेच लक्ष घातले होते. त्यांची काम करण्याची क्षमता दांडगी होती. त्यांच्या कामात एक वेगळपण होते. त्यांनी हुतात्मा साखर कारखान्यात नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून कारखान्याची गाळप क्षमता वाढविली होती. परंतु दुर्दैव. त्यांना आयुष्य फार कमी मिळाले. अरुण भैय्या नंतर अण्णांचे धाकटे चिरंजीव वैभव काका नायकवडी यांनी कारखान्याच्या कामकाजात मनापासून लक्ष घालून प्रशासन उत्तम चालविले आहे. त्यांची निर्णय घेण्याची क्षमता चांगली आहे. हुतात्मा कारखान्यात त्यांनी नवीनच दोन प्रोजेक्ट करण्याचे ठरविले आहे. एक ताबडतोबीने डिस्टीलरी प्लॅन्ट उभा करणे आणि दुसरा को.जनरेशन. हे सर्व करत असताना त्यांनी अण्णांच्या विचाराप्रमाणे शेतकऱ्यांच्या ऊस दराची व कामगारांच्या बोनसची काळजी घेतली आहे.

साखर कारखाना प्रकरण एवढ्यावर संपत नाही आणखीन खूप काय आहे. त्यासाठी स्वतंत्र हुतात्मा पॅटर्न या नावान एक पुस्तिका लिहिण्याचा मानस आहे.

तरीही  हे प्रकरण संपवण्या अगोदर हुतात्मा साखर कारखाना कामात क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे मित्र श्री. पी.डी.गुणे साहेब यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी साखर पडेपर्यंत  आणि साखर पडल्यानंतरही  सर्व कामात निरपेक्ष भावनेने लक्ष घातले आहे. या गोष्टीचा आवर्जून उल्लेख केल्याशिवाय हुतात्मा साखर कारखाना प्रकरण पूर्ण होत नाही.



हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याच्या उभारणी कामाची पाहणी करत असताना **क्रांतिवीरअण्णा** व साखर संघ अध्यक्ष **मा.बाळासाहेब विखे-पाटील**



हुतात्मा किसन अहिर साखर कारखान्याच्या पहिल्या ऊस गाडीचे स्वागत व पूजन करताना **कॉ.दत्ता देशमुख**



**हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना**

# राजकीय क्षेत्र
# १९८५ ची निवडणूक

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची साखर पडल्यानंतर क्रांतिवीर नागनाथअण्णा गेटच्या बाहेर आले. त्यावेळी शेतकऱ्यांना त्यांनी सांगितले, 'माझे काम संपले आहे. कारखाना व्यवस्थित चालवण्याची जबाबदारी आता तुम्हा शेतकऱ्यांची आहे. गरज पडेल त्यावेळी मी आहेच. परंतु मला जे खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्याचे काम करायचे आहे. त्यातील ही सुरुवात असली तरी पुढे अजूनही खूप करायचे आहे. फार मोठा पल्ला गाठायचा आहे. त्यासाठी मी वाटचाल करणार आहे. त्यात विधान सभेची पंचवार्षीक निवडणुक तोंडावर आली आहे. त्याचा विचार मनात होता आणि त्याचवेळी योगायोगाने कॉ.दत्ता देशमुख वाळव्याला आले होते, त्यांनी अण्णांना विधान सभेच्या निवडणुकी बद्दल विचारले. ते म्हणाले, ''नागनाथ, विधान सभेच्या निवडणुका तोंडावर आल्यात. तुम्हांला निवडून येण्याबद्दल विश्वास आहे का?'' त्यावेळी अण्णांनी त्यांना सांगितलं,''आज पर्यंत जे काम आपण लोकांच्यासाठी केले ते जास्त समाधानकारक नसले तरी वाईट असं काहीच केलेलं नाही. त्यामुळे उजळ माथ्याने मी लोकांच्यापुढे मत मागण्यास जाऊ शकतो.'' अशी चर्चा अण्णांची व कॉ.दत्ता देशमुखांची झाली होती.

कॉ. दत्ता देशमुख पुन्हा आठवड्याने वाळव्याला आले एक दिवस मुक्कामाला थांबले त्यावेळी वाळवा व आसपासच्या गावांतील कार्यकर्ते, शेतकरी यांना कॉ.देशमुखांनी सांगितले, ''आम्ही नागनाथना येत्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी वाळवे तालुक्यातून उभा करायचे म्हणतोय. तुमचा या गोष्टीला पाठिंबा आहे का ?'' या कॉ.दत्ता देशमुखांच्या प्रस्तावास लोकांनी उत्साहाने क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या, क्रांतिसिंह नाना पाटलांच्या, हुतात्मा किसन अहिरांच्या, कॉ.दत्ता देशमुखांच्या नावाच्या

घोषणा दिल्या आणि एकमुखी सर्वांचा पाठिंबा असल्याचे जाहीर केले.

पंधरा तीन आठवड्यांत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला. आचारसंहिता लागू झाल्यानंतर क्रांतिवीर अण्णांनी आपला कारखान्याच्या साखर शाळेतला मुक्काम हलवला आणि नेहमीच्या हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या मुक्कामाच्या ठिकाणी आले. त्यांनी कारखान्यातील वाहन व गेस्टहाऊसचा वापर कार्यकर्त्यांनी अजिबात करायचा नाही अशी त्यांना ताकीद देण्यात आली. दोन दिवसात पाच एक हजार शेतकऱ्यांच्या उपस्थितीत क्रांतिवीर नागनाथअण्णांचा अर्ज भरला. निवडणूक चिन्ह म्हणून त्यांनी सिंहाचे चिन्ह घेतले.

निवडणुकीचा प्रचार सुरू झाला, क्रांतिवीर अण्णा अपक्ष म्हणून निवडणूक लढवत होते आणि काँग्रेस मधून विलासराव शिंदे निवडणूक लढवत होते. तसा निवडणुकीचा स्टंट होता तो काँग्रेसचे उमेदवार विलासराव शिंदे आणि क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्यामध्ये.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचा अण्णांनी पारदर्शक चालवलेल्या कारभाराची पार्श्वभूमी, शेतकऱ्यांना जास्ती दर देण्याचा पडलेला पायंडा, कामगारांना जास्तीत जास्त दिलेला बोनस, कष्टकरी शेतकरी व शेतमजुरांच्यासाठी दिलेले योगदान आणि १९४२ च्या स्वातंत्र लढ्यात देश स्वतंत्र्यासाठी इंग्रजांच्या बरोबर केलेला संघर्ष. या साऱ्या कामाच्या बेरजेने अण्णांच्या बाजूला पुरते लोकमताचे पारडे झुकू लागले. त्यात काँग्रेस मधल्या जुन्या मंडळींना वाटायला लागेल किती केले तर अण्णा तसे जुने काँग्रेसवालेच आहेत म्हणून स्वातंत्र्य सैनिकांनीही जाहीर पत्रक काढून अण्णांना पाठिंबा जाहीर केला. त्याच प्रमाणे सांगलीचे नेते वसंतदादा म्हणायचे, ''नागनाथ १९४२ च्या लढ्यातील माझे सहकारी आहेत ते वाळवे तालुक्यातून अपक्ष उमेदवार म्हणून विधान सभेची निवडणुक लढवित आहेत.'' येवढं दादांच्या बोलन्याने जुन्या कार्यकर्त्यांनी ओळखायचं ते ओळखले.

विशेष बाब क्रांतिवीर अण्णांचे जुने मित्र परंतु सध्या काँग्रेस पक्षातील प्रमुख असलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी अण्णांना उघड पाठिंबा दिला. त्याप्रमाणे पत्रक काढले, गावोगावी प्रचारासाठी अण्णांच्या बरोबर जाहीर सभेतून, प्रचार करत होते. तेही स्वतः म्हणायचे नागनाथअण्णा आमचे जुने काँग्रेसवाले आहेत ते निवडणूक अपक्ष म्हणून लढवतात. अशा पद्धतीने जुन्या नव्या काँग्रेसच्या मंडळींनी अण्णांची १९८५ ची निवडणूक अत्यंत दक्षतेने लढवली होती. त्यांचाही विजयात मोठा सहभाग आहे.

एकंदरीत साऱ्या तालुक्यातील जनतेने अण्णांना निवडून द्यायचे ठरवले होते शिवाय निवडणुकीतील विशेष व आकर्षक बाब म्हणजे उत्साही कार्यकर्त्यांनी निवडणुकीचे चिन्ह सिंह होते. म्हणून त्यांनी जिवंत सिंह मतदार संघात फिरवला. या

साऱ्या गोष्टींचा परिणाम व्हायचा तो झाला आणि क्रांतिवीर नागनाथअण्णा भरघोस मतांनी विजयी झाले. १९५७ नंतर २८ वर्षांनी निवडणुकीला अण्णा उभा होते तरी पुर्वी प्रमाणेच जनतेने भरघोस मते दिली.

क्रांतिवीर नागनाथअण्णा निवडून आले. अण्णा हे एक वेगळं रसायन होतं की, त्यांच्या अंगी विशेष अशी शक्ती होती. मनाचा खंबीरपणा होता. ज्या पद्धतीने ते विजय पचवत होते तितक्याच जिद्दीने पराजयही पचवत होते. त्यांच्या चेहऱ्यावर विजयाचा कसलाही फरक दिसत नव्हता. निवडणुकीच्या निकालानंतर लगेच त्यांनी शेतमजूर, कष्टकरी शेतकऱ्यांचा जो महागाईचा, बेकारीचा, मुला-मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर होता तो हातात घेतला. पुढे मागासलेल्या शिराळा पेट्यातल्या डोंगर दऱ्यात रहाणाऱ्या लोकांचे प्रश्न हाती घेतले. तसे अण्णा फारविचार पूर्वक एका एका प्रश्नाला हात घालत होते. त्यासाठी जनरेट्याने सरकारवर दबाव आणण्याचा सातत्याने विचार नागनाथअण्णांना करावा लागत होता. त्यासाठी त्यांनी २६ मे १९८५ रोजी ऐतवडे बुद्रुक ता.वाळवा जि.सांगली कर्मवीर भाऊराव पाटलांच्या कर्मभूमीत शेतमजूर, कष्टकरी, शेतकऱ्यांची भव्य अशी परिषद घेतली, त्यावेळी त्यांनी कष्टकरी बहुजनांना एकत्र येण्याचे आवाहन केलं. त्या परिषदेला पन्नास एक हजार शेतकऱ्यांनी हजेरी लावली. क्रांतिवीर नागनाथअण्णा, क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, हुतात्मा किसन अहिर या थोर मंडळींच्या घोषणांच्या निनादात कष्टकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या मागणीचे ठराव मांडले, ते एकमताने पास झाले. पुढे ते सरकारला पाठवून देण्याची जबाबदारी प्रमुख कार्यकर्त्यांच्यावर सोपवून अण्णांनी परिषदेचे काम संपल्याचे जाहीर केले. ही परिषद क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली संघटित करण्याचे काम डॉ.भारत पाटणकर, कॉ.नाना शेटे, डॉ.बाबूराव गुरव, धनाजी गुरव, भारत पाटील वगैरे प्रमुख कार्यकर्त्यांनी केले. यासाठी आनंदाने रसद पुरवठा करण्याचे काम हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे सर्व सभासद व कामगार मंडळी क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून करत होती. ह्या सर्वांना बरोबर घेऊन अण्णा न थकता, न दमता आपले ध्येय गाठण्यासाठी अहोरात्र झटत होते आणि त्यासाठी ते जिवंत हुतात्म्यांचे जीवन जगत होते.

'आकाशात घार फिरते पण तिचे लक्ष आपल्या पिलांपाशी असते,' सतत ती आपल्या पिलांच्या मदतीला धाऊन येते, त्या प्रमाणे क्रांतिवीर नागनाथअण्णा अनेक कामांत असले तरी जिथे जिथे कष्टकऱ्यांच्यावर अन्याय होतो, तिथं तिथे ते न बोलवता विना आमंत्रणाचे आपले कर्तव्य म्हणून जात होते. चांदोली का ? खुजगाव या वादाचा शेवट लागून चांदोली येथे वारणेवर ३५ टी.एम.सी.चे धरण बांधण्याचा निर्णय झाला, धरणाचे काम सुरू झाले परंतु त्या धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी ज्या सोई सरकारने द्यायला हव्या होत्या, त्या त्यांनी न देता लोकांना झुलवत ठेवले होते. धरणाच्या

कामाकडे जाऊन यावे व तिथल्या धरणग्रस्त जनतेला भेटून यावे म्हणून कॉ.दत्ता देशमुखांना घेऊन अण्णा चांदोलीकडे गेले होते. साधारण साल १९८६ होते. तिथे त्यांना धरणाच्या कामाची गती दिसली खरी पण ज्या जनतेची घरं, शेतीवाडी ज्या धरणाखाली बुडणार होती त्यांनी राष्ट्रीय विचार करून धरणाला पाठिंबा दिला. आपल्या सर्वस्वाचा त्याग केला, त्यांच्याबद्दल सरकारचे धोरण बरोबर नाही हे क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या लक्षात आले. त्याच वेळी त्या जागेवरच जेवढे धरणग्रस्त हजर होते त्यांच्या समोर कॉ.दत्ता देशमुखांना सांगितले, "वारणा धरणग्रस्तांची संघटना आपण स्थापन करू या तुम्ही ह्या संघटनेचे अध्यक्ष आणि कॉ.नाना शेटे, डॉ.भारत पाटणकर, डॉ.बाबूराव गुरव ही मंडळी त्यात आघाडीवर काम करतील आणि ह्या वारणा धरणग्रस्तांचेच काय संपूर्ण महाराष्ट्रभर जिथं जिथं लहान मोठे धरणाचे बांधकाम चालू आहे तिथल्या सर्व धरणग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण शेवटपर्यंत लढूच त्यासाठी ह्या पीडितांची संघटना बांधण्यासाठी जे अर्थसाहाय्य असो, वहानाची सोय असो, त्याची व्यवस्था हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना करेल" असे जाहीरपणे साऱ्या धरणग्रस्तांना अण्णांनी आश्वासन दिले. कॉ.दत्ता देशमुखांनी अध्यक्षपद स्वीकारले आणि ज्या ज्या वेळी मला वारणा धरणग्रस्तांच्या प्रश्नासाठी बोलवाल त्या त्या वेळी मी हजर राहीन असे आश्वासन दिले. क्रांतिवीर अण्णांनी आपला शब्द पाळला, तसा शब्द कॉ.दत्ता देशमुखांनीही पाळला होता.



१९८५ च्या निवडणुक प्रचारावेळी
**क्रांतिवीर नागनाथअण्णा** कार्यकर्त्यांसह

# हुतात्मा नानकसिंग स्मारक

क्रांतिवीर नागनाथ अण्णा रात्री झोपले, सकाळी जागे झाले की कामाला सुरुवात. रात्री कधी आले, कधी जेवले, कधी झोपले याची पर्वा करत नसत. परंतु नेहमी ते पहाटे ४-५ च्या मध्यावर उठायचे. सकाळी सहा वाजेपर्यंत आपले आंघोळ पाणी उरकून तयार असायचे. नेहमीप्रमाणे दिवस उगवता उगवता जेवणाचे ताट घरून शिपाई घेऊन येत असे. लगेच ते जेवायला बसायचे. सर्वांच्या अगोदर आपला वैयक्तिक दैनंदिनाचा कार्यक्रम ते उरकून तयार असायचे. जो कार्यकर्ता वेळेवर येईल त्याला बरोबर घेऊन कामाला लागायचे. नुकत्याच मे मध्ये विधान सभेच्या निवडणुका संपल्या. त्यातून कार्यकर्त्यांना उसंत मिळतोय नाही मिळतोय तोपर्यंत पुढच्या कामाची जोडणी चालूच असायची. सारा मास्टर प्लॅन कागदावर नव्हता, तो त्यांच्या डोक्यात फिट होता. सारंच एकदम काम कार्यकर्त्यांना सांगितलं तर त्यांचा उत्साह टिकणार नाही म्हणून ते एक काम संपलं की पुन्हा हळूवार दुसरं काम जोडायचे. तसे क्रांतिवीर अण्णा पूर्णपणे आम्हांला कुणाला कळलेच नाहीत. जे कळले ते आम्हांला हिमालयसारखे विचार मोठे असणारे आणि आकाशा एवढं मन असणारे, तत्त्वाने जाणारे, संयमी अगदी एखाद्या सतीसारखं आपलं सारं जीवन पवित्र ठेवलं. त्यातून त्यांच्या भोवती असं एक वलय तयार होतं होत की त्यांच्या सहवासात आलेला प्रत्येक माणूस त्यांचाच व्हायचा. त्यांना आम्ही जवळचे कार्यकर्ते देव म्हणत नव्हतो किंवा त्यांना देव करत नव्हतो पण ते महामानव होते. तसेच बहिणाबाई चौधरी यांनी त्यांच्या काव्यात म्हटले आहे, 'अरे माणसा माणसा कधी होशील माणूस' बहिणाबाईंच्या म्हणण्याप्रमाणे क्रांतिवीर नागनाथ

अण्णा आपले पूर्ण जीवन माणूस म्हणून जगले. त्यांना कळायला लागल्यापासून त्यांनी आयुष्यभर चांगलेच काम केले. त्यातून त्यांचा आत्मविश्वास व मानसिकता जबरदस्त होती. त्यांच्या मनाची आणि शरीराची ताकद इतरांच्या पेक्षा वेगळी होती. त्यांच्या वागण्यात एक वेगळपण होतं. का कोणास ठावे आणि कसे त्यांना धोक्याचे संकेत अगोदर मिळत होते. त्यामुळे ते अनेक वेळा जीवावर बेतलेल्या संकटातून स्वत: वाचलेच होते आणि शिवाय त्यांनी आपल्या सहकाऱ्यांनाही ही वाचवले होते. अशा या क्रांतिवीर नागनाथअण्णांचा जिथं जिथं वावर असायचा तिथलं वातावरणात एक वेगळंपण जाणवायचं. मी (जयवंत अहिर) गेली ३० ते ३५ वर्षे सातत्याने त्यांच्या सहवासात आहे. माझा अनुभव म्हणला तर माझी आई ८५ वर्षांची होती. माझे घर शाळेच्या बरोबर पाठीमागे आहे. क्रांतिवीर नागनाथ अण्णा शाळेत असताना मी घरी जेवायला गेलो होतो. माझी आई पाठीमागच्या दारात धान्य निवडत बसली होती मला विचारले, ''अरं जयवंत, अण्णा शाळेत आहे वाटतं ?'' मी तिला म्हणालो, ''आई, अण्णांना तू बघितलस काय?'' त्यावर ती म्हणायची, ''मी त्यांना बघितलं नाही.'' ''मग अण्णा शाळेत असल्याचे तुला कोणी सांगितलं काय?'' ती म्हणायची, ''मला कुणीच सांगितलं नाही आणि सांगितलं असतं तर तुला विचारलं असतं का?'' ''मग आई तुला अण्णा शाळेत आहेत असं कशावरून वाटत?'' '' हे बघ जयवंता, शाळेकडं बघितलं की मला कळतं अण्णा शाळेत आहेत. खात्री करावी म्हणून तुला विचारलं. यावरून तू काय समजायच ते समज. माझ्या मनाला मात्र अण्णा शाळेत असले की एक वेगळी जाणीव होते. अर बाबा जयवंता, शाळची भीताडं आणि झाडं सांगत्यात अण्णा शाळेत आहेत का नाहीत ते.''

जून १९८५ साल होतं. अण्णांनी पूर्वी कधी ठरवलं होतं माहीत नाही. ते अचानक आम्हा सर्वांना (वसंत पवार, जयवंत अहिर, दत्ता शेळके, तुकाराम नाना खोत, शामराव अप्पा वगैरे) दोन गाड्या करून चांदोलीकडे निघाले चांदोली धरण चार एक किलोमीटर असावं मध्येच सोनवडे आणि मणदूरच्या साधारण मध्यावर एका ओढ्याच्या काठावर त्यांनी सर्वांना थांबवले आणि रस्ता क्रॉस करून उत्तर दिशेला रस्त्यापासून १०० एक मीटरवर हुतात्मा किसन अहिर यांच्या पादुका एका चौकोनी दगडावर कोरलेल्या होत्या त्या ठिकाणाजवळ अण्णा थांबले. तुकारा खोत (वस्ताद) पडवळवाडी, शामराव अप्पा (जुनेखेड) शिवाय स्थानिक जमलेले शेतकरी. या सर्वांना अण्णा म्हणाले, ''ही जागा, इथली ही माती हुतात्म्यांच्या रक्ताने पवित्र झालेली आहे हे तुम्हाला माहीत आहे. वस्ताद तुम्हांला आणि शामराव अप्पाला २५ फेब्रुवारी १९४६


चा दिवस आठवला तर इथलं तुम्हांला सारं दिसलं. आज ही जागा हुतात्म्याच्या बलीदानाचं प्रतीक आहे. माझं फार दिवसांचं स्वप्न आहे. ही जागा खुजगावला धरण झालं असतं तर पाण्यात बुडली असती. परंतु चांदोलीला धरण झाल्यामुळं ही वाचली. तशीच दुसरी एक गोष्ट या जागेवर वारणा धरणाची कॉलनी होणार होती. ज्या कॉन्ट्रॅक्टरने कॉलनी बांधण्याचे काम घेतलं. योगा योग बघा तो कॉन्ट्रॅक्टर देवभोळा होता. त्यानं चांगला मुहूर्त बघून कामाला सुरुवात केली आणि पाया काढायला सुरुवात केली. पाया काढत असताना जमिनीच्या पोटात दगडाचे थर होते. ते काढत असताना त्यातून साप निघाले. म्हणून त्याने दुसरीकडे पाया काढायचे काम चालू केले. तरी तिथंही तीच परिस्थिती. शेवटी त्या कॉन्ट्रॅक्टरने संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले. मी या जागेवर कॉलनीचं काम करणार नाही. एक तर मला दुसरी जागा दाखवा नाहीतर दुसरा कॉन्ट्रॅक्टर नेमा. तसा तो कॉन्ट्रॅक्टर नावाजलेला, नेकीने चांगलं काम करणारा असल्यामुळं अधिकाऱ्यांनी त्याला बदलण्यापेक्षा जागाच बदलली आणि सध्या ज्या जागेवर कॉलनी उभी आहे ती जागा त्यांना दाखवली. मला तुम्हांला सांगायचं आहे. त्या कॉन्ट्रॅक्टरची गोष्ट खरी खोटी मला माहीत नाही पण हुतात्म्यांच्या रक्तानं पावन झालेली ही भूमी या जागेचे साक्षीदार माझ्या आणि तुमच्या सारख्या असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांची वाट बघत आहे.''

पुढे क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणाले,''अरे जया, पवारसर, दत्ता मला तुमच्या लक्षात एक गोष्ट आणून द्यायची आहे. ज्या हुतात्म्यांच्या रक्तानं पवित्र झालेली ही माती सर्व संकटांतून वाचली आहे. २५ फेब्रुवारी १९४६ ला हुतात्मा किसन अहिर व नानकसिंग यांना शहिद होऊन जवळ जवळ ४० वर्षे होत आली. त्यावेळेपासून माझ्या मनात पुढं मागं आपण इथं हुतात्मा किसन अहिर व हुतात्मा नानकसिंग यांची आठवण म्हणून जीवंत स्मारकं करायची. ती नुसती स्मारके नकोत तर ती लोक उपयोगी पाहिजेत हे ठरवलं होतं. त्याचा योगायोग आज आला म्हणून मी तुम्हा साऱ्यांना इथं घेऊन आलो आहे. हा दुर्गम डोंगराळ भाग आहे. इथल्या शेतकऱ्यांच्या मुलांच्यासाठी आपण टेक्नीकल, ॲग्रिकल्चर, सायन्स, आर्ट अशा विविध अंगांचे असे बहुउद्देशीय हुतात्मा नानकसिंगांच्या नावाने वाळव्या सारखे मल्टिपर्पज स्कूल येत्या जून १९८५ पासून सुरू करायचे आणि हुतात्मा किसन अहिर यांच्या नावाने मुलांचे मोफत वसतिगृह चालू करायचे. सध्या ही जागा आपल्या ताब्यात नसली तरी सोनवड्यांच्या व काळोकीवाडीच्या शेतकऱ्यांच्या मालकीची ही जमीन आहेत. त्यांच्या बरोबर या पूर्वीच मी चर्चा केली आहे. त्याप्रमाणे ५० एकर जमीन(ही पूर्ण टेकडी)एक हजार

रुपयाला एकरा प्रमाणे खरेदी करू. येथील इमारत हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या साहाय्याने बांधेपर्यंत तूर्त शाळा सोनवडे गावात सुरू करू.''

चार एक दिवसांत परत अण्णा सोनवडे गावात आले. सर्व शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांनी त्यांना (शेतकऱ्यांना) सांगितले आणि नियमाप्रमाणे ५० एकरांचे करार करून घेण्यासाठी दत्ता शेळके(दादा)यांना सांगितले. पवार सर व मला(जयवंत अहिर), तुकाराम नाना खोत, शामराव अप्पा यांना सोबत मदत करण्यास सांगून अण्णा धरणग्रस्तांच्या मीटिंगसाठी पुढे गेले.

हुतात्मानगरला ५० एकर जमीन घेण्याचे अण्णांचे स्वप्न साकार झाले. पुढे त्या टेकडीचा माथा प्लेन करून घेतला. त्या माथ्यावर शाळेची मेन बिल्डिंग, मुलांना खेळण्यास ग्राउंड आणि राहिलेल्या चढ उतारावर पाच हजार नारळ आणि पाच हजार आंब्यांची झाडे लावली. यदा कदाचित पुढे मागे सरकारने शाळेस ग्रॅन्ड देण्याचे बंद केले किंवा अन्य कारणाने शाळेचा आर्थिक सोर्स थांबला तरी ही शाळा झाडांच्या उत्पादनातून चालावी हा उद्देश त्या पाठीमागचा अण्णांचा आहे. आज ह्या जागेवर पाच हजार नारळ व पाच हजार आंब्यांची झाडे उभी आहेत. त्यापासून चांगले उत्पन्न मिळायला सुरुवात झाली आहे. शिवाय काजू, जांभळ, फणस, दालचिनी, मिरी इ. औषध झाडेही खूप आहेत.



हुतात्मा नानकसिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हुतात्मानगर,(सोनवडे)

# वारणा धरणग्रस्त

वारणा धरणाच्या प्रकल्पासाठी १९६७ साली प्रशासकीय मान्यता मिळाली होती. मूळ धरणाचे नियोजन शिराळा तालुक्यातील खुजगाव येथे होते. त्या धरणात ८७.१२ टीएमसी पाणी साठा होणार होता. त्या धरणातील उपयुक्त पाणी ३५.१२ टीएमसी तर मृत पाणी साठा ५१.९५ टीएमसी होता. एकूण ९९ हजार १०० हेक्टर क्षेत्राला पाणी द्यायचे नियोजन होते. परंतु सांगली जिल्ह्यातील २० आणि कोल्हापूर जिल्ह्यातील १७ गावे पाण्याखाली जाणार होती. खुजगाव येथील धरणग्रस्तांला शेतकऱ्यांनी जोरदार विरोध केला. तसे शेतकऱ्यांचे म्हणणेही बरोबर होते. त्यातुन खुजगावच्या ऐवजी चांदोली येथे धरण व्हावे ही मागणी पुढे आली. खुजगाव येथे धरण होण्यामुळे पाण्याचा मृत साठा जास्त रहाणार होता. शिवाय सांगली, कोल्हापूर मिळून २०+१७ असे ३७ गावांचे विस्थापन करणेही काम मोठे अवघड होते. चांदोलीला धरण होण्याने उपयुक्त पाणीसाठा खुजगाव येवढाच जवळजवळ होणार होता. शिवाय विस्थापित कमी गावाचे करावे लागणार होते.

खुजगाव धरणस्थळाची जागा बदलून ती जागा चांदोली येथे घेण्यात आली. १९७६ ला त्याचा निर्णय झाला. ह्या बदलामुळे थोडासा पाणीसाठा कमी झाला. साहजिकच त्यामुळे भिजणारे क्षेत्रही थोडे कमी झाले. चांदोली धरणात साठा ३४.४० टीएमसी. त्या पैकी उपयुक्त २७.५२ आणि मृत पाणीसाठा ६.८८ टीएमसी आहे. खुजगाव चांदोली वादात बराच काळ गेला. त्यामुळे प्रकल्प खर्चही वाढला. धरणाचे काम पूर्ण व्हायलाही बराच वेळ झाला. १९६७ ला प्रकल्पाची किंमत ३१.६४ कोटी. पुढे १९७६ ला सुधारित खर्च, ८१.९७ कोटी पर्यंत आणि १९८६ ला २८८.४७ कोटिवर

सुधारित मान्यता दिली तसे काम फार रखडले होते. त्यामुळे धरण प्रकल्प खर्च भरमसाठ वाढला होता. शेवटी २०११ ला शासनाने तिसरी सुधारित मान्यता २१४९.९५ कोटिची दिली. सतत वाढता खर्च, प्रकल्प पूर्ण होणं, पोट कालवे पूर्ण होणं, जे काम झालं त्याचा दर्जा काय? कॅनॉलची अवस्था काय? कॅनॉलमध्ये सोडलेले पाणी शेतात जातय का? शिवाय ज्या धरणग्रस्तांनी आपली घरंदारं सोडली त्यांच्या विस्थापनाचे काय? असे सारे प्रश्न वारणा प्रकल्पाचे ऐरणीवर आहेत. हे सारे प्रश्न सोडवण्यासाठी कॉ.दत्ता देशमुख, क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, डॉ.भारत पाटणकर, कॉ.नाना शेटे या मंडळींनी आपली हयात घालवली.

मला चांगलं आठवतय. वारणा धरणाचे काम सुरू असताना कॉ.दत्ता देशमुख व क्रांतिवीर नागनाथअण्णा, कॉ.नाना शेटे यांच्या बरोबर मी(जयवंत अहिर)एम.एच.एम. ६८२६ अॅम्ब्यासिटर गाडीचे ड्रायव्हिंग करत होतो. धरणाचे काम तसे गतीने चालले होते. पाण्याखाली बुडणाऱ्या गावांचे पुनर्वसन ज्या गावांत करायचे होते त्या सूचना गावोगाव कळवल्या होत्या. परंतु गावकरी उदास होते. त्यांच्या मनाची कालवा कालव झाली होती. पिढ्यान् पिढ्या ज्या गावांत आपण राहिलो, इथल्या डोंगर कपारिंशी, दगड मातीशी, पशुपक्ष्यांशी असणारे घट्ट नाते तोडून कायमचे गाव सोडून सरकार जिथं टाकल त्या उघड्या बोडक्या माळावर जाऊन रहायचे. ही धरणग्रस्तांच्या मनाची अवस्था आम्हा साऱ्या जणांना त्याची जाणीव झाली होती. क्रांतिवीर नागनाथअण्णा, कॉ.दत्तांना म्हणाले, ''अहो दत्ता, ही माणसं सरळ, भोळी भाबडी, डोंगर कपारीत रहाणारी. मला यांचा १९४२ पासूनचा अनुभव आहे. दुसऱ्यांसाठी, देशासाठी त्याग करणारी ही जनता आहे. म्हणून त्यांनी आपली गावं सोडण्याची तयारी दाखवली तशी त्यांनी आपल्या सामानाची बांधाबांधही केली आहे. आपली साऱ्यांची जबाबदारी आहे त्यांचे पुनर्वसन योग्य पद्धतीने वेळेवर झाले पाहिजे. तसं पाहिलं तर देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या घरादारांवर तुळशीपत्र ठेवून देश स्वातंत्र्य करण्यासाठी त्याग केला, त्या प्रमाणं या धरणग्रस्तांचा त्याग आहे. तेव्हा त्यांनाही स्वातंत्र्यसैनिकां प्रमाणे पेन्शन आणि इतर नोकरीच्या, शिक्षणाच्या सवलती सरकारने दिल्या पाहिजेत.'' त्या दिवशी आम्ही सर्वजण पाण्याखाली बुडणाऱ्या शेवटच्या गावापर्यंत पेटलोन पर्यंत जाऊन आलो. प्रत्येक ठिकाणचे चित्र बघून क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या, कॉ.दत्ता देशमुखांच्यासह सर्व कार्यकर्त्यांच्या मनाला यातना होत होत्या. त्या लोकांना सोडून मागं फिरायला आमचे मन तयार नव्हते. आम्ही सर्वजण दु:खी मनानं वाळव्याला आलो. दुसऱ्या दिवशी प्रमुख कार्यकर्त्यांची मीटिंग घेऊन धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या कामात लक्ष घालण्याचा क्रांतिवीर अण्णा व कॉ.दत्ता देशमुख सह सर्व कार्यकर्त्यांनी निर्धार केला.

धरणात पाणी आडवण्याअगोदर १९८५ साली पाण्याखाली बुडणाऱ्या त्या गावांना हालवायला सुरुवात केली. वाळव्यातही काही गावांचे लोक आणून सोडले होते. त्याप्रमाणे अनेक गावांत धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी आणून मोकळ्या माळावर सोडले होते. त्या प्रमाणे वडगावच्या माळावरही धरणग्रस्तांना सोडले होते. साधे शेड उभा करून लोकांनी बायका पोरांसाठी निवारा केला होता. परंतु अचानक वळवाचा पाऊस इतका तुफान पडला त्यात निवाऱ्यासाठी उभा केलेली शेड म्हणा, खोपटं टिकाव धरू शकली नाहीत. त्यात वडगाव मध्ये पुनर्वसन झालेल्या धरणग्रस्तांपैकी एक बाकी आडलेली होती. ती बाळंत झाली. तिचे मूल पावसाच्या पाण्यात वाहून गेले अशी बातमी वाळव्यात आली. क्रांतिवीर अण्णा पेपर वाचत बसले होते. त्यांनी मला हाक मारली, "अरे जया, महेश ड्रायव्हर कुठे आहे ? त्याला बोलव, पवार सरांना बोलव, आपणा ताबडतोब वडगावला जायचे आहे. रात्री वळवाचा पाऊस जोरात पडलाय. धरणग्रस्तांची फार दैना झाली आहे. चला आपणाला शक्य आहे तेवढी त्यांना मदत करु" आम्ही वडगावला गेलो. धरणग्रस्तांचे फार हाल झाले होते. बायका मूल, जनावरांना पावसाचा फार मोठा तडाका बसला होता. पाण्यात मूल वाहून गेले हे खरं नव्हतं पण बाळाला आणि बाळाच्या आईला पावसाची झळ सोसावी लागली होती ही बातमी खरी होती.

१९८५ साली त्याच दिवशी क्रांतिवीर नागनाथअण्णांनी धरणग्रस्तांच्या भल्यासाठी त्यांच्या पुनर्वसनासाठी संघटना बांधायचा निर्णय घेतला आणि सरकारने पाण्यात बुडणाऱ्या गावांना,धरणग्रस्तांना, त्यांच्या कसल्याही सोईचा विचार न करता माळरानावर आणून सोडले होते. तिथं तिथं अण्णा आपले कार्यकर्ते कॉ.नाना शेटे, डॉ.भारत पाटणकर, डॉ.बाबूराव गुरव व काही धरणग्रस्तांतले म्होरके घेऊन धरणग्रस्तांना भेटी दिल्या. त्या सर्वांना वाळव्याला बोलवले. हुतात्मा किसन अहिर यांच्या पुतळ्या समोर मीटिंग घेतली आणि त्याच दिवशी जाहीर केले. शेतमजूर, कष्टकरी, शेतकऱ्यांच्या माध्यमातून वारणा धरणग्रस्तांची संघटना बांधण्याचा निर्णय घेतला. अध्यक्ष म्हणून कॉ.दत्ता देशमुखांची निवड केली. सेक्रेटरी कॉ.नाना शेटे, चिटणीस म्हणून डॉ.बाबा आढाव यांची निवड करण्यात आली. वारणा धरणग्रस्तांतील शेवटच्या माणसाचे पुनर्वसन होईपर्यंत सर्वांनी काम करायचा निर्धार केला. संघटना बांधण्याच्या कामासाठी हुतात्मा साखर कारखान्याच्या वतीने शेतकऱ्यांनी आर्थिक मदतीचा हात धरणग्रस्तांना देण्याचा निर्णय एक मताने घेतला.

चांदोली धरणाचे काम तसे पूर्ण होत आले असले तरी ४५ वर्षांचा कालावधी लोटला तरी जवळ जवळ १५४५.७७ कोटींची कामं बाकी होती. निधीसाठी थांबली होती.

चांदोली धरणाचे काम पूर्ण होत आले असले तरी प्रकल्पाचे आराखड्यानुसार काम करायचे झाल्यास अजून १५४५.७७ कोटींची गरज होती. तो निधी मिळवण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर होते. जवळ जवळ ४५ वर्षांचा कालावधी लोटला. त्या मुळे प्रकल्पाला विलंब झाल्यामुळे खर्चातही १२००.१९ कोटींने वाढ झाली. निधी अभावी बऱ्याच वेळा पुनर्वसनाची व कालव्याची कामे रखडायची. यासाठी वारणा धरणग्रस्त संघटने मार्फत कॉ.दत्ता देशमुख व क्रांतिवीर नागनाथअण्णा यांच्या पुढाकाराने मोर्चे, घेराव जिल्हाकार्यालयच्या समोर ठिय्या देऊन बसणे अशा अनेक मार्गाने धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्नांची पराकाष्ट अण्णांच्यासह कार्यकर्ते धरणग्रस्त करत होते. काही वेळा आश्वासन मिळायचे. काही वेळा थोडे फार पदरात पडायचे. परंतु यावर क्रांतिवीर अण्णांना समाधान नसायचे. ते म्हणायचे, ''पूर्णपणे शेवटच्या माणसापर्यंत त्याच्या हक्काप्रमाणे धरणग्रस्तांना न्याय मिळालाच पाहिजे.''

कॉ.दत्ता देशमुखांच्या जाण्यानं वारणा धरणग्रस्त संघटनेच्या अध्यक्ष पदासाठी क्रांतिवीर नागनाथअण्णांची निवड एकमुखे धरणग्रस्तांनी केली. परंतु अण्णा हे पदासाठी काम करणाऱ्यापैकी नव्हते. कोणतेही काम मनावर घेतले की मग ते शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे असो, दुष्काळग्रस्तांचे, पाणी संघर्ष चळवळीचे असो नाहीतर स्त्रियांच्या प्रश्नांचे असो, दलित आदिवासी जनतेचे असो नाहीतर धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे असो. ते पूर्णपणे त्यात स्वत:ला झोकून देत असत व त्या कामाचा शेवट लावत असत. क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या पत्नी सौ.कुसुमताई नायकवडी(माई)यापण धरणग्रस्तांच्या मागणीसाठी सांगली, कोल्हापूर कलेक्टर कचेरीवरील ठिय्या आंदोलनात आघाडीवर असायच्या. त्या म्हणायच्या, ''धरणग्रस्तांनी आपलं सर्वस्व गमावलं आहे. राष्ट्रासाठी त्याग केला. गेली १८ वर्षापेक्षाही जास्त काळ झाला. त्यांचा लढा चालू आहे. तरी त्यांना न्याय मिळाला नाही. धरणग्रस्त एकत्र येऊ नयेत म्हणून त्यांना जाणीवपूर्वक ठिकठिकाणी टाकले आहे. धरणग्रस्तांची जीवन मरणाची लढाई सुरू आहे. तरीही राज्यकर्त्यांना धरणग्रस्तांच्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाकडे निधी नाही. मुंबईतील उड्डाणपूल, मंत्र्यांचे महागडे दौरे करण्यासाठी कोठून पैसे येतात? शासनाकडे पुनर्वसनाच्या भू संपादन प्रस्तावासाठी केवळ १६ कोटी ८१ लक्ष ११ हजारांची गरज आहे. मात्र तेवढी रक्कम शासनाकडे नाही. सोमवार दिनांक ६ जानेवारी २००३ रोजी वारणा धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या कालबद्द कार्यक्रम तयार करून त्यानुसार कार्यक्रम राबवण्याचे आश्वासन जिल्हा पुनर्वसन प्रशासनाने दिल्यामुळे आज ठिय्या आंदोलन मागे घेतले. त्या वेळी पुनर्वसनासाठी लागणारी रक्कम शासनाने १ महिन्याच्या मुदतीत म्हणजे ६ फेब्रुवारी पर्यंत न दिल्यास अर्थमत्र्यांच्या घरासमोर

बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली (शेतमजूर, कष्टकरी शेतकरी संघाटना) वारणा धरणग्रस्त १ जानेवारी २००३ पासून ठिय्या आंदोलनाला बसले होते. जिल्हा पुनर्वसन अधिकारी सौ.नयना गुंडे यांनी धरणग्रस्तांच्या आंदोलन स्थळी येऊन आश्वासन दिल्यामुळे आंदोलन मागे घेण्यात आले. धरणग्रस्तांनी एकूण २७ मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले होते.

क्रांतिवीर नागनाथअण्णांनी १९८५ साली वारणा धरणग्रस्तांची पहिली परिषद कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ऐतवडे येथे विद्यालयाच्या पटांगणावर घेतली. त्या दिवसापासून धरणग्रस्तांच्या प्रश्नासाठी नागनाथअण्णा आपल्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन रास्ता रोको, जिल्हा कार्यालयावर ठिय्या आंदोलने. ५ टक्के विस्तापितांसाठी नोकऱ्या, आरक्षणासाठी मागणी निवेदन, वरचेवर बैठका, मोर्चे रिंगण आंदोलन, शासनाची कार्यालयं बंद पडण्यापर्यंत क्रांतिवीर नागनाथअण्णांनी आक्रमक भूमिका घेतली. धरणग्रस्त महिला ह्या प्रत्येक लढयाच्या वेळी बहुसंख्य हजर असायच्या. शेवटचा इशारा म्हणून शासनाला नागनाथअण्णांनी बुधवार दि.१५ जानेवारी २००३ रोजी सांगली जिल्हा कार्यालयावर मोर्चा काढला त्या वेळी जाहीरपणे सांगितले. शिराळा व शाहुवाडी तालुक्यातील ३९ गावांतील ३००६ कुटुंबांचे शंभर टक्के पुनर्वसन करावे यासाठी लागणाऱ्या २४ कोटी ८१ लाख रु. निधी तत्काळ उपलब्ध करावा. धरणग्रस्तांतील प्रत्येक कुटुंबातील एकाला हक्काची नोकरी मिळावी. या मागण्या दोन महिन्यांत मान्य न झाल्यास शासकीय कार्यालय बंद पाडण्याचा इशारा क्रांतिवीर अण्णांनी दिला. त्यावेळी स्त्री पुरुष, धरणग्रस्त दहा हजारांच्यावर उपस्थित होते. शिवाय कॉ.नाना शेटे, राम पाटील, श्रीपती पाटील, नामदेव नांगरे, मुसा मुल्ला, इब्राहिम वारूसे इ. होते. जिल्हा पुनर्वसन अधिकारी नयना गुंडे यांनी सभेच्या ठिकाणी येऊन निवेदन स्वीकारले. शासनाला इशारा करूनही शासनाने दोन महिन्यांत ठोस असे धोरण न घेतल्यामुळे पुनर्वसनासाठी लागणारा २१ कोटींचा निधी तत्काळ उपलब्ध करून द्यावा. जमीन संपादनाच्या कामाला गती द्यावी म्हणून जिल्हा कार्यालयासमोर पाच तासांचे उग्र आंदोलन करून कार्यालयाकडे येणारे सर्व रस्ते अडवून कामकाज बंद पाडले. या मोर्चाचे नेतृत्व क्रांतिवीर नागनाथअण्णा, कॉ.नाना शेटे व कॉ.राम पाटील यांनी केले.

क्रांतिवीर नागनाथअण्णा वारणा धरणग्रस्त यांच्या न्यायासाठी १९८५ साली छेडलेली चळवळ पुढे कोयना धरणग्रस्तांना या चळवळीत संघटित करून धरणग्रस्तांच्या विस्थापनासाठी शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी प्रयत्न करून धरणग्रस्तांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या प्रयत्नामुळे सरकारला धरणग्रस्तांचे

आणि सुधारीत कायदे करावे लागले. बऱ्यापैकी धरणग्रस्तांना न्याय मिळाला असला तरी बऱ्याच्या मागण्या अजून पदरात पडायच्या आहेत. क्रांतिवीर नागनाथअण्णांची शासनाकडे मागणी होती. ती जाहीर रीत्या त्यांनी मांडली होती. एकतर धरणग्रस्तांना स्वातंत्र्यसैनिकांचा दर्जा देऊन त्यांना पेन्शन चालू करावी, परंतु अजूर तरी या मागणीचा शासनाने विचार केलेला नाही. मधला मार्ग म्हणून धरणग्रस्तांना निर्वाहभत्ता द्यावा यासाठी शासनाकडे जोरदार मागणी केली होती. त्याची सुरुवात शासनाने लवकर करावी म्हणून क्रांतिवीर नागनाथअण्णांनी हुतात्मा कारखान्यातून आठ लाख रुपये कोल्हापूर जिल्ह्यातील धरणग्रस्तांना निर्वाह भत्ता म्हणून पुनर्वसन खात्याचे मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या हस्ते. स्वत: क्रांतिवीर अण्णा शिवाजीराव नाईक, कॉ.नाना शेटे, डॉ.भारत पाटणकर, बाळासाहेब नायकवडी, भारत पाटील, बाबूराव गुरव, बी.के.घाडके इतर धरणग्रस्त व वाळव्याचे कार्यकर्ते जयवंत अहिर, वसंत पवार वगैरे यांच्या उपस्थितीत चांदोली धरणाच्या भिंतीवर पैसे देण्याचा कार्यक्रम केला. क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या ह्या सद्‌भावनेचा अजूनही शासन विचार करत नाही आणि हुतात्मा कारखान्याने उसनवार दिलेल्या आठ लाख रुपयातील एक दिमडीही शासनाने परत केली नाही.

या मागणीसाठी चांदोली धरणाखाली पाण्यात बुडलेली गावं परंतु त्यांच्या कोल्हापूर जिल्ह्यात वसाहती झाल्या होत्या असे धरणग्रस्त धरणाच्या भिंतीवर नर्वाहभत्याच्या मागणीसाठी धरणे धरुन साधारण १५ फेब्रुवारी २००१ साली सलग ११ दिवस बसली होती. वारणा धरणग्रस्त, कोयना धरणग्रस्त, वारणा चांदोली अभयारण्यग्रस्त, अंबेओव्हळ धरण, चित्रा धरण, सर्वनाला धरण, कडवी धरणग्रस्त या सर्व धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी १९८६ पासून सतत २०११ अखेर क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी जवळ-जवळ दोन तपे आपले सहकारी कॉ. नाना शेटे, श्री. बाळासाहेब नायकवडी, डॉ. बाबूराव गुरव, भारत पाटील, धनाजी गुरव, मुक्ती संघटनेचे डॉ.भारत पाटणकर यांना बरोबर घेऊन संघर्ष केला. संघर्ष वाया गेला नाही परंतु क्रांतिवीर अण्णांच्या म्हणण्याप्रमाणे शेवटच्या माणसापर्यंत न्याय मिळायला पाहिजे होता तो मिळाला नाही. म्हणून १९८७ साली मंत्रालयावर ५० एक हजार धरणग्रस्तांचा मोर्चा काढला. कॉ. दत्ता देशमुखही त्या मोर्चाला हजर होते. क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी अनेक मोर्चे काढले. सांगली, कोल्हापूरला काढलेल्या अनेक मोर्चातील माझ्या (जयवंत अहिर) आठवणीतला कोल्हापूर कलेक्टर ऑफिसवर काढलेला मोर्चा आणि त्याच वेळी सलग ४६ दिवस ठिय्या आंदोलन केले. ते आंदोलन जानेवारी २००४ साली क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे नेतृत्वाखाली भारत पाटील, धनाजी गुरव, बाळासाहेब नायकवडी, राम पाटील, नांगरे, बुवा, बी.के.घोडके व मुक्ती संघर्ष

चळवळीचे नेते डॉ. भारत पाटणकर होते. विशेषत: पुरुषांच्या बरोबर स्त्रीया व लहान मुलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. सकाळ, संध्याकाळ वाळव्याहून हुतात्मा कारखान्यावरुन ह्या मंडळींचे जेवण येत होते. अंदाजे दररोज कायमपणे मुक्कामाला असणारे स्त्री-पुरुष एक हजाराच्या आसपास होते. दररोज जाऊन-येऊन करणारे एक हजार असतील. त्यावेळी लोकांची काय अवस्था झाली असेल याचा विचार मनात आलातर अंगावर काटा उभा राहतो. लोकांच्या मागण्या काय होत्या. आम्हांला उदरनिर्वाह भत्ता द्या. निवाड्याप्रमाणे पैसे द्या. उपलब्ध असणारी जमीन द्या. नागरी सुविधा द्या. ह्या सरळ साध्या मागण्या. इंग्रज सरकारला मेटाकुटीला आणलेले क्रांतिवीर नागनाथ अण्णा सारखा स्वातंत्र्य सैनिक आपल्या वयाच्या ८२ व्या वर्षी सतत ४६ दिवस लढा देतायत. यावेळी अनेक स्त्रीयाबरोबर कोंडाबाई लक्ष्मण पाटणे नावाची धनगर समाजातील बाई त्या सरकारबद्दल आपल्या काव्यात म्हणते,

"आयाबायांनो कंबर कसुन उठा गं !<br>
असल सरकार व्हणात घालुन कुटा गं !<br>
या सरकाराची रीत नाही बरी गं !<br>
बायका पोरं रडती रस्त्यावरीत गं ! "




वारणा धरणग्रस्त परिषदेत मार्गदर्शन करतांना<br>
**मा.बाबा आढाव** व अध्यक्षस्थानी क्रातिवीर **नागनाथअण्णा** आणि<br>
क्रांतिमाता **लक्ष्मीबाई नायकवडी** (सन १९८६)

# १९८८-कोयना धरणग्रस्त संघटना

क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी समजून उमजून घर-प्रपंच मुला-बाळांचा, घरदाराचा त्याग करुन,व्यक्तीगत प्रपंचा या साऱ्या गोष्टींना फाटा देऊन सामाजिक कामाला वाहून घेतले होते. ते सहज एकवेळ कार्यकर्त्यांच्या मीटिंगमध्ये असाच विषयाने विषय निघाला आणि म्हणाले, ''प्रपंच हा नीटनेटका करावा. त्यासाठी माया कशी जमवावी, आपल्या मुलाबाळांना शहरातल्या एखाद्या चांगल्या शाळेत घालावे. आपण स्वत: एखादा चांगला बंगला बांधून ऐषआरामात पुणे मुंबई सारख्या एकाद्या शहरात राहावे, मर्चिडस गाडीतून फिरावे. जागतिक बँकेत पैसे ठेवावेत. हे सारे करायचे म्हटलेतर मला अवघड होतं का? अशक्य होतं का ? आजही पुढं असणारी परंतु मागे कुठच नसणारी परंतु आता पुढं पुढं करणारी, हे सारं सुख भोगतायत का नाही ? हे माझ्यापेक्षा तुम्हांला जास्त माहिती आहे, अहो जास्त कशाला हे कोयना धरण पूर्ण झाल्यानंतर वीज तयार होणार आणि नदीकाठावर दोन्ही बाजूंने विजेच्या मोटारी बसणार. तेव्हा एखादा विजेच्या मोटारी, पंप तयार करण्याचा कारखाना काढावा आणि तसं मी ठरवलं असतं तर तेही शक्य होतं. पण मला त्यातील काहीही करायचं नव्हतं आणि तसे कधी माझ्या मनातही आले नाही. मला तुम्हा कष्टकऱ्यांना सुखी करायचं होतं. म्हणून मी सतीचा खडतर यातनेचा जीवन मार्ग खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यासाठी स्विकारला आहे. मी माझ्या मार्गाने पुढे जात असताना मला जे दिसलं, जे मी पाहिलं, कोयनेच्या पाण्यामुळं वीज तयार झाली शेतीला पाणी मिळालं, अनेकांचे मळे फुलले परंतु आपली

घरंदारं जमीन जुमला, गाव सोडून गेलेल्या त्या कोयनेच्या धरणग्रस्तांचे काय? अजूनही ती मंडळी हाल आपेष्ठात जीवन जगतायत. हे काय चाललं आहे? ज्या कोयनेच्या धरणग्रस्तांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून तुमच्या घरादारांचा अंधार नाहीसा केला, तुमचे प्रपंच आणि माड्यामजले सजवले, त्या धरणग्रस्तांच्या वसाहतीस १९८८ साल उजाडलं तर लाईट नाही ? कुणाला अजून घरदार, जमीन नाही. हे सरकार कसले म्हणायचे ? यांना कधी धरणग्रस्तांची कळ येणार ?'' त्याच दिवशी योगायोगाने कोयनेच्या वसाहतीत क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या सभेचे नियोजन होते. त्यावेळी अण्णांच्या बरोबर नेहमीच असणारे कार्यकर्ते डॉ.भारत पाटणकर, कॉ.नाना शेटे, डॉ.बाबूराव गुरव, बाळासाहेब नायकवडी, भारत पाटील, आणि वसंत पवार, जयवंत अहिर, मन्सूर चाऊस, अनिल खरळकर, बेलवनकर, उत्तम घोलप, राजा वडर, कृष्णा जठारे, कदम ड्रायव्हर, पोपट धनवडे, तानेखान ह्या साऱ्यांना साक्षी ठेवून अण्णांनी त्याच दिवशी कोयना धरणग्रस्त संग्राम संघटनेची स्थापना केली ते साल १९८८ होते. पुढे त्यांनी जिथं जिथं कोयनेच्या लोकांच्या वसाहती आहेत, त्या वसाहतींना भेटी देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी काय करण्याची गरज आहे त्याचा सर्वे करण्याची जबाबदारी कॉ.नाना शेटे व डॉ.भारत पाटणकर व इतर प्रमुख कायकर्ते यांच्यावर सोपविली. अशा पद्धतीने प्रत्येक कामाचा फडशा त्याच वेळी त्या जागेवर पाडत होते. क्रांतिवीर नागनाथअण्णांची निर्णयक्षमता जबरदस्त होती की समोरच्या माणसानं तोंडात आश्चर्याने बोट घालावे अशी होती.

कोयना प्रकल्प-कोयना नदीवर देशमुखवाडीला १९५४ साली धरण बांधायला सुरुवात केली. आणि १९६० साली ते पूर्ण झाले. त्यावेळी त्या धरणाची उंची ८९.१५ मीटर व लांबी ८६३.५२ असे हे धरण १०० टी.एम.सी. पाणी साठ्याचं तस महाराष्ट्रातलं सर्वात मोठं धरण होत. त्या धरणाच्या पाण्यात तशी बरीच गावं बुडाली होती. त्या बुडीत गावातील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच काम सुरुवातीला गतीन होतं पुढं त्या कोयनेच्या प्रकल्पग्रस्त मंडळींकडे दुर्लक्ष झाले. क्रांतिवीर नागनाथअण्णा १९८५ पासून वारणा धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या कामात स्वत:ला संपुर्ण झोकून काम करत असतानाच कोयना धरणग्रस्तांच्या बाबतीत वारणा, कोयना तसेच इतर धरणग्रस्तांचे विस्थापिकरणासाठी त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी कॉ. दत्ता देशमुख, क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे नेतृत्वाखाली अनेक वेळा कॉ. नाना शेटे, डॉ. भारत पाटणकर, बाबूराव गुरव या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन अनेक मोर्चे काढले. त्यातून

बऱ्यापैकी धरणग्रस्तांना न्याय मिळाला. असे नेते मंडळींचे मत नव्हते. मामलेदार कचेरी, कलेक्टर कचेऱ्यावर काढलेल्या मोर्चातून फारस कांही साध्य होत नाही म्हटल्यावर जोराची धडक द्यावी म्हणून १९८७ साली मुंबई मंत्रालयावर कॉ. दत्ता देशमुख व क्रांतिवीर अण्णा यांच्या नेतृत्वाखाली ५० हजार धरणग्रस्तांचा मोर्चा धडकवला. जनतेचा रेटा बघून मंत्रालयातून आश्वासनांची खैरात झाली. प्रत्यक्ष फार थोडं धरणग्रस्तांच्या पदरात पडलं. असं असून नागनाथ अण्णा कधी खचले नाहीत. त्यांना अशक्य असं काहीच नसायचं म्हणून ते सतत प्रत्येक गोष्टीचा चिकाटीने पाठपुरवठा करत होते."



**क्रांतिवीर नागनाथअण्णा** सांगली जिल्हाधिकारी कचेरी समोर धरणग्रस्तांच्या मेळाव्यापुढे मार्गदर्शन करताना (सन २०००)

# दलित आदिवासी ग्रामीण संयुक्त साहित्यसंमेलन (१९८८)

क्रांतिवीर नागनाथअण्णा कष्टकरी बहुजन ग्रामीण भागातील तसेच शिराळ पेट्यासारखा डोंगर दऱ्याखोऱ्याच्या मागास अशा दुर्गम भागांत रहाणाऱ्या कष्टकऱ्यांच्यासाठी जे जे कार्यकर्ते पुरोगामी परिवर्तनवादी चळवळी करत होते, त्यांना सर्वेतोपरी सहकार्य करत होते. गरज पडली तर स्वत:च त्या ठिकाणी हजर राहून पाठिंबा देत असत. त्याचाच एक भाग म्हणा. १९८८ साली धुळ्याचे शरद पाटील आणि अण्णांची भेट झाली त्यांनी अण्णांच्या पुढे एक प्रस्ताव मांडला. वाळव्याला दलित आदिवासी ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलन घेऊया. बहुजन कष्टकरी, जातिजमातींना ब्राह्मणी धर्मांधांनी अज्ञानात पिढ्यान् पिढ्या ठेवल आहे. यातून बाहेर काढण्यासाठी आजच्या परिस्थितीत त्यांना आदर्श असा सांस्कृतिक पर्याय की जो फुले, शाहु, आंबडेकर यांच्या विचारांवर आधारित असं साहित्य फुलवलं पाहिजे. ते नव्या पिढीपुढं मांडलं पाहिजे. त्यांच्या मनात रुजवलं पाहिजे. त्या पिढीनं ते जोमानं मन लावून आत्मसात केलं पाहिजे, वाचलं पाहिजे, त्याचा त्यांनी प्रचार केला पाहिजे. अण्णांना ह्या गोष्टीची पूर्ण जाणीव असल्यामुळे त्यांनी संमेलन घेण्यास मान्यता दिली. हुतात्मा संकुलातील सर्व शेतकऱ्यांनी साहित्य संमेलन मनापासून घ्याचे ठरवले. हे संमेलन न भूतो न भविष्यति ह्या तोडीचे अगदी क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या इच्छेप्रमाणे साऱ्या महाराष्ट्राचे डोळे लागावेत असे साहित्य संमेलन वाळवे येथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणावर संपन्न झाले.

मध्यंतरी आठ वर्षांच्या मधल्या काळात तेरा दुष्काळी तालुक्याच्या पाणी प्रश्न संघर्ष चळवळीच्या पाठीमागे असल्यामुळे अण्णांना साहित्य चळवळीचा फारसा

संबंध साधता आला नाही. ही चळवळ थंडावली काय अशी अण्णांच्या मनाला काळजी वाटत होती. या काळजीच्या ओढीतूनच क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा दलित आदिवासी ग्रामीण संयुक्त साहित्यसंमेलन जोरदार हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून करण्याचा शेतकऱ्यांनी निर्णय घेतला आणि वाळव्यात परत एक वेळ २०,२१ आणि २२ जानेवारी १९९६ असे तीन दिवसांचे संमेलन यशस्वी करण्याचे आयोजन केले आणि खंडित झालेला हा बहुजनांचा सांस्कृतिक प्रवाह क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या पुढाकाराने पुन्हा नव्या जोमाने पुढे झेपावू लागला. या चौथ्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष गिरीष कर्नाड होते, कवी नारायण सुर्वे, उत्तम कांबळे, डॉ.बाबूराव गुरव, डॉ.भारत पाटणकर, सौ.कुसुमताई नागनाथ नायकवडी, सोनवणे, आ.ह.साळुंखे, बाबूराव बागुल वगैरे असे अनेक बहुजनांचे महान साहित्यिक, कवी ह्या साहित्यसंमेलनासाठी उपस्थित होते. परगावहून आलेल्या मंडळींची कारखाना कॉलनीत आणि हुतात्मा विद्यालयात राहण्यची व्यवस्था केली होती. विशेष बाब म्हणजे साहित्यसंमेलनासाठी आलेल्या प्रत्येक पाहुण्यांना अंथरण्यासाठी पांघरण्यासाठी नवीन छोटे जमखाने, नवी गादी, नवे बेडसीट, नवे ब्लँकेट व सोलापुरी चादरी आणल्या होत्या. अंथरण्याचे व पांघरण्याचे साहित्य नवीनच द्यायचे अण्णांनी निर्णय घेतला होता. पुढे साहित्यसंमेलन संपल्यानंतर नवीन आणलेले साहित्याचा एक सेट नव्या किंमत २०% डिस्काउंट देऊन पाहिजे त्यांनी विकत घ्यावा. असा एक नवीन पायंडा या निमित्ताने पाडला.

ह्या संमेलनासाठी वाळव्यातील लोकांचा मोठा सहभाग होत. ह्या संमेलनासाठी लोकांनी काही शिकावे असाच उद्देश अण्णांचा होता. त्याचबरोबर या संमेलनाच्या माध्यमातून दलित, आदिवासी, ग्रामीण खेडूत जे दऱ्या खोऱ्यांतून दुर्गम अशा डोंगर कपाऱ्यांत रहाणाऱ्या बहुजनांना आपल्या अडचणी सरकार दरबारापर्यंत पोहोच करण्याच व्यासपीठ या निमित्ताने त्या लोकांच्यासाठी उपलब्ध करून द्यायचा उद्देश त्यांचा सफल झाला. तीन दिवसांच्या या साहित्यसंमेलनात अनेक वक्त्यांनी स्पष्ट परखड भूमिका ब्राह्मणी विकृतीबद्दल जोरदारपणे मांडली. वागण्या-बोलण्यात सहजता आणि बहुजन समाजासाठी सामाजिक क्षेत्रात मूलभूत आमूलाग्र बदल झाले पाहिजेत अशी त्यांची भूमिका हे त्यातलं एक वैशिष्ट्य होतं. संमेलन सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत तीन दिवस चालले होते. मधला जेवण चहा पाण्याचा वेळ सोडला तर सतत मांडणी, चर्चा, कविता, पुन्हा रात्रीच्या जेवणानंतर चर्चा, करमणुकीतून प्रबोधनाचे कार्यक्रम गाणी, कविता होतच होत्या. या संमेलनात भाग घेणारी मंडळी महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यांतून तर काही मंडळी परप्रांतातूनही आली होती. कवी, लेखक, समीक्षक, चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक, विचारवंत, संपादक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक

अशा सर्व क्षेत्रांतील मंडळी होती. ती सर्व बहुजन समाजातील शिकली सवरलेली मंडळी होती. बहुजन समाजाला अंधश्रद्धेच्या,धर्माच्या अज्ञानाच्या अशिक्षितपणाच्या अंधारातून बाहेर करण्यासाठी वेडी होऊन काम करणारी होती.

क्रांतिवीर नागनाथअण्णांना मात्र खरं खुरं स्वातंत्र्य आणायचं आहे ते काम ही अशा साहित्य संमेलनातून जवळ येईल. त्यातून एकमेकांचा, परस्परांबद्दलचा विश्वास असा समन्वय साधण्याचा, वाढण्याचा उद्देश सफल होईल, बहुजनांमध्ये आपुलकी, माया, एकमेकां बद्दल आदर वाढावा,ओळख वाढावी, यातून त्यांची संघटना करण्याचं काम सोपं होणार आहे. अशा लांबपल्ल्याचा विचारही अण्णांच्या डोक्यात आहे. आपल्या भाषणात अण्णांनी नेहमीप्रमाणे हुतात्मा भगतसिंग, राजगुरू, बाबू गेनू, हुतात्मा किसन अहिर यांचा उल्लेख करून बोलण्याअगोदर शाहू, फुले, आंबडेकर यांना वंदन करून ते संमेलनात बोलताना म्हणाले, ''या तीन दिवसांच्या कार्यक्रमानिमित्त आपण एकत्र आलो. बहुजनांच्या हितासाठी एकत्र आलो. आपण एकमेकांला समजून घेतलं. मनानं आणि विचारानं एकत्र आलो या शक्तीतून आपण कष्टकरांच्यासाठी काहीतरी करू. आपण जमलेली सर्व मंडळी राजकारणातील सत्तेमध्ये सामाजिकतेच बाजारीकरण करणाऱ्यांच्या व संस्कृतीचं विद्रुपीकरण करणाऱ्यांच्या विरोधात लढण्यासाठी एकत्र आलो आहोत. हे सर्वांनी ध्यानात ठेवावं. आज आपल्या संमलेनाचा शेवटचा दिवस आहे. आपण खूप मोठ्या संख्येने इथं जमला आहात. संमेलनाचा उद्देश सफल झाला आहे. या संमेलनानिमित्त आज तुम्हांला प्रत्यक्ष शेतकरी कसा राहतो, कसा जगतो, त्याच एकत्रीत कुटुंब कस राहतं हे तुम्हांला जवळून पाहता यावे म्हणून तुम्हांला वाळव्याचे शेतकरी आपल्या घराकडे घेऊन जेवण खाण्याचा पाहुणचार करणार आहेत. दुपारचे एक वाजत आले आहेत. सांगावसं, बोलावसं, खूप वाटतं पण? माझी सवय बोलण्यापेक्षा'......अण्णा हसले आणि थांबले.

दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलन घेऊन आज दहा वर्षे झाली. या दहा वर्षात सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांतील तेरा दुष्काळी तालुक्यांच्या प्रश्नावर क्रांतिवीर नागनाथअण्णांनी मोठी पाणी संघर्ष चळवळ चालवली आहे. या कामात मध्यंतरी दहा वर्षांच्या काळात बहुजनांच्या साहित्यसंमेलनाचा फारसा संबंध साधता आला नाही. तो संबंध वाळव्यात सातवे राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन ११ व १२ फेब्रुवारी २००६ रोजी क्रांतिवीर नागनाथअण्णांनी हुतात्मा कारखान्याच्या माध्यामतून घेतले. त्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ.नागनाथ कोतापल्ली व उद्घाटक डॉ.निर्मलकुमार फडकुले, स्वागताध्यक्ष स्वत: क्रांतिवीर नागनाथअण्णा होते. या संमेलनाचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रकाश रोकडे यांनी नियोजन केले होते. क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी समतानगर वाळवे येथे झालेल्या या दोन दिवसांच्या संमेलनातून लोकांना खूप काही शिकता आले.

नुकतंच आलेले जागतिकीकरण म्हणजे काय, त्याचे फायदे तोटे काय ? जागतिकीकरणात सामाजिक न्याय असेल काय या मुद्दयांच्यावर प्रा.डॉ.रावसाहेब कसबे,ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव कांबळे, डॉ.बाबूराव गुरव, प्रा.रत्नलाल सोनग्रा यांनी लोकांना व्यवस्थित समजेल अशा सोप्या भाषेत मांडणी केली. प्रा.जे.पी.देसाई इतिहास संशोधक यांनी स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिवीरांचा इतिहास सांगून तरुणांच्यात नवचैतन्य निर्माण केले. नामवंत कवींनी आपल्या कविता सादर केल्या, सामाजिक साहित्यिक कवी उद्धव कानडे यांनी संत गाडगे बाबांचा लोकजागर 'माणूस माझे नाव' या विषयावर सोप्या भाषेत विचार मांडले. त्यातून लोकांना खरे संत गाडगे बाबा कळाले. दुसऱ्या दिवशी कविवर्य ज्ञानेश्वर कोळी यांच्या अध्यक्षतेखाली ॲड.दिलीप काकडे यांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी बंधुता चळवळीचे कसे महत्त्व आहे या विषयावर व्याख्यान देऊन लोकांच्यात राष्ट्रीय प्रेम निर्माण केले. आणि दुपारी संस्थापक प्रकाश रोकडे यांची बंधुता आणि संघर्ष या विषयांवर प्रकट मुलाखत झाली आणि शेवटी सांगतासमारंभ आप्पासाहेब खोत यांच्या कथाकथनाने झाला. या साऱ्या गोष्टींतून बंधुता साहित्य संमेलनातून खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यासाठी जी लढाई करायची आहे ती लढाई कशी करायची त्यासाठी काय करायचे याची एक झलक या साहित्य संमलेनातून झाली. शेवटी क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणाले,''या बंधुता साहित्य संमेलनातून लोकांच्यातील मरगळ निघून गेली. या साहित्य संमेलनाने सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला बळ दिले. या बळाचा उपयोग आपण सामाजिक बांधिलकी म्हणून असले लोक प्रबोधनाचे, साहित्य संमेलनाचे कार्यक्रम वरचेवर महाराष्ट्रभर राबवून बहुजनांचे खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी सज्ज व्हायला पाहिजे.'' एवढे बोलून अण्णा थांबले.



तिसऱ्या दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष **मा.नारायण सुर्वे** यांचे स्वागत करताना **सौ.कुसुमताई नायकवडी** स्वागताध्यक्ष व क्रांतिवीर **नागनाथअण्णा** (सन १९८८)

# अण्णा आणि सोव्हिएट रशिया

क्रांतिसिंह नाना पाटील व कॉ.दत्ता देशमुख रशियाला जाऊन आले होते. क्रांतिवीर अण्णांनी सोव्हिएट रशियाला जाऊन यावे म्हणून दोघांनीही आग्रहाने सांगितले होते. अण्णांच्या मनात जायची इच्छा होती. पण योगायोग कधी येतोय ते बघू अशी मनात इच्छा ठेऊन ते आपल्या रचनात्मक कामात व्यस्त झाले. शेतकरी, शेतमजूर, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त यांच्या न्याय्य मागणीच्या संघर्षाबरोबर वाळव्यात नवीन सुरू केलेल्या हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना हक्काच्या ऊस क्षेत्राच्या झोन संबंधी ते शासना बरोबर लढत होते.कार्यक्षेत्राबद्दल शासनाच्या ध्यानात आणून देत होते.

पुढे विधान परिषदेच्या निवडणुका १९८५ साली लागल्या होत्या. सर्वांच्या आग्रहाने अण्णा निवडणुकीला उभे राहिले आणि निवडूनही आले. १९८५ ते १९८८ या तीन वर्षात अण्णा हुतात्मा कारखान्याला कायमपणे ऊस मिळावा यासाठी कार्यक्षेत्र निश्चित करण्याबरोबर कारखाना लवकरात लवकर कर्जमुक्त करण्यासाठी, साखर उतारा जास्त मिळवणेसाठी व शेतकऱ्यांना ऊसदर जास्त देणे या कामात रात्रंदिवस प्रयत्न करत होते. त्या कामातून ते रशियाला जायचे विसरले. ध्यानीमनी नसताना ते १९८८ साल असेल त्यावेळी अरुण गुजराथी यांनी आमदारांच्यासाठी सोव्हिएट रशियाच्या ट्रिपचे नियोजन केले होते. अण्णांना न विचारताच त्या यादीमध्ये त्यांनी आपणहून अण्णांचे नाव घातले होते. तसे त्यांनी अण्णांना सांगितले. वाळव्याला आल्यानंतर अण्णांनी कार्यकर्त्यांना सांगितले मी रशियाला जाणार आहे. माझे नाव

अरुण गुजराथी यांनी यादीत घातले आहे. या कामासाठी पवार सर व मला पासपोर्टसाठी लागणारे कागदपत्राची पुर्तता करायला सांगितली. त्यासाठी मुंबईला अरुण गुजराथींना भेटून सोव्हिएट रशियाच्या ऑफिसमध्ये जाऊन माहिती घ्या. आम्ही दोघे तातडीने मुंबईला गेलो. सर्व माहिती आणून पासपोर्टच्या कामाला लागलो. अण्णा आमदार असल्यामुळे पासपोर्ट मिळायला फारसा वेळ लागला नाही.

अण्णा रशियाला जाणार हे अण्णांच्या पत्नी सौ.कुसुमताई (आम्ही सारे त्यांना वहिनी म्हणतो) यांना कळाले. त्यांचीही इच्छा सोव्हिएट रशियाला जायची होती त्यांनी तसे अण्णांना सांगितले. सुरुवातीला अण्णा त्यांना नाही म्हणत होते. परंतु वहिनीच्या आग्रहामुळे व चिकाटीमुळे शेवटी अण्णांनी रशियाला बरोबर येण्यासाठी मान्यता दिली. पुढे त्यांचाही पासपोर्ट मी आणि पवार सरांनी काढून आणला. अण्णांनी वहिनींना स्पष्ट सांगितले होते,''तुझ्या प्रवासाचे पैसे तुझे तू घालायचे आहेस माझ्या खर्चासाठी घरातून माझे बंधू शामरावअप्पा यांच्याकडून आठ हजार मी घेणार आहे. व बाकीचे बघू काय करायचे ते. एकूण खर्च माणसी साधारण सोळा हजार येणार होता. सगळी तयारी झाली आणि अचानक आमदारांची रशियाला जाणारी सहल रद्द झाली. आता पुढे काय?

नंतर थोड्या दिवसांत कॉ.दत्ता देशमुख यांच्या प्रयत्नाने रशियाला जायचे नक्की झाले. ''हॉलिडे मेकर्स'' या नावाची प्रवास कंपनी आहे. या कंपनीमार्फत जाण्याचे निश्चित झाले. त्यासाठी कॉ.दत्ता देशमुखांना खूप प्रयत्न करावे लागले. त्यांच्या प्रयत्नातून दिल्ली ते मास्को या सहलीमध्ये अण्णा व वहिनींचा समावेश झाला. रशियाला जाण्याअगोदर ता.२९,३० व ३१ ऑक्टोबर १९८८ या तीन दिवसांचे द्वितीय दलित आदिवासी ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलनाचा सोहळा वाळव्यात हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणावर क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या पुढाकाराने चालू होता. ३१ ऑक्टोबरला रात्री तर अण्णांना रशियाला जाण्यासाठी वाळव्याहून निघायचे होते. सर्व तयारी झाली होती. अण्णांच्या रशियाच्या खर्चासाठी कामगार व शेतकऱ्यांनी पैशाची तरतूद केली होती. अठरा ते वीस हजार रुपये जमले होते. अण्णांच्या जाण्याच्या खर्चाचा प्रश्न मिटला होता. परंतु अण्णांच्या मनात काय विचार वेगळेच घोळत होते. त्याचा कुणालाही पत्ता नव्हता. शेतकरी, कार्यकर्ते, कामगार सर्वजण हुतात्मा किसन अहिर पुतळ्या समोर जमले होते. खर्चाची रक्कम पवार सरांच्याजवळ होती. अण्णांनी पांडू शेखर यांना जवळ बोलावले. ते मुला-मुलींच्या वसतिगृहाचे काम बघत होते. अण्णांनी मला जया म्हणून हाक मारली जमलेले पैसे किती आहेत? पवार सर कुठं

आहेत? त्यांना इकडे घेऊन ये आम्ही दोघेही अण्णांच्या जवळ गेलो. अण्णांनी विचारले, ''किती पैसे जमलेत ?'' आम्ही म्हणालो, ''वीस हजार,'' ठीक आहे. ते पांडू शेखर कडे द्या. आम्हाला काही कळेना. त्यांच्या सांगण्याप्रमाणे आम्ही पांडू शेखर कडे पैसे दिले. पांडू शेखरला अण्णा म्हणाले, ''पांडू, मी रशियाला जाणार आहे हे तुला माहीत आहे का? तो म्हणाला, ''हो मला माहीत आहे.'' ''तुझ्याकडे दिलेले वीस हजार रुपये मुला-मुलींच्या वसतिगृहासाठी दिलेत. मी रशियाला जाऊन येई पर्यंत ते पुरतील. मुला-मुलींची काळजी घे. वेळच्या वेळी जेवण खाणं मुलांना दे.'' अण्णांना रशिया खर्चासाठी दिलेले पैसे त्यांनी मुलांच्या वसतीगृह खर्चासाठी दिले. अता पुढे अण्णांना खर्चाला कोठून पैसे द्यायचे हा आमच्यापुढे प्रश्न होता.

पुढे अण्णा आम्हांला म्हणाले, ''जया, पवार सर तुम्ही दोघांनी माझ्या खर्चासाठी आठ हजार घरातून शामराव (शामरावआप्पा म्हणजे अण्णांचे धाकटे बंधू) आप्पांच्याकडून घ्या आणि आठ हजार अप्पा गायकवाड या कामगाराच्या नावावर कामगार पतसंस्थेतून कर्ज घ्या आणि कर्जाचे हप्ते माझ्या आमदारकीच्या येणाऱ्या पेन्शन मधून भागावयचे.'' आम्हा दोघांकडे बघत अण्णा हसत हसत म्हणाले, ''पवार सर, माझी पेन्शन काय तुमच्याच हातात येत असते. झाले सर्व अण्णाच्या इच्छेप्रमाणे झाले. मुंबईपर्यंत मी(जयवंत),उत्तम घोलप, महेश कांबळे आणि काही वॉचमन पोहचवायला जाणार होतो. पवार सर हे अण्णा व वहिनींना दिल्लीपर्यंत पोहचवायला जाणार होते. सोमवार ता.३१ ऑक्टोबर १९८८ रात्री साहित्य संमेलनाचा शेवटच्या दिवसाच्या सांगतासमारंभाचा कार्यक्रम करून ११ वाजता वाळव्याहून निघण्यासाठी गाडीत बसले होते. सर्व कार्यकर्ते दलित,आदिवासी साहित्यसंमेलन कार्यक्रमासाठी आलेले सर्व प्रमुख, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी पोर्च मध्ये अण्णांना निरोप देण्यासाठी जमले होते. मी, पवार सर अण्णांच्या सोबत मुंबईला जाणार असल्यामुळे अण्णांच्या गाडीतच बसलो होतो. येवढ्यात अण्णा म्हणाले, ''अरे जया, अजून कुसुम आली नाही वाटतं. (कुसुम म्हणजे अण्णांच्या पत्नी) जा त्यांना घेऊन ये'' मी तातडीने अण्णांच्या घरी गेलो. अहो वहिनी ! निघण्याची तयारी झाली का ? चला लवकर ! अण्णा गाडीत बसलेत. वहिनी निघण्याच्या तयारीतच होत्या. त्या ताबडतोब शाळेकडे आल्या. आम्ही सर्वजण दोन गाड्यांतून निघालो होतो. बरोबर अकरा वाजता दोन्ही गाड्यांनी हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचे आवार सोडले आणि पहाटे पुण्याच्या इन्स्पेक्शन बंगल्यावर पोहचलो. सकाळी आवराआवरी नंतर दुपारी निघालो. मंगळवारी १ नोव्हेंबरला मुंबईत सर्वजण आमदार निवासवर आलो. अण्णांची आमदार निवासमध्ये

१२५ नंबरची खोली होती. तिथे आम्ही थांबलो. बुधवारी २ नोव्हेंबरला ११.३० वाजता मुंबई सेंट्रल वरून दिल्लीला जाणारी राजधानी एक्स्प्रेस गाडी होती. त्या गाडीची तिकिटे अगोदरच रिझर्व्ह केली होती. आम्ही अण्णा, वहिनींसह सर्व वेळेवर स्टेशनवर गेलो. परेख भाईंनी अण्णा व वहिनींच्यासाठी घरून भरपूर जेवण आणले होते. ते त्यांच्या स्वाधीन केले. त्या दोघांना (अण्णा आणि वहिनींना) परेश भाई व त्यांच्या वडिलांनी चंदनाचे हार घातले. पवार सर दिल्लीपर्यंत जाणार असल्यामुळे अण्णांच्यासोबत गाडीत चढले. कॉ.दत्ता देशमुख, मी, महेश कांबळे, तानेखान, मन्सूर, बबन, उत्तम घोलप आणि इतर वॉचमन सर्वांनी अण्णांना निरोप दिला. त्याच वेळी डॉ.गायकवाडांच्या कन्या मीनाताई स्टेशनवर भेटल्या. त्याही अण्णांच्या सोबत रशियाला जाणार होत्या. त्यांनाही आम्ही सर्वांनी शुभेच्छा दिल्या. दिल्लीची गाडी सुटली. अण्णा वहिनींनी उंचावलेले हात नजरेआड झाले आणि आम्ही स्टेशन वरून बाहेर पडलो. कॉ.दत्ता देशमुखांना दादरला श्रमीक ऑफिसमध्ये सोडले आणि वाळवा जवळ केला.

अण्णा सोव्हिएट रशियाला गेले ते एकूण साम्यवादी राष्ट्र, औद्योगिक, वैज्ञानिक प्रगती, शेती संशोधन, शैक्षणिक प्रगती, अंतराळ संशोधन आणि सर्वांहून इतर राष्ट्रांना मदत करण्याची प्रगती हे सारे ऐकून होते. ते तिथं जाऊन प्रत्यक्ष अनुभवायचं होतं. म्हणून रशियाला गेले होते. रशियाला गेल्याचे अण्णांना खूप समाधान वाटले. रशियाहून ते १९ नोव्हेंबरला २.३० च्या विमानाने दिल्लीला आले. पुढे ते वाळव्यात आले. अण्णांनी कार्यकर्त्यांना रशियाची सविस्तर माहिती सांगून आपणही त्यातले काहीतरी घ्यावे असे मला वाटते. रशियाहून येताना अण्णांनी कार्यकर्त्यांच्यासाठी भेट म्हणून बॉलपेन आणले होते. पांढऱ्या शुभ्र रंगाचे होते. हाजीर तो वजीर. त्यांना प्रत्येकाला एक-एक बॉलपेन रशियाची आठवण म्हणून दिला. तसा मला(जयवंत)ही दिला. तो मी आजतागायत अण्णांची आठवण म्हणून जपून ठेवला आहे. त्याचप्रमाणे अण्णांच्या मोतीबिंदूचे ऑपरेशनसाठी अमृतसरला डॉ.दलदितसिंग यांच्याकडे गेलो होतो त्यावेळी अमृतसर मंदिरातील लंगरमध्ये जेवण केल्यानंतर चूळ भरताना अण्णांची दाढ हातात आली. ती त्यांनी माझ्या हातात दिली. तीही मी आजअखेर सांभाळून ठेवली आहे.

सोव्हिएट रशियाहून परत आल्यानंतर काही आठवड्यांत हुतात्मा किसन अहिर यांच्या पुतळ्यासमोर अण्णा व आम्ही कार्यकर्ते चाऊस सर, पवार सर, कोंडूसकर सर, दत्ता शेळके, मी आणि एक दोन शिक्षक बसलो होतो. वेळ सकाळची होती. आई अण्णांच्या नाष्ट्याचा डबा व दूध घेऊन आल्या होत्या. अण्णांनी नाष्ट्याचा सर्वांना एक एक घास दिला. स्वत:ही एक घास घेतला. दुधाचा एक घोट घेऊन ते भांडे पुढे

दुसऱ्याकडे तिसऱ्याकडे असे आम्ही सर्वांनी एक एक घोट घेतले. आई गेल्यानंतर अण्णा सहज म्हणाले, ''अरे जया तुम्हांला वाटतय अण्णांनी आयुष्यात आपल्या घराकडे मुलाबाळांच्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. हे तुमचे म्हणणं खरं बी आहे. कारण मला माहीत आहे. प्रत्यक्ष खरोखरच मी माझ्या घरासाठी काहीही केलं नाही. परंतु मी आज ५० वर्षांनी पाठमागे वळून बघितलं, मी शाळा शेतकऱ्यांची मुलं-मुली शिकावीत म्हणून काढली. त्या शाळेत माझीही मुलं शिकली, साऱ्यांच्यासाठी इरिगेशन काढलं, त्यात माझ्या भावाची पण जमीन भिजलीच की, सर्वांच्यासाठी मी हुतात्मा साखर कारखाना काढला, इतरांच्या उसाबरोबर माझ्याही भावाचा ऊस कारखान्यात आला, इतरांच्या उसाला जसा भाव मिळाला तसा माझ्या भावाच्याही ऊसाला मिळाला. यातून मला तुम्हा कार्यकर्त्यांना एवढंच सांगायच आहे. सर्वांच्यासाठी आपण राबत राहिलो. दुसऱ्यांना सुखी करण्यास त्यांच्या आडअडचणीत वेळ घालविलेला वाया जात नाही. प्रत्यक्ष नाही अप्रत्यक्षरीत्या तरी अपेक्षा न करता ध्यानी मनी न धरता आपण राबत राहिलो तर आपलाही फायदा होतोच. येवढंच ध्यानात ठेवा आणि सर्वांनी सार्वजनिक कामाला वेळ द्या. असं अण्णाचं मन मोठ होतं.



क्रांतिवीर **नागनाथअण्णा** व **सौ.कुसुमताई नायकवडी**
रशियाचे दौऱ्यावर असताना (सन १९८८)

# शेतमजूर कष्टकरी शेतकरी परिषद
# (२६ मे १९९३ किणी-वाठार)

खरं म्हणजे क्रांतिवीर नागनाथअण्णा हे जातीयवादी धर्मांधशक्तीच्या विरोधात वर्षोन-वर्षे काम करत आहेत. जातीयवादी धर्मांध शक्तींपासून बहुजन समाजानं लांब रहावे म्हणून संघटितरीत्या शेतमजूर, कष्टकरी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करतच आहेत. जातीयवादी मंडळी धर्मांच्या नावावर, देवाच्या नावावर, बरोबर समाजाला अंधारात ठेऊन ब्राह्मणीवृत्तीच्या विचारांची सत्ता कशी येईल या उद्योगात त्यांचे सतत प्रयत्न चालतात. हे हाणून पाडण्याचे काम देशभर फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित झालेल्या अनेक संघटना करत आहेत. त्या संघटनांना सुद्धा क्रांतिवीर नागनाथअण्णा आयुष्यभर मदत करतच राहिले.

६ डिसेंबर १९९२ चा दिवस म्हणजे देशाच्या दृष्टीने राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने काळा दिन ठरला आणि या देशातल्या जातीयवादी धर्ममार्तंडांच्या शक्तीने बाबरी मशिद पाडून फार मोठे देशाचे नुकसान केले. देशभर हिंदु-मुस्लिम बांधव ताणतणावा खाली, दबावाखाली आपले जीवन जगत आहेत. देशाच्या फाळणीनंतर पाकिस्तान आणि हिंदुस्थान मधल्या हिंदु आणि मुस्लिमांचे जे दंगे झाले त्यातून जे पिढ्यान् पिढ्यांचे वैर तयार झाले त्या जखमा अजून वाहत आहेत. तो पर्यंतच बाबरी मशिद पाडून आणखी या वैरात जातीयवादी संघटनांनी भरच घातली. अगोदर जनता महागाई आणि बेकारीच्या आगीत होरपळते आहे, भाकरीसाठी रानोमाळ भटकत आहे. बाबरी मशिद पाडून हा प्रश्न सुटला का? सोपा झाला का? कशासाठी या मंडळींनी असला उद्योग केला? याला खत पाणी घातलं. या मंडळींना बाबरी मशीद पाडायला

ज्या जातीयवादींनी प्रोत्साहन दिलं असलं तरी त्यांच्याबरोबरच बाबरी मशिद पाडण्याच्या पापात त्यावेळी सत्तेवर असणारे सरकारही तितकेच जबाबदार आहे.

८ मार्च १९९३ च्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत क्रांतिवीर नागनाथअण्णांनी वाळवे येथे मोठ्या प्रमाणात हुतात्मा किसन अहिर विद्यालयात बहुजन समाजातील कार्यकर्ते बोलविले होते. त्यांच्या बरोबर चर्चा करून बाबरी मशिद पाडणाऱ्या जातीयवादी शक्तींचा बिमोड करण्यासाठी महाराष्ट्रभर एक हजार सभा घ्यायच्या व एकाच वेळी त्या हजार गावांतून मनुस्मृतीचे सामुदाईक दहन करून लोकांना जात, पात, धर्म या चक्रातून बाहेर काढायचे ठरविले. त्या सभा घेण्याच्या कामात स्वत: क्रांतिवीर अण्णा, डॉ.बाबूराव गुरव, कॉ.नाना शेटे, डॉ.भारत पाटणकर, धनाजी गुरव, धैर्यशील पाटील, भारत पाटील, राम पाटील, नांगरे आणि बुवा तसेच बाळासाहेब नायकवडी व क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेहमी बरोबर असणारे कार्यकर्ते जयवंत अहिर, पवार सर असे सर्व कामाला लागले आणि साधारणत: तीनशे गावांत सभा झाल्या.

मला(जयवंत अहिर)आजही चांगलं आठवतय २६ मे १९९३ वार होता. बुधवार सूर्य मध्यानंवर आला होता. ऊन मी म्हणत होतं आणि रखरखत्या उन्हातही कोल्हापूर-पुणे महामार्गावर किणी (वाठार) हायस्कूलच्या मैदानाकडे शेतकरी, शेतमजूर, स्त्री पुरुषांचे लोंढे येत होते. तापलेल्या मैदानात मांड घालून बसत होते. तर लहान मुलं बाळ बरोबर असणाऱ्या स्त्रिया मैदानाकडेला असलेल्या झाडांच्या फाटक्या सावलीत विसावत होत्या. क्रांतिवीर अण्णांनी पिण्याच्या पाण्याची व लहान मुलांच्या दुधाची व्यवस्था केली होती. कार्यकर्ते दक्षतेने बसल्या जागेवर लोकांना अपसूक सेवा देत होते. अजून मैदानाकडे रीघ चालूच होती. येव्हाना एक तरुण शाहिराने सामाजिक परिवर्तनाच्या पोवाड्याला हात घातला. शाहिराची बोटे डफावर नाचू लागली. त्या तरुण शाहिरांनी सिंह गर्जनेच्या पहाडी आवाजात बाबरी मशिद पाडणाऱ्या जातीयवादी धर्मांद शक्तीला आवाहन करून पोवाडा म्हणायला सुरुवात केली. पोवाड्याच्या शब्दा शब्दांच्या मांडणीतून अंगावर स्फूर्तीने शहारे उभे राहत होते. येव्हाना लोकांनी मैदान डोक्यावर घेतले. टाळ्यांच्या आणि घोषणांच्या आतषबाजीने मैदान थरथरत होते. थोडा वेळ का होईना लोकांना पोवाडा शाहीर अमर शेख म्हणतायत की अण्णा भाऊ साठे असा हा तरुण शाहीर बैभान होऊन पोवाडा म्हणत होता. लोकांच्या झुंडी अजूनही मैदानाकडे येत होत्या. मैदानावरची शिस्त पाहून सभेचं वेगळंपण जाणवत होतं. हा हा म्हणता लाखाचे मैदान भरत आले होते. ऐंशीएक हजारांचा जनसमुदाय जमला होता. क्रांतिवीर नागनाथअण्णा मैदानावर घोंगडं टाकून लोकांच्या बरोबर हितगुज करत बसले

होते. साडेतीन वाजले आणि क्रांतिवीर नागनाथअण्णा स्टेजवर स्थानापन्न झाले. लोकांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. त्यांच्या नावाच्या घोषणा देऊन जयजयकार केला. किणी वाठारच्या परिषदेला आवर्जून आलेले परिवर्तनवादी विचारांचे चित्रपट अभिनेते साथी निळू (भाऊ) फुले, राम नगरकर, क्रांति अग्रणी जी.डी.(बापू)लाड, प्राचार्य पी.बी.पाटील, डॉ.बाबा आढाव, के.एल.मलाबादे, आमदार शंकर धोंडी पाटील, कॉ.गोविंदराव पानसरे, प्रा.डॉ.बाबूराव गुरव, डॉ.भारत पाटणकर असे मातब्बर वक्ते व्यासपीठावर आरूड झाले. बरोबर चार वाजले. क्रांतिवीर नागनाथअण्णांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. प्रथम त्यांनी हुतात्मा भगतसिंग, हुतात्मा किसन अहिर, हुतात्मा नानकसिंग, राजगुरू यांची आठवण करून शाहू, फुले, आंबेडकरांना वंदन करून त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले, ''जातीयवाद्यांच्या कुटिल नीतीचे धागे दोरे उलघडून दाखविताना अण्णा त्वेशाने संतापले होते. बाबरी मशिद पाडून जातीयवाद्यांनी पुन्हा एकदा जाती पातीची भांडणे लावायला सुरुवात केली आहे. आपण जातीयवाद्यांचे हे डाव उधळले गेले नाहीतर देशाची मोठी पिछेहाट होणार आहे. बाबरी मशीद पाडून पुन्हा चातुर्वर्ण्य उतरंड मांडू पाहणाऱ्या दृष्ट प्रवृत्तीला वेळीच गाढले पाहिजे. या जातीयवाद्यांना वेळीच लगाम घालण्यासाठी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या धर्तीवर सारे मतभेद विसरून निरपेक्ष भावनेने सर्व शक्तीनीशी संघर्षाला तयार रहावे असे अण्णांनी जनसमुदायाला आवाहन केले आणि त्याच वेळी शेतमजूर, कष्टकरी शेतकरी संघटना स्थापन केल्याचे जाहीर केले. येथून पुढे या संघटनेच्या मार्फत आपले लढे चालू ठेवून व्यासपीठावरील सर्व नेत्यांनी आपल्या भाषणातून बाबरी मशिद पाडणाऱ्या जातीयवाद्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला आणि त्याचा बीमोड करण्याचा अण्णांच्या ठरावाला एकमुखी पाठिंबा दिला. राम नगरकर यांना कोणाकडून तरी समजले होते या सभेला व्यत्यय आणून जातीयवादी सभा उधळण्याचा प्रयत्न करणार आहेत. त्याला उत्तर देताना राम नगरकर म्हणाले, ''तुम्ही सभा उधळायला याच मी पुण्यात राहतोय. पुण्यातील भल्या भल्यांची भादरलेला मी माणूस आहे. त्यात तुमची काय कथा, जाता जाता तुमचीही भादरेन, तेव्हा कोण येतोय तेच बघतो.'' पुढे प्राचार्य पी.बी.पाटील, बाबा आढाव, गोविंद पानसरे, शंकर धोंडी पाटील, डॉ.बाबूराव गुरव, डॉ.भारत पाटणकर यांनी आपल्या भाषणातून लोकांना जातीयवादी संघटनेच्या कुटिल नीतीचा आपण साऱ्यांनी मिळून निषेद केला पाहिजे. त्यांचा बिमोड केला पाहिजे. मध्येच डॉ.भारत पाटणकरांनी शेतकरी संघटना विजयाच्या व जातीयवाद्यांच्या निषेदाच्या घोषणा दिल्या. कार्यक्रम संपला. लोक नव्या दमाने, नव्या उत्साहाने निघालेले दिसत होते.

पुन्हा पुन्हा अशा गोष्टी आपल्या देशात घडू नयेत म्हणून क्रांतिवीर नागनाथअण्णांनी हुतात्मा किसन अहिर व हुतात्मा नानकसिंग यांचा २५ फेब्रुवारी १९९३ ला जो स्मृतिदिन झाला त्या स्मृतिदिना दिवशीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने बाबरी मशिद पाडणाऱ्या ब्राह्मणी जातीयवादी धर्मांध शक्तीच्या विरोधात राष्ट्रीय एकात्मता म्हणून वाळवा हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचा पुतळ्यापासून ते चांदोली धरणाच्या जवळचे हुतात्मा नानकसिंग विद्यालय हुतात्मानगर (सोनवडे) ता.शिराळा अशी ८० किलोमीटरची मानवी साखळी राष्ट्रीय एकात्मता म्हणून केली.

येवढ्या गोष्टीवर क्रांतिवीर अण्णा थांबले नाहीत. पुढे त्यांनी या जातीयवादी धर्मांधशक्तीचा बिमोड दिन सलग तीन वर्षे केला. पहिला बिमोड दिन कोल्हापूर येथे ६ डिसेंबर १९९३ रोजी मोठ्या प्रमाणात महात्मा गांधी मैदान कोल्हापूर येथे साठ एक हजार जनसमुदायांच्या साक्षीने मोठी निदर्शने करून साजरा केला. पुढे याच प्रमाणे ६ डिसेंबर १९९४ दुसरा सोलापूर येथे चार हुतात्म्यांच्या साक्षीने केला. तसेच ६ डिसेंबर १९९५ रोजी कराड येथे साजरा केला आणि या देश घातकी शक्तीच्या कारनाम्याचा पाढा वाचण्यासाठी क्रांतिवीर अण्णा, डॉ.भारत पाटणकर, डॉ.बाबूराव गुरव, कॉ.नाना शेटे वगैरे कार्यकर्ते जे फुले, शाहू, आंबेडकरांचा वारसा जपणारे आहेत. त्यांनी एक हजार गावांत सभा घेऊन मनुस्मृतीचे सामुदाईक दहन करण्याची मोहीम २६ जुलै १९९५ रोजी पुरी केली.




**शेतकरी परिषद,** किणी (२६ मे १९९३)

# कृष्णा खोऱ्यातील ऐतिहासिक पाणी संघर्ष चळवळ

क्रांतिवीर नागनाथअण्णा कोणाला पूर्ण कळाले होते का नाही हे मला माहीत नाही. याचा अर्थ मला ते पूर्ण कळाले होते असा माझा दावा नाही. परंतु त्यांचा आणि माझा(जयवंत अहिर)चाळीस वर्षांचा सहवास होता. त्यातून मी अण्णांना समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यातून जे अण्णा मला भावले होते, कळाले होते ते अण्णा विश्व हेच आपले घर मानणारे होते. मानव जातीचा उद्धार करताना ते आईच्या न्यायाने जात होते. आईचं आपल्या सर्वच मुलांवर प्रेम असतं परंतु त्यातल्या-त्यात बुटीतली भाकरी घेऊन पळणाऱ्या मुलापेक्षा पाळण्यातल्या रडणाऱ्या मुलाकडे आई जास्त लक्ष देते. त्याच प्रमाणे बहुजन समाजातील दलित, पीडित, मागासलेल्या जनतेकडे अण्णा जास्त लक्ष देत होते. त्यात फासेपारधी, नंदीवाले,ढोर,चर्मकार,मातंग या सारख्या भटक्या जमातींबरोबर धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त या लोकांच्यासाठी नागनाथअण्णांनी आपलं आयुष्य खर्च केले. काळाच्या पुढचे विचार असणाऱ्या क्रांतिवीर अण्णांचे मन आभाळा ऐवढे मोठे होते. त्यांची नैतिकता, प्रामाणिकपणा, सत्य बोलणं, बोललेल्या शब्दाला जागणं, त्यांची कामाची हातोटी, कर्तव्य कटुता, अन्यायाविरोधात ठाम भूमिका, खऱ्याला खरं आणि खोट्याला खोटं म्हणण्याचं धैर्य, तशी त्यांची राहणी साधी, चालणं सरळ, बोलणं थेट होतं, हे मी अनुभवलं आहे. जवळून पाहिलं आहे. क्रांतिवीर नागनाथअण्णा हे शेतकरी जसा घात बघून पेरणी करतो त्याप्रमाणे अण्णांना कामाची घात कळत होती. कोणते काम कधी करावे हे मनात ठरवून त्या कामाला हात घालत आणि ते यशस्वी करत. हुतात्मा कारखान्याच्या यशानंतर पूर्वी कधी काळी त्यांच्या मनाच्या ऐरणीवर असलेल्या सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यांतील तेरा दुष्काळी तालुक्यांचे

कृष्णा खोऱ्यातील त्यांच्या हक्काचे पाणी त्यांना मिळावे म्हणून पाणीप्रश्नाचा संघर्ष लढा घात बघून हातात घेतला होता.

१९९२-९३ साल होतं हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या कामातून क्रांतिवीर अण्णा मोकळे झाले होते. साखर कारखान्याचे कर्ज फेडण्याची मुदत ५ वर्षे असताना क्रांतिवीर अण्णांनी ३ वर्षांतच साखर कारखाना कर्जमुक्त केला. शासकीय भाग भांडवलांचे हप्ते वेळेवर भागावले जात होते. शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर दिला होता. नागठाणे येथील कृष्णा नदीवरच्या बंधाऱ्याचे काम अण्णांच्या पुढाकाराने पूर्ण झाले होते. हुतात्मा कारखाना आणि शेतकऱ्यांच्या ऊस शेतीच्या पाण्याचा कायमचा प्रश्न मिटवला होता. अनेक लहान मोठ्या इरिगेशन स्कीम करून शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देऊन हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याला लागणाऱ्या ऊस पिकाची शाश्वती केली होती. आता सारं काही ठीक होतं. दिवसेंदिवस साल मागं टाकत काळ पुढे चालला होता. क्रांतिवीर अण्णा आपल्या सार्वजनिक कामांत नेहमीच व्यस्त राहायचे. त्यांना प्रत्येक दिवस महत्त्वाचा वाटत असे. तो दिवस मला चांगला आठवतोय. साल होतं १९९३. आटपाडीच्या दलित कार्यकर्त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या कार्यक्रमानिमित्त अण्णांना बोलविले होते. साधारण एप्रिल मधला तिसरा आठवडा असावा. आंबेडकरांच्या जयंतीच्या कार्यक्रमाला आम्ही निघालो होतो. सोबत दोन गाड्या होत्या. क्रांतिवीर अण्णांच्यासह डॉ.भारत पाटणकर, डॉ.बाबूराव गुरव, वसंतराव पवार, मी(जयवंत अहिर),उत्तम घोलप आणि इतर मन्सूर, तानेखान, अशोक चव्हाण, बबन कदम, नागठाण्याचे शिंदे वगैरे वॉचमन, महेश कांबळे व कृष्णा जठारकर ह्या दोन ड्रायव्हरांसह आम्ही ११ जण वाळव्याहून निघालो होतो. दिड तासात आम्ही आटपाडी परिसरात पोहचलो. त्यावेळी दुपार झाली होती. कडाक्याचं ऊन होतं अशा उन्हात आटपाडीतील बायकामाणसं पाण्यासाठी डोक्यावर घागरी घेऊन रानोमाळ भटकतांना दिसत होती. त्यांच्या बरोबर काही लहान मुलंही होती. त्यांच्या पायात तर चप्पलही नव्हती. हे अण्णांनी पाहिले तसं आम्हीही पाहिलं होतं. परंतु ते चित्र क्रांतिवीरांच्या काळजाला भिडले तेवढे आमच्या नव्हते. अण्णा आम्हा सर्वांना उद्देशून म्हणाले, ''देशाला स्वातंत्र्य मिळून आज चाळीस पंच्चेचाळीस वर्षे झाली. आम्ही स्वातंत्र्यासाठी लढलो ते असले बघण्यासाठी नाही. अण्णा बोलत होते. ते भावनावश झाले होते. त्यांच्या तोंडून शब्द फुटत नव्हते.

आम्ही कार्यक्रमाच्या ठिकाणी गेलो. कार्यक्रम करून परत वाळव्याला येण्यासाठी माघारी फिरलो दिवस बुडता बुडता वाळव्यात साखर शाळेत आलो. पण अजूनही अण्णा अस्वस्थ होते. त्यांच्या डोळ्यांपुढे दुष्काळी तालुक्यातील आटपाडीला पाहिलेलं दृष्य जसेच्या तसे त्यांना दिसत होते. हे खरं असल तरी त्यांनी आपल्या मनाची व्यथा कोणाला

सांगितली नव्हती. हुतात्मा साखर कारखान्याची चारच दिवसांवर जनरल बॉडी आली होती. जनरल सभेचा दिवस उगवला. चार वाजले. सभा सुरू झाली. एका एका विषयावर चर्चा करत सर्व विषय संपले. चर्चा चांगली झाली. सर्व विषय एकमताने पास झाले आणि क्रांतिवीर नागनाथअण्णा सभेचा समारोप करण्यासाठी माईक जवळ आले. जनरल सभेला जमलेल्या सर्व शेतकऱ्यांना उद्देशून म्हणाले, ''मी काय सांगतोय ते नीट लक्ष देऊन ऐका. हुतात्मा कारखाना काढलाय तो नुसत्या पंधरा गावांच्या विकासासाठी आपण काढला नाही. तुमच्या विकासा बरोबर इतरही शेतकऱ्यांचा विकास झाला पाहिजे आणि तो त्यांचा हक्क आहे. ती वेळ आता जवळ आली आहे. आपण निदान माणुसकी म्हणून आपल्या भाकरीतील अर्धी भाकरी दुसऱ्याला दिली पाहिजे. आपण सुकाळात आहोत. आपल्या शेजारीच असलेले सांगली, सातारा, सोलापूर मधील तेरा दुष्काळी तालुके पिढ्यान्‌पिढ्या दुष्काळात दिवस काढत आहेत. कृष्णा खोऱ्यातील त्यांच्या हक्काच्या पाण्यापासून ते वंचित राहिले आहेत. झालं ते झालं. निदान इथून पुढे हुतात्मा साखर कारखाना तुम्ही चालवायाचा आहे आणि मला दुष्काळी तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या व शेतीच्या पाण्याच्या प्रश्नांसाठी मोकळे सोडायचं आहे. मी त्यांच्या हक्कासाठी लढणार आहे. पाणीसंघर्ष चळवळ सुरू करणार आहे. त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा आर्थिक बोजा हुतात्मा कारखान्याच्या माध्यमातून करायचा आहे. त्यासाठी तुमच्या सर्वांच्या पाठिंब्याची गरज आहे. जनरल सभेसाठी नागठाणचे ज्ञानाबा महाराज, ईश्वर बापू, भानुदास भाडळकर, सदू काका जाधव पुढे बसले होते. त्यांना उद्देशून अण्णा म्हणाले, ''महाराज आपलं साऱ्यांचं ठीक आहे. तुम्ही सर्वांनी दुष्काळी भागाच्या चळवळीला आणि त्यासाठी होणाऱ्या खर्चाला पाठिंबा द्यावा.'' अण्णा मध्येच म्हणाले, ''महाराज, साऱ्या शेतकऱ्यांचा पाठिंबा आहे ना? मग साऱ्यांनी हात वर करून संमती द्या. साऱ्या शेतकऱ्यांनी हात वर करून एकमुखी पाणी संघर्ष चळवळीच्या खर्चासाठी पाठिंबा दिला. तसा जनरल बॉडीत मांडलेल्या ठरावाला शेतकऱ्यांच्या बरोबर संचालक मंडळाने पाठिंबा दिला आणि तसा ठराव तारीख १५.८.१९९३ रोजी पास केला आणि तो प्रोसिडींग बुकावर नोंद केला.

क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांनी शेतकऱ्यांच्या पाठिंब्यावर आणि हुतात्मा कारखान्याच्या आर्थिक बळावर सांगली,सातारा,सोलापूर या तिन्ही जिल्ह्यांतील तेरा दुष्काळी तालुक्यांच्या कृष्णा खोऱ्यातील त्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी ऐतिहासिक अशी पाणीसंघर्षाची चळवळ छेडली ती स्तुत्य होती. आता अण्णांनी ठरवले दुष्काळी भागातील पुढाऱ्यांनी काही केलं नाही सरकारनं काही केल नाही अशी टीका टिपणी न करत बसता शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी संघटनेच्या मार्फत पाण्याचा प्रश्न धसाला लावायचा.

१९४२ पासून क्रांतिवीर अण्णांचा या भागात वावर होता. त्यामुळे त्यांना अनेक गोष्टी माहीत होत्या. तिथल्या भौगोलिक परिसराचा त्यांच्या नजरेत सर्व्हे होता. दुष्काळी भागातील जनतेच्या मागासलेपणाचा, त्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्यांच्या वाट्याचं हक्काचं कृष्णा खोऱ्यातल पाणी ज्यांनी बळकावले त्यांनी आपले मळे फुलवले, या पुढे हे चालू द्यायचं नाही. अण्णांनी आटपाडी तालुक्यापासून सुरुवात केली. आटपाडीच्या जनतेवर आपला आणि आपल्या कार्यकर्त्यांचा कसलाही बोजा पडू द्यायचा नाही. ते आटपाडीला येताना जेवणखाण्याचे, चहापाण्याचे साहित्य आपल्या बरोबर ठेवायाचे. अण्णा आटपाडीला आले ते सर्व तयारीनिशी आले. आटपाडीची जनता साधी भोळी. तिला चळवळीचा व डाव्या विचाराचा फारसा अनुभव नव्हता. सुरूमध्ये स्थानिक वक्तेही नव्हते. अण्णांनी आटपाडीला येतानाच डाव्या चळवळीत काम करणारे, सामाजिक बांधिलकी असलेले कार्यकर्ते डॉ.भारत पाटणकर, कॉ.नाना शेटे, डॉ.बाबूराव गुरव, जयंत निकम, स्वत: अण्णा, सोबत सभा संघटतीत करण्यासाठी, स्पीकरची गाडी वेगळी, त्यात पुकारणारे संभा डवंग, सुरेश जाधव, एक शाहिरी कलापथक आणि जेवणा खाण्याची रसद पुरवणारे व इतर कामांसाठी वसंत पवार, मी(जयवंत अहिर), उत्तम घोलप, मन्सुर चाऊस, जगू शिंदे, विलास डवंग, बबन कदम, ईलाई चाऊस, पोपट धनवडे, हुसेन तानेखान, सुभाष मुळीक, अशोक चव्हाण, चार ड्रायव्हर, महेश कांबळे, अनिल खरळकर, कृष्णा जठारकर, कदम पैलवान, किरण मुळीक आणि खास वाळव्याहून जेवण आणण्यासाठी मिलिटरीमन बजरंग नेर्लेकरासारखा दक्ष ड्रायव्हर म्हणण्यापेक्षा खरंतरं तो एक कार्यकर्ताच होता. प्रत्येक जण मनापासून आपली जबाबदारी पार पाडत होते. त्यामुळे पाणीसंघर्ष चळवळ अपसूक चालू होती.

आटपाडी तालुक्यातील गावअन् गाव, वाड्यावस्त्यांवर सभांच्या कामाला सुरुवात झाली. शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्याचे काम सुरू झाले. क्रांतिसिंह नाना पाटलांनी पारतंत्र्याच्या काळात १९३० सालापासून १९४२ सालापर्यंत १२ वर्षे स्वातंत्र्यासाठी लोकजागृतीचे रान ज्या चिकाटीने उठवण्याचे काम केले, त्याच पद्धतीने क्रांतिवीर नागनाथअण्णांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी दुष्काळी टापूतल्या शेतकऱ्यांना पाणीसंघर्ष चळवळीसाठी संघटित करण्याचे काम मनापासून केले. आटपाडी तालुक्या प्रमाणे खंडाळा, खटाव, माण, तासगाव, फलटण, खानापूर, माढा, मंगळवेढा, जत, कवठेमहांकाळ, मिरज, सांगोला ह्या दुष्काळी तालुक्यांत सभा घेऊन रान उठवले. सांगोल्याचे भाग्यविधाते भाई गणपतराव देशमुख(आबा)यांनी सुरुवातीपासून अण्णांच्या खांद्याला खांद्या लाऊन पाणीसंघर्ष चळवळीला साथ केली. क्रांतिवीर

नागनाथअण्णा व भाई गणपतराव आबा, आपल्या भाषणांत बोलताना दुष्काळी जनतेला सांगायचे, ''कृष्णा खोऱ्यातील तुमच्या हक्काचे पाणी आहे. आजपर्यंत तुमच्या आज्ञानाचा फायदा घेऊन तुम्हांला कृष्णेच्या पाण्यापासून पिड्यान् पिड्या जाणीवपूर्वक वंचित ठेवले आहे. या पुढे आपले हक्काचे पाणी पिण्यासाठी आणि शेतीसाठी मिळालेच पाहिजे. त्यासाठी आपण एकत्र येऊन पाण्यासाठी पाणीसंघर्ष लढा द्यायचा आहे.''

सुरुवातीलाच पाणीसंघर्ष चळवळ छेडतानाच विचारपूर्वक नागनाथअण्णांनी पाणीसंघर्ष चळवळीत दमदार पाऊल टाकले होते. ते मागे घेण्यासाठी नव्हते. शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांवर नागनाथअण्णांनी अनेक चळवळी केल्या होत्या आणि त्या यशस्वी केल्या होत्या. त्यांच्याकडे अनुभवांची मोठी शिदोरी होती. तरीही सुरुवातीला आटपाडी भागातील समज कमी असणाऱ्या लोकांच्या मनात संभ्रम तयार झाला होता. कृष्णा नदी कुठे, आम्ही कुठे आणि नागनाथअण्णा म्हणतायत, तुम्हांला पिण्यासाठी आणि शेतीसाठी कृष्णेचे पाणी देतो. परंतु आमच्यापासून येवढ्या दूरवर असलेल्या कृष्णेचं पाणी आमच्या शेतीला मिळणार कसे? रस्त्यातल्या अडचणी, छोटे मोठे ओढे नाले, उंच उंच डोंगर दऱ्या, लहान मोठ्या दऱ्या, हे पार करून पाणी येणार कसे आणि नागनाथअण्णा आमच्या शेती भातीला पाणी देणार कसे? यात अण्णांचे काही तरी राजकारण असेल काय? त्यांना आमच्या भागातून निवडणूक लढवायची आहे काय? काही तरी अण्णांचा यात हेतू असला पाहिजे. तसं पहिलं तर अण्णांचा तालुका समृद्ध, त्यांचा साखर कारखाना चांगला चाललाय, त्यांच्या शेतकऱ्यांना उसाला भावही चांगला मिळतोय, अण्णाचं गाव कृष्णेच्या काठावर आहे. त्यांच्यावर निसर्गाची अशी गार सावली असताना काहीतरी हेतू असल्याशिवाय नागनाथअण्णा आटपाडीच्या उन्हात कसे? अशा मन:स्थितीत आटपाडीची जनता होती. त्यांनी अण्णांना पुरतं ओळखलं नव्हतं. क्रांतिवीर अण्णांनी विचार केला आम्ही दुष्काळी जनतेला पाणी मिळावं या निरपेक्ष भावनेने व ज्या जिद्दीन प्रयत्न करतोय त्या मानान लोकांची साथ का नाही? आपण कुठे कमी पडतोय का? लोकांना आपल्याबद्दल काय शंका आहे काय? असे अण्णांच्या मनात आले म्हणून दुष्काळी जनतेच्या मनातला संभ्रम घालवण्यासाठी क्रांतिवीर नागनाथअण्णा एका जाहीर सभेत म्हणाले, ''काही मंडळींना वाटत असेल पाणीसंघर्ष चळवळी पाठीमागे नागनाथचा काही ती हेतू असला पाहिजे. माझ्या दुष्काळी बंधुनो, हा नागनाथ तुम्हांला जाहीरपणे सांगतो. तुमचं राजकारण, पक्ष, पार्टी, काय असायची ती असो. मला त्याचं देणे-घेणे काही नाही, तुम्ही आमक्याला मत द्यावं तमक्याला मत द्यावं असं काहीही सांगायला मी आलो नाही. तुमच्या कोणत्याही दुष्काळी तालुक्यातून कसलीही निवडणूक लढवायाच्या हेतूने

आलो नाही. मी तुमच्या तालुक्यातून भविष्यातही कधीच निवडणुकीचे राजकारण करणार नाही. एवढंच काय दुष्काळी तेरा तालुक्यांतील कोणत्याही तालुक्यातून मी निवडणूक लढवणार नाही. मी तुम्हांला आवाहन करतो सुभाषचंद्र बोसनी भारतीय जनतेला जसे आवाहन केले होते. तुम मुझे खून दो मैं तुम्हें आझादी दुंगा. त्या प्रमाणे तुम्ही मला ताकद द्या मी तुम्हांला पाणी देतो. येवढ्याचसाठी नागनाथने नि:स्वार्थपणाने, शुद्ध भावनेने ही पाणीसंघर्ष चळवळ छेडली आहे.




'कृष्णा खोरे संघर्ष पाणी परिषद,' **क्रांतिवीर नागनाथअण्णा** सह **मा.वैभवकाका, मा.साथी निळू फूले,** अध्यक्ष **मा. गणपतराव आबा** इ.

अशा स्पष्ट प्रभावी बोलण्याचा लोकांच्यावर जो परिणाम व्हायचा तो झाला. लोकांची मानसिकता बदलली. त्यातून पाणीसंघर्ष चळवळीत प्रत्येक तालुक्यातील गावा गावांतील, वाड्या वस्त्यांवरील घटक चळवळीला जोडला गेला. त्यातून पाणीसंघर्षाची मशाल पेटली. लोक पाण्यासाठी पेटून उठले. हिरिरीने पाणीसंघर्ष चळवळीत भाग घ्यायला लागले. क्रांतिवीर अण्णांनी शांततेनं लोकशाही मार्गाने पाणीसंर्घष चळवळीचा एक एक टप्पा लोकांना रुचेल, पचेल अशा पद्धतीने पाण्यासाठी संघर्ष करण्याचे धोरण अवलंबले.

आता तेरा दुष्काळी तालुक्यांत पाणीसंघर्ष चळवळीने मूळ धरले होते. सरकारला जाग यावी म्हणून पहिला जोराचा धक्का देण्यासाठी क्रांतिवीर नागनाथअण्णांनी

व सांगोल्याचे आमदार भाई गणपतराव देशमुख(आबा),डॉ.भारत पाटणकर,कॉ.नाना शेटे, डॉ.बाबूराव गुरव, जयंत निकम आणि तेरा तालुक्यांतील पाणीसंघर्ष चळवळीत सक्रिय असलेले १)**खंडाळा तालुका**-ॲड.बाळासाहेब बागवान, कॉ.गुलाबराव ढमाल, कॉ.शंकर चौधरी, २)**खटाव तालुका**-प्रा.संभाजीराव जाधव,प्रा.दत्ताजीराव जाधव,हणमंतराव साळुंखे, कॉ.खाशाबा शिंदे,प्रतापराव बागल,प्रतापराव ढमाल ३)**माण तालुका**-प्रा.विश्वासराव बाबर, ४)**फलटण तालुका**-कॉ.बाबूराव कदम, कॉ.रामभाऊ कदम, ५)**खानापूर तालुका**- ॲड.सुभाष पाटील,गणपतराव घागरे,दिलीप सव्वाशे,अरुण माने, रावसाहेब शिंदे, कॉ.सपंतराव पवार, अनिल बाबर माजी आमदार ६)**आटपाडी तालुका**-कै.अण्णासाहेब लेंगरे (माजी आमदार), सीताराम बापू पुजारी, शेख साहेब(माजी सभापती), नारायण (सावकर) पुजारी, राजेंद्र अण्णा देशमुख(माजी आमदार), आर.एस.चोपडे सर, साहेबराव चौगुले, विलास गुरव, विलास पाटील, सावंता पुसावळे, हणमंतराव देशमुख, व्ही.एस.देशमुख, यशवंत देशमुख(बापू), नाथाजी बाड, शिवाजीराव पाटील,लक्ष्मण पाटील(तात्या), वसंतराव हाके,शिवाजी फुले, महादेवराव देशमुख(दाजी),चंद्रकांत गायकवाड, प्रा.शेंडे सर, सिदाप्पा पुजारी, प्रा.एल.डी.सारक, आनंदराव पाटील, विष्णुपंत पाटील, भानुदास खेडकर (हिवतड),पत्की अण्णा, विजयराव पाटील, रामभाऊ मरगळे, शाहीर रामभाऊ झोडगे, जालिंदर विभूते, साहेबराव विभुते, ७) **माढा तालुका**- हणमंतराव बारकुले,लक्ष्मण देवकुळे, धनाजीराव साठे, भाई पांडुरंग पाटील, माजी आमदार भारत पाटील, ८) **मंगळवेढा**-प्रा.शिवाजीराव काळुंगे सर,दामोदर देशमुख,ॲड.भारत पवार, ॲड.नंदकुमार पवार, ना.लक्ष्मण ढोबळे(माजी मंत्री) ९) **जत तालुका**- बबनराव गायकवाड, भैराप्पा माळी, कल्लाप्पा अण्णा होरती, उमाजी सनमाडीकर (माजी आमदार), मोहनराव गायकवाड, सौ.महानंदा मिरजकर, १०)**कवठेमहांकाळ तालुका**-चंद्रकांत लोढे, नामदेवराव करगणे, दादासाहेब ढेरे, हाय्युम सावनूरकर, प्रा.प्रतापराव ढेरे, ११)**मिरज तालुका**-प्रा.शरद पाटील(माजी आमदार), जनार्धन गोंधळी, शंकर कैकाडी, के.बी.पाटील, जयपाल चौगुले, रमेश कदम, १२)**सांगोला तालुका**-भाई गणपतराव देशमुख आबा(आमदार) व त्यांचे कार्यकर्ते, भाई जगन्नाथ लिगाडे इ.१३)**तासगाव तालुका**-ना.आर.आर.पाटील(आबा), डॉ.बाबुराव गुरव, जालिंदर जमदाडे व आर.आर.आबाचे कार्यकर्ते ह्या साऱ्यांना घेऊन आणि क्रांतिवीर अण्णांचे सहकारी कार्यकर्ते, कॉ.नाना शेटे, एस.आर.पाटील, जयवंत अहिर, वसंत पवार, बाळासाहेब नायकवडी, भारत पाटील, धनाजी गुरव, मन्सुर चाऊस, उत्तम घोलप, बजरंग नेर्लेकर, मुबारक पठाण, कृष्णा जठार, महेश कांबळे वगैरे आणि दुष्काळी तालुक्यातील आम जनता. त्यात सारे स्त्री-पुरुष तरुण मुलं-मुली यांना एकत्र करून पहिला जोराचा धक्का देण्यासाठी रविवार

११जुलै १९९३ साली आटपाडी येथे पहिली पाणीपरिषद घेतली. त्या परिषदेमध्ये क्रांतिवीर अण्णा बोलताना, ''म्हणाले १५० वर्षे ज्या ब्रिटिशांनी राज्य केले त्यांना हाकलून देण्यासाठी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात जे जन आंदोलनांचे सामर्थ्य लाभल्यामुळे ब्रिटिशांना देश सोडण्याची वेळ आली तीच शक्ती आटपाडी तालुक्याचा पाणी प्रश्न सोडविण्याकरिता वापरण्याची गरज आहे. असे सडेतोड विचार क्रांतिवीर नागनाथअण्णांनी आटपाडी येथे आयोजित पाणीपरिषदेचे प्रमुख संघटक म्हणून बोलत असताना मांडले. तीन टप्प्यात आटपाडीचा पाणी प्रश्न सोडविण्याची घोषणा करून ते म्हणाले की, पहिल्या टप्प्यांत निवेदन तयार करणे, दुसऱ्या टप्प्यात ९ ऑगस्ट रोजी ती तलाठ्याना सादर करणे व तिसऱ्या टप्प्यात त्याचे काय झाले याची चौकशी करण्यासाठी १५ ऑगस्ट रोजी तालुका स्तरावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची त्यांनी घोषणा केली. पाणी मिळविण्यासाठी शासनाबरोबर एकजुटीने संघर्ष करण्याशिवाय कोणताही पर्याय राहिलेला नाही. प्रसंगी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी काहीही, कितीही टोकाचा संघर्ष करावा लागला तो करायचा. परंतु कोणत्याही परिस्थितीत माघार घेण्यात येणार नाही. असे रोखठोक आवाहन शासनाला क्रांतिवीर नागनाथअण्णांनी दिले. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक माजी आमदार लेंगरे यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.भारत पाटणकर यांनी केले. त्यावेळेला मध्येच शेतमजूर,कष्टकरी-शेतकरी संघटनेचा विजय असो, आटपाडी तालुका झिंदाबाद, आटपाडी तालुक्याचा कायमचा दुष्काळ हाटला पाहिजे, कृष्णा खोऱ्याचे हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे, दुष्काळ निर्मूलन चळवळीचा विजय असो, 'पाणी आमच्या हक्काचे,नाही कुणाच्या बापाचे,' जमीन व पाण्याचे शास्त्रीय नियोजन झालेच पाहिजे, मिळालेच पाहिजे, मिळालेच पाहिजे पाणी आम्हांला मिळालेच पाहिजे, २००० सालाच्या आत कृष्णा खोऱ्याच्या पाण्याचे वाटप झालेच पाहिजे,कामगार, शेतमजूर,कष्टकरी,शेतकरी एकजुटीचा विजय असो. अशा हजारो शेतकरी बांधवांनी घोषणा देऊन मैदान दणाणून सोडले. त्यावेळी क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या सूचनेप्रमाणे डॉ.भारत पाटणकर यांनी ठराव मांडले ते असे. १)आटपाडी तालुक्याच्या समग्र पाणलोट क्षेत्र विकासाची तातडीने अंमलबजावनी झाली पाहिजे. २)तालुक्यात झालेल्या सर्व पाटबंधारे तलावांचे पाणी समान वाटले पाहिजे ३)हे पाणी वापरण्याची आखणी व नियंत्रण लाभधारकांच्या हाती दिले पाहिजे. ४)आटपाडी तालुक्यातील सर्व अपूर्ण पाटबंधारे व पाझरतलाव पूर्ण करण्याचे काम तातडीने सुरू केले पाहिजे. ५)नादुरुस्त झालेले, फुटलेले तलाव तातडीने दुरुस्त केलेच पाहिजे ६)आटपाडी तालुक्याच्या पश्चिम भागाला धोम धरणाचे आणि पूर्व भागाला उजनीचे पाणी मिळालेच पाहिजे. या ठरावांना क्रांतिवीर अण्णांनी लोकांना आवाहन करून, हात वर करून संमती द्यायला

सांगितले. लोकांनी एकमुखी हात वर करून घोषणांच्या निनादाने मंजुरी दिली. पुढे ते ठराव शासनाला पाठविले. या परिषदेसाठी कॉ.शेख काका, ॲड.धैर्यशील पाटील, बाबूराव गुरव यांची भाषणे झाली. जयंत निकम, मारुती माने, भारत पाटणकर, अण्णासाहेब पत्की, विलास खरात, भारत पाटील यांनी ठराव मांडले. या परिषदेला लोकांची उपस्थिती इतकी प्रचंड होती की, सरकारला धडकी भरावी. आटपाडीचे भवानी विद्यालयाचे मैदान खचाखच भरून ओसंडले होते बघेल तिकडे माणसंच माणसं होती. विशेषत: परिषदेला स्त्रियांची उपस्थिती लक्षणीय होती. शेवटी परिषद संपण्या अगोदर क्रांतिवीर नागनाथअण्णा जनसमुदायाला म्हणाले, ''ही पाणीसंघर्ष चळवळ रानात पाणी येईपर्यंत चालूच राहणार आहे. या परिषदेमुळे आपले काम झाले अशा भ्रमात न राहता सातत्याने पाणी मिळेपर्यंत आपण एकजुटीने शासनाबरोबर संघर्ष करायचा आहे.'' मध्येच डॉ.भारत पाटणकरांनी दोन घोषणा दिल्या. 'रानात पाणी बघणार मगच चळवळ थांबणार,' 'पाणी आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं' या दोन घोषणांनंतर पुढील कार्यक्रम जाहीर करून सभा संपल्याचे जाहीर केले.

अशा परिषदा आटपाडीला दरवर्षी २६ जुलैला क्रांतिवीर नागनाथअण्णा घेत होते त्या प्रत्येक परिषदेला एक दोन वेळचा अपवाद सोडला, तर भाई गणपतराव देशमुख हेच अध्यक्षस्थानी असायचे. १९९३ च्या पाहिल्या पाणीपरिषदेनंतर छ.शाहू महाराज यांच्या जन्माची तारीख पूर्वी २६ जुलै गृहीत धरल्यामुळे दर वर्षी २६ जुलैला परिषदा होत होत्या. पुढे इतिहास संशोधकांनी शाहू महाराजांच्या जन्माची तारीख ऐतिहासिक जुन्या कगदपत्रां नुसार २६ जून असल्याचा शोध लावला. यामुळे पुढे आटपाडी पाणी संघर्ष चळवळ परिषदा २६ जून रोजी घ्यायला सुरुवात केली. १९९४, ते २०१२ पर्यंत सातत्याने या पाणीपरिषदा चालूच होत्या आणि पुढेही चालू आहेत.

बुधवार दिनांक २६ जुलै २००० राजर्षी छ.शाहू महाराज यांच्या जन्मदिनी आटपाडी येथील भवानी हायस्कूलच्या मैदानावर १३ दुष्काळी तालुक्यांची ही आठवी भव्य परिषद क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांनी आयोजित केली होती. परिषदेत सर्वच वक्त्यांनी दुष्काळी तालुक्यांतील जनतेबद्दल उदासीनता दाखविणाऱ्या राज्यशासनावर कडाडून टीका केली. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध चित्रपट अभिनेते साथी निळू फुले हे होते. परिषदेचे उद्‌घाटन राज्याचे पणन मंत्री गणपतराव देशमुख यांच्या हस्ते झाले. ते आपल्या उद्‌घाटन भाषणात म्हणाले, ''दुष्काळी भागातील जनतेची वर्षानुवर्षी असलेली पाण्याची मागणी पूर्ण झाली पाहिजे. ही मागणी रास्त असून त्यासाठी जे काही करावे लागेल ते करण्याची माझी तयारी आहे. कृष्णा खोरे योजनेनंतर विस्थापित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे व्यवस्थित पुनर्वसन झाले पाहिजे. लोकसंख्येच्या प्रमाणात पाण्यचे समान वाटप झालेच

पाहिजे'' असे प्रतिपादन करून ना.देशमुख म्हणाले, ''केंद्राकडून लादण्यात आलेल्या अन्यायी दरवाढीस राज्य शासनाने तीव्र विरोध दर्शविला आहे. जनतेची बाजू लक्षात घेऊन शासनाने ही दरवाढ तात्पुरती स्थगिती केली आहे.'' यावर कायमची रद्द करावी अशी मागणी क्रांतिवीर नागनाथअण्णांनी प्रचंड टाळ्यांच्या गजरात केली. माजी आमदार शरद पाटील या वेळी बोलताना म्हणाले, ''राज्यात सत्ताबदल झाला. पुरोगामी विचाराची माणसे सत्तेवर आली. तथापि दुर्दैवाने कृष्णेचे पाणी उचलण्यासाठी राज्य शासन ठाम पावले उचलू शकले नाही. क्रांतिवीर नागनाथअण्णांनी आठ वर्षे झाली प्रयत्नांची पराकाष्ठा करून, दुष्काळी भागातील जनतेला संघटित केले. शासन अजून जागे होत नाही. अजूनही कृष्णेचे पाणी खूप लांब आहे, कालव्यांची कामे अपूर्ण आहेत. येत्या दिवाळीत दुष्काळी भागातील जनतेने कृष्णेच्या पाण्याने अंघोळ करावी अशा फसव्या घोषणा मंत्री करत आहेत. मिरज पूर्व भागातील कळंबी, सलगरे आणि खंडेराजुरीतील कालव्यांची कामे बंद करून कवठेमहांकाळमध्ये कामे जोरात चालू आहेत. हा मिरज पूर्व भागातील शेतकऱ्यांवर अन्याय आहे. आटपाडी येथील भव्य पाणीपरिषद राज्य शासनाला गंभीर इशारा देताना क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणाले, ''कृष्णा खोरे योजनेसाठी संघटित खाजगी उद्योगांना विकासकर आकारून पैसा उपलब्ध करून द्यावा. कालवे, बोगदे व पंप हाऊसची कामे तीन पाळ्यांमध्ये सुरू करावीत. ह्या मागणीची १६ ऑगस्ट पर्यंत अंमलबजावणी सुरू न केल्यास सांगली सातारा, सोलापूर जिल्ह्यांतील जनता रस्त्यावर उतरेल आणि आपल्या हक्काच्या पाण्यासाठी अभूतपूर्व रणसंग्राम सुरू होईल.'' त्यावेळी ते म्हणाले, ''दुष्काळी भागातील जनतेच्या भावनांशी खेळणाऱ्या शासनाला वठणीवर आणण्याचे अनेक मार्ग आपल्याकडे आहेत. मात्र आपल्या आंदोलनाचा कार्यक्रम १६ ऑगस्ट पासून प्रत्येक दुष्काळी तालुक्यापर्यंत पोहचविला जाईल. ही चळवळ आता झेप घेणार असून यशापर्यंत पोहचल्याशिवाय ती थांबणार नाही'' असा खणखणीत इशारा पाणीपरिषदेत शासनाला क्रांतिवीर नागनाथअण्णांनी दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात साथी निळू फुले म्हणाले, ''पाणी आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं ही घोषणा आता या भागातील आजोबा पासून नातवांच्या तोंडात सुरू आहे. क्रांतिवीर नागनाथअण्णांनी सुरू केलेल्या पाणीसंघर्ष चळवळीमुळे दुष्काळी भागातील जनतेच्या शब्दाला काही अंशी किंमत प्राप्त झाली आहे. धरणग्रस्तांना निर्वाह भत्ता देण्याचे शासनाने मान्य केले. हे या चळवळीचेच यश आहे. तथापि त्यासाठी खूप चिकाटीने संघर्ष करावा लागणार आहे. सर्व सत्ताधाऱ्यांनी आतापर्यंत दुष्काळी भागाकडे दुर्लक्ष केले. पुरोगामी कार्यकर्त्यांचा काटा कसा काढायचा यातच ते धन्यता मानून लागले. आज येथे व्यासपीठावरील अनेक पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते बसले आहेत. त्यांनी फुटू नये असा

धाक जनतेने बसविला पाहिजे. राज्यातील साऱ्या दुष्काळी तालुक्यांना पाणी मिळाले पाहिजे. त्यासाठी मी तुमच्या पाठीशी राहीन.'' असे आश्वासन देत निळू फुले यांनी आता राज्यात राजकीय क्रांती घडविण्याचे आवाहन केले. डॉ.भारत पाटणकर, डॉ.बाबूराव गुरव, कॉ.नाना शेटे, शिवाजीराव काळुंगे, उस्माननबी शेख, सावंता पुसावळे, या मान्यवरांची भाषणे झाली. डॉ.भारत पाटणकर यांनी पाणी परिषदेत पुढील ठराव मांडले १)समान वाटपाच्या पायावर कृष्णा खोऱ्यातील प्रत्येक कुटुंबाला शेती उपयोगी पाण्याचा समान वाटा मिळण्याच्या पद्धतीने पाणी वाटपाची फेर आखणी करण्याचा आदेश महाराष्ट्र शासनाने काढावा. पथदर्शक फेर आखणी म्हणून आटपाडी तालुक्याची फेर आखणी सुरू केली आहे. ती १५ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करावी. २)कालव्यांची,बोगद्यांची, पंप हाऊसची कामे तीन पाळ्यांमध्ये सुरू करावीत. निधी तातडीने उपलब्ध करून अशा प्रकारची अंमलबजावणी सुद्धा १५ ऑगस्ट पर्यंत सुरू करावी. ३)राज्य सहकारी बँकेने निधी देण्याच्या आड केंद्रसरकार येत असेल तर महाराष्ट्र सरकारनेच लढ्याची भूमिका घ्यावी. पैसे कमी पडत असतील तर संघटित खाजगी उद्योगांवर विकास कर आकारून पैसे तातडीने उपलब्ध करावेत. ४)वीज दर वाढ तात्पुरती स्थगित करून जुन्या(हॉर्स पॉवर ६००/-रु.) दराने बिले आकारण्याचा निर्णय कायम स्वरूपी म्हणून जाहीर करावा. ५)१६ ऑगस्ट पर्यंत ठरावांची अंमलबजावणी झाली नाही तर क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यांची चळवळ आजपर्यंत झाली त्यापेक्षाही अतिशय तीव्र करण्यात येईल. ६)कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती न करता कायम स्वरूपी शिक्षक भरती करावी.

पुढे प्रत्येक दुष्काळी तालुक्याच्या परिषदा घेतल्या. त्याही मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्या, तासगावची परिषद फ ारच गाजली. एवढी प्रचंड लोक, परिषदेला उपस्थिती होती. तसेच स्वत: आर.आर.आबाही आवर्जून हजर होते. क्रांतिवीर अण्णा, गणपतराव आबा, डॉ.भारत पाटणकर व पाणी संघर्ष चळवळीचे कार्यकर्ते बरोबर घेऊन नियोजन बद्ध काम करत होते. गावोगावी प्रभात फेऱ्या सुरू झाल्या, घोषणांचे फलक लावले. गावच्या, वाड्या वस्तींवरील भिंती घोषणानी रंगविल्या गेल्या. हजारो लोकांची सह्यांची निवेदनं शासनाला पाठवली, साखर कारखाने, सोसायट्या, ग्रामपंचायत्या, इतर लहान मोठ्या सहकारी संस्था, शिक्षण संस्था, इत्यादींचे पाणी मागणीचे ठराव शासनाला पाठवले. सरकारचा गाव पातळीवरचा प्रतिनिधी म्हणून गावोगावी तलाठ्यांना घेराव घातले. मामलेदार, प्रांत, कलेक्टर पर्यंत घेराव घातले. मंत्र्यांना निवेदन दिले. त्यांना दुष्काळी भागात फिरायला बंदी घातली अशा प्रकारे ज्या त्या पातळीवर पाणी प्रश्नाची तीव्रता सरकारला दाखवून देणं शक्य होतं त्या साऱ्या

मार्गांचा अवंलब केला. लोकजागृतीसाठी गावोगावी पोवाडे आणि क्रांतीची प्रेरणा देणारी कलापथके पाठवली. यातून पाणीसंघर्ष चळवळीला गती आली. क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली पाणीचळवळीने आता टोकाची भूमिका घेतली होती. शेवटचा पर्याय म्हणून दुष्काळी जनतेला न्याय मिळावा म्हणून साराबंदीचा निर्णय घेतला तो यशस्वी केला. पाण्यासाठी ज्या ज्या मार्गाचा अवलंब करता येईल तो अण्णांनी केला. त्यातून टेंबू योजनेचा जन्म झाला.

तेरा दुष्काळी तालुक्यांच्या पाणीप्रश्नाच्या लढ्याला आता वीस वर्षे होत आली. चळवळ चालू होती आणि पुढेही रानात पाणी येईपर्यंत चालूच राहणार. या चळवळीचे जनक क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांचे २२ मार्च २०१२ रोजी मुंबई येथे लीलावती हॉस्पिटल मध्ये निधन झाले. त्यावेळी आटपाडी तालुक्यावर शोककळा पसरली होती. गेल्या वीस वर्षांत लोकांना झालेले अण्णांचे दर्शन व त्यांच्या विचाराचा पडलेला अलौकिक प्रभाव लोकमाणसांच्या मनावर उमटला आहे. (कोरला आहे) आटपाडीला क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या भगिरथी प्रयत्नाने पाणी आले ते अण्णांच्या निधनानंतर आले. ते प्रथम घरणीकीच्या तलावात पोहोचले. शेख साहेबाचे उपस्थिती आटपाडीच्या इमानी जनतेने अण्णांचे चिरंजीव वैभव(काका)नायकवडी यांच्या हस्ते पाणी पूजनाचा कार्यक्रम घेतला. त्या कार्यक्रमाला वाळव्याचे प्रतिनिधी जयवंत अहिर (मामा), बाळासाहेब नायकवडी, एस.आर.पाटील, यशवंत उर्फ गुत्ता(अण्णा)बाबर, नंदू पाटील, सुरेश जाधव, संभाजी डवंग हजर होती. महेश कांबळे याने क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या सफारी गाडीची चारी पाय(चाके)घरणकीला आलेल्या कृष्णेच्या पाण्यात



कृष्णेचे पाणी दुष्काळी आटपाडी तालुक्यातील घाणंद तलावात प्रथम पोहोचले असता पाणीपूजन करताना मा.वैभवकाका नायकवडी, उस्मानबी शेख, आर.एस.चोपडे, व्ही.एन.देशमुख, दादासाहेब पवार, एस.आर.पाटील, जयवंत अहिर इ.

घातली. ते दृष्य बघून आटपाडीच्या जनतेचे डोळे पाण्यानी भरले. अण्णांच्या आठवणीने ते पाण्यातील सफारीकडे बघत क्रांतिवीर नागनाथ अण्णांना शोधत होते.

क्रांतिवीर नागनाथअण्णांनी दुष्काळ हाटवण्याची जी ऐतिहासिक पाणीसंघर्ष चळवळ छेडली ती नि:स्वार्थपणे चालवली. वीस वर्षांच्या संघर्षातून आटपाडीला व इतर तालुक्यांत कृष्णेचे पाणी आले. तो एक खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्याचा एक भाग झाला. अण्णांच्या मनातलं स्वप्न होते ते स्वप्न २० वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षनंतर हळूहळू मार्गी लागताना दिसत होते. दुष्काळी तेरा तालुक्यांतील प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी गेले पाहिजे तसेच अण्णांचे दुसरे स्वप्न पाण्याचे समान वाटप झाले पाहिजे. समान पाणीवाटपामध्ये अण्णा आपले विचार साध्या सोप्या भाषेत मांडताना उदाहरण देऊन सांगायचे. एखाद्या शेतकऱ्याची चार एक जमीन आहे परंतु त्याच्या वाट्याला दोनच एकराचे पाणी आले. आणि दुसरा एक शेतमजूर आहे त्याला जमीन नाही पण त्याच्या वाट्याला आलेले दोन एकरांचे पाणी शिल्लक आहे. ते पाणी मोबदला घेऊन शेतमजुराने संबंधित शेतकऱ्याला घ्यावे अशा पद्धतीने पाण्याचे समान वाटप व्हावे. आज अण्णा नाहीत परंतु त्यांचा विचार मागे आहे. आता जबाबदारी पाणीसंघर्ष चळवळ चालवणाऱ्या कार्यकर्त्यांच्यावर आहे. क्रांतिवीर अण्णांनी तर सर्वांना अनेकवेळा जाहीर सभेतून सांगितले आहे 'रानात पाणी बघणार मगच चळवळ थांबणार.'

दुष्काळी भागातील ओढ्यानाल्यांना,तलावांना पाणी आले. ते प्रत्यक्ष शेतात जाईल त्यावेळी क्रांतिवीर नागनाथअण्णांचे स्वप्न पुरे होऊन वर्षानुवर्षे पडीक पडलेल्या जमिनी सुजलाम् सुफलाम् होऊन येणाऱ्या उत्पादनातून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल. राष्ट्रीय उत्पादनात भर पडेल. मोल मजुरी करणाऱ्या हाताला काम मिळेल , बेकारी हटेल, गावागावांत शांतता नांदेल. एकूणच सर्व ठीक होईल. या उद्देशाने केलेली चळवळ शेवटच्या घटकाच्या शेतीला पाणी मिळेपर्यंत पाणी संघर्ष चळवळ चालवयाची असे ध्येय क्रांतिवीर अण्णांचे होते. त्यात कसलंही राजकारण नव्हते. पाणी संघर्ष चळवळीचे जनक क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा सामान्य जनतेला विसर पडलेला नाही. परंतु स्वार्थी पुढारी पाणी पूजनाचे कार्यक्रम घेण्यात दंग आहेत. ते श्रेय घेण्याचं राजकारण करत आहेत. अशा मंडळींपासून जनतेने दूर रहावे आणि संघटित होऊन अण्णांची मनीषा पूर्ण करावी. यातून साऱ्यांच्या प्राथमिक गरजा, अन्न, पाणी, निवास, शिक्षण, हाताला काम, आरोग्य, गोरगरीब स्त्री पुरुषांना भयमुक्त जीवन जगता येईल हेच क्रांतिवीर नागनाथअण्णांचे मनातले खरं खुरं स्वातंत्र्य आहे ह्या पेक्षा वेगळं काय?

वीस बावीस वर्षांच्या क्रांतिवीर नागनाथअण्णा, भाई गणपतराव देशमुख आणि तेरा दुष्काळी तालुक्यांतील कार्यकर्ते व आम जनतेच्या प्रयत्नांतून कृष्णेचे पाणी आले. पुढे काय 'रानात पाणी बघणार मगच चळवळ थांबणार' असा अण्णांचा निर्धार होता. आता अण्णा आपल्यात नाहीत म्हणून चळवळ थांबवायची नाही. चळवळीचा रेटा पुढे नेण्यासाठी भाई गणपतराव आबांच्या साथीला क्रांतिवीर अण्णांचे चिरंजीव वैभव काका आपल्या सर्व सहकाऱ्यांना बरोबर घेऊन सर्व तयारीनिशी पाणीसंघर्ष चळवळीत उतरले आहेत. आपण सर्व दुष्काळी तालुक्यातील जनता, कार्यकर्ते व पुढारी मंडळी त्यांच्या पाठीशी खंबीर उभी राहिली तर रानात पाणी यायला फार वाट बघावी लागणार नाही. ऐतिहासिक अशी पाणीसंघर्ष चळवळीची ज्योत सतत पेटत ठेवली पाहिजे. या ऐतिहासिक पाणीसंघर्ष चळवळीत अनेक लोक सहभागी होते. त्याच प्रमाणे वैभव नायकवडी, चित्रपट कलाकार निळू भाऊ फुले, राम नगरकर ही कलाकार मंडळी, बाळासाहेब नायकवडी, भारत पाटील इत्यादी आघाडीने काम करत होते. दिवस महिने वर्षे माग टाकत चळवळ अखंड चालू आहे. पुढेही चालूच राहणार. आज आपल्यात क्रांतिवीर नागनाथअण्णा नसले तरी पाणीसंघर्ष चळवळीसाठी वैभवकाका नायकवडी या अण्णांच्या वारसाचे नेतृत्व मिळाले आहे. वैभवकाका नायकवडी यांनी पाणीसंघर्ष चळवळीत दमदारपणे पावूल टाकून निर्धारपूर्वक चळवळीचे नेतृत्व स्वीकारले आहे. त्यांच्या पाठीमागे तेरा दुष्काळी तालुक्यांतील तरुणांची फौज सर्व तयारीने सहभागी होत आहे. त्यामुळे पाणीसंघर्ष चळवळीला चांगलं भरतं आलं आहे.

१५ जुलै १९९३ च्या दुष्काळी तालुक्यांच्या पाणी प्रश्नांच्या पहिल्या परिषदे पासून २६ जून २०१० पर्यंतच्या परिषदेनां क्रांतिवीर नागनाथअण्णा प्रत्यक्ष हजर होते. अण्णा व भाई गणपतराव देशमुख (आबा) यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आता पर्यंत कोणतेही राजकारण न आणता निस्वार्थपणे पाणी संघर्ष चळवळी चालू होत्या त्या तश्याच चालाव्यात यासाठी दुष्काळग्रस्त आम जनतेने सावध राहीले पाहिजे आज अण्णा गेले असले तरी दुष्काळी तालुक्यातील सर्व घटकांनी भाई गणपतराव देशमुख (आबा) व वैभवकाका नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली एकसंघपणे पाणी संघर्ष चळवळ चालवली पाहिजे तरच क्रांतिवीर नागनाथ अण्णांचे प्रत्येकाच्या रानात पाणी जाण्याचे स्वप्न पुर्ण होईल.

***

# पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा आणि आयकर चळवळ

१९९७-९८ साल होतं. वार सोमवार होता. क्रांतिवीर नागनाथअण्णा साखर शाळेत वर्तमानपत्र वाचत बसले होते. सकाळी ८.३० ची वेळ होती. वसंत पवार अण्णांच्या पेन्शनचे जमाखर्च लिहीत बसले होते. उत्तम घोलप अण्णांच्या जवळ उभा होता. मी (जयवंत अहिर) नुकताच येऊन वर्तमानपत्र चाळत होतो. कोण कोणाशी बोलत नव्हते. एवढ्यात कारखान्याचे इन्चार्ज एम.डी.वावरे साहेब, सेक्रेटरी भांगरे साहेब आणि अकौंटंट विठ्ठल गुंजवटे हे तिघेजण अण्णांना भेटायला आले. अण्णांनी वावरे साहेबांना पाहिले. वर्तमानपत्र बाजूला ठेवले. त्यांना जवळच्या खुर्चीवर बसवून घेतले. आणि मन्सूर चाऊसला तिघांच्यासाठी तीन ग्लास दूध आणायला सांगितले. मध्येच वावरे साहेब बोलण्यांचा प्रयत्न करत होते. त्यांना अण्णा म्हणाले, ''अगोदर दूध घ्या. नंतर काय ते बोला.''

वावरे साहेबांनी दुधाचा ग्लास संपविला आणि हातातील आयकर नोटिसीचा कागद अण्णांच्या हातात दिला. चर्चा सुरू झाली. ते म्हणाले, ''अण्णासाहेब हुतात्मा कारखान्याने आजपावेतो केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या एफ.आर.पी. प्रमाणे ऊसाच्या होणाऱ्या दरापेक्षा शेतकऱ्यांना ऊसाला जादा भाव दिला. त्या भावाची रक्कम आयकराने कारखान्याचा नफा समजून त्याच्यावर आयकर लादला आहे. त्या आयकराची नोटीस आपणाला अंदाजे ९० कोटींची आली आहे. त्याच प्रमाणे इतर कारखान्यांनाही आलेल्या आहेत. मध्येच सेक्रेटरी भांगरे साहेब अण्णांना म्हणाले,''आपल्या हुतात्मा कारखान्याची आर्थिक परिस्थिती चांगली असली तरी हुतात्मा कारखाना संपूर्ण विकला तरी आपणाला आयकर भरता येणार नाही. अशी अवस्था आहे. इतर कारखान्यांच काय होईल हे मला

सांगता येणार नाही.'' अण्णांनी शांतपणे या तिघांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांना एकच सांगितले. एक रुपया सुद्धा आयकर भरायचा नाही. सरकार काय करते ते पाहू. विठ्ठल गुंजवटे आणि भांगरे साहेब यांना अण्णा म्हणाले,''सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या चारी जिल्ह्यांतील साखर कारखान्यांच्या एम.डी.आणि चेअरमनना पत्र पाठवून आयकरासंबंधी चर्चा करण्यासाठी कोल्हापूर विद्याभवन मध्ये येत्या रविवार दुपारी २ वाजता हजर राहावे. अशी सर्वांना माझी सही घेऊन पत्रे पाठवा. चला आता. वेळ घालवू नका. कामाला लागा.

ठरल्या दिवशी रविवारी कोल्हापूरला विद्याभवनवर बऱ्याच कारखान्यांचे चेअरमन, एम.डी. जातीनिशी आले होते. अण्णांनी आयकराच्या विषयाला सुरुवात केली. सवीस्तर चर्चा झाल्यानंतर त्या सर्व कारखाना प्रतिनिधींना आपली मते मांडायला सांगितली. प्रत्येक कारखान्याच्या एम.डी. व चेअरमननी आयकर हा साखरकारखान्यांवर निष्कारण लादला आहे. केंद्र सरकारच्या या धोरणामुळे अनेक कारखाने मोडीत निघतील. कारखाना प्रतिनिधींच्या भाषणानंतर क्रांतिवीर नागनाथअण्णा सर्वांना उद्देशून म्हणाले, ''शासनाचे धोरण हे अत्यंत चुकीचे आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी शेतकऱ्यांची आहे. नफे घेणाऱ्या भांडवलदारांची नाही. शासनाच्या ध्यानात ही बाब आली पाहिजे होती. सहकारी साखर कारखान्यांने हे शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आपल्या उसाची साखर करण्यासाठी काढले आहेत. नफ्यासाठी नाहीत. इतर कारखान्यांत तयार झालेल्या मालांच्या किमती ते कारखाने आपला नफा ठेऊन ठरवतात आणि त्या प्रमाणे मार्केटमध्ये विकतात. ती परिस्थिती शेतकऱ्यांच्या उसापासून तयार झालेल्या साखरेसाठी नाही. साखरेचा भाव शासन व व्यापारी ठरवतात. साखरेपासून आलेल्या उत्पादनातून साखर तयार करण्यासाठी झालेला उत्पादन खर्च वजा जाता राहिलेल्या उत्पादनाला एकूण गळीत झालेल्या टनाने भागून येईल तो भाव शेतकऱ्यांना दिला जातो. कारखान्यांकडे तसा काही नफा राहत नाही. दिलेला भाव शेतकऱ्यांच्या झालेल्या खर्चाचा विचार करता शेतकऱ्यांना परवडतो का? याचा केंद्र सरकारने काही न विचार करता वर आयकराचा बोजा कारखान्यांवर टाकून शेतकऱ्यांचे साखर कारखान्याने मोडीत काढण्याचा विचार करते आहे. तेंव्हा आपण सर्वांनी एकमताने कारखान्याच्या मानगुटीवर बसलेले हे आयकराचे भूत सावरूया आणि त्यासाठी आपण संघटितपणे एकत्र येऊन शासनाला जाग आणुया. पुढे गरज पडलीतर कोल्हापूर कचेरीवर आठ एक दिवसांत शेतकऱ्यांचा आयकर विरोधी मोर्चा काढून कलेक्टर कचेरीच्या दारात बसू. हे साऱ्यांना मान्य आहे का? सर्वांनी अण्णांच्या निर्णयाला एकमुखी मान्यता दिली. सर्व साखर कारखाना प्रतिनिधी सरकार विरोधी आक्रमक भूमिकेत होते.

आयकराच्या विरोधात अण्णांनी छेडलेली ही चळवळ शेतकऱ्यांच्या न्याय्य मागणीसाठी होती. त्यामुळे लोकांच्यातून मोठ्या प्रमाणात निषेध मोर्चे व मेळावे व्हायला लागले. कोल्हापूर कलेक्टर कचेरीच्या मोर्चाच्या वेळी क्रांतिवीर नागनाथअण्णांनी जाहीर केले. कोणत्याही कारखाने एक रुपयाही आयकर भरायचा नाही. शासनाने आयकराच्या नोटिसी मागे घ्याव्यात. जो पर्यंत सरकार नोटिसा मागे घेत नाही तो पर्यंत आपण आपला लढा चालूच ठेवायचा. केवळ बोलण्यापेक्षा कृतीतून नागनाथअण्णा प्रत्येक लढ्यात उतरत होते. त्यांनी त्यावेळेला जाहीरही केले होते. जो पर्यंत आयकर रद्द होत नाही तो पर्यंत केंद्रातील मंत्र्यांना सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर भागात येऊ द्यायचं नाही. अशा पद्धतीने चळवळ पुढचा टप्पा गाठत होती. त्याच सुमाराला केंद्रीय पेट्रोलियम मंत्री राम नाईक हे आटपाडीला येणार आहेत. ही बातमी आटपाडीचे पाणीसंघर्ष चळवळीतील चोपडेसर यांनी अण्णांना फोन करून दिली होती. त्यावेळी पाच हजार शेतकऱ्यांच्या समवेत क्रांतिवीर नागनाथअण्णांनी त्यांना घेराव घातला. साखर कारखान्याच्या आयकराबद्दल नाईक साहेब काय ते बोला. मग तुम्हांला आटपाडीला जाता येईल. तसे नामदार राम नाईक हे पूर्वी पासूनचे संबंधित होते. शिवाय १९५७ ला दोघेही आमदार होते. राम नाईक यांनी अण्णांच्याबरोबर चर्चा करून सविस्तर आयकराची माहिती समजून घेतली. त्यांनाही अण्णांचे म्हणणे पटले. ते त्यावेळी सर्व शेतकऱ्यांना उद्देशून म्हणाले, ''आयकरासंबंधी तुमचे म्हणणे बरोबर आहे. माझ्याकडे आयकराचे खाते जरी नसले तरी मी दिल्लीत गेल्यानंतर संबंधित मिनिस्टरांशी बोलून साखर कारखान्यांच्यावर लादलेला आयकर रद्द करावा म्हणून प्रयत्न करतो. राम नाईक साहेब यांनी आश्वासन दिल्यानंतर आटपाडीला पुढील कार्यक्रमासाठी मा. मंत्री महोदय गेले.

नामदार बाळासाहेब विखे पाटील हे केंद्रात मंत्री असताना ते सांगलीला कार्यक्रमासाठी येणार होते. हे क्रांतिवीर अण्णांना समजल्यानंतर त्यांनी सांगलवाडी येथे आयर्विन पुलाच्या अलीकडे मोकळ्या जागेत ४ एक हजार शेतकरी कामगार आणि सांगली, कोल्हापूर, सोलापूर कारखान्यांचे प्रतिनिधी या सर्वांना बरोबर घेऊन आयकराबद्दल बाळासाहेब विखे पाटील यांना निवेदन देण्यासाठी थांबले होते. मोर्चा जसा लोकशाही पद्धतीने शांततेचा होता. परंतु पोलिस खात्याना काय वाटले कोणास ठाऊक. त्यांनी बाळासाहेब विखे पाटलांना कसलीही कल्पना न देता पेठनाक्यावरून सरळ इस्लामपूर मार्गे सांगलीला आणण्याऐवजी कोल्हापूर, जयसिंगपूर मार्गे सांगलीला आणले. ही बातमी अण्णांना समजली. अण्णांना ही गोष्ट आवडली नाही. त्यांनी आक्रमक भूमिका घेऊन पोलिसांचे कडे तोडून सांगलीत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी पोलिस आणि

शेतकऱ्यांच्यात तणाव वाढला. लोकशाही मार्गाने शेतकऱ्यांनी मोर्चा काढला असतानाही त्यावेळी विश्वास पांढरे या पोलिस अधिकाऱ्याने अण्णांना चांगली वागणूक दिली नाही. तसे लोक जास्तच चिडले त्यातून त्या अधिकाऱ्याने शेतकऱ्यांच्यावर लाठीमार केला. प्रकरण वाढणार म्हणून क्रांतिवीर नागनाथअण्णा मला म्हणाले, ''अरे जया, तू आणि पवार सर बाळासाहेब विखे पाटील कुठे आहेत त्यांना भेटून सर्व माहिती द्या.'' बाळासाहेबांना भेटून माहिती देताच त्यांनी कार्यक्रम अर्धा सोडला आणि ताबडतोब आमच्या बरोबर अण्णा ज्या ठिकाणी ठिय्या देऊन जेथे बसले होते तेथे आले. अण्णांना भेटताच ते म्हणाले, ''अण्णा, मला पोलिसांनी कसलीही कल्पना दिली नाही शिवाय मला चुकीच्या मार्गाने सांगलीत आणले. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. ते शेतकऱ्यांना बोलताना म्हणाले, ''क्रांतिवीर नागनाथअण्णा हे आमच्या वडिलांच्या पासून माहितीचे आहेत. त्यातून माझी त्यांची जिवाभावाची मैत्री झाली. त्यांचे मोर्चे लोकशाही पद्धतीने, शांततेने, संयमाने असतात हे मला माहीत आहे. त्यांनी आयकराचे आंदोलन छेडले आहे ते योग्यच आहे. ते आंदोलन त्यांनी नुसत्या हुतात्मा कारखान्यापुरता मर्यादित मुद्दा करून ते या रणांगणात उतरले नाहीत. त्यांनी साऱ्या महाराष्ट्रचं काय देशभरातील ज्या कारखान्यांवर सरकारने आयकर लादला आहे त्या साऱ्या कारखान्यांचा प्रश्न घेऊन ते लढत आहेत. त्यांचा मुद्दा योग्यच आहे. पुढे बाळासाहेब म्हणाले, ''आयकर रद्द झाला नाहीतर सहकारी साखर कारखान्यांचे कंबरडेच मोडणार आहे. सारी सहकारी साखर कारखानदारी यात संपणार आहे. मी तुम्हा साऱ्यांना जाहीरपणे वचन देतो. माझ्या परीन जेवढा प्रयत्न करता येईल तेवढा करून माझी सारी ताकद आयकर रद्द करण्यासाठी केंद्रात उभा करेण . मी या चळवळीत तुमच्याबरोबर आहे.'' आयकराच्या योग्य मुद्यावर योग्य भूमिकेतून क्रांतिवीर अण्णा शांततेने लढा देत असताना पोलिसांनी त्यांना चांगली वागणूक न देता उलट शेतकऱ्यांच्यावर लाठीमार केला हे बरोबर नाही. ऐवढे बोलून बाळासाहेब पुढे कार्यक्रमाला सांगलीला निघून गेले. बाळासाहेब विखे पाटील असतानाच मोर्चाला उद्देशून क्रांतिवीर अण्णा म्हणाले, ''आयकर रद्द झालाच पहिजे. एक पै ही आयकर भरायचा नाही आणि कोणाला भरून द्यायचा नाही. स्वातंत्र्य लढ्यातील मी एक स्वातंत्र्यसेनानी आहे. इंग्रज पोलिसांच्या गोळ्या छातीवर झेलल्या या पोलिसांना वटणीवर आणायचे मला अवघड नाही. परंतु आपले भांडण आहे ते केंद्र सरकारशी आयकरा बद्दल.

क्रांतिवीर नागनाथअण्णांना पोलिसांनी जी वागणूक दिली. जिल्हाभर मोठे काहुर उठले त्याचा एक भाग म्हणून वार्ताहर परिषद घेऊन प्रा.शरद पाटील म्हणाले,''आयकर विरोधी कृती समितीच्या वतीने स्वातंत्र्यसेनानी क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या

नेतृत्वाखाली सांगली,कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्याच्यावर लादलेला आयकर रद्द व्हावा या मागणीसाठी सांगलवाडीत केलेल्या रस्तारोको आंदोलनात पोलिस अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्याकडून कोणताही अनुचित प्रकार घडला नसताना आंदोलकांवर केलेला लाठी हल्ला व धक्काबुकी प्रकरणी बेजबाबदार पोलिस अधिकारी विश्वास पांढरे यांची चौकशी करावी व आंदोलकांवर दाखल केलेल्या केसेस त्वरित मागे घ्याव्यात. अशी मागणी मिरज तालुका माजी आमदार प्रा.शरद पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. पत्रकात पुढे असे स्पष्ट केले आहे की, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री बाळासाहेब विखे पाटील हे दि.१९ रोजी सांगली येथे आले असता आयकर विरोधी कृती समितीच्या वतीने स्वातंत्र्यसेनानी क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांतील सहकारी साखर कारखान्यांचे सभासद, शेतकरी, साखर कामगार यांचा सहकारी साखर कारखान्यांवर लादलेल्या आयकर रद्द व्हावा यासाठी मोर्चा काढण्यात आलेला होता. या शांततेने चाललेल्या मोर्चातील लोकांच्यावर कोणताही अनुचित प्रकार घडला नसताना पोलिस अधिकारी विश्वास पांढरे यांनी लाठी हल्ला व धक्काबुकी केली तसेच आंदोलकांविरुद्ध गुन्हे दाखल केलेले आहेत. ही घटना अती चीड आणणारी आहे. तेव्हा बेजबाबदार पोलिस अधिकारी यांची चौकशी करावी व आंदोलकांवर दाखल केलेल्या केसेस त्वरित मागे घेण्यात याव्यात अशी मागणी मिरज तालुका पाणी संघर्ष समितीचे नेते प्रा.शरद पाटील यांनी केले आहे.

सांगली जिल्ह्यातून अनेक संघटनांनी विश्वास पांढरे यांची चौकशी करावी म्हणून आपापल्या संघटनेच्या वतीने त्यांचा निषेध केला. त्यामध्ये प्रा.डॉ.बाबूराव गुरव, जीप चालक संघटनेचे अध्यक्ष दीनेश यादव, उपाध्यक्ष एस.आर.शिकलगार, जिल्हा संघटक सुहास पाटील होते. या सर्वांनी विश्वास पांढरेंची चौकशी करावी नाही केल्यास आम्ही रस्त्यावर येऊ. असे ते म्हणाले. त्याच प्रमाणे तासगांवच्या परिवर्तन ग्रुपने निषेध केला. त्यावेळी १५० कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बैठकीत प्रताप घाडगे, कृष्णा पाटील, राजू आदाटे, अनिल माने, प्रदीप पाटील, विकास तोडकर, राजू कांबळे हे म्हणाले, ''क्रांतिवीर अण्णांची कोणतीही आंदोलने हिंसक नव्हती व नाहीत. याचा विचार विश्वास पांढरे यांनी करायला हवा होता.'' दलित महासंघाचे शिराळा तालुका संपर्क प्रमुख दादासाहेब वायदंडे म्हणाले, ''साखर कारखान्यांवर लागू करण्यात आलेला आयकर रद्द करावयासाठी शांततेने आंदोलन करणाऱ्या क्रांतिवीर नागनाथअण्णांना तसेच कार्यकर्त्यांना धक्काबुकी करणाऱ्या पोलिस अधिकारी पांढरे यांना निलंबित करावे अशी मागणी त्यांनी केली. तसेच पोलिस निरीक्षक मदन पाटील या अधिकाऱ्यांनी केलेल्या वर्तनाची चौकशी करून

या अधिकाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही व्हावी. ब्रिटिशांच्या गोळ्यांना न घाबरणारे अण्णा या पोलिसांच्या बंदुकांना घाबरणार नाहीत. पुढे ते म्हणाले, ''पोलिस अधिकाऱ्यांना निलंबित करून त्यांनी केलेल्या लाठीमाराची चौकशी करावी. पांढरे यांना निलंबित न केल्यास दलित महासंघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेटण्याचा इशाराही श्री.वायदंडे यांनी दिला.''

शेवटी या आंदोलनाचे उठलेले वावटळ सरकारने लक्ष घालून गृहमंत्री आर.आर. पाटील यांनी शमवले.

सातत्याने क्रांतिवीर नागनाथअण्णांचे तमाम साखर कारखान्याच्या आयकर नोटिसा रद्द कराव्यात म्हणून प्रयत्न चालूच होते. त्याचा भाग म्हणून सोमवार २८ ऑगस्ट २००० रोजी सांगलीला कलेक्टर कचेरीवर भव्य असा मोर्चा काढला होता. त्यावेळी ते म्हणाले, ''केंद्रातील भाजप सरकारने साखर कारखान्यांच्यावर आयकर आकारून ऊस उत्पादकांचे कंबरडे मोडले तर आहेच परंतु महाराष्ट्रातील कॉंग्रेस सरकार पर्चेस टॅक्स आणि कपातीचे युतीचे धोरण स्वीकारूनच कारभार करीत आहे. शिवाय वीज दरवाढ अडीचपटीने होणार असून सामान्य माणूस महागाईने भरडून निघणार आहे. अशा जीवघेण्या संकटातून आपणाला कुणीही वाचविणार नाही. भक्कम अशा एकजुटीच्या सामर्थ्याशिवाय पर्याय नाही.'' कष्टकरी कामगार शेतकरी संघटनेतर्फे आज भर पावसात आमराई पासून सुरू झालेला मोर्चा पाणी अंगावर घेत सांगलीच्या प्रमुख रस्त्यांनी फिरून जिल्हाधिकारी कचेरी पुढे नेण्यात आला. त्या सभेत क्रांतिवीर अण्णा बोलत होते. मोर्चात महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लोक स्वयंभू शेतकरी, शेतमजूर, 'कष्टकरी संघटनेचा विजय असो' अशा घोषणा देत होते.

वीज बिले भरू नका, भरू देऊ नका, साखर कारखान्यांवर आयकर लादणाऱ्या धोरणाने शेतकरी उद्ध्वस्त होणार आहे. तर कॉंग्रेस सरकारच्या वीज दरवाढीच्या धोरणामुळे शेतकरी मेटाकुटीला येणार आहे. असे स्पष्ट करून क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणाले, ''राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या अडीअडचणींचा विचार करत नाहीत. भाजपला आणि कॉंग्रेसला गावागावांतून संपविण्यासाठी शेतकऱ्यांनो संघर्षाला तयार रहा. बिलाची एकही दमडी भरू नका व साखर कारखान्यांनाही आयकर भरू देऊ नका त्यासाठी त्यांच्याकडे मोर्चे न्या. हप्त्याने सुद्धा आयकर भरायचा नाही. हे कारखान्यांना बजावून सांगा. साखर संघाच्या बनवाबनवीला अजिबात फसू नका. विजेची दरवाढ उधळून लावण्यासाठी बिले भरायची नाहीत असा ठाम निर्धार करा. अन्यायाविरुद्ध रणशिंग फुंकलेच पाहिजे.

आयकर रद्द करण्यासाठी चालवलेली ही अत्यंत महत्त्वाची चळवळ. डिसेंबर १९९६ साली कांशिराम यांचेसोबत पुणे विद्यापीठाला छत्रपती शाहू महाराजांचे नाव देण्यासाठी चालवलेली चळवळ. पुणे येथे दहा हजार शेतकऱ्यांचा धडकवलेला मोर्चा. तशी ती चळवळ योग्य वेळी चालू केली होती परंतु शेतकऱ्यांच्या साखर कारखान्यावर केंद्र सरकार आयकराचे रुपाने कुऱ्हाड चालवत होते. साखर कारखानदारी मोडू पहात होते. त्यांचे कुटील डाव हाणुन पाडण्याचे काम महत्त्वाचे. त्याच बरोबर पुणे विद्यापीठाला छत्रपती शाहू महाराजांचे नाव देण्याच्या लढ्याची जबाबदारीही तितकीच योग्य होती. म्हणून अण्णांनी सर्व ताकद आयकर रद्द करण्याच्या कामाबरोबर नामकरणाचाही लढा धुपत ठेवला होता.

युतीच्या सरकारने पर्चेस टॅक्स आकारून शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून टनामागे १० रुपयाप्रमाणे कपात करण्याचे धोरण राबविले. तेच धोरण काँग्रेस पुढे का राबवत आहे. असा सवाल करून नागनाथअण्णा म्हणाले, ''सरकारचे फक्त नाव बदलले धोरण तेच राहणार असेल तर तसे एकदा स्पष्ट करा. त्याचा गंभीरपणाने विचार करावा लागेल. काँग्रेसने धोरण बदलले नाही तर त्यांनी लक्षात ठेवावे की, लोकांचा संयम सुटला आहे त्यांच्या अंसतोषाला सरकारच जबाबदार राहील. वीज दरवाढ रोखली नाहीतर मंत्र्याचे काय होईल ते सांगता येणार नाही. असा गंभीर ईशाराही त्यांनी दिला. वीज मंडळातील वायरमन पोरांच्यावर आम्ही हात उगारणार नाही. तिथला मूळ कोण याचा शोध घेणार असे ते म्हणाले. त्यावेळी त्यांनी जाहीर केले. आम्ही हुतात्मा कारखान्याला ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऊस बीलातून दहा रुपये कपात करणार नाही.

काँग्रेस सरकार चुकीचे धोरण अवलंबून दिवाळखोरीचा कारभार करीत आहे. असा आरोप करून क्रांतिवीर अण्णा म्हणाले, ''४६ वर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेसवाल्यांना कृष्णा खोरे प्रकल्पासाठी पैसे नाहीत म्हणण्याचा अधिकार नाही. आता एक टक्का सुद्धा आमचा त्यांच्यावर विश्वास राहिला नाही. महागाई व एकूणच परिस्थिती बदलण्यासाठी काँग्रेस नदीत सोडली पाहिजे. ४० वर्षे विस्थापित झालेल्या धरणग्रस्तांना शासनाने स्वातंत्र्यसैनिकांप्रमाणे सन्मानाने वागविले पाहिजे. त्यांना पेन्शन व इतर सवलती दिल्या पाहिजेत.'' अशी आग्रही प्रतिपादनही त्यांनी केले. सर्वश्री काँ.भारत पाटणकर, डॉ.बाबूराव गुरव, काँ.नाना शेटे यांचीही त्यावेळी भाषणे झाली.

त्याच सुमारला इचलकरंजीतील यंत्रमाग कामगारांना मारहाण करणाऱ्या पोलिसांच्या बद्दल संताप व्यक्त करून नागनाथअण्णा म्हणाले, ''शेतकरी व कामगार यांच्यावर लाटी उचलाल तर भविष्यात तुमचे ठीक होणार नाही. पोलिसही तुमची आमची

पोरं आहेत. त्यांच्या डोक्यात काही नसते. पण त्यांना कुणीतरी आदेश देते. आमच्या ब्लॅक लिस्टमध्ये त्या पोलिसांची नावे घेणार आहोत. नि:शस्त्र शेतकऱ्यांच्यावर,कामगारांवर लाठी चालविण्यात पुरुषार्थ आहे काय ? सारे पचेल अशा भ्रमात राहू नका. जेव्हा लाट उसळेल तेव्हा बदला घेतला जाईल. (मंगळवार दि.२९ ऑगस्ट २००० या अग्रदूत अंकाच्या संदर्भानुसार)

जो पर्यंत आयकरासाठी शेतकरी संघटित होऊन संघर्ष करत होते त्यावेळी आयकर खात्याने साखर कारखान्यांना नोटीस बजावण्याचे काम थांबवले होते. चळवळीचा रेटा कमी झाला. क्रांतिवीर नागनाथअण्णा २२ मार्च २०१२ रोजी आपणांला सोडून गेले. अण्णा होते तो पर्यंत आयकराचा लढा तीव्र होता.



ता. १९ ऑगस्ट २००१ रोजी
आयकर विरोधी साखर कारखान्याची कृती समिती आणि शेतमजूर,कष्टकरी-शेतकरी संघटनेच्या वतीने केंद्र सरकारच्या अन्यायकारक आयकर धोरणा विरोधी निदर्शने करत असताना निदर्शकांच्या वरती सांगली येथे पोलीस अधिकारी पांढरे यांनी केलेल्या लाठीमारास प्रतिकार करत असताना
**क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी**

# पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णांचा पहिला वाढदिवस

आटपाडी पाणीपरिषद २६ जुलै २००१ अगदी तोंडावर आली होती. त्या तयारीसाठी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या साखर शाळेत अण्णांनी बैठक बोलविली होती. त्या बैठकीस कॉ.नाना शेटे, डॉ.भारत पाटणकर, शामराव सव्वाशे काका, डॉ.बाबूराव गुरव, मी (जयवंत अहिर), श्री.वसंत पवार, श्री.महामूद चाऊस, श्री.विठ्ठल गुंजवटे, श्री.वावरे साहेब, श्री.भांगरे साहेब, नागठाण्याचे ज्ञानदेव महाराज, सदाशिव(काका)जाधव, ईश्वर बापू, भानुदास भाडळकर,उत्पादनचे श्री.बी.एस.माने, उत्तम घोलप, मन्सूर चाऊस, हुसेन तानेखान, नांगरे व बुवा ही धरणग्रस्त जोडी होती. सांगोपांग चर्चा झाली. यावर्षीची परिषद जोरदार करण्याचे ठरवून या परिषदेला सिने कलावंत निळू फुल्यांना हजर ठेवायचे अशी चर्चा चालू असताना मध्येच अण्णा म्हणाले, ''निळू भाऊना हजर ठेवण्याची जबाबदारी जया, तुझी आहे.'' पाणी परिषदेसाठी लागणाऱ्या वाहनांची व्यवस्था विठ्ठल गुंजवटे, महामूदभाई चाऊस व विलास पाटील यांच्यावर सोपवून मीटिंग संपल्याचे सांगितले.

मीटिंग संपल्यानंतर कॉ.नाना शेटे मध्येच म्हणाले, ''अहो मंडळी, येणाऱ्या १५ जुलै २००१ रोजी क्रांतिवीर नागनाथअण्णा ८० व्या वयात पदार्पण करतायत. आता पावेतो क्रांतिवीर नागनाथअण्णांनी आपला वाढदिवस कधीच साजरा केला नाही आणि ते हुन कधीच करणार नाहीत म्हणून कॉ.नाना शेटे व कार्यकर्त्यांनी आग्रहाने अण्णांना सांगितले, ''आम्ही तुमचे काही ऐकणार नाही. तुम्ही नाही म्हणायचे नाही. १९४२ स्वातंत्र्य लढ्यात तुम्ही भाग घेतला. जीवन मरणाच्या संकटाला तोंड दिले २२ मे १९४६ ला तुम्हाला आणि वाय.सी.पाटलांना ठार मारण्यासाठी गुंड आले होते.

त्यातून तुमच्या हुशारीमुळे तुम्ही वाचला. त्यावेळी बाबूराव कोकाटे आणि प्रताप पाटील ही दोन मुले हाकनाक गुंडाच्या बंदुकीला बळी पडली. दिवसा ढवळ्या २९ जुलै १९४४ ला तुम्ही साताराचा अभेध्य जेल फोडला. त्यावेळी पोलिसांच्या नजरेला पडला असता तर काय झाले असते ? धुळ्याच्या खजिना लुटीत पोलिसांनी तुमच्यावर आणि तुमच्या सहकाऱ्यांवर गोळीबार केला. त्यावेळी जी.डी.बापूंच्या पिंडरीतून आरपार गोळी गेली. आणि तुमच्या तर छातीला गोळी लागली होती. तुमच्या आयुष्याची दोरी बळकट म्हणून त्या गोळीचा रेंज संपला होता. ती गोळी तुमच्या छातीला थटली आणि तुमच्या समोरच पडली. तरी गोळी लागलेली जागा चेंडावाऐवढी सुजली होती. गावगुंड तर तुम्हांला इथं मारतो. तिथं मारतो. असे म्हणत होते. अशा ज्ञात अज्ञात संकटांतून तुम्ही वाचला आहात आणि योगायोगाने येत्या १५ जुलै २००१ रोजी तुम्ही ८० व्या वर्षात पर्दापण करीत आहात. आम्हांला माहीत आहे. वाढदिवस साजरा करण्याच्या व त्यासाठी वेळ घालविण्याऱ्यांपैकी तुम्ही नाही. हे सर्वांना माहीत आहे. परंतु अण्णासाहेब तुमच्या वाढदिवसाच निमित्त करुन आम्ही जे करणार आहे ते तुमचं खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्याचं स्वप्न पुरं करायला पूरकच होणार आहे. आम्हा कार्यकर्त्यांचा मनापासूनचा उत्साह बघून अण्णांना डावलता आले नाही.''

क्रांतिवीर अण्णांचा १५ जुलै २००१ रोजी ८० वा वाढदिवस येतो आणि वाढदिवस साजरा करण्यासाठी अण्णांनी संमती दिल्याची बातमी हा हा म्हणता शिक्षक,कामगार,शेतकरी,साऱ्या पंचक्रोशीत झाली. लोकांच्या उत्साहाला भरतं आलं. स्वयंभीच शेतकरी, कामगार, शिक्षक यांनी अण्णा ८० व्या वर्षात पदार्पण करतायत म्हटल्यानंतर त्यांना ८० लाख रुपयांची थैली देण्याचे ठरले. थोड्याच दिवसांत ८० लाख रुपये कसे आणि कधी जमले हे कार्यकर्त्यांना कळाले नाही. जनतेला माहीत होते. थोरामोठ्यांचे वर्षाला वाढदिवस साजरे होतात. परंतु पहिलाच वाढदिवस वयाच्या ऐंशीव्या वर्षी साजरा करणारे क्रांतिवीर नागनाथअण्णाच असावेत. याचा अर्थ दुसरे कोण नसतील असा आमचा दावा नाही. पण हुतात्मा संकुलातील क्रांतिवीर नागनाथअण्णा एकमेव आहेत.

कार्यकर्त्यांनी अण्णांचा वाढदिवस अगळा वेगळा करायचे ठरविले. त्यासाठी निरनिराळ्या कमिट्या स्थापन केल्या. प्रत्येकाने उत्साहाने स्वत:हून कामाची जबाबदारी स्वीकारली. जाणकार मंडळी नागनाथअण्णांना म्हणाले, ''अण्णा तुमचा पहिलाच हा वाढदिवस असा तसा साजरा करायचा नाही. चांगला एक वर्षभर साजरा करायचा. वाढदिवसाचे औचित्य साधून त्यातून शेतकऱ्यांचे, कामगारांचे, स्त्रियांचे, दलितांचे,

कारकून, शिक्षकांचे, पीडित समाजाचे, धरणग्रस्तांचे, दुष्काळग्रस्तांचे, भटक्या जाती जमातींचे प्रश्न धसाला लावायचे, तुमच्या मनातला अध्यावत दवाखाना सुरु करायचा. अण्णा, असे तुमच्या वाढदिवसाचे वेगळेपण असेल.''

काही मंडळींच्या मनात वेगळ्या कल्पना होत्या. त्यांनी वाढदिवसाच्या आदल्या दिवशी व दुसऱ्या दिवशी हुतात्मा संकुल विद्युत रोषणाई केली होती. १५ गावांत त्या दिवशी जनतेने गावांत घरोघरी गुढ्या, तोरण्या उभ्या केल्या होत्या. कमानी उभ्या केल्या होत्या. अण्णांचे मोठमोठे डिजीटल फोटो लावून सर्वांनी आपला आनंद व्यक्त केला होता. १२ वाजून गेल्यावर १५ जुलै २००१ ला वाढदिवस सुरू झाला. विद्यार्थ्यांनी अण्णांच्या हस्ते केक कापून वाढदिवसाची सुरुवात केली. अण्णांच्या जयजयकाराने सारा परिसर दणाणून सोडला. पहाटे पाच वाजल्यापासून स्त्रियांच्या झुंडीच्या झुंडी अण्णांना ओवाळण्यासाठी शाळेकडे येऊ लागल्या. शेतकऱ्यांच्या हार तुऱ्यांच्या रांगा उभ्या होत्या. अण्णांना घातलेल्या हार तुऱ्यांचे ढीग लागत होते. आलेल्या स्त्री पुरुषांना प्रत्येकाला एक ग्लास दूध व चार पेढे देण्याचे काम कामगार आनंदाने करत होते. त्या लोकांचे स्वागत क्रांतिवीर नागनाथअण्णा गौरव समिती करत होती. विशेषत: त्यात चेअरमन शामराव काका सव्वाशे, वसंत पवार, पांडुरंग नायकवडी, मी (जयवंत अहिर), चंदर लोहार, दत्ता शेळके, डॉ.भारत पाटणकर, माजी चेअरमन महादेव कांबळे, कॉ.नाना शेटे हे होते. दुपारी १ वाजता हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटागंणावर सजविलेल्या भव्य आणि दिव्य अशा मंडपात १ वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. अध्यक्षस्थानी निळूभाऊ फुले होते. लाखो लोकांच्या उपस्थितीत ग.प्र.प्रधान यांच्या हस्ते चांदीच्या क्रांतिज्योतीची प्रतिकृती, ८० लाखांची थैली देऊन व पुष्पहार घालून क्रांतिवीर नागनाथअण्णांचा यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना ग.प्र.प्रधान म्हणाले, ''स्वातंत्र्य लढ्यातील सर्व जखमा अंगावर झेलून क्रांतिवीर नागनाथअण्णा सध्याही कष्टकरी जनतेसाठी रात्रंदिवस झगडत आहेत. दुसऱ्यासाठी जीवन जाळणारा नागनाथअण्णा एकमेव आहे. केंद्र सरकारवर टीकास्त्र सोडताना ग.प्र.प्रधान म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सरकार जाणूनबूजून दुर्लक्ष करीत असून साम्राज्यवाद व जागतिकीकरणाचे अनुकरण करून शेतकऱ्याला देशोधडीला लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी वाळव्याच्या क्रांती भूमीतून पुन्हा एकदा क्रांतीची चळवळ सामर्थ्याने उभी करावी लागणार आहे. यासाठी सर्वांनी सज्ज राहावे. क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या हातातील क्रांतीची ज्योत पुढे न्यावी.'' असे आवाहनही त्यांनी केले.

प्राचार्य डॉ.एन.डी.पाटील भाषणात म्हणाले, ''क्रांतिच्या पाऊलवाटा पुसून टाकणारी शेतकऱ्यांच्या हिताविरोधी वागणारी सत्ता केंद्रात आहे. साठ वर्षांपासून अण्णांचे श्रमजीवी माणसांसाठी आतूट नाते आहे.

प्रा.आ.ह.साळुंखे त्यावेळी म्हणाले, ''आपणांस प्रस्थापिताच्या विरोधातील चळवळ सक्षम करावयाची आहे. क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या विचारांची प्रेरणा समाजापुढे रुजविण्यासाठी एकत्रित येण्याची गरज आहे. अण्णांनी बहुजन चळवळीला एक वेगळं रूप दिलं आहे. हजारो दीन दलित कार्यकर्त्यांचा ते आधार आहेत. सामान्यत: विधायक कामासाठी प्रस्थापितांना विरोध करण्याचे सामर्थ्य त्यांनी निर्माण केले आहे. त्यांच्या विचारांपासून, कार्यापासून सर्वांनी प्रेरणा घ्यावी. आजचा सत्कार सोहळा म्हणजे लाखो लोकांच्या कृतज्ञतनेचा, प्रेमाचा,भावनेचा हा उत्सव आहे.''

क्रांतिवीर नागनाथअण्णांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्रथम आपल्या कुटुंबाविषयी मार्मिक माहिती दिली. स्वातंत्र्य लढा व स्वातंत्र्योत्तर काळातील चळवळीचे दिवस यातून आपणांस ८० वर्षे झाली हे कळालेच नाही. अनेक संघर्षांतून मी ८० वर्षांपर्यंत पोहचलो याचे मला आश्चर्य वाटत आहे. असा त्यांनी भावनाविवश होऊन उल्लेख केला. आपण यापुढे न्यायासाठी खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी झगडतच राहणार असल्याचे स्पष्ट केले. केंद्रातील बुद्धिवान सरकार साखर कारखान्यांनी आयकर भरावा म्हणून तगादा लावला आहे. यामध्ये २०० कोटी रुपये साखर कारखान्यांचा तोटा होत आहे. एक नया पैसाही आयकर कोणी भरू नये. आयकर रद्द झालाच पाहिजे. यासाठी आंदोलन सुरू राहणार असून ३० सप्टेंबरला कोल्हापूर गांधी मैदानावर मोठ्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यात बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी त्यावेळी केले. त्यापुढे ते म्हणाले, ''जागतिक करणाचे नवे आवाहन समोर उभे आहे. केंद्र शासनाच्या शेतकऱ्यांविरोधी धोरणामुळे पंजाबातील शेतकरी आत्महत्या करत आहेत ही चिंतेची बाब असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. शासनाच्या विरोधात लढण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने उभे राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात साथी निळू भाऊ फुले यांनी सांगितले, ''जातीयतेविरुध्द आता खुलेपणाने बोलण्याचे आणि त्या विरुद्ध आवाज उठविण्याची गरज असल्याचे स्पष्ट करून आपणांस या चळवळीला निमंत्रित केले जाते ते लोक जमावेत म्हणून सांगितले जाते पण तशी परिस्थिती क्रांतिवीर नागनाथअण्णांचे कार्यक्रमात नसते कोणत्याही कार्यक्रमात लोक लाखाच्या घरात जमत असतात. पुढे निळूभाऊ म्हणाले, ''क्रांतिवीर अण्णांनी चालवलेल्या पाणी संघर्ष चळवळीत मी सुरुवाती पासून आहे. आपल्या

सर्वांच्या प्रयत्नाने चळवळ जीवंत राहिली पाहिजे.'' असे मत व्यक्त केले. बहुजनांची चळवळ चालविण्यासाठी क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली जी शक्ती उभा कराल त्यांच्या पाठीशी आपण राहू अशी ग्वाही त्यांनी दिली. पुढे बोलताना निळू फुले म्हणाले, ''क्रांतिवीर नागनाथअण्णा कोणताही रंग न लावता कोणताही अभिनय न करता मनापासून बहुजन चळवळीचे काम करीत आहेत. ८० व्या वर्षी त्यांचा उत्साह दाडंगा आहे. एखाद्या संघटनेचा प्रमुख, एखाद्या पत्रकाराचा प्रमुख ब्राह्मणच का आहे रावसाहेब कसबे, वाहरू सोनवणे का असू नयेत ?'' असा सवाल करून त्यांनी यासाठी कष्टकरी श्रमजीवी, बहुजनांच्या चळवळीला सर्वांनी पाठबळ द्यावे असे आवाहन करून बहुजनांच्या चळवळीचे नेतृत्व बहुजनांनीच करावे. क्रांतिवीर नागनाथअण्णांनी सुरू केलेली समाजाच्या हिताची चळवळ न्याय मिळेपर्यंत सुरू राहणे आवश्यक असून आयुष्याच्या अखेरपर्यंत आपण क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या पाठीशी ठामपणे उभा राहू असे उदगार त्यांनी काढले.

अॅड.धैर्यशील पाटील हे म्हणाले, ''क्रांतिवीर नागनाथअण्णा कष्टकरी जनतेची शक्ती आहे. त्यांना सर्वांनी एकजुटीने साथ केली पाहिजे.''

बाबा आढाव वाढदिवसानिमित बोलताना म्हणाले,''अण्णांची आजची भूमिका शेलार मामांची आहे. फुले, शाहू, आंबडेकरांचे विचारच सर्व जातिधर्मांना एकत्र आणून नवी क्रांति घडविण्याचे काम क्रांतिवीर नागनाथअण्णांनी चोखपणे पार पाडले आहे. अण्णा हे क्रांतीचे वाळव्यातील वेगळे रसायन आहे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत पाटणकर यांनी केले तर स्वागत कॉ.नाना शेटे यांनी केले.

पणन मंत्री गणपतराव देशमुख म्हणाले, ''दुष्काळी भागाच्या आर्थिक विकासाला पाण्याची गरज असून पाणी प्रश्नासाठी क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली उभा राहणारा लढा निर्णायक ठरविण्यासाठी आपण त्यात सक्रिय राहू'' असे सांगून अण्णांच्या यापुढील चळवळीला पाठिंबा जाहीर केला.

सौ.कुसुमताई नायकवडी (वहिनी) म्हणाल्या,''नायकवडींनी घरादाराचा विचार न करता गोरगरीब जनतेसाठी चळवळीत भाग घेतला. कष्टकरी श्रमजीवी, दलित आदिवाशी जनतेस जवळ करून त्यांच्यावर अहोरात्र माया केली. त्यातील थोडा देखील भाग घरच्यांच्या वाट्याला आला नाही. पण त्यांचे कार्य पाहता आपण समाधानी आहोत. सर्व भरून पावलोत सामाजिक,आर्थिक विषमता नष्ट होण्यासाठी सर्वांनी नायकवडींच्या पाठीशी उभे राहावे.'' याप्रसंगी डॉ.बाबूराव गुरव, वैभव नायकवडी, बबन ढाकणे, कॉ.यशवंतराव चव्हाण आदींची भाषणे झाली. कार्यक्रमास स्वातंत्र्यसैनिक

रंगराव पाटील, गणपतराव कोळी, अभिनेते विलास रकटे, कल्लाप्पाण्णा आवाडे, सौ.इंदुमती आवाडे, बाबासाहेब कुपेकर,अभयकुमार साळुंखे, नरसिंह गुरुनाथ पाटील, आमदार संपतराव पाटील, माजी आमदार यशवंत एकनाथ पाटील, गणपतराव आंदळकर, वसंत चव्हाण, कॉ.शांताराम गरूड, राजुताई बिरनाळे, इंदुताई पाटणकर, बुधाजीराव मुळीक, भिकूशेठ पाटील, रामभाऊ कोळेकर,सनतकुमार आरवाडे, मा.आमदार बाबासाहेब पाटील, लक्ष्मण माने, जगन्नाथ लिगाडे आदी मान्यवर उपस्थित होते. क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या वाढदिवसाच्या आनंद सोहळ्यात पहाटे ४ वाजल्यापासून वसंतराव पवार, उत्तम घोलप, दत्ता शेळके, चंदर लोहार, मी (जयवंत अहिर) व हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील, जिजामाता विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका, हुतात्मा कारखान्याचे कामगार, कार्यकर्ते, स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थिनी जणू आपलाच वाढदिवस आहे असं समजून उत्साहाने आलेल्या लोकांची चोख व्यवस्था करीत होते.

**क्षणचित्रे**

* क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या हस्ते हुतात्मा संकुलात हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ८० झाडे लावली.
* लाखो लोकांचा जनसमुदाय सभेस उपस्थित होता. यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. सकाळी पहाटे ५ वाजल्यापासून तालुक्यातून लोक थव्याथव्याने अण्णांचे अभिनंदन करण्यास येत होते. अण्णांच्या भेटीसाठी दिवसभर रांगा लागल्या होत्या.
* हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणावर रंगीबेरंगी छतांनी सजावलेला १ लाख लोक बसतील असा भव्य मंडप उभारलेला होता.
* गावात गुढ्या, तोरणे लावून स्वागत कमानी उभारल्या होत्या.
* सर्व रस्ते व हुतात्मा संकुल परिसर विद्युत रोषणाईने सजवला होता.
* सभेपूर्वी सकाळी संजय जाधव, भोसले, खंडागळे, सुरेश जाधव, जयवंत कुंभार अशा अनेक शाहिरांच्या कडून अण्णांचे गौरवपर पोवाडे गायले जात होते.
* कार्यक्रमात क्रांतिवीर अण्णांना सन्मानपत्र देऊन व ८० लाखांची थैली देऊन गौरविण्यात आले.
* क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या जीवनपटाचे चित्रमय प्रदर्शनाची मांडणी मेनहॉल मध्ये शेजाळे सर व नांगरे सर या ड्राईंग शिक्षकांनी इतकी आकर्षक केली होती ती लोकांची मने खेचणारी होती.
* ८० व्या वर्षीही अण्णांचा उदंड उत्साह पाहून निळू फुले म्हणाले, "आम्ही थोडं

थोडं तीर्थ तरी घेतो पण अण्णा कोणतेही व्यसन न करता सदैव सतत उत्साहित राहतात. हे विशेष आहे.

* कार्यक्रमानंतर सुमारे ५० हजार लोकांच्या भोजनाची व्यवस्था जिजमाताच्या पटांगणावर केली होती. प्रचंड गर्दी होती तरी स्वयंसेवक कार्यकर्त्यांनी केलेली व्यवस्था वाख्याणासारखी होती.

क्रांतिवीर नागनाथअण्णांनी मिळालेल्या ८० लाखांच्या थैलीचे वाटप स्टेजवरच सुरू केले. कोणाला लाख, कोणाला दोन लाख, तर कोणाला चार लाख असे अठरा लाख रुपये त्यांच्या हातानीच दिले. आम्ही कार्यकर्ते अण्णांना म्हणालो, ''अहो अण्णा कार्यक्रम होऊ दे मग काय ते पैशाचे वाटप करा. त्यावर ते माझे नाव घेऊन म्हणाले, ''अरे जया, शिळी भाकरी आणि तव्यातून काढलेल्या गरम भाकरीला वेगळीच चव असते.'' ते कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले, ''मला पैशाला वस्ती करून द्यायची सवय नाही आणि जवळ ठेवयाची सवय नाही.''

यावरून मला (जयवंत अहिर) अण्णांनी सांगितलेला किस्सा आठवतो. ''उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाणांच्या आई गेल्या होत्या. म्हणून यशवंतराव कराडला गेले होते. त्या वेळी मी हुतात्मा साखर कारखान्याच्या कामासाठी दिल्लीत होतो. त्यामुळे त्यांना मला भेटता आले नाही. यशवंतराव चव्हाण दिल्लीला आल्याचे मला समजले म्हणून त्यांना भेटण्यासाठी कृषीभवनमध्ये त्यांच्या कार्यालयात गेलो होतो. त्यावेळी त्यांचे पी.ए.डोंगरे साहेब होते. तसे ते माझ्या चांगले परिचयाचे होते. मी त्यांना म्हणालो, ''डोंगरे साहेब यशवंतरावांच्या आई गेल्या त्यावेळी मी येथेच दिल्लीत होतो. आज मला त्यांना भेटायचे आहे. (डोंगरे साहेबांना यशवंतरावांचे आणि माझे संबंध किती जवळचे आहेत हे माहीत होते.) डोंगर साहेब म्हणाले, ''साहेबांना आईचे दु:ख सावरण्यासाठी आपण भेटणार असाल तर इथं भेटण्यापेक्षा घरी जाऊन भेटणे चांगले. थोड्याच वेळात जेवायला ते घरी जाणार आहेत. डोंगरे साहेबांचा सल्ला मला योग्य वाटला म्हणून मी यशवंतरावांना भेटण्यासाठी बंगल्यावर गेलो. मला बघितल्यावर यशवंतरावांनी माझा हात प्रेमाने आपल्या हातात घेतला व आपल्या जवळ बसवून घेतले. मी आईची आठवण काढताच यशवंतराव भावनाविवश झाले. त्यांच्या डोळ्यातून पाणी आले. त्यावेळी मी म्हणालो, ''यशवंतराव आई ही सर्वांनाच प्रिय असते. तुमच्या आई अत्यंत समाधानाने गेलेल्या आहेत. तेव्हा जास्त दु:ख करत बसू नका'' त्यानंतर इकडच्या तिकडच्या महत्त्वाच्या बाबींवर चर्चा झाल्यानंतर आग्रहाने मला यशवंतरावानी आपल्या बरोबर जेवायला घेतले. जेवण झाल्यावर यशवंतरावना सांगून मी

आय.आय.पी.ए.होस्टेलवर माझ्या राहण्याच्या ठिकाणी आलो. टॅक्सीतून उतरलो. टॅक्सीचे भाडे देताना माझ्या लक्षात आले. आपला पैशाचा लखोटा यशवंतरावांच्या घरी जेवलो तिथे डायनिंग टेबलवर राहिला. म्हणून मी यशवंतरावांच्या बंगल्यावर परत गेलो. जेवणानंतर थोडीशी विश्रांती घेऊन चव्हाण साहेब ऑफिसला निघाले होते. तेवढ्यात मी तिथे पोहोचलो मला बघताच चव्हाण साहेब म्हणाले, ''अहो नागनाथ परत का आलात ?'' ''अहो साहेब, माझा पैशाचा लखोटा तुमच्या टेबलावरच राहिला. तो घ्यायला परत आलोय.'' त्यावेळी यशवंतराव एकच वाक्य म्हणाले, ''नागनाथ तुम्हांला आयुष्यात शर्टाला खिसा लावता आला नाही.'' यशवंतराव चव्हाण यांच्या ह्या वाक्यात सारं काही आहे. (हे कळणाऱ्याला)

कार्यक्रम न भूतो न भविष्यति झाला. क्रांतिवीर नागनाथअण्णांचा सत्कार बघून जमलेल्या स्त्री-पुरुषांचे डोळे आनंदाश्रूने भरले होते. जनतेने अण्णांना उदंड आयुष्य चिंतले.

क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त दैनिक अग्रदूत या दैनिकाने १५.७.२००१ रोजी नजराणा हा विशेषांक काढला. त्यात पालखी या नावाखाली अरुण नाईक यांनी एक लेख दिला आहे. त्यात ते म्हणतात, ''नव क्रांतीचे प्रणेते म्हणून क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली भ्रष्टाचारी, प्रतिगामी, अनीतिमान, देश लुबाडू, समाजद्रोही, शेतकऱ्यांचे शत्रू, तसेच गुन्हेगार अशा सत्तालोलपू आणि सत्ता पिपासूंना भस्मसात करण्यासाठी पुन्हा क्रांतीची मशाल पेटविली पाहिजे.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांनी तळहातावर शिर घेऊन लढा दिला, क्रांतीच्या ज्वालेने जे पेटून उठले आणि खरोखरीच ब्रिटिश साम्राज्याला हादरून टाकले. अशा थोर वीर स्वातंत्र्य सेनानींत आदरणीय क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी हे अग्रगण्य आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शांत राहिले, किंवा सत्तेत कुठे सहभागी झाले किंवा सत्ताधाऱ्याच्या एखाद्या पक्षाचा उदोउदो करत राहिले असली बुळबुळीत, गुळमुळीत अशी जीवन पद्धती क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांनी कधीच स्वीकारली नाही. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढ्याच्या वेळी मा.अण्णांनी जी क्रांती मशाल पेटवली ती आजतागायत ज्वाला झळाळत राहिलेली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक क्रांतिकारक राजकीय क्षेत्रात अग्रेसर राहून सत्तेत सहभागी व्हायला सरसावले. आणि त्याच वेळी सरकार क्षेत्राचेही प्राबल्य निर्माण होऊन त्या क्षेत्रातही रस घ्यायला ते मोठ्या संख्येने पुढे झाले. एका दृष्टीने ही गोष्ट अगदी सरळ होती की, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ज्यांनी प्राणांची बाजी लावलेली

होती त्यांना स्वातंत्र्यातल्या सत्तेत सहभागी व्हायला एक नैतिक अधिकार होता. पण थोडसे मागे वळून पाहिले तर आदरणीय नागनाथ अण्णांच्या सारखे सामान्य कष्टकरी जनतेसाठी समग्र आयुष्य वाहून दिलेले किती स्वातंत्र्य सेनानींना सत्तेत सहभागी व्हायला मिळाले? किंवा अशा तेजस्वी स्वातंत्र्य सेनानीना आवर्जून सत्तेत सहभागी करण्यासाठी कोणी कोणी प्रयत्न केला?

ज्याच्या जवळ काही आर्दश होते, ज्याच्या रक्ताच्या कणाकणांत नि:स्वार्थ बुद्धी होती. ज्यांनी भारताच्या या मातीला आपली आई भारतमाता मानले होते, जे स्वप्नात सुद्धा कुणाचेही शोषण करण्याचा विचार मनात शिवून देणारे नव्हते, भ्रष्टाचाराला ज्यानी नरक मानलेले होते आणि ज्यांनी न्याय बुद्धी जागृत ठेवून समाजातले प्रश्न सोडविले होते. आणि आज तशा पद्धतीने ते सोडविण्याची ज्यांच्या जवळ क्षमता आहे अशा किती स्वातंत्र्य सेनानींना आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री व्हायला मिळाले? किंवा अशाच नि:स्पृह स्वातंत्र्य सेनानींनाच महाराष्ट्राचा राज्य कारभार चालवायला मिळावा म्हणून यथाकथीत समाजधुरीणांनी पुढाकार घेतला?

कुणी-कुणीही अशा भानगडीत पडले नाही. उलट जे काही मिळेल ते आपल्या पदरात ओढून क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या सारख्या ध्येयनिष्ठ, कार्यप्रवण, आणि जन कल्याणासाठी सदैव धगधगणाऱ्या देशभक्तांना सत्तेपासून दूर ढकलून, उपेक्षित ठेवण्याचे राजकारण करण्यात आले. आणि आज महाराष्ट्रात आपले क्रांतिकारकत्व कॅश करणारे सत्ताधारी म्हणून गाजलेले काही स्वातंत्र्य सेनानी आणि जाणूनबुजून बाजूला टाकले गेलेले पण सदैव क्रांति विचाराने तळपत राहिलेले मतदारही नेते मंडळींच्या राजकारणात सहभागी झाली !

आपण भारत मातेला स्वातंत्र्य करण्यासाठी जो प्राणपणाने लढा दिला त्याची जाहिरातबाजी करून निवडणुकीत मते मागण्याचा व्यापार धंदा काही स्वातंत्र्य सेनानींना करता आला नाही. तसा धंदा करण्यासाठी त्यांचे पीळदार मन तयार झाले नाही. आणि बऱ्याच, स्वातंत्र्य सेनानींनी तशी जाहिरात बाजी करून राजयोग भोगला! आता असा राजभोग मिळविणाऱ्यांनी तसे काही प्रयत्नपूर्वक करणे हेही अनिष्ठ-चुकीचे असे म्हणता येणार नाही. पण अशा नेत्यांनी आपली देशनिष्ठा, समाजनिष्ठा अत्यंत प्रकर न ठेवल्याने सगळ्या समाजाचे चित्र बदलून गेले आहे. नेते कमालीचे भ्रष्टाचारी झाले, स्वैर वागू लागले, हे खपवून घेण्याची सवय लोकांना लागून राहिली. दुर्दैव असे आहे की, ज्या ज्येष्ठ व्यक्ती म्हणून लोकांच्या आदर्शस्थानी विराजमान झालेल्या होत्या, त्या थोरांच्याकडून भल्या भल्या चोरांना संरक्षण देण्याचे त्यांना पोसण्याचे इतकेच

नव्हे, त्यांना प्रतिष्ठित करण्याचे कुकर्मच अशा थोर म्हटलेल्या व्यक्तींच्या हातून घडले गेलेले आहे. आणि स्वातंत्र्यपूर्व काळाचा समाज आणि स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांनंतरचा समाज यांत जमीनआस्मानचा फरक पडला आहे !

साधी गोष्ट बघा. क्रांतिवीर नागनाथअण्णा आणि क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड यांच्या समवेत ज्यांनी ज्यांनी क्रांति रणगणावर लढाई केली. नागनाथअण्णांना साथ दिली, त्यांचे स्वातंत्र्याच्या काळात काय स्थान राहिले? क्रांतीचा विचार देऊन प्रखर कृती करणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटील यांची थोरवी एखाद्या मंत्र्यापेक्षा निश्चितच आदरणीय आहे. पण क्रांतिसिंह नाना पाटील हे जो पक्ष सत्तेची सौदाबाजी करायला तयार झाला त्या पक्षात ते राहिले नाहीत. म्हणून त्यांना त्यांच्या थोर विचारांसकट, लौकीकासकट दूर ठेवण्याचे कट कारस्थान केल्यासारखे कुटिल राजकारण घडून गेले.


क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या बरोबर असलेले, त्यांच्या विचाराने वागणारे, त्यांच्या कृतीला साथ देणारे शिराळ्याचे स्वातंत्र्य सेनानी मा.वाय.सी.पाटील, कुपवाडचे मा.धोंडीराम बापू माळी, अंकलखोप रणरागिणी राजूताई बिरनाळे, दैनिक अग्रदूतचे संस्थापक-संपादक कै.अण्णासाहेब कुंभोजकर, पारतंत्र्याच्या काळात धुळ्याचा खजिना लुटण्यात अग्रेसर असलेले कै.रावसाहेब कळके यांना सांगली जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात कुठले स्थान होते? जे जे सांगली जिल्ह्यात पद्मभूषण डॉ.वसंतराव दादांच्या आवतीभोवती नेते म्हणून वावरले त्यांच्या इतकी योग्यता या नागनाथअण्णांच्या साथीदारांना नव्हती? पण राजकारणात असल्या योग्यतेचे पावित्र्य ठेवण्याचा विचार जपला जात नाही. त्याची आवश्यकताही गेल्या ५० वर्षांत कुणाला वाटली नाही.

जे व्हायचे ते होऊन गेले आहे. गंगेच्या प्रवाहात जेवढी घाण व्हायची होती ती होऊन गेली आहे आणि आता मात्र प्रत्येकाच्या मनी माणसी कळ उठलेली आहे की, अरे हे आता नरड्यावर आले आहे. देश बुडवेच प्रत्यक्ष देशाचे मालक म्हणून मिरवायला लागले आहेत. आणि अशा देश बुडव्यांना साथ करणाऱ्यांनी तर देशहित, समाजहितावरच बलात्कार केलेला आहे ! आता ज्याला थोडी जर जाण आहे, लाज आहे अशा प्रत्येकाच्या काळजात कळ उठू लागलेली आहे की, आता हे बदलले पाहिजे, बदल घडवायचा म्हणजे क्रांती !

म्हणजे पुन्हा एकदा क्रांतिज्वाला भडकल्या पाहिजे. मग अशा ज्वाला आहेत कोणा जवळ ? अशा क्रांतीच्या ज्वालेची पेटती मशाल आजही क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या हृदयात आहे ! आणि पुन्हा एकदा ''नव क्रांती'' घडविण्याचा स्फूर्तिदाई मनोदय क्रांतिवीर नागनाथ अण्णा आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी, सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने वृत्तपत्रात दिलेल्या मुलाखतीतून व्यक्त केला आहे.

क्रांतिवीर नागनाथअण्णांनी एकदा निर्धार केल्यावर ते काय करू शकतात, हे क्रांतीच्या काळात आणि आज हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची उभारणी करून, त्याचे चालविलेले उत्कृष्ट प्रशासन आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या जपणुकीचे कार्य पाहून कुणीही ठरवून शकेल. खरोखरीच मा.नागनाथअण्णांच्या साखर कारखान्या सारखा साखर कारखाना चालविणे हे सोपे नाही. याची प्रचिती भल्या भल्यांना आलेली आहे. तेव्हा नव क्रांतीचे प्रणेते म्हणून क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली भ्रष्टाचारी, प्रतिगामी-अनीतिमान, देशलुबाडू, समाजद्रोही शेतकऱ्यांचे शत्रू आणि गुन्हेगार अशा सत्तालोलूप आणि सत्तापिपासूना भस्मसात करण्यासाठी पुन्हा क्रांति मशाल पेटविली पाहिजे.

फक्त क्रांतिवीर नागनाथअण्णा आता वयाच्या ८० व्या वर्षी नवक्रांतीची मशाल घेऊन लढ्यासाठी उभारतील तेंव्हा त्यांच्या मातोश्री पूजनीय क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी या अण्णांच्या कपाळावर कुंकुमतिलक लावायला, थांबल्या नाहीत. त्या अनंतात विलीन झाल्या आहेत. त्यांच्या स्मृतीने डोळे ओले होतात.



**क्रांतिवीर नागनाथअण्णा** यांचा ८० व्या वाढदिवशी सत्कार करताना
**प्रा.ग.प्र.प्रधान, श्री.वसंत पवार, मा. एन.डी.पाटील, श्री.जयवंत अहिर, सौ.कुसुमताई नायकवडी, कॉ.बाबूराव गुरव व मा. वैभवकाका नायकवडी**
(दि. १५ जुलै २००१)

# पारदर्शक कारभार

क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या प्रामाणिकपणाबद्दल मी लिहण्यापेक्षा अण्णांचे विरोधकच अण्णांच्या प्रामाणिकपणाबद्दल गुणगान गात होते. ते म्हणायचे, ''अण्णा स्वत: खाणार नाहीत आणि दुसऱ्यालाही खाऊ देणार नाहीत. परंतु आलेल्या कोणत्याही पाव्हन्यांना, कार्यकर्त्यांना जेवण, चहापाणी, दुधाचा ग्लास देऊन त्यांचे स्वागत करण्याची परंपरा त्यांनी वाडवडलांच्या पासून चालवली आहे. त्यांनी आपल्या व्यक्तीगत जीवनात आणि त्यांनी चालवलेल्या सार्वजनीक संस्थांमध्ये पारदर्शक कारभार केला आहे.'' अनेक नेत्यांच्या भ्रष्टाचाराबद्दल त्यांच्या नैतिक्तेबद्दल, अप्रामाणिकपणाबद्दल केलेल्या टीकेच्या जाहीर वर्तमानपत्रातून बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. परंतु क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या उभ्या हयातीत कोणीही त्यांना भ्रष्टाचारी आहेत, अप्रामाणिक आहेत, असं कधीही कुठल्याही वर्तमान पत्रात बातमी आलेली मला तरी आठवत नाही.

लोकसभा विधानसभेसाठी उभा रहिलेले उमेदवार आपली संपत्ती जाहीर करतात. क्रांतिवीर अण्णांही विधानसभेला लोकसभेला उभे राहिले होते. त्यांनी आपली संपत्ती काय जाहीर करावी. तशी त्यांच्या नांवावर ना घर, ना जमीन, कोणत्याही बँकेत त्याचं खातं नव्हतं. त्यांची मालमत्ता म्हणजे प्रवासातील एक २५० ते ३०० रुपयांची बंधाची बॅग. त्यामध्ये पांघरण्याची एक शाल ४०० ते ४५० रुपयांची दोन धोतर जोड्या, ६०० रुपये, कोल्हापूर चप्पल २५० रुपये, साधारण २२०० एक रुपये पर्यंत अण्णांची संपत्ती. १९४२ पासून त्यांनी घर सोडले. ते नेहमी हुतात्मा किसन अहिर

विद्यालयात राहत होते. पुढे हुतात्मा साखर कारखाना झाल्यानंतर साखर शाळेत राहत होते. वाळव्यात असल्यानंतर त्यांचे रोज घराकडून जेवणाचे ताट येत होते. शिक्षण संस्थेच्या व कारखान्याच्या आर्थिक व्यवहारात चोखपणाने नेमलेल्या माणसांकडून आर्थिक व्यवहार करू घेत होते.

अण्णांची प्रामाणिकपणाची अनेक उदाहरणं देता येतील. मी त्यांच्या संस्थेत आर्थिक व्यवहाराकडे कॅशिअर म्हणून ३५ वर्षे काम करीत होतो. त्यात मला कसलाही गैरव्यवहार दिसला नाही. अण्णा दिल्लीला शिक्षण संस्थेच्या कामानिमित्त वरचेवर जात होते. मिरजेचे डॉ.गायकवाड, डॉ.ओहळ, डॉ.खाबडे हे त्यांचे जिवलग मित्र. दिल्लीला जाताना बऱ्याच वेळा अण्णा मिरज स्टेशनला रेल्वेला बसायला जायचे. त्यावेळी जाताना डॉक्टरांना म्हणायचे, ''मी दिल्लीला निघालोय. तुम्हांला काय आणयाचे का ? डॉक्टर मंडळी म्हणायचे, ''दिल्लीहून येताना आग्र्याचा पेटा, मथुरेचा पेढा या सारखी मिठाई स्वस्त आणि चांगली मिळते.ती येताना घेऊन या.'' दिल्लीहून परत येताना अण्णा आठवणीने डॉक्टर लोकांनी सांगितलेली मिठाई आणायचे. आणलेली मिठाई डॉक्टरांना देऊन राहिलेली मिठाई आम्हा कार्यकर्त्यांसाठी वाळव्याला आणायचे. आल्याबरोबर साऱ्यांना मिठाई वाटायला सांगायचे. हाजीर तो वजीर. कुणासाठी राखून ठेवायची नाही.

योगायोगाने मिठाई वाटत असताना एकाद्यावेळी अण्णांच्या आई शाळेत आल्या तर त्यांनाही आम्ही एखादा मिठाईचा पुडा देत असू. आई मिठाई खायच्या नाहीत परंतु नातवांच्यासाठी घरी घेऊन जायच्या. अण्णा त्यावेळी मला काही बोलायचे नाहीत. परंतु आई मिठाईचा पुडा घरी घेऊन जायच्या. आई गेल्यानंतर मला अण्णा म्हणायचे ''जया, आईला दिलेल्या मिठाईची किंमत २० रुपये आहे. आईला पैसे मागू नकोस. पण ते पैसे कुसुमच्या नावावर टाक आणि तिचा पगार देताना ते वसूल करून घे.'' मी त्या प्रमाणे वहिनींच्या पगारातून पैसे वसूल करून संस्थेकडे जमा करीत होतो.(कुसुम म्हणजे क्रांतिवीर अण्णांच्या पत्नी. त्या जिजामाता विद्यालयात मुख्याध्यापिका म्हणून काम करीत होत्या) त्या काळात शिक्षकांचे पगार संस्थेकडून केले जात होते. मी त्यावेळी कॅशिअर होतो. तसा या साऱ्या गोष्टींचा मी साक्षीदार होतो. अण्णा मला नेहमी म्हणायचे, ''जया, हे कोणाला दाखविण्यासाठी नाही. आपण आपल्या मनाशी प्रामाणिक राहून वागायचे. त्यामुळे आपलं कुणीही वाकडं करू शकत नाही.'' असे सांगत असताना अण्णा मला म्हणाले, ''अरे जया, १९४४ साली धुळ्याचा

५ लाख ५१ हजाराचा खजिना लुटला त्यावेळी नोटांची पोती पाठीवर होती. बिन हिशेबी रक्कम त्यातल्या काही नोटा घराकडं नेता आल्या असत्या का नाही ? परंतु त्यातले दहा रुपये सुध्दा घेतले नाहीत. पण, घ्यावेत असं माझ्या मनातही आल नाही. हे माझ्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. मी हे सर्व कुणी सांगितलं म्हणून करत नाही तर हे माझ्या मनान ठरवले आहे. आणि ते कुणाला दाखवण्यासाठी, आपली कुणी वाहवा करावी म्हणून नाही तर आपल्या मनाच्या समाधानासाठी हे सर्व आहे.'' अण्णांचे मित्र पी.डी. गुणे किर्लोस्कर कंपनीमध्ये सर्वेसर्वा होते. त्यांच्या पत्नी सौ.अरुणाताई क्रांतिवीर अण्णांच्या बद्दल म्हणायच्या, ''नागनाथअण्णा म्हणजे प्रामाणिकपणा'' असं त्यांच समीकरण होतं. असे अनेकांचे अनुभव आहेत की अण्णांचा आर्थिक स्वच्छ कारभार प्रत्येक व्यवहारातला त्यांचा पारदर्शक कारभार होता. जसा पैशाबद्दल होता तसा इतर बाबींच्याबद्दलही होता. उदाहरण द्यायचे म्हटलंतर हुतात्मा किसन अहिर विद्यालयात, हुतात्मा कारखान्यात आणि हुतात्मा नानकसिंग विद्यालय सोनवडे या परिसरांत भरपूर हापूस आंब्यांची झाडं अण्णांनी दूरदृष्टी ठेऊन लावलेली आहेत. गेल्या चाळीस वर्षांपासून त्या आंब्यांचे उत्पादन सुरू झाले आहे. परंतु क्रांतिवीर अण्णांच्या धोरणामुळे आंबे मार्केटमध्ये विकायचे नाहीत. वाळव्यातले आंबे आडी घालुन पिकवायचे आणि पिकलेला आंबा प्रत्येक विद्यार्थी, विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षिका, सर्व कामगार यांना प्रत्येकी एक देऊन राहिलेले आंबे पंधरा गावांतील कार्यक्षेत्रात प्रत्येक घरटी एक एक पोहोच करायचा. अशी प्रथा त्यांनी चाळीस वर्षांपासून पाडलेली आहे. त्यामुळे सीझनमध्ये आंब्यांची झाडं, फळानं लकडलेली असतात. ती लहान मुलांच्या हाताला येतील अशी फळं असताना सुद्धा कोणीही शाळेची मुलं, शेतकरी, वाटसरू आंबे तोडत नाहीत. त्यांना माहित आहे की, पिकलेला आंबा आपल्या घरी पोहोच होणार आहे. घरटी आंबे देऊन राहिलेले आंबे कोल्हापूर, सांगली, सोलापूर, पुणे, मुंबई पर्यंत शिक्षण संस्था व कारखान्यांसाठी साहाय्य करणारी मंडळी, अण्णांचे मित्र यांना पोहोच केले जातात. आमची आंबे वाटणारी टीम मी (जयवंत अहिर), वसंत पवार, पांडुरंग नायकवडी, गावडे सर, नारायण गुरव इ. आम्ही मंडळी याचे साक्षीदार आहोत. व स्थानिक आंबे वाटपाचे काम कामगार, शिपाई यांच्याकडे सोपविलेले. अण्णांच्या मित्र मंडळींनीही मार्केट मधून आणून किती आंबे खाल्ले असले तरी त्यांना अण्णांनी प्रेमाने पाठविलेल्या आंब्याची आठवण असायची. ते म्हणायचे, ''अण्णांनी वाळव्याहून पाठवून दिलेल्या आंब्यांची चव वेगळीच आहे.'' क्रांतिवीर अण्णांचे परममित्र गुणे

साहेब तर वाळव्याहून आलेले आंबे ज्यूस काढून फ्रीजमध्ये ठेवायचे आणि ऑड सीझनला परदेशातून आलेल्या आपल्या मित्रांना आमरस करून वाढायचे. पाहुणे गुणे साहेबांना म्हणायचे, ''अहो गुणे साहेब, आता आंब्यांचा सीझन नसताना आमरस कसा काय'' त्यावेळी ते पाहुण्यांना सारा इतिहास आपले मित्र नागनाथअण्णांचा सांगायचे.

आंबे वाटून झाल्यानंतर अण्णा म्हणायचे, ''अरे दत्ता, जया, पवार सर सर्वांना आंबे वाटून झाले का.'' आम्ही झाले म्हणून सांगितल्यावर म्हणायचे, ''आता त्यातले दोन आंबे इकडे आणा त्याच्या समान आठ फोडी करा.'' त्यातल्या सात फोडी भेटायला आलेल्या मंडळींना द्यायचे व आठवी फोड ते हुतात्म्यांचा प्रसाद समजून खायचे.

सार्वजनिक कामात अण्णांचा जसा पारदर्शक कारभार होता तसा त्यांच्या व्यक्तिगत जीवनातही ते आयुष्यभर प्रामाणिक राहिले. व्यक्तिगत जीवनात एक काळ असा होता. अण्णा दहा दहा रुपयाला सुद्धा नडत होते. परंतु तत्त्वात त्यांनी कधी तडजोड केली नाही. त्याचे उदाहरण म्हणून स्वातंत्र्यसैनिकांना केंद्र सरकारने व महाराष्ट्र सरकारने पेन्शन द्यायला सुरुवात केली. परंतु अण्णांनी पेन्शन स्वीकारली नाही. ते म्हणायचे, ''शासनदरबारी ज्या स्वातंत्र्यसैनिकांची नावं नोंद झाली त्यांनी तेवढे स्वातंत्र्य मिळविले नाही. त्यांच्याशिवाय ज्ञात अज्ञात अशा कितीतरी भारतीय जनतेने देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग केला आहे. त्या सर्वांना पेन्शन मिळाल्यानंतर मगच मी पेन्शन घेणार'' असा त्यांचा निर्णय होता. शेवटपर्यंत त्यांनी पेन्शन घेतली नाही. मध्यंतरी महाराष्ट्र सरकारने १२०० रुपयांचे आत उत्पन्न असणाऱ्या मुलांना शैक्षणिक फी माफ केली. आणि त्याच वेळा स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांना स्कॉलरशिप चालू केली. अण्णांची मुलं लहान होती. परंतु मोठी मुलगी विशाखाताई ही आठवीच्या वर्गात शिकत होती. तिच्या स्कॉलरशिपचा फॉर्म मी अण्णांना सहीसाठी दिला त्यावेळी ते म्हणाले, ''जया मी पेन्शन का घेतली नाही हे तुला माहीत आहे. त्याच प्रमाणे देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या सर्वांच्या मुलांना स्कॉलरशीप मिळेल त्यावेळी आपल्या मुलांनाही स्कॉलरशीप घ्यायचा नैतिक अधिकार आहे.''

अशीच एक गोष्ट मला आठवते. अण्णांची तब्येत किरकोळ काहीतरी बिघडली होती. म्हणून आम्ही डॉ.गायकवाडच्या हॉस्पीटलमध्ये गेलो अण्णांना त्यांनी औषध दिले आणि ते म्हणाले, ''रोज दिवसातून एक दोन वेळा नारळाचे पाणी घेत चला.'' अण्णांनी विचार केला. डॉक्टरनी तरी सांगितले आहे. योगायोगाने दोन दिवसांवर हुतात्मा कारखाना

जनरल बॉडीची सभा होती. सर्व मीटिंगचे विषय झाल्यानंतर क्रांतिवीर अण्णा शेतकऱ्यांना म्हणाले, ''डॉ. गायकवाडांच्याकडे मी दवाखान्यात गेलो होतो. त्यांनी मला नारळाचे पाणी दिवसातून दोन तीन वेळ घ्यायला सांगितले. माझा तसा घराकडे काहीच संबंध नाही हे तुम्हाला माहीत आहे. तरी सुद्धा वडिलांच्या मळ्यात नारळाची झाडे असती तर तिथूनही नारळ आणले असते. परंतु तशी परिस्थिती नाही. तेव्हा तुम्ही सर्व शेतकऱ्यांनी परवानगी दिली तर मी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना परिसरात असलेल्या नारळाचं पाणी घेऊ का ? तुमची याला साऱ्यांची संमती आहे का ?.'' जमलेल्या चार हजार शेतकरी अण्णांच्या या बोलण्याने भावणावश झाले. काही शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आले. नागठाणचे ज्ञानोबा महाराज म्हणाले, ''काय विचारता अण्णा, तुमच्यासाठी आम्ही सारे शेतकरी जीव देऊ तिथं नारळाच्या पाण्याच काय ?'' याच प्रमाणे कारखान्याच्याच एका जनरल सभेत अण्णा शेतकऱ्यांना म्हणाले, ''१९४२ ला मी घर सोडलं, देशाच्या स्वातंत्र्यासाठी भूमिगत असताना लोकांनी मला जेऊ-खाऊ घातले ती माणसं मला भेटायला आली तर त्यांना जेवण, चहापान, दूध देण्यासाठी तुमची परवानगी आहे का ? '' त्यावेळी लोकांनी एकमुखी मान्यता दिली. अशा अनेक गोष्टी आहेत की त्यामुळे अण्णांचा पारदर्शी कारभार समजेल.

***

# पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा थोराचे विचार

**क्रांतिसिंह नाना पाटील–**

नागनाथअण्णा नायकवडी हे माझे राजकीय वारस आहेत. त्यांच्या राजकीय,सामाजिक, विधायक कामांच्या मागे मी लिंबू धरून उभा आहे.

**यशवंतराव चव्हाण,**माजी उपपंतप्रधान भारत सरकार

नामदार यशवंतराव चव्हाणांच्या दिल्ली येथील निवासस्थानी क्रांतिवीर नागनाथ अण्णांचा पैशांचा लखोटा डायनिंग टेबलवर विसरला होता तो परत अणण्यास गेल्यावर यशवंतराव चव्हाण साहेब एकच वाक्य म्हणाले, ''नागनाथ आयुष्यात तुम्हांला शर्टाला खिसा लावता आला नाही.'' (यातलं मर्म कळणाऱ्याला)

**कॉ.दत्ता देशमुख,**लाल निशाण पक्ष

नागनाथ तसे फार प्रयत्नवादी. नेपोलियनला जसे अशक्य माहीत नव्हते, तसेच नागनाथांचेही होते. शिवाय १९४२ च्या चळवळीतील सक्रिय कार्यकर्ता बाकीच्यां प्रमाणे स्वार्थी व संधीसाधू नाही.

**ग.प्र.प्रधान**

नागनाथअण्णा हे एक चांगले संघटक. त्यांचा लोकसंग्रह मोठा आहे.

**वसंतरावदादा पाटील,** माजी मुख्यमंत्री,महाराष्ट्र

नागनाथ माझा १९४२ चा जिवाभावाचा बंधूतुल्य मित्र आहे. परंतु आजही नागनाथ १९४२ सारखाच वागतो. तो एकाद्या निशाचर प्राणी सारखा राहतो. तो कधी झोपतो का नाही ते त्यालाच माहीत.

**प्राचार्य पी.बी.पाटील**

नागनाथअण्णांनी 'चलेजाव'ची घोषणा झाल्यापासून प्रत्यक्ष इंग्रज देश सोडून जाई पर्यंत 'सातारा क्रांति धगधगत ठेवली'. त्याची तुलना छत्रपती संभाजी महाराजांची क्रूर हत्या करणाऱ्या औरंगजेबाविरुद्ध मराठी माणसाने याच कृष्णा आणि वारणा खोऱ्यात चालविलेल्या ऐतिहासिक लोक लढ्याशी होऊ शकते. आजही नागनाथअण्णा आपण शून्य होऊन जीवंत हुतात्म्यांचे जगणे ते जगत राहिले.

**डॉ.आ.ह.साळुंखे**

क्रांतिवीर नागनाथअण्णा महाराष्ट्रातील अनेक परिवर्तनवादी चळवळींच्या आधारस्तंभाचे द्योतक आहे. त्यांचे मन कोणत्या द्रव्यांनी बनले आहे आणि कोणत्या मुल्यांनी सुंदर झाले आहे हे सांगण्यासाठी माझ्याजवळ शब्द नाहीत ! मला या दिलदार माणसाचे प्रेम मिळाले ही माझी मोठी श्रीमंती होय.

**प्रा.एन.डी.पाटील**

क्रांतिवीर अण्णांनी जीवाची बाजी लावून १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. मी जे राजकारणात आलो ते नागनाथअण्णांचे बोट धरून.

**कॉ.शांताराम गरुड**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ग्रामीण कष्टकऱ्यांना संघटित करून त्यांचे लढे उभे करण्यात अण्णांचा वाटा मोठा आहे.

**क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड**

नागनाथ माझा एक अविस्मरणीय साथीदार, १९४२ च्या संग्रामातला वीर साथीदार, एक चैतन्य शक्ती होता. नागनाथानी स्वतंत्र गट बांधला, त्यांची झेप सिंहाची होती. इतर सरदारांपेक्षा त्यांच्या विचाराला व्याप्ती जास्त होती. त्यांनी दर्जेदार कार्यकर्ते साथीला घेऊन देदिप्यमान व भूमिगतांच्या आकलन शक्तीपलीकडे कार्य घडविले याची नोंद मला घेणे भाग आहे. सातारच्या भूमिगत स्वातंत्र्य लढ्याचे ते सोनेरी पान आहे. नागनाथाचे बरोबर उभा राहीलेले कार्यकर्ते धेय्यवादी, एकनिष्टपणे प्रामाणिक राहून छातीचा कोट करुन भूमिगत लढा लढले. त्याची वैशिष्ट्यपूर्ण नोंद केल्याशिवाय माझे लिखाण पूर्ण होऊ शकत नाही. या शिवाय नागनाथला एकच वेड. शिक्षण प्रसार आणि मोफत वसतिगृह चालविणे.

**साथी निळू भाऊ फुले**
क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणजे कामानं झपाटलेला माणूस.

**बाबा आढाव**
नागनाथांच्या डोक्यात ग्रामराज्य इतकं गच्च बसलय ते यशस्वी करण्यासाठी त्यांनी आपली हयात झिजवली. अनेक पुढाऱ्यांनी खेडी सोडली आणि अलिशान बंगल्यात शहरं जवळ केली. मात्र क्रांतिवीर नागनाथअण्णा हे एकमेव असे आहेत, आपलं गाव सोडून कुठल्याही शहराच्या झगमटाला बळी पडले नाहीत.

**रामभाऊ कुलकर्णी, श्रीपाद केळकर,**
**इंदुमती केळकर, सदाशिव बागाईतकर** (जळते दिवस पेटलेली माणसे)
''क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी इतरांच्या पेक्षा वेगळे होते. शिकला सवरलेला हा तरुण धाडसी होता. त्यांचे विचार स्पष्ट होते. दृष्टी स्वच्छ होती. आपल्याला काय करायचे आहे आणि काय साधायचे आहे या विषयी त्यांच्या मनात गोंधळ नव्हता. शस्त्रगारावर त्यांचा विश्वास होता. निखळ राष्ट्रवादी दृष्टिकोण हे त्यांचे वैशिष्ट्य होते. कुंडल गटापासून वेगळे झाले म्हणून प्रतिसरकार स्थापनेच्या प्रयत्नापासून दूर झाले नाहीत. त्यांनी वाळवा, शिराळा परिसरात प्रतिसरकारचा ध्वज फडकत ठेवला होता.

**प्रल्हाद केशव अत्रे** (१२ मे १९४६ नव युग विशेषांक)
छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुटकेप्रमाणे आश्चर्यकारक अशा तऱ्हेने सातारा सब जेल मधून पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तामधून नागनाथनी आपली सुटका करून घेतली. त्यामुळे त्यांना साताराचे 'जय प्रकाश' म्हणतात.

**प्रभाकर गुणे किर्लोस्कर ब्रदर्स**
माणसांची पारख करण्याची क्षमता, शुद्ध आयुष्य, पिढीत लोकांच्याबद्दल जिव्हाळा, समाजकंटकांच्या संबंधीचा तिरस्कार, आणि त्यांना शासन करण्याची धडाडी, प्रामाणिकपणा, असा माझा अगळावेगळा मित्र आहे. त्याने जे काय केले ते नावासाठी नाही. म्हणून त्याचं माझं मैत्रीचं आतुट नातं जुळलं.

**सौ.अरुणाताई पी.गुणे**
क्रांतिवीर अण्णांनी ब्रिटिश काळात किती धाडसांनी, कष्टांनी व जिद्दीने स्वातंत्र्यासाठी कार्य केले. त्यावेळी वाहने नव्हती पण क्रांतिवीर अण्णांच्या मनात स्वातंत्र्य मिळावेच हे ध्येय होते. तरुण पिढीला त्यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून वागता येईल. ''नि:स्वार्थी या शब्दाचा अर्थ म्हणजे अण्णा''

**सुशीलकुमार शिंदे,** माजी ऊर्जा मंत्री, भारत सरकार
क्रांतिवीर नागनाथअण्णांचे देशप्रेम,नेतृत्व, संघटनकौशल्य, स्वतंत्रपणे मोहीम राबविण्याची ताकद आणि ब्रिटिश काळात ब्रिटिशांचे खजिने लुटणे, पोलीस स्टेशन लुटणे, अंतर्गत फौज तयार करणे, पोर्तुगिजांच्या शस्त्रागारातील शस्त्रे आणि काडतुसे गोव्याहून जंगल मार्गे आणणे हे सगळे एखादया चित्रपटात शोभले असे आहे.

**स्वातंत्र्यसैनिक धोंडीराम बापू माळी,**
क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या तपस्वीतेचा झुंजारपणाचा आणि द्रष्टेपणाचा वारंवार प्रत्यय आला. त्यांचा स्वातंत्र्य लढ्यातील अत्यंत भारावलेला काळ माझ्या डोळ्यांपुढे जिवंत उभा राहतो. नव्या युगात प्रवेश करणाऱ्या भारतीयांना अण्णांची स्वातंत्र्य लढ्यातील अप्रतिम कार्य व त्याग तसेच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्र बांधणी करताना केलेले यशस्वी प्रयत्न सारे काही आज गोंधळलेल्या तरुणांपुढे अण्णांचे कार्य दीपस्तंभासारखे ठरावे असे आहे.

**प्रा.डॉ.माणिकराव मा. साळुंखे,**माजी कुलगुरू शिवाजी विद्यापीठ
क्रांतिवीर नागनाथअण्णांनी स्वातंत्र्यासाठी दिलेल्या योगदानाचा इतिहास अत्यंत रोमहर्षक आणि प्रेरणादायी आहे. स्वातंत्र्यानंतर त्यांनी गोरगरिबांच्यासाठी केलेले काम वाखाण्यासारखे आहे. नव्या युगात प्रवेश करणाऱ्या भारतासाठी अण्णांच्या आठवणी दीपस्तंभाप्रमाणे प्रकाश देत राहतील.

**स्वातंत्र्य सैनिक रावसाहेब शिंदे,**चेअरमन रयत शिक्षण संस्था सातारा.
क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी म्हणजे महाराष्ट्राच्या परिवर्तनशील जीवनाचा दीपस्तंभ आहे. अण्णांचे जीवन हे एका वीराच्या शौर्याची, धैर्याची, देशभक्तीची, आणि लढ्याची अशी तेजोमय यशोगाथा आहे.

**प्राचार्य बाबासाहेब पाटील,** 'ऋणानुबंधकार' ऐतवडे खूर्द
भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या इतिहासात आदरणीय क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांचे नाव सुवर्णअक्षराने लिहले गेले आहे.

**व्ही.पी.राणे,** माजी शुगर कमिशनर
वाळव्याच्या एका कुलवंत शेतकऱ्याच्या घरात जन्माला आलेला, आभाळा एवढं मन मोठं असलेला, हिमालयासारखा धीर गंभीर असलेला, अथांग सागरासारखा शांत स्वभावाचा आणि गोरगरिबांच्या अस्मितेला कोणी हात घातला तर उसळी मारणाऱ्या क्रांतिवीर नागनाथअण्णांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. स्वातंत्र्यानंतर खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपले आयुष्य लोकांच्यासाठी वाहिले. हुतात्मा किसन अहिर सह.साखर कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी अनेक आदर्श निर्माण केले. माजी प्रशासकीय वाटचाल या स्वत: लिहलेल्या पुस्तकात वि.पा.राणे साहेब अण्णांची जुनी आठवण सांगताना लिहतात साखर संचालक पदाच्या कार्यकालातील खाली दिलेले प्रसंग उद्धृत करणे मला जरुरीचे वाटते. स्वातंत्र्य लढ्यामध्ये ज्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले असे थोर स्वातंत्र्यसेनानी किसन अहिर, ज्यांच्या नावाने पुढे हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना सुरू झाला त्या कारखान्याने परवान्यासाठी अर्ज केला होता. आपल्या ऊस उपलब्धतेवर विपरीत परिणाम होईल या कल्पनेने या कारखान्याच्या उभारणीला राजारामबापू सहकारी साखर कारखान्याचा कडवा विरोध होता. परंतु हुतात्मा किसन अहिर कारखान्याच्या उभारणीस साखर संचालक आणि राज्य सरकार यांचा पाठिंबा होता. तत्कालीन केंद्रीय कृषिमंत्री श्री.राववीरेंद्र सिंग यांनी दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी नवी दिल्ली येथे बैठक बोलविली होती. शासनाच्या वतीने मी बैठकीला उपस्थित राहिलो. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर श्री.सिंग यांनी मला सादरीकरण करण्यास सांगितले आणि सादरी करणानंतर त्यांनी असे उदगार काढले की, ''यावरून मला रेल्वेगाडीच्या प्रवासाचे स्मरण होते. जेव्हा रेल्वेस्टेशनवर गाडी थांबते तेव्हा डब्यातील प्रवासी नवीन चढणाऱ्या प्रवाशांना कडवा विरोध करतात, परंतु पुढच्याच रेल्वे स्टेशनला मागील स्टेशनवर डब्यात चढलेले प्रवासी नवीन प्रवासी गाडी शिरू नयेत म्हणून प्रयत्न करतात.'' श्री.सिंग यांनी हा प्रस्ताव थोड्याच दिवसांत होणाऱ्या परवाना समितीच्या बैठकीत ठेवण्याचे आदेश दिले. बैठकीच्या आदल्या दिवशी मी दिल्ली येथे गेलो.

त्या दिवशी विमानास दोन तास उशीर झाला आणि मी रात्री १२ वाजता महाराष्ट्र सदनात पोहोचलो. मी तेथील रजिस्टरमध्ये माझे नाव लिहिले आणि मला पहाटे ४.३० वाजता उठविण्याची स्वागतकक्षास सूचना देऊन मी मागे वळलो तोच मला थोर स्वातंत्र्यसेनानी, ज्यांनी हा कारखाना उभारला होता ते श्री.नागनाथ नायकवडी-ज्यांना नागनाथअण्णा म्हणून ओळखले जात असे-मला भेटण्यासाठी उभे होते. मला भेटण्यासाठी ते थांबलेले पाहून मला आश्चर्य वाटले आणि मी त्यांना तसे सांगताच ते म्हणाले की तुम्ही आला नाहीत तर काय होईल याची मला काळजी वाटत होती. मी म्हटले,''साखर संचालक या नात्याने सदर बैठकीला उपस्थित राहणे माझे कर्तव्यच आहे.'' आणि माझ्या खोलीकडे वळलो. ठरल्याप्रमाणे मी पहाटे ४.३० वाजता उठलो आणि बैठकीमध्ये चर्चा करावयाच्या कागदपत्रांच्या अभ्यासात पूर्णपणे गढून गेलो. बरोबर ५ वाजता दरवाजावरील घंटीचा आवाज आला आणि मी दार उघडून बघतो तर नागनाथअण्णा हातामध्ये चहाचा ट्रे घेऊन उभे होते.''एवढा त्रास कशासाठी घेतला आणि तुम्ही रात्री कोठे झोपला होता?'' असे मी त्यांना विचारताच ते म्हणाले की, मी रात्रभर लॉबीमध्ये झोपलो होतो, पहाटे स्वयंपाकघरात जाऊन चहा तयार केला आणि ट्रे आणण्यासाठी कोणी नव्हते म्हणून मी स्वत: घेऊन आलो. उराशी बाळगलेले कारखान्याच्या उभारणीचे स्वप्न पुरे व्हावे यासाठी हा थोर स्वातंत्र्यसेनानी किती धडपडत होता ते पाहून मला माझ्या भावना आवरणे अवघड झाले. कारखान्याचा प्रस्ताव परवाना समितीसमोर आला आणि तो मंजूरही झाला. कारखान्याची उभारणी सर्वांत कमी वेळात पूर्ण झाली आणि आज हा कारखाना अत्यंत कार्यक्षम तांत्रिक कामगिरी, सर्वांत कमी उत्पादन खर्च आणि उच्च ऊसदर देणारा कारखाना म्हणून ओळखला जातो.अशा कारखान्याच्या उभारणीशी माझा साखरसंचालक या नात्याने जो संबंध होता त्याबद्दल मला नेहमीच आनंद वाटतो.

**डॉ.आप्पासाहेब माने**

दुष्काळी भागाला पाणी मिळण्यासाठी क्रांतिवीर अण्णांनी केलेले आंदोलन म्हणजे एक वेगळे पर्वच.! उन्हातानांत उपाशी तापाशी शेतमजूर, कष्टकरी शेतकऱ्यांचे दीन दलित पीडितांचे नेतृत्व करणारे अण्णा म्हणजे जगाला ऊर्जा देणारा तळपता सूर्यच.! अण्णांच्या आर्थिक व्यवहारातील पारदर्शकपणा म्हणजे अगदी बावन्नकशी सोन्यासारखं शुद्ध आहे.

**मा.विश्वास धुमाळ,** माजी साखर आयुक्त

जेव्हा उद्दिष्ट व ध्येय स्पष्ट असते तेव्हा अपुरे मनुष्यबळ, सत्ता, संपत्ती व इतर साधन सामुग्री कमी असली तरी विधायक नेतृत्वाचे गुण असणाऱ्यांना त्याची तमा नसते. त्यांपैकी नागनाथअण्णा होते. स्वातंत्र्यच्या चळवळीत त्यांनी आपल्या सर्वस्वाचा होम केला. स्वातंत्र्यानंतर रचनात्मक कामात त्यांनी हुतात्मा किसन अहिर सह.साखर कारखान्याचा सहकार चळवळीमध्ये आदर्श व मूळ तत्त्वं टिकवून ठेवली आहेत. म्हणून साहजिकच या मागे कोण व्यक्ती आहे हे जाणून घेण्याची जिज्ञासा झाली. त्यातूनच मी महाराष्ट्र राज्याचा साखर आयुक्त असताना परिचय झाला. सर्व अर्थाने सामर्थ्यवान समाज कसा करता येऊ शकतो यावर अण्णा व साखर कारखाना याबद्दल जयवंत अहिर यांनी लिहावे, लिखाण चालू ठेवावे समाजापुढे आदर्श अण्णाबद्दल माहितीतून अनेक अण्णा तयार होतील.

**डॉ.जयसिंगराव पवार,** संस्थापक संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास घडत असता त्या प्रक्रियेत मोलाचे योगदान करणाऱ्यापैकी क्रांतिवीर नागनाथअण्णा एक होते. बेचाळीसच्या लढ्यातील आपल्या असामान्य कामगिरीने क्रांतिवीर नागनाथअण्णा लोकांच्या दृष्टीने दंतकथाच बनून राहिले होते. आजही त्यांचा करिश्मा तसाच आहे. आता तसे नेते निर्माण होणार नाहीत. कारण परिस्थितीच बदलली आहे. क्रांतिवीर नागनाथअण्णां सारखा महापुरुष परिस्थितीच बदलून टाकतो.

**मा.इंद्रजित भालेराव,** कवी

अण्णांचे धैर्य, अण्णांचे धाडस, जाज्वल्य देशभक्ती याला तोड नाही.

**कॉ.किशोर ढमाले,** राज्य संघटक-सत्य शोधक ग्रामीण कष्टकरी सभा,
सत्यशोधक कमुनिष्ठ पक्ष,विद्रोही सांस्कृतिक चळवळ

क्रांतिवीर नागनाथअण्णांची स्वातंत्र्याची कल्पना फक्त ब्रिटिशांना हाकलण्यापुरती मर्यादित नव्हती. तर सामाजिक,राजकीय,आर्थिक असे सर्वंकश स्वातंत्र्य त्यांना अभिप्रेत होते. स्वातंत्र्यानंतरही क्रांतिवीर अण्णांनी क्रांतिकारी सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान उरी बाळगून शेतकरी,कष्टकरी जनतेची खरीखुरी सत्ता आणण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढले. अशा अण्णांना क्रांतिकारी सलाम...! सत्य की जय हो...!

### मा.उत्तम कांबळे

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशाविरुद्ध लढून मिळालेलं ते राजकीय स्वातंत्र्य मानणारा एक विचारप्रवाह आहे. त्यांपैकी क्रांतिवीर नागनाथअण्णा नव्हते.त्यांना सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य पाहिजे होते. त्यासाठी स्वत:च्या सरकार विरुद्ध, या सरकारच्या व्यवस्थेविरुद्ध लढण्यासाठी सत्ता स्थानाकडे न जाता ते अधिक बंडखोर होऊन दुसऱ्या स्वातंत्र्यासाठी लढू लागले. त्यांनी आपल्या आयुष्यालाच रणमैदान बनविले.भगतसिंग,सुखदेव,राजगुरू,क्रांतिसिंह नाना पाटील यांचा विस्तवासारखा विचार मुठीत घेऊन जगणारे अण्णा स्वातंत्र्यानंतरही आयुष्यभर अशाच प्रकारची लढाई लढले. कदाचित अशा लढाईतील ते शेवटचे पाते असतील. अण्णांची वाळव्यातील पहाट भूपाळीने नव्हे तर युद्ध गीतांनी सुरू होत असे. नेत्याच चारित्र्य वादातील कस असत याचंही उदाहरण म्हणजे क्रांतिवीर नागनाथअण्णा. ८०-९० वर्षात त्यांचा मोठ्यातला मोठा शत्रूही अण्णांवर कधी भ्रष्टाचाराची, चारित्र्याची, पक्षपाती पणाचे आरोप करू शकला नाही. साधेपणा,चारित्र्य, संघटनकौशल्य ही अण्णांची बलस्थानं  होती. कधीही ५-५० हजार लोकांचा मोर्चा सहज काढण्याची अण्णांची ताकद -होती. क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणजे खरोखरच समाज बदलण्यासाठी सर्व पातळींवर झालेल्या आंदोलनाच एक महान अपत्य.... या अपत्यानं फाटक्या तुटक्या माणसांना बरोबर घेऊन बदलाचा एक इतिहास घडविला. सर्वहारांसाठी सुदंर वर्तमान आणि सुंदर भविष्यकाळाचं स्वप्न त्यांनी पाहिलं... या स्वप्नांना  हातपाय दिले. स्वप्नांच्या हातात हत्यारं दिली... लढत राहिले. ते आयुष्यभर या  सर्वांना घेऊन एका दीर्घ लढाईचं आणि एका बंडखोर पर्वाच नाव म्हणजेही  नागनाथअण्णा.

### प्राचार्य विश्वास सायनाकर

धडाडी, निर्णयक्षमता, प्रसंगावधान, बेडरपणा, निरपेक्षपणा, समर्पणवृत्ती, नाठाळाचे माथा हाणू काठी हा बाणा, स्वराज्यासाठी टोकाचा त्याग करण्याची तयारी, अन्याय झुगारणारी बंडखोरी, निकराच्या जिवांवरच्या प्रसंगी आघाडीवर पण श्रेयवादात सगळ्यांच्या मागे राहणारे, जिवाला जीव देणारे सहकारी घडवणारे, जन्मजात सेनानी असणारे, ब्रिटिशांचा गुंडांचा कर्दनकाळ असणारे आणि गोरगरीब, नडल्याह्रपिडल्यांचे रक्षण कर्ते क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणजे इतिहासाच्या गरजेतून घडलेले एक स्वयंभू व्यक्तिमत्त्व एक नररत्न. छत्रपतींचा गनिमीकावा, संभाजीराजांचा निधडेपणा, राजर्षी शाहूंची बंडखोरी, कर्मवीरांचे न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड या ब्रीदाचे अद्‌भुत मिश्रण म्हणजे क्रांतिवीर नागनाथअण्णा.

**हसन मुश्रीफ,**माजी पाटबंधारे मंत्री

सर सेनापती घोरपडे कारखान्याच्या पहिल्या बॉयलर प्रदीपनाच्या वेळी हसन मुश्रीफ म्हणाले, ''दिवंगत यशवंतराव चव्हाण, सहकार महर्षी विठ्ठलराव विखे पाटील व क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांचा आदर्श घेऊन कारखाना चालवू.''

**आमदार गणपतराव देशमुख,**शेतकरी कामगार पक्ष

सर्वस्वाचा त्याग करून ''करेंगे या मरेंगे'' या निर्धाराने ब्रिटिशाविरुद्ध प्रति सरकारच्या लढ्याचे जे अभियान चालविले त्यात छातीवर गोळ्या झेलून स्वातंत्र्याचा लढा यशस्वी करणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे वाळव्याचे नागनाथअण्णा नायकवडी. त्यांनी तरुण वयात जे ध्येय ठरविले, त्याबद्दलच्या निष्ठा इतक्या स्पष्ट होत्या आणि जबर होत्या की, सर्व क्रांतिकारकांनी मृत्यूलाही कवटाळण्याचे आवाहन स्वीकारले. त्यांचे कारण म्हणजे अण्णांची आई क्रांतिमाता लक्ष्मीबाईचे संस्कार, स्वातंत्र्यानंतर अण्णांनी राष्ट्र उभारणीचे जे विधायक आणि रचनात्मक कार्य सुरू केले त्यामध्ये त्यांनी कौशल्याने महत्त्वपूर्ण योगदान देऊन हुतात्मा किसन अहिर सह.साखर कारखाना, शैक्षणिक संस्था,तसेच शाळा,महाविद्यालये व मुला-मुलींची वसतिगृहे स्थापन करून नि:स्वार्थपणे सर्व सामान्य शेतकऱ्यांचे प्रामाणिक हित जोपासले. स्वातंत्र्यप्राप्तीचा फायदा शेतकरी व कामगार वर्गाला होत नाही म्हणूनअन्यायाविरुद्ध सत्त्वशील मार्गाने बंड करत राहिले. त्याचाच एक भाग म्हणजे १३ दुष्काळी तालुक्यांतील त्यांनी छेडलेली ऐतिहासिक ''पाणी संघर्ष चळवळ''

**कॉ.गोविंदराव पानसरे**

क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी आणि कुंडलचे जी.डी.बापू लाड हे क्रांतिसिंह नाना पाटलांचे सर्वांत प्रमुख सहकारी होते. स्वातंत्र्यानंतर कम्युनिष्ट बनले. त्यांचा हा व्यवहार त्यांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील भूमिकेशी व व्यवहाराशी सुसंगत असाच होता. त्यांनी आयुष्यभर श्रमिकांच्या, कष्टकरी शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, दीन दलितांच्या चळवळी केल्या. त्यांचा पारदर्शकपणा इतका होता की, कोणी विरोधकांनीही कधी अण्णांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले नाहीत.

**रा.कृ.कणबरकर,** माजी कुलगुरू शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

माझे मित्र नागनाथअण्णा गेली ६० वर्षे अन्याय विवारणार्थ सतत लढत राहिले. सामाजिक,आर्थिक,राजकीय असा एकही लढा झाला नाही की,तिथे जिद्दी अण्णा आघाडीवर नाहीत. मग तो लढा दलितांच्यावरील अन्याया विरोधी असो किंवा जागतिक बाजारपेठ विरोधी असो. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी असो, ट्रक, टेम्पो वडापासाठी असो, नाहीतर धरणग्रस्तांचा असो, किंवा सीमावासीयांचा असो. प्रत्येक लढ्याचे नेतृत्व अण्णांच्याकडे ठरलेले. अन्याय दिसेल तिथे धावून जाणे हे अण्णांच्या जीवनाचे सूत्र होते. नागनाथ हे केवळ अन्याय निवारण्याचे, संघर्षाचे काम करत होते असे नव्हे, त्यांनी संघर्षा बरोबर विधायक कार्याचाही आदर्श निर्माण केला. वाळव्यात त्यांनी मुला-मुलींच्या शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे आदर्श चालविली होती. सतत आठ वर्षे संघर्ष करून त्यांनी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची स्थापना करून तो आदर्श चालविला. शेतकऱ्यांना सर्वांत जास्त दर देणारा, सर्वांत जास्त साखर उतारा असणारा, भारतातील एक कार्यक्षम साखर कारखाना म्हणून या कारखान्याची ख्याती आहे. याचे गुपित काय? तिथे खराखुरा सहकार आहे. स्वाहाकार नाही. या पाठीमागे क्रांतिवीर नागनाथअण्णांनी स्वच्छ, समर्थन, सेवाभावी वृत्तीने केलेले कार्य होय. अण्णांनी उभ्या केलेल्या शिक्षण संस्था व हुतात्मा संकुलामध्ये त्यांनी कोणतेही पद स्वीकारले नाही. अशा त्यागी अण्णांचा सर्वांनी आदर्श घ्यावा.

**खासदार सदाशिवराव मंडलिक,** कोल्हापूर

पद्मभूषण क्रांतिकारी सेनापती क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणजे परिवर्तनवादी चळवळीचे आधारस्तंभ. बहुआयामी नेतृत्व आणि समाजाला ज्यांच्या कार्याविषयी अपार कृतज्ञता आणि आदर आहे.राजकारण आणि समाजकारण यांत गेली ५० वर्षे एक कार्यकर्ता म्हणून माझी वाटचाल सुरू आहे. त्यामागे अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आहे. प्रखर देशभक्तीची तेजस्वी मशाल आपल्या रचनात्मक कार्यातून स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षांतही तेवत ठेवणाऱ्या अण्णांची कर्तृत्व हा अविस्मरणीय ऐतिहासिक ठेवा आहे. तो शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट व्हावा. साखर कारखानदारीवर आलेले आयकर रूपी संकट केवळ अण्णांच्या पुढाकाराने टळले होते.

**लक्ष्मण माने,**साहित्यिक व भटके विमुक्तांचे नेते

थोर स्वातंत्र्य सेनानी क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील जळजळीत अंगार. अण्णांना मी पहिल्यादा पाहिले तेव्हा विचित्र वाटले. खाकी दंडापर्यंत आखडलेला शर्ट, पांढरे शुभ्र धोतर, ठसठसीत भव्य कपाळ, पाणीमय विलक्षण तेजोमय डोळे, तेज:पुंज हसतमुख चेहरा, रुबाबदार देहयष्टी, ठणठणीत प्रकृती, सारे जगावेगळे, असा कुठे पुढारी असतो काय? राजकारणातल्या माणसांचा एक साचा ठरलेला असतो. या साच्यात हा माणूस कोठेच बसत नाही. यांच्या गळ्यात मसरालाही लाजवेल असा सोन साकळ्यांचा गोफ नाही, किलो अर्धा किलो राहू द्या पण चार दोन तोळ्याच्या साखळ्यांही गळ्यात नाहीत. हातात सोन्याचे ब्रेसलेट नाही, डोळ्याला रिबॉनचा गॉगल नाही. तोंडामध्ये पानाचा तोबरा नाही, हातामध्ये महागड्या गाडीचे किचन नाही. पायात बूट नाही, बगळ्यासारखा पांढरा शुभ्र सफारीचा सूट नाही. लाखाची, कोटीची भाषा तोंडात नाही, हा सरळसोट मुद्द्याचं पाहिजे तेवढंच बोलणारा. या माणसाने ब्रिटिशाचे तोंडं फोडून त्यांना सळो की पळो करुन सोडले होते, स्वातंत्र्याच्या लढ्यात चुकून वाचलेल्या या माणसांने आपले सारे आयुष्य लोकांना देऊन टाकले, गैर,वावगे, खोटं अण्णांना मुळीच चालत नव्हतं, मी त्यांना म्हणालो, सातार्‍यामध्ये मी भटक्या मुलांच्यासाठी शाळा बांधतोय. अण्णांनी तिथल्या तिथं पाऊण लाख रुपये कारखान्यामार्फत देऊन टाकले. माझ्यासारखे कितीतरी परिवर्तनवादी कार्यकर्ते अण्णांनी सांभाळले होते. महाराष्ट्रा मधील रिपब्लिकन पक्षाची संघटना वाढावी म्हणून नेत्यांना एकत्र करून जाहीर कार्यक्रम करून सुमो गाडी देणारे अण्णा, राजकारणाच्या परिघाच्या फार पलीकडे उभा असलेला हा श्रमिकांचा कष्टकर्‍यांचा अण्णा विठ्ठल होता. भेटायला आलेले किती लोक असोत त्यांना एक ग्लास दूध आणि जेवल्याशिवाय न सोडणारे अण्णा शेतकरी, शेतमजूर, कामगार, दुष्काळग्रस्त, श्रमिक, दलित उपेक्षित, भटके विमुक्त असे जे जे पीडित, शोषित तेथे अण्णांच्या स्वत:च्या जिव्हाळ्याचे विषय असत. ज्यांचे कुणी नाही त्यांना अण्णा आपल्या ओट्यात दत्तक घेत असत. क्रांतिवीर नागनाथअण्णांचे संस्कार ही मोठी शिदोरी आम्हांला त्यांनी दिली आहे. त्यातले कणभर जरी आमच्यात उतरले तरी कष्टकर्‍यांच्या जगात पहाट उगविल्याशिवाय राहणार नाही.

**पार्थ पोळके,** अध्यक्ष विद्रोही संस्कृती चळवळ,महाराष्ट्र
अण्णांच्या नसानसांमध्ये क्रांतिकारत्व भिडले आहे. क्षण आणि ध्येयवेढा माणूस मी फक्त क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या रूपातच पाहिला.

**प्रा.डॉ.अच्युत माने,** ख्यातनाम वक्ते व ज्येष्ठ विचारवंत,निपाणी
स्वातंत्र्य चळवळीतील अण्णांचा सहभाग हा केवळ त्या मर्यादित उद्दिष्टापुर्ता नव्हता तर त्यांचा चळवळीचा क्रांतिकारक पिंड त्यांच्या जीवनाच्या अंतापर्यंत धगधगत होता. या अर्थांने त्यांचे संपूर्ण आयुष्य ही एक धगधगती मशाल होती. अण्णांच्या सारखा चारित्र्यवान नेता शोधा आणि तो तरुण पिढीला तो दाखवा असे म्हणण्याची वेळ भारतीय जनतेवर आली आहे. अशा पार्श्वभूमीवर अण्णांचे जाळणारे व्यक्तिमत्त्व अधिकच खुलून समोर उभे राहते.बाबरी मशीद पाडली गेली आणि देशाच्या स्वातंत्र्या नंतरची एक काळी घटना समोर आली. अण्णांनी हा दिवस ''बिमोड दिन'' धर्म निरपेक्ष समाज निर्मित्तीसाठी जाहीर करून जाहीर मेळावे घेतले. परिवर्तनाची भाषा तोंडी असणारे अनेक नेते आहेत. शाहु, फुले आंबेडकरांची नावे ती घेतात मतलबासाठी पण कृतीत काय? अण्णा बोलायचे तसे कृतीत करायचे. समाजाच्या समग्र परिवर्तनाचा विचार करणारा हा एक महान क्रांतिकारक, कृतिप्रवण युगपुरुष होता. शिक्षण, सहकार, सेवा यांप्रती संपूर्ण जीवन देणारे अण्णा हे आजच्या समाजजीवना- संदर्भात फार मोठा आस्थेचा आणि श्रद्धेचा विषय आहे. ''सारेच दीप आता मंदावले'' अशा परिस्थितीत अण्णांचे जीवन भावी पिढीला एखाद्या दीपस्तंभासारखे आहे.

**मा.शरदचंद्रजी पवार,** माजी कृषीमंत्री, भारत सरकार
पद्मभूषण क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात, देशाबद्दल स्वाभिमान जागृत करून सर्वसामान्यांना त्यांच्या कर्तृत्वशक्तीची जाणीव करून देण्याचे मौलिक कार्य केले. १९४२ च्या चळवळीत प्रति सरकारच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध  सशस्त्र फौज उभी करून लढा दिला. हे करत असताना सामाजिक समृद्धीसाठी शैक्षणिक कार्यास अग्रहक्क दिला. स्वातंत्र्यानंतर तळागाळांतील लोकांच्यासाठी, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी यांच्या उद्धारासाठी विविध चळवळी उभ्या केल्या.अण्णांनी अतिशय असे महत्त्वाचे परिवर्तनाचे काम केले. क्रांतिवीर अण्णांनी उभा केलेला हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना म्हणजे भारतीय साखर उद्योगातील एक दीपस्तंभ आहे. क्रांतिवीर अण्णांचे सर्व आयुष्य म्हणजे सामाजिक सेवेचा एक जीवनपट आहे.

**मा.मुलायमसिंग यादव,** राष्ट्रीय अध्यक्ष, समाजवादी पार्टी
डॉ.अण्णा एक जनप्रिय नेता रहे, जिन्होंने स्वातंत्रता संग्राम में योगदान दिया। उन्होने किसानों, मजदूरों, दलितों व आदिवासियों के हित में हमेशा कार्य किया । ऐसे प्रेरक व्यक्तित्व पर हमे विश्वास हैं कि, मे डॉ.अण्णा के सम्बन्ध मे ऐसी सामग्री उनके जीवन में जो है ओ पाठकों के लिए उपयोगी सिद्ध होगी ।

**प्रतीक प्रकाशबापू पाटील,** कोळसा राज्यमंत्री भारत सरकार
अखंड संघर्षमय सामान्य कष्टकरी जनतेला वाहिलेले जीवन म्हणून पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी यांचे नाव आदराने घ्यावे लागेल. १९४२ च्या घडलेल्या घटनांमध्ये क्रांतिवीर अण्णांचा सहभाग होता. त्यांनी इंग्रज सरकारला सळो की पळो करून सोडले. स्वातंत्र्यानंतर त्यांनी समाज विकासाचा वसा घेतला.अण्णांनी हुतात्मा साखर कारखाना चालवून हुतात्मा पॅटर्न देशात आदर्श असा निर्माण केला. दुष्काळी भागासाठी त्यांनी अखंडपणे संघर्ष करून लाखो लोकांच्या उपस्थितीत पाणी परिषदा घेऊन दुष्काळी भागाचा दुष्काळ हटवण्याचे काम अण्णांनी केले.

**अखिलेश यादव,** मुख्यमंत्री,उत्तर प्रदेश
सर्वविदित है कि पद्मभूषण डॉ.अण्णा का सारा जीवन समाजोत्थान का कार्य करते हुए बीता । उन्होंने सदैव गरीब, आदिवासी, किसान, महिलाओं के हितों के लिए संघर्ष किया । स्वतंत्रता आंदोलन मे उनका योगदान स्मरण किया जाता रहेगा । स्वतंत्रता पश्चात सहकारिता आंदोलन के माध्यम से राष्ट्र निर्माण के कार्य में उन्होंने सक्रियता से भाग लिया । क्रांतिवीर अण्णा का कार्य इतना महान है कि, जो पाठकों के लिए प्रेरणायी सिध्द होगी.

**प्रा.शिवाजीराव काळुंगे**
१९९३ साल. तेरा दुष्काळी तालुक्यांसाठी क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांनी छेडलेली ऐतिहासिक पाणीसंघर्ष चळवळ. त्यातून गेल्या वीस वर्षांचे आलेले संबंध त्यातून मला जे अण्णा भावले त्या अण्णांचे हिमालयाची उंचीही अपुरी पडेल असे उत्तुंग जीवनकार्य होते. अण्णांच्या दृष्टीने कोणताही मान्यवर खासदार, आमदार, पुढाऱ्यांपेक्षा चळवळीवर निष्ठा ठेऊन काम करणारा लहान किंवा अगदी सामान्य कार्यकर्ता हा महत्त्वाचा, माझ्या विषयी तर अण्णांचा खूप जिव्हाळा होता. मी एके

दिवशी अण्णांना जेवण घरून आणू देऊ का ? असे विचारले. अण्णा शक्यतो बाहेरचे जेवण घेत नसत. आपला यत्किंचितही त्रास चळवळीतील कार्यकत्याला होता कामा नये. हा त्यांचा कटाक्ष का कोण जाणे.... अण्णांना घरचे जेवण देण्याची आम्ही पती पत्नीनी संधी सोडली नाही. जेवण झाल्यावर दौऱ्यावर निघताना अण्णा म्हणाले, ''अरे उत्तम... काळुंगे सरांचा रिकामा डबा घरी पोहोच केला का?'' हे त्यांनी विचारले. मी मात्र भारावून जाऊन मनाशी विचार करीत असे की, ऐवढे मोठे अण्णा पण किती लहान गोष्टीची काळजी करतात. माझी मुलगी आणि पत्नी मला म्हणाली, ''अण्णांना एक वेळ घरी घेऊन या.'' मी त्यांना प्रत्येक वेळी प्रयत्न करतो म्हणायचो पण मला माहीत होते. अण्णा शक्यतो कोणाच्या घराकडे जात नसल्यामुळे माझे अण्णांना घरी चला म्हणायचे धाडस होत नव्हते. एकवेळ योगायोगाने मंगळवेढ्यात पाण्याच्या प्रश्नावरती बैठक होती. बैठक संपल्यानंतर धाडस करून अण्णांना म्हणालो,''अण्णा माझ्या मुलीची व मॅडमची इच्छा आहे आपण घरी यावे.'' अण्णा म्हणाले, ''काळुंगे सर मी शक्यतो कोणाच्या घरी जात नाही. पण तुमच्याकडे येतो. परंतु फक्त तीनच मिनिटे थांबणार. पाणी सुद्धा घेणार नाही.'' अण्णा माझ्या घरी आले. आनंद झाला. मला माझ्या मोठ्या मुलीच्या मुलाला अण्णांच्या पायावर घालायचे होते. ते मी केले अण्णांनी आशीर्वाद दिला आम्ही साऱ्यांनी अण्णांचे दर्शन घेतले. अण्णांनिबरोबर तिसऱ्या मिनीटाला ठरल्याप्रमाणे पाणी न पिता घरातून बाहेर पडले. माझे घर साधे धाब्याचे आहे परंतु अण्णांचा पदस्पर्श झाल्यामुळे ते घर सोडून मी नवीन घेतलेल्या बंगल्यात अजूनही राहायला गेलो नाही. अण्णांच्या सहवासात गेलो. प्रत्येक दिवस त्यांच्याबरोबर काम करायला मिळालेली संधी मी माझे भाग्य समजतो. जया मामांच्या आग्रहास्तव मनातले दोन शब्द इतकेच! पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णांच्या कार्यकर्तृत्वास माझे त्रिवार वंदन.

## ॲड.सुभाष पाटील

कामगार, मजूर, शेतमजूर, कष्टकरी शेतकरी, आदिवासी, दलित यांच्या प्रश्नांवर नागनाथअण्णांनी आपली हयात घालविली. नदीवर बांधलेल्या मोठ्या मोठ्या धरणांमुळे शेती आणि शेतकरी समृद्ध होतो. परंतु त्याच वेळी त्या धरणामध्ये जमीन, घरदार सर्वस्व गमावलेले धरणग्रस्त मात्र जिवंतपणी मरणयातना भोगतात. त्यांचे अश्रू पुसण्यासाठी अण्णा आयुष्यभर झटत राहिले. या धरणग्रस्तांना स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान मिळाला पाहिजे. यासाठी अण्णा संघर्ष करत राहिले. किती सांगू? किती लिहू? कळायला लागल्यापासून अखेरच्या श्वासापर्यंत सतत नवनिर्मितीसाठी संघर्ष करत राहिले. अखंड योद्धा क्रांतिवीर नागनाथअण्णाच होता.

**प्रा.आर.एस.चोपडे,** झरे,ता.आटपाडी

क्रांतिवीर नागनाथअण्णा एक कणखर दूरदृष्टीचे नेतृत्व बहुजन समाजाला मिळाले. त्यामुळे सर्वांचे प्रेरणास्थान अण्णा झाले. गरिबांना धरणग्रस्तांना, दुष्काळग्रस्तांना, दलितांना, शेतकऱ्यांना न्याय मिळत आहे. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीचा खरा वारसा शिष्य या रूपाने महाराष्ट्रास वाळव्याने दिला आहे. बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाऊले. ते झऱ्याला आमच्या बॅ.शेंडगेच्या संस्थेत आपणहून आले. सारा परिसर पाहून आमच्या पाठीवर थाप मारली आणि म्हणाले, ''चोपडे सर, एवढ्या कष्टाने तुम्ही हे सारे उभे केलय. आमचा त्यात वाळव्याच्या शेतकऱ्यांचा खारीचा वाटा म्हणून तुमच्या ज्यूनिअर कॉलेजच्यासाठी हुतात्मा कारखान्याच्या माध्यमातून एक खोली बांधून देऊ. असे सांगून तिसऱ्या दिवशी खोलीच्या बांधकामाला सुरुवात केली. आणि थोड्याच दिवसांत बांधकाम पूर्ण केले. अण्णांच्या सारखे दूरदृष्टीचे नेतृत्व हुतात्मा संकुलाला लाभले. अण्णांची उंची व झेप यांचा आवाका फार मोठा होता. अण्णांचे व्यक्तिमत्त्व परिसासारखे होते. त्यांच्या सान्निध्यात जो गेला त्याचे सोने झाले. आम्हा तेरा दुष्काळी तालुक्यांचा दुष्काळ हटविणारे कृष्णा खोऱ्याचे आमच्या शेतीला पाणी देणारे भाग्य विधाते क्रांतिवीर नागनाथअण्णा या रूपाने आम्हांला भेटले, भावले.

**मा.अशोक घोरपडे,** दैनिक सकाळ

क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणजे विचारांची धडधडती तोफ. अण्णा हे आगळे वेगळे व्यक्तिमत्त्व असलेले क्रांतिकारक. ते मुद्द्याचं मोजकंच बोलायचे, पण त्यातील आशय खूप मोठा असायचा. फार दूरदृष्टीने आणि परखडपणे ते आपला विचार मांडायचे. धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, पाणीसंघर्ष चळवळीचे आंदोलने असोत, बिमोड दिन असोत, की साखर कारखान्याचे कार्यक्रम असोत किंवा शेतकऱ्यांच्या परिषदा असोत, नाहीतर दीन दलितांचे संमलेन असोत. अण्णा निरोप धाडायचे आणि बोलावून घ्यायचे. त्यांच्या बोलण्यातून सहवासातून,त्यांची स्वातंत्र्याविषयाची कल्पना, स्वातंत्र्य मिळाल्या नंतर ते भांडवलदाराच्या घशात गेलेली त्यांच्या मनाला लागलेली खंत,पुन्हा लढा उभारण्याच्या अनेक कल्पना, त्यांसाठी संघटन, हुतात्मा पॅटर्न, पाणीसंघर्ष चळवळ, शेतकरी, कामगार, शेतमजूर, धरणग्रस्त यांच्या प्रश्नांसाठी लढे. अशा सगळ्या गोष्टी सहजपणे उलघडत गेल्या. त्यांची नव्या स्वातंत्र्याची कल्पना समजत गेली. त्यातून त्याचं वेगळ व्यक्तिमत्त्व व लढावू क्रांति कर्तृत्वाचा अभ्यासही आम्हांला करता आला. १९९३ पासून अण्णांनी दुष्काळ, पाणी परिषदा

घेतल्या, त्या परिषदेला एक लाखाच्या आसपास लोकांचा जनसमुदाय जमत होता. तळपत्या उन्हात बसून अण्णांचे भाषण ऐकत होता. अशा परिषदा अण्णांनी दरवर्षी स्वत:च हजर राहून २०११ अखेर अठरा वर्षे पाण्यासाठी संघर्ष केला. ते म्हणायचे, ''रानात पाणी बघणार मगच थांबणार.'' पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, यशवंतराव चव्हाण, धनजंयराव गाडगीळ, वसंतदादा पाटील यांच्या सारख्या अनेक समाजधुरिणांनी सहकारातून व्यक्त केलेली अपेक्षा क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांनी हुतात्मा पॅटर्ननुसार सत्यात उतरवली. वाळव्याचा हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. कष्टकऱ्यांच्या दलित पीडितांचा विकास ज्या गतीने व्हायला पाहिजे होता तेवढा झाला नाही. ही खंत त्यांच्या मनात कायम होती. अत्यंत साधी राहणी कायम ठेवून शेवटच्या श्वासापर्यंत ते जनतेसाठी लढले.

**डॉ.केशवराव धोंडगे,**कंधार माजी आमदार,माजी खासदार

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश कालियाचे मर्दन करणाऱ्या क्रांतिवीर नागनाथअण्णांनी सातारच्या कारागृहातून मर्दपणे उंच अशा संरक्षक भिंतींवरून उडी मारून जीव धोक्यात घातला. निर्भयतेपणाची ढाल पाठीला बांधून ह्या ध्येयवेड्या वीर नागनाथरावांनी पुरुषार्थाची स्वातंत्र्याच्यी तेजस्वी व पुरुषार्थी लेणी की त्याला इतिहासात तोड नाही, जोड नाही,केवळ अचाट धैर्य या आमच्या वाघाने दावले. त्यामुळे स्वराज्याचे फावले. सावरकरांची समुद्र उडी त्रिखंडात गाजली, पण या कृष्णाकाठाच्या नागनाथराव महावीराने सातारच्या कडेकोट संरक्षक भिंतींवरून मर्दपणे उडी मारली. ती पळून जाण्यासाठी नाही. जीव वाचविण्यासाठी नाही तर मायभूमीच्या, भारतमातेच्या पायातील, दास्यशृंखला, तोडून गुलामीत खितपत पडलेल्या करोडो मायबापांना मुक्त करण्यासाठी त्यांची ती उडी होती. स्वाभिमानाची मर्दुमकीची स्वातंत्र्य तेजाची, शूर व वीरत्वाची ती अजिंक्य गुढी होती. वास्तविक पाहता उडी अनुपमेय ज्यांला उपमाच देता येत नाही. अशी ती उडी होती. पण नागनाथअण्णांची जात आडवी आली. आणि नागनाथअण्णांची उडी अखेर वर्णसुराना झोमली त्यांना गाजवून सोडली. अण्णांच्या गळ्या जानवे असते व डोक्याला शेंडी असती तर माझ्या गबूर अण्णांच्या उडीची तळी सर्व प्रसार माध्यमांनी दाहीदिशा फडकविली असती. स्वातंत्र्यवीर सावरकारांच्या उडीला आम्ही दुय्यम दर्जा देण्याचे पातक कसे करू ? त्यांचा महान त्याग आम्हांला शिरसावंद्य आहे. पण त्याच पद्धतीने आमच्या नागनाथअण्णांची उडी काय कमी होती का? ती आड्यापाट्याच्या

खेळातील उडी होती? जीवन मृत्यूच्या दारात जाणारी ती सातारच्या कारागृहातील उडी कारागृहातून सुटून अक्राळल-विक्राळ अशा काळ गृहात जाणारी ती महापुरुषार्थी स्वातंत्र्य लढ्यातील सर्व श्रेष्ठ क्रांति दर्शी कुणबी राजाची, बळी राजाची, नाहीरे वाल्याची व त्यांच्या अस्मितेच्या क्रांति देवतेची, विरोशिरोमणीची ती उडी होती.त्या उडीने केवळ वाळवाच व कृष्णकाठच पावन झाला असे नाही तर संपूर्ण महाराष्ट्र या पुरुषार्थाने व कीर्तिध्वजाने, प्रेमगीताने न्हाऊन निघाला. असा माझ्या जिवाचा जिवलग मार्गदर्शक, हितचिंतक, मर्दबाण्याचा निर्व्यसनी, सिंहाचं काळीज घेतलेला, निष्कपटी अंत:करणात सतत स्वातंत्र्यासाठी ज्वालाग्राही भट्टी पेटवीत चालता बोलता यज्ञकुंड व क्रांति विद्यापीठ म्हणजे माझे श्रेष्ठबंधुराज नागनाथरावजी !

**श्री.व्यकंटराव रणधीर,**माजी आमदार बोराडी, जि.धुळे

नागनाथअण्णा समाज सुधारकारांच्या भूमितील वटवृक्ष होते. एक पुरोगामी विचार सरणीचा समाज उत्थानाची कास असलेला माणूस. खानदेशातील सरकारी खजिना लुटीच्या चळवळीत. एक पहाडी व्यक्तिमत्त्व असणारे नागनाथअण्णा प्रतिकुल परिस्थितीतही तगून राहणारा बुलंद माणूस. आमची पहिली भेट झाली ती सरकारी खजिना लुटीत. अण्णा म्हणजे वादळाला थोपवून धरण्याची ताकद असलेला असामान्य व्यक्तिमत्त्व अशा या माणसाचे जीवन एक अजब रसायन आहे. सामाजिक जीवनातील जातिधर्मपंथांच्या भिंती तोडणारा कृतिशील अजातीय माणूस म्हणून महाराष्ट्रातील एकमेव व्यक्ती. त्यांनी १२२ सहकारी साखर कारखान्यांमध्ये सर्व प्रथम एका कांबळे नावाच्या मागासवर्गीय माणसास चेअरमनपद देणारे अण्णा समाजवादी होते. स्वातंत्र्यानंतर शिक्षण व सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी उभारणारा एक ध्येयवेढा क्रांतिकारक, माझे समविचारी मित्र नागनाथअण्णा नायकवडी.

**श्री.दादासाहेब पाटील,**चेअरमन,प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग,कोल्हापूर

क्रांतिवीर नागनाथअण्णाच्या अंगी अनेक गुण आहेत. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे काम महान आहे. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी व्यक्तिगत प्रपंच न करता खऱ्या अर्थाने गोर गरीब व कष्टकरी लोकांच्यासाठी कार्य केले. त्यांच्या कामगिरीबद्दल लिहण्यासाठी अनेक पाने खर्च पडू शकतात. त्यांचे जीवनचरित्र लिहणे एक महान काम आहे. गरिबांबद्दल अतिशय कणव त्यांच्या अंगी असणाऱ्या या गुणाला स्पर्श करण्याचा प्रयत्न मी करीत आहे. अण्णा सरळ सहज बोलत, जे बोलत ते कृतीत आणत असत, त्यांचे दिसणे साधे, राहणे साधे, त्यांचा पेहरावही साधा. हे पाहून गरिबांतल्या

गरीब माणसालाही अण्णांच्याबद्दल अपुलकी व जिव्हाळा वाटत होता. क्रांतिवीर अण्णांनी धरणग्रस्त, शेतमजूर, कष्टकरी शेतकरी, दुष्काळग्रस्त, दलित अल्पसंख्याक अशा बहुजन लोकांच्यासाठी चळवळी केल्या. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यातून शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त दर दिला. कामगारांना वेज बोर्ड, पगार, ४० टक्के बोनस, ऊस तोडणी मजुरांना योग्य न्याय, त्यांच्या मुलांच्यासाठी पहिली साखर शाळा अण्णांनी कारखान्यावर सुरू केली. कारखाना साईटवर लोकांच्यासाठी दोन रुपयांत पोटभर जेवण देण्याची व्यवस्था केली. शैक्षणिक क्षेत्रात तर त्यांनी फार मोठे योगदान दिले. आपलं आयुष्य गोरगरीब जनतेसाठी खर्च केले. अतिशय मुक्त हस्ते उदार मनाने सतत लोकांना, शैक्षणिक संस्थांना मदत केली. अण्णा हे खऱ्या अर्थाने दीन दलितांचे कैवारी आहेत.

**श्री.पन्नालाल सुराना,**ज्येष्ठ समाजवादी विचारवंत
स्वातंत्र्यलढ्यात अण्णांनी जे काम केले आहे ते इतिहासात सुवर्णअक्षराने लिहावे असेचआहे. स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांच्या,दीन दलितांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी आयुष्यभर केले. शैक्षणिक क्षेत्रात अनेक शाळा, कॉलेज शिराळा पेटा व वाळवे तालुक्यात काढल्या. मुला-मुलींचे मोफत वसतिगृह काढले. सामाजिक विषमतेवर कठोर, अण्णा नेहमी बाह्या सरसावून पुढे सरसावले आहेत. सांगली जिल्ह्यातील जत, आटपाडी, खानापूर, कवठेमहांकाळ, साताऱ्यातील खटाव, माण, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला आदी दुष्काळी तेरा तालुके की जिथे प्यायला सरळ पाणी मिळत नाही. तिथे शेतीला पाणी मिळावे. पाणी समाजाच्या मालकीचे मानले जावे. त्याचे समान वाटप व्हावे. यासाठी अण्णांनी वीज बावीस वर्षे लढा चालू ठेवला. १९९३ साली जी आटपाडी पाणी परिषद सुरू झाली ती कायम स्वरूपी दुष्काळी जनतेच्या मनाचा ठाव घेत गेली. अण्णा दररोज बैठका, सभा, मीटिंग घेऊन दुष्काळी जनतेला आपल्या भागात येणाऱ्या पाण्याचे महत्त्व पटवून देत सगळा भाग पिंजून काढत. एखादे काम हातात घेतले तर ते तडीस न्यायचे. अण्णांकडून शिकावे. पाठीचा कणा ताठ आहे. मनाचा निर्धार कायम आहे. ज्यांनी अयोध्येत बाबरी मशीद पाडण्याचे कृत्य केले त्यांच्या विषारी विचारसरणीपासून देश वाचवण्यासाठी अण्णा धडपडले. रचना आणि संघर्ष या दोन चाकांची गाडी समर्थपणे हाकणारा हा गडी म्हणजे महाराष्ट्राचा खंबीर आधारस्तंभ होय....!

**श्री.नामदेवराव कराडकर,** ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, अण्णांचे सहकारी

ऐन तारुण्यात देशाच्या स्वातंत्र्यासाठी चळवळीत उतरलेले नागनाथअण्णा गेली कित्येक वर्षे घराचा उंबरठा ओलांडून स्वत:च्या घरात गेले नाहीत. त्यांनी स्वत:ला घालून घेतलेले नियम ते आजतागायत कडक शिस्तीने पाळताहेत. अशा अण्णांना सरस्वतीचा वरदहस्त न लाभला तर नवल. आज अण्णांना शिवाजी विद्यापीठ तर्फे डी.लिट ही पदवी देऊन सन्मानित केले. अण्णांनी उभारलेले शैक्षणिक कार्य म्हणजे रानोमाळी फुललेले नंदनवन...! अण्णांच्या शैक्षणिक कार्याचा आलेख सातत्याने उंचावत गेला. मात्र त्या मागे जवळ जवळ साठ वर्षांची त्यांनी खडतर तपश्चर्या आहे. अण्णांनी किसन अहिर व नानकसिंग या आपल्या दोन हुतात्मा झालेल्या मित्रांना अभिवांदन म्हणून शाळा, वसतिगृहे आणि पूर्ण हुतात्मा संकुल उभं केलं आहे. ग्रामस्थांच्यात एकी निर्माण करून शिक्षणाचा पाया रचला. शाळेभोवती आंब्यांची बाग फुलविली आहे. या झाडांची देखभाल शाळेतील मुले करतात. त्याचे फळ त्यांना आंबे लागले की आपोआप मिळते. या बागेतील आंबे आधी मुलांना आणि नंतर गावातील प्रत्येकच्या घरी वाटले जातात. अण्णांच्या शाळेत किल्लारीच्या भूकंपामुळे निराधार झालेली मुले दुष्काळाने होरपळलेली निराश्रित मुले दिसतात. त्यांच्यासाठी अण्णा म्हणजे माउलीच. अण्णांनी साखर कारखान्याला मंजुरी भगिरथी प्रयत्नाने आणली. ११ च महिन्यांत साखर पाडली. आणि साखर कारखान्यातून बाहेर जे पडले ते आजतागायत कारखान्यात आत गेले नाहीत. अण्णांनी कारखाना शेतकऱ्यांच्या ताब्यात दिला. त्यांचा मुक्काम बाहेर साखर शाळेत असायचा. ते कारखान्याचे सभासदही झाले नाहीत. मग चेअरमन व्हायचे सोडा. अशा या व्यक्तीची दातृत्व, कर्तृत्व आभाळासारखं विस्तरणीय आहे. 'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावेत' अण्णांच्या सान्निध्यात वावरणाऱ्या प्रत्येकात हा गुण नक्कीच येत असावा, इतका त्यांचा प्रभाव सर्वांवर पडतो. अण्णा शिक्षणासाठी इकडे वाळव्याला आलेल्या गोरगरीब मुलांसोबत चक्क शाळेत राहतात. घरची भाजी-भाकरी त्यांच्या सोबत खातात. शाळा हेच त्यांचं घर आहे. मुलं हेच त्यांचे सखेसोबती.

**श्री.विवेक दाभोळे,** पत्रकार इस्लामपूर

जीवनातील महानकार्यामुळे उभ्या आडव्या मराठी मुलुखात एक जितीजागती आख्यायिका बनून राहिलेल्या नागनाथअण्णांचा शिवाजी विद्यापीठाच्या डी.लिट. पदवीने रास्त गौरव तर झाला आहेच. शिवाय यामुळे या पदवीची देखील उंची

वाढली आहे.कष्टकरी, शेतकऱ्यांच्या खऱ्या स्वातंत्र्यासाठी पंचाऐंशीच्या पूर्तीनंतर देखील तितक्याच तडफेने संघर्ष करणाऱ्या, वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरून शासनाला जागे करणाऱ्या क्रांतिवीर नागनाथअण्णा यांच्यामुळेच आज थोड्याफार प्रमाणात तरी सर्वसामान्य कष्टकरी, शेतकऱ्याला न्याय मिळतो आहे. यातच अण्णांच्या कार्याची महानता सामावलेली आहे.

**श्री.धन्वंतरी परदेशी,** पत्रकार वाळवा

क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांचे जीवन म्हणजे एक चालता बोलता इतिहासच. बालवयातच क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांच्यासारख्या मातेचे संस्कार आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी झपाटलेल्या क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा प्रभाव आणि वडील रामू बापू नायकवडी यांच्या कडक शिस्तीत अण्णांचे बालपण घडले. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अण्णांनी प्राणांची बाजी लावली. स्वातंत्र्यांच्या अग्निकुंडात उडी घेतली. स्वातंत्र्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी पैशाच्या उपलब्धतेसाठी धुळ्याचा पाच लाख एकावन्न हजारांचा खजिना सहकाऱ्यांच्या मदतीने लुटला. आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा आदर्श घेऊनच ऐन तारुण्यात शिराळा पेट्यासारख्या दुर्गम भागात सशस्त्र सेना उभी केली. क्रांतिवीर नागनाथअण्णांची १९४२ च्या लढ्यातील कामगिरी संस्मरणीय आहेच. शिवाय स्वातंत्र्योत्तर काळामध्ये त्यांनी शेतकरी, भूमिहीन धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त यांच्यासाठी दिलेले लढे सर्व परिचित आहेत.त्यांच्या विविध लढ्यांमुळेच वाळवा हे क्रांतिकारकांचे तीर्थक्षेत्रच बनले आहे. परमेश्वर त्यांनी मानला नाही. देव-देवता, पूजा-अर्चा कधीही मानल्या नाहीत. महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसिंह नाना पाटील, हुतात्मा किसन अहिर, कर्मवीर भाऊराव पाटील याच त्यांच्या प्रेरणा होत्या. त्यांनी विश्वास ठेवला तो राबणाऱ्या आणि कष्ट करणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि चळवळ करणाऱ्या कार्यकर्त्यांवरच. तीच त्यांची मोठी ताकद होती आणि या ताकदीच्या जोरावर त्यांनी सत्ताधाऱ्यांनाही नमवले. चळवळीच्या धाकावर धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त यांच्यासाठी कायदे करणे सरकारला भाग पाडले. ऊसकरी शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना निर्माण करून एक वेगळा उच्चांक करून हुतात्मा पॅटर्न म्हणून देशात गाजवला.

**जयवंत अहिर,** क्रांतिवीर नागनाथअण्णा चरित्रकार
संधी असतानाही सत्तेच्या आणि भौतिक सुखाच्या मोहात न आडकता, भारत देश सुजलाम सुफलाम करण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा द्रष्टेपणाचा, तत्त्वज्ञानाचा, आणि बुद्धीनिष्ठ, तर्कशुद्धतेची सांगड घालून धर्म मार्तंडांनी हजारो वर्षांची जातीयतेची बनविलेली चौकट उखडण्यासाठी नव्या विचाराचा नवा समाज घडविताना क्रांतिवीर अण्णा स्वत:ला विसरून शेवटच्या श्वासापर्यंत जिवंत हुतात्म्याचे जीवन जगले.

**श्री.उत्तम घोलप,** अण्णांचा एकनिष्ठ सेवक
निसर्गाच्या आणि पशुपक्ष्यांच्या सान्निध्यात घनदाट अरण्यात वारणेच्या काठावर माझं नांदोली गांव चांदोली धरणाच्या पाणलोटात बुडणार होतं. आमचं मायबाप सरकार जिथं आम्हांला टाकतील तेथे जायचं होतं. आमच्या कितीतरी पिढ्या नांदोली गावात गेल्या होत्या. तिथली माती, झाडंझुडपं, पशुपक्षी याचं घट्ट असं नातं होतं. त्या सर्वांना सोडून कायमचा जायच्या विचारानं मनाची घालमाल होत होती. आमच्या गावचं वाळव्याला पुनर्वसन होणार म्हणून एका गृहस्थाला मी सांगितले. त्या गृहस्थाने आम्हांला बजावले ! 'वाघाच्या पिंजऱ्यात जात आहात, क्रांतिवीर नागनाथ अण्णांच्या अपुऱ्या माहिती मुळे आम्ही जाम घाबरलो होतो. १९८५ साली आमचे पुनर्वसन वाळवे गावात झाले. आम्ही वाळवे गावी आल्यानंतर अण्णांना शाळेत भेटलो. आम्हांला वेगळाच अनुभव आला. अण्णांनी प्रत्येकाची मायेने आस्थेवाईकपणे चौकशी केली. आम्हा धरणग्रस्तांच्या दैनंदिन परिस्थितीने अण्णांचे मन हेलावून गेले होते. आम्हांला त्यांनी खूप मोठा आधार दिला. आमच्या आयुष्यात अण्णासारखा पहिलाच माणूस आम्हांला भेटला. अण्णांच्या सान्निध्यात सतत येण्यामुळे खरे अण्णा आम्हांला कळाले. परंतु काही व्यक्तिगत मंडळींनी स्वार्थासाठी व हेव्यादाव्यातून अण्णांना बदनाम करण्याचं काम केलं आहे. मला टेक्निकल विभागाकडे अण्णांनी शिपाई म्हणून घेतले. मी मुंबईत राहिल्यामुळे माझी वागण्याची पद्धत वेगळी होती. ती अण्णांना आवडली. त्यांनी मला खूप जवळ केलं. ऑफिस कामाबरोबर मी त्यांच्या बरोबर सतत राहायला लागलो. त्यांची सेवा करण्याची मला संधी मिळाली. मी स्वत:ला सुदैवी समजतो. अण्णासारखा एक लढवय्या जनतेची खरी खुरी सेवा करणारी एक संघर्षशील व्यक्ती सोबत राहण्यात मला आनंद मिळत असे. अण्णा कोल्हापूर जिल्ह्यात ऊस गोळा करण्यासाठी फिरत होते. त्यावेळी मी आणि महेश कांबळे अशी आम्हा तिघांची एक टीम मुद्योळ तिटा,

बिद्री कारखाना परिसर, गारगोटी, राधानगरी, वाकी घोल पर्यंत ऊस आम्ही गोळा करत होतो. दोन दोन दिवस आम्हांला अंघोळही मिळत नसे. कधी कधी जेवण नसे. त्यावेळी आम्ही चिरमुरे फुटाणे खाऊन दिवस काढत होतो. काही काही वेळा अण्णा ओलेच कापडे नुसते झटकायचे आणि घालायचे. दुसरी टीम भोगावती कारखाना, कुंभी कासारी परिसरामध्ये जया मामा, मोटे सर, शेटे सर ऊस गोळा करायचे काम करीत होते. अण्णांचे आणि माझे खूप आपुलकीचे नव्हे तर आपुलकीच्या पलीकडले घट्ट असे संबंध निर्माण झाले. एक दिवस अण्णा मला म्हणाले, ''उत्तम, तू किती आईच्या मायेने माझी काळजी घेतोस. तू माझी आईच आहेस.'' त्यांचे शब्द ऐकून मला भरून पावल्या सारखे वाटले. तेथून मी घरी आल्यानंतर खूप रडलो. त्यांचे ते शब्द घरी आल्यावर तसेच घुमत होते. अण्णांच्या मनात गरीब जनते विषयी खूप आपुलकी होती. असे अण्णा माझे आणि सर्वांचे आधारवड होते.

**श्री.जे.एफ.पाटील,** ज्येष्ठ अर्थ तज्ज्ञ

स्वातंत्र्य चळवळीत नागनाथअण्णांचे योगदान देदिप्यमान होते. अंगावर रोमांच करणारे होते. पण माझ्यामते स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जवळजवळ ६० वर्षे त्यांनी राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात जे सातत्यपुर्ण काम केले त्याचे ज्या प्रमाणात मुल्यमापन, अधिकृत नोंदणी व निर्वचन व्हायला पाहिजे होते ते झाले नाही. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना महाराष्ट्राच्या सहकारी अर्थकारणाचा एकमेव मानबिंदू मानावा लागेल. उत्तम प्रशासन, उत्तम तांत्रिक कार्यक्षमता, ऊस उत्पादकांना उत्तम मार्गदर्शन, चैन,चंगळ, भपक्याच्या खर्चाला पूर्ण फाटा, अत्यंत कर्तव्यदक्ष जबाबदार प्रातिनिधीक संचालक मंडळ, ऊस उत्पादकांना ऊसाची किफायतशिर किंमत देण्यात अग्रेसर, अण्णांचे व्यक्तीमत्व हे अत्यंत वेगळे, सरळ, सोपे पण तेवढेच सहज भारदस्त होते. अण्णांचे भाषण मोजके, सोपे, गावरान पण सहज कळेल व चटकन भावेल अशा शब्दांत मर्यादित असे, आश्वासनापेक्षा कृतीकडे, प्रत्यक्ष घटीतासाठी त्यांचे लक्ष असे. सार्वजनीक कल्याणकारी कार्यक्रमासाठी अण्णांनी आयुष्यभर मदत केली. इतकी की ते जैन संस्काराचे उत्तम उदाहरण ठरावे. ''

***

# पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णांची जीवनज्योत अनंतात विलीन

१५ जुलै २०१० क्रांतिवीर अण्णांचा अठ्ठ्याऐंशीवा वाढ दिवस मोठ्या प्रमाणात साजरा झाला. त्या दिवशी मला अण्णांनी विचारले, ''अरे जया, माझं वय काय झाल ?'' मी म्हणालो, ''अण्णा, आज तुमचं अठ्ठ्याऐंशी सुरू झालं.'' त्या वेळी पवार सर जवळ होते. अण्णांनी त्या वेळी एकच वाक्य उच्चारलं ''आठ आहे, चिंता नाही.'' या वाक्याचा बोध मला नंतर झाला. अण्णा अठ्ठ्याऐंशीव्या वयाच्या शेवटी शेवटी २२ जून २०११ रोजी दुपारी एक वाजता साखरशाळेत हातातील काठी घसरल्यामुळे स्वतःला सावरण्यासाठी म्हणून खाली बसण्याचा प्रयत्न केला त्यावेळी उत्तम जवळच होता. त्याने अण्णांचा हात धरला. मन्सूर चाऊस व नागठाणचा शिंदे वॉचमन पण हजर होते. पण दुर्दैव-बसताना पायाचा अँगल बदलला आणि संपूर्ण शरीराचा भार खुब्यावर पडला आणि खुब्याचे हाड फ्रॅक्चर झाले. असह्य वेदना होत होत्या. मी १२.३० ला जेवण्यासाठी घरी गेलो होतो. उत्तम एक वाजता जेवण्यासाठी घरी गेला होता. पाच मिनिटांत फोन मला (जयवंत) आला. ताबडतोब साखरशाळेत या. मी तातडीने साखरशाळा गाठली आणि सारा प्रकार कळला.

तसे अण्णा सोशिक होते. अती वेदना होत असल्या तरी बोलायचे नाही तर आजाराला तोंड द्यायचे. या पूर्वी अण्णांच्या आजाराचा एक वेळचा अपवाद. ॲक्सिडंट झाला त्या वेळचा सोडला तर एक दीड दिवसच म्हणजे जास्त झाले. त्यांची नैसर्गिक तब्बेत अशी होती की ते शक्यतो आजारी पडत नव्हते. आज मात्र अण्णांच्या चेहऱ्यावर वेदना जाणवत होत्या. मी त्यांना म्हणालो, ''अण्णा, पाय फार दुखतोय काय ?''

फक्त मानेने 'होय' म्हणाले. ''मग आता उशीर नको. ताबडतोब मिरजेला जाऊया.'' तो पर्यंत वैभव, किरण दादा, चंदर लोहार वगैरे जमलेच. तातडीने डॉ.पडीया व डॉ.टकलेंच्याकडे आलो. त्यांना वस्तुस्थिती सांगितली. त्यांनी ताबडतोब पायाचा एक्सरे काढला. हाड फॅक्चर झाल्याचे समजले. मिशन हॉस्पिटला ॲडमिट करण्याचे ठरवले. डॉक्टर इसापुरे यांना बोलावून एक्सरे घेतले. त्यांनी दुसऱ्यांदा एक्सरे बघितले. ऑपरेशन तर करायलाच पाहिजे. इथं ऑपरेशन करण्यापेक्षा पुण्याला संचिती हॉस्पिटला जाण्याचे ठरले, बॉम्बे हॉस्पिटलचे डॉ.पाचारे यांच्याशी फोनवर संपर्क साधला आणि त्यांना वस्तुस्थिती सांगितली. त्यांनीही अण्णांना संचितीला घेऊन या मी स्वतः ऑपरेशनला हजर रहातो. ऑपरेशन उत्तम झाले. स्वतः डॉ.संचिती व डॉ.पाचारे यांनी ऑपरेशन केले. हॉस्पिटल मधून डिस्चार्ज मिळाला. दवाखान्यात असतानाच १५ जुलै २०११ ला ८९ वा वाढदिवस दवाखान्यातच साजरा केला. स्वतः वैभव दवाखान्यात हजर होते, नेहमीची अण्णांची टीम उत्तम घोलप, मन्सूर चाऊस, अशोक चव्हाण, शिंदे, डवंग, जयवंत अहिर, विठ्ठल गुंजवटे, याशिवाय वाळव्याहून व आसपासच्या खेड्यांतील अण्णांना पाहण्यासाठी आलेले अनेक कार्यकर्ते, डॉक्टर्स, सिस्टर्स यांच्या हजेरीत वाढदिवस साजरा केला.

एवढं मोठं ऑपरेशन एवढा मोठा आजार की अण्णांना एक महिना हॉस्पिटलमध्ये रहावे लागले. तरी ते आटपाडीची पाणीपरिषद विसरले नाहीत. त्यांनी वैभवला खास निरोप देऊन पाठवले. वैभवची मनःस्थिती अण्णांना सोडून जायची नव्हती परंतु अण्णांचा आग्रह आणि दुष्काळी भागाचा पाण्याचा प्रश्न म्हणून मला म्हणाले, ''जया मामा, मी आटपाडीस पाणी परिषदेसाठी जातो आणि परिषद संपली की वाळव्याला न जाता तसाच पुण्याला येतो.'' मीही त्यांना आग्रहानं सांगितलं ''तुम्ही जावा, आम्ही आहोत काळजी करु नका.''

आम्ही अण्णांना घेऊन संचिती हॉस्पिटल पुण्याहून २३ ऑगस्ट २०११ रोजी वाळव्याला आलो. आठ एक दिवस अण्णांची तब्येत ठीक होती. परंतु गुरुवार तारीख ३ ऑगस्ट २०११ रोजी तब्येत बिघडली म्हणून मिशन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले तिथल्या डॉक्टरांच्या औषध उपचारांना अण्णांच्या तब्येतीने साथ केली. आणि १८ ऑगस्ट २०११ डिस्चार्जही मिळाला. परत वाळव्याला आलो. तीन आठवडे अण्णांची तब्येत बरी होती. चढ उतार असायचा पण फार कमी.

एका-एकी रविवार ११ सप्टेंबर २०११ रोजी अण्णांना अस्वस्थ वाटायला लागले. म्हणून मिशन हॉस्पिटलमध्ये 'आय.सी.यू' मध्ये ॲडमिट केले. तशी तब्येत

नरमच होती. सायंकाळी साधारण सहा नंतर दिवे लागणीच्या वेळी अर्धवट जागे, अर्धवट झोपेत होते. तरी त्यांच्या डोक्यात विचार काय ? वैभव, उत्तम, मी (जयवंत) अण्णांच्या जवळ उभे होतो. अण्णांनी आम्हांला विचारलं, शेतकऱ्यांच्या उसाला दर काय दिला ? वैभवकाकांनी उत्तर दिलं '२७३८'. पुढे अण्णा म्हणाले, ''सर्वांत आपला जास्त दर आहे का ?'' वैभवकाका म्हणाले, ''होय अण्णा, आपला पहिला नंबर आहे.'' ''भारतात पहिला नंबर आहे का ?'' ''होय, भारतात पहिला नंबर आहे.'' थोडा वेळ गेला असेल नसले, तोपर्यंत त्यांनी विचारले, ''चालू सिझनला किती देणार ? तोही पहिल्या नंबरचाच द्या.'' अण्णांचे वय ९०, आय.सी.यू. मध्ये ॲडमिट असताना डोक्यात एकच विचार. शेतकरी, कष्टकरी, कामगार, दलित, मजूर, यांचं खरं-खुरं स्वातंत्र्य आणण्याचं स्वप्न आमच्याकडून वदवून घेत होते. तेही शेतकऱ्यांच्या ऊस दराचे निमित्त करून.

१२ सप्टेंबर २०११ (सौ.कुसुमताई अण्णांच्या पत्नी) सौ.वहिनी अण्णांना भेटण्यासाठी आल्या होत्या. सोबत मुलगी सौ.विशाखा, धाकटी सून सौ.नंदिनीताई वगैरे आल्या होत्या. अण्णांची तब्बेत फारशी चांगली नव्हती. त्या एक दोन तास हॉस्पिटलमध्ये होत्या. तसं आता त्यांचंही वय ८३ वर्षांचे आहे. जाताना आमच्या चेहऱ्यावरचा ताण व काळजी बघून त्या (सौ.कुसुमताई) आम्हां कार्यकर्त्यांना म्हणाल्या, ''हे पहा तुम्ही सर्वजन, ह्यांची काळजी खूप घेत आहात. प्रयत्न चालू आहेतच. एक लक्षात असूदे प्रत्येक जन्माला आलेला माणूस हा एक दिवस जाणार आहे. तुम्ही फार टेन्शन घेऊ नका.'' पुढे त्यांच्या तोंडातून शब्द फुटेना डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले.

स्वत:ला सावरून त्या पुढे म्हणाल्या, ''डॉक्टर मंडळी खूप प्रयत्न करतायतच आणि आपणही सर्वजण काळजी घेतोय. वैभव, तुला माहीत आहे मी याच हॉस्पिटलमध्ये खूप आजारी होते. मरणाच्या दाढेतून बाहेर आलेली आहे. आपल्या हातात आहे तेवढं आपण करायचं. बाकी सर्व (हात वर करून म्हणाल्या) त्याच्या हातात आहे.'' वहिनी घरी गेल्या थोड्या वेळातच शरदराव पवार अण्णांना बघण्यास मिरज हॉस्पिटलमध्ये आले. त्यांनी सांगितले ''अण्णांच्यासाठी आणखीन कशाची गरज आहे किंवा एखादा निष्णात डॉक्टर बोलवायचा असेल तर मला सांगा. मी त्यासाठी सर्वतोपरी मदत करतो.'' त्यानंतर दोन-एक दिवसांतच आर.आर.आबा अण्णांना भेटण्यास आले. अण्णांनी आबांचा हात आपल्या हातात घेतला. डोळे भरून अण्णांनी आबांना आणि आबांनी अण्णांना

पाहिले. आबा जड अंतःकरणाने बाहेर आले. डॉ.ससेंच्या केबीनमध्ये सर्व तज्ज्ञ डॉक्टरांच्या बरोबर आर.आर.आबांनी चर्चा केली. ते डॉक्टरांना म्हणाले, ''अशा अवस्थेत अण्णांना हालवायला नको, परंतु तुम्ही एखाद्या निष्णात, चांगल्या डॉक्टरांचे नाव सांगा, त्यांना इथं आणण्याची व्यवस्था करू.'' आर.आर.आबांनी दुसऱ्याच दिवशी २८.९.२०११ रोजी स्पेशल हेलीकॉप्टरने पुण्याचे डॉ.प्रयाग यांना बोलावून घेतले. त्या डॉक्टरांनी अण्णांची मनापासून, काळजीपूर्वक तपासणी केली. ते म्हणाले, ''मी अण्णांचं नाव खूप ऐकलय. त्यांचं व्यक्तिमत्त्व मला माहीत आहे पण आज त्यांना प्रत्यक्ष पहायला मिळाले.''

अण्णांना तपासल्यानंतर डॉ.प्रयागनी आम्हा सर्वांना सांगितले,''अण्णांची तब्बेत चांगली आहे. परंतु इथल्यापेक्षा अण्णांना मुंबईला हलवलं तर या पेक्षाही तिथली औषधोपचाराची अद्ययावत व्यवस्था आहे. आपण अण्णांना मुंबईला न्यायला पाहिजे. हयगय करू नका.'' डॉ.प्रयागांच्या म्हणण्याप्रमाणे अण्णांना मुंबईला लीलावती हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करायचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला. दुसऱ्या दिवशी ३०.९.२०११ रोजी एअर बसने अण्णांना मुंबईला हलविले. त्यांच्याबरोबर डॉ.अमीत दोरकर, वैभव, उत्तम घोलप व एक एम.डी.डॉक्टर, एक नर्स होती. एअरबस मध्ये अद्ययावत दवाखान्यासारखी सोय होती. अण्णांना घेऊन विमान मुंबईत आले. विमानतळापासून हॉस्पिटलमध्ये अण्णांना लवकरात लवकर येता यावे म्हणून आर.आर. आबांनी ॲम्ब्युलन्सच्या पुढे वाट रिकामी करण्यासाठी सायरनची पोलीस व्हॅन दिली होती. त्यामुळे ५ ते १० मिनिटांतच अण्णांना लीलावती हॉस्पिटलमध्ये आय.सी.यु.मध्ये ॲडमिट केले. आर.आर. आबांनी बारकाईने लक्ष घालून पुढे हॉस्पिटलच्या ट्रस्टींना फोन करून बोलावून घेतले आणि तातडीने औषधोपचार तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाच्या देखरेखी खाली चालू केला. क्रांतिवीर अण्णांच्या तब्बेतीत चांगली सुधारणा होत होती. सोमवार तारीख १०.११.२०११ रोजी त्यावेळी डॉ.वाज, डॉ.त्रिवेदी, डॉ.शास्त्री, डॉ.देशमुख स्वतः ट्रस्टी गाणुसाहेब, श्री.पांडे साहेब अशी अनेक मंडळी अण्णांच्या तब्बेतीची काळजी घेत होते.

थोड्याच दिवसांत अण्णांच्या तब्बेतीत चांगलीच सुधारणा झाली आणि अण्णांना डिस्चार्ज मिळाला. आम्ही अण्णांना घेऊन तारीख १६.१२.२०११ मुंबईहून वाळव्याला आलो चारच दिवसांत अण्णांना अस्वस्थ वाटायला लागले म्हणून दि.२०.१२.२०११ मिशन हॉस्पिटलला डॉ.ससे यांच्याकडे डॉ.टकले व डॉ.हेमंत पडीया, डॉ.मिना यांच्या विचारविनिमयाने ॲडमिट केले. २२.१२.२०११ सौ.कुसुमताई (माई)

यांना अण्णांच्या आजाराने ताणतणाव पडला. त्यातच त्यांना माईल्ड पॅरेलीस अॅटक आला म्हणून डॉ.ससेंच्याकडे अॅडमिट केले. दोन दिवसात परत २४.१२.२०११ रोजी रात्री ११ वाजता क्रांतिवीर नागनाथअण्णांना मुंबईला लीलावती हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केले. डॉ.वाज अति दक्षतेने अण्णांच्यावर उपचार करत होते. त्या दिवशी पहाटे ३ वाजता अण्णांची तब्बेत स्थिर झाली. त्यावेळी डॉ.घरी गेले. त्यांना अण्णा कोण आहेत हे कळले होते. त्यांची अजून समाजाला खूप गरज आहे. तेव्हा त्यांची तब्बेत ठीक करणं त्यांचं आयुष्य वाढवणे अशा एकाच उद्देशाने डॉ.वाज अण्णांच्याकडे पहात होते. मध्यंतरी डॉ.पडिया, डॉ.मिना पडिया, डॉ.टकले अण्णांना व वाज डॉक्टरना भेटण्यासाठी आले. त्या वेळी डॉ. वाज व मिरजचे वरील तीन अण्णांचे फॅमिली डॉक्टर यांची सविस्तर चर्चा झाली. त्या वेळी त्यांच्या बोलण्यातून आर.आर.आबा, वैभव व माझ्या (जयवंत अहिर) चर्चेतून डॉ.वाजना अण्णा खूप कळाले होते.

एका आठवड्यात अण्णांची तब्बेत पूर्ववत झाली. जानेवारी महिन्यात एक दोनदा चढ उतार झाला. ३१ जानेवारी अण्णा एकदम चांगले होते आणि अचानक चार फेब्रुवारीला काय झाले. एकदम ताप यायला लागला. तरी डॉ.वाज म्हणाले, ''काळजी करण्यासारख काहीही नाही. अॅन्टिबॉयोटिक इंजेक्शनं चालू केली आहेत. वैभवचा जिल्हा परिषद निवडणुकांचा प्रचार दौरा होता म्हणून वाळव्याला आला असला तरी दररोज त्यांचा डॉक्टरांना, मला फोन असायचा. दोन-एक दिवसांत अण्णांची तब्बेत ठीक झाली. पण ते दिवसा झोपायचे आणि रात्रभर जागे असायचे. लीलावती हॉस्पिटलमध्ये दुपारी चार वाजता मी(जयवंत), उत्तम घोलप, मन्सूर चाऊस आम्ही आतल्या आत दवाखान्यात अण्णांना व्हील चेअर वरून फिरवत होतो. पण अण्णांच्या डोळ्यावरची झापड जाईना म्हणून मी म्हणालो, ''अहो अण्णा, अजून १९४२ साल असल्यागत रात्रभर जागे अणि दिवसा झोपताय हे बरोबर नाही. अण्णा, तुमचं म्हणजे अगदी पूर्वी एक सिनेमा निघाला होता 'अंधेरी नगरी आणि चौपट राजा' त्या राजाचा कायदा दिवसा झोपा आणि रात्री काम करा. अगदी तसंच तुमचे आहे.'' असे म्हटल्या बरोबर ते मनापासून इतके हसले की बोलायची सोय नाही. तसं हसण्याचा एक फायदा झाला साचलेला भरपूर कफ एकदम बाहेर पडला आणि त्यांनी बोलायचा प्रयत्न केला. पण उच्चार बरोबर झाला नाही.

रविवार ५.२.२०१२ संध्याकाळी अण्णांची तब्बेत उत्तम. दुसऱ्या दिवशी सकाळी परत बिघडली, परत चांगली. असा सारखा चढ उतार मार्च २०१२ उजाडला

तरी चालूच होता. डॉ.वाज विशेष काळजी घेऊन नवीन अद्ययावत उपचार करत होते. गुरुवारी २२ मार्च २०१२ रोजी त्यांना बी.पी.चा त्रास सुरू झाला. तो सारखा कमी जास्त होत होता. बरोबर ४ वाजून गेल्यानंतर हळूहळू बी.पी.कमी-कमी होत बरोबर ४ वाजून ३६ मिनिटांनी गोरगरीब, कष्टकरी, शेतकऱ्यांचा, दलितांचा, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, शेतमजूर, कामगार यांचा महानायक पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा शांत मनान सर्वांना सोडून गेले. अनंतात विलीन झाले. नागनाथअण्णांच्या जाण्याने डाव्या चळवळीचे भरून न येणारे नुकसान झाले. साऱ्या महाराष्ट्रावर शोककळा पसरली. हुतात्मा संकुल दुःखात बुडाले. वर्षाचा गुढी पाढव्याचा सण असताना हुतात्मा कार्यक्षेत्रातल्या एकाही गावांने गुढ्या उभ्या केल्या नाहीत. अशीच परिस्थिती शिराळा पेटा, तासगाव, कवठेपिरान, आष्टा वगैरे भागात होती. अनेकांना आपले अश्रू आवरता आले नाहीत. असा नेता पुन्हा होणे नाही.



क्रांतिवीर नागनाथअण्णांची जीवनज्योत अनंतात विलीन

# आदरांजली

हुतात्मा उद्योग समूहाचे शिल्पकार, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी यांचे गुरुवार दिनांक २२ मार्च २०१२ रोजी दुपारी ४.३६ वाजता मुंबई येथे निधन झाले. शुक्रवार दिनांक २३ मार्च २०१२ रोजी सायंकाळी वाळवा येथे शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

पद्मभूषण क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांना मान्यवरांनी वाहिलेली आदरांजली.

**मा.ना.पृथ्वीराज चव्हाण,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या निधनाने स्वातंत्र्य आंदोलनातील एक दुवा निखळला आहे. क्रांतिवीर नागनाथअण्णा यांनी अशा एका पिढीचे प्रतिनिधित्व केले की, ज्यांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून परकीय सत्तेशी फार मोठा लढा दिला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही क्रांतिवीर अण्णांनी समाजसेवा हेच ध्येय उराशी बाळगून संपूर्ण आयुष्य समाजासाठी व्यतीत केले. प्रखर राष्ट्रप्रेम, सामान्यांप्रती कळकळ आणि सेवावृत्ती यांनी परिपूर्ण असे आदर्श आणि कृतार्थ आयुष्य ते जगले.

**मा.ना.अजित पवार,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अण्णांनी प्राणपणाने लढा दिला. इंग्रजांच्या विरोधातील प्रतिसरकारच्या आंदोलनातून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीच्या

इतिहासात सुवर्ण अध्याय घडविला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी तळहातावर प्राण घेऊन लढलेल्या अण्णांनी स्वातंत्र्यानंतर देश आणि समाज घडविण्याच्या कामात स्वत:ला वाहून घेतले. धरणग्रस्तांच्या लढ्याला त्यांनी बळ दिले. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासावर त्यांचा विशेष भर होता. नागनाथअण्णांसारखा थोर देशभक्त आणि महान नेता पुन्हा होणार नाही.

**मा.शिवाजीराव देशमुख,**सभापती,विधानपरिषद

स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या क्रांतिवीर नागनाथ अण्णांनी १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले. त्यातूनच विधायक असे गोरगरीब जनतेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करून हुतात्मा समूहाची निर्मिती केली. धरणग्रस्तांचे प्रश्न घेऊन लढा उभारणारे एक आदर्श नेतृत्व आपल्यातून निघून गेले. त्यांच्या जाण्याने देशाच्या समाजकारण, राजकारण व सहकार क्षेत्रामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या जाण्याचे दु:ख झाले आहे त्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो.

**मा.ना.डॉ.पतंगराव कदम,**पालक मंत्री सांगली जिल्हा

थोर स्वातंत्र्यसेनानी व स्वातंत्र्य लढ्यात अग्रभागी असणारे सांगली जिल्ह्याचे सुपुत्र नागनाथअण्णा नायकवडी यांच्या दु:खद निधनाने महाराष्ट्र एका थोर देशभक्ताला व क्रांतिवीराला मुकला आहे. अण्णा अगदी हलाकीच्या परिस्थितीत जीवन जगून सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत अखंडपणे कष्टकऱ्यांच्यासाठी लढत राहिले. शेतकरी, दीनदुबळ्यांसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. राज्यामध्ये उत्तमरीतीने सहकारी साखर कारखाना चालवून सहकार क्षेत्राला आदर्श घालून दिला आहे.

**मा.ना.आर.आर.पाटील,**गृहमंत्री,महाराष्ट्र राज्य

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक नागनाथअण्णा नायकवडी यांच्या निधनाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात स्वत:चे प्राण पणाला लाऊन इंग्रजांविरोधात लढणारे प्रतिसरकारमधील साहसी देशभक्त आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात मूलभूत बदलासाठी झटणारे एक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आज देशाने गमावला आहे. नागनाथअण्णांच्या निधनाने माझा आधारस्तंभ कोसळला.स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत भूमिगत असताना नागनाथअण्णांचा उभ्या महाराष्ट्रभर संचार असायचा. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मूलभूत बदलासाठी अण्णांनी

अनेक लढे उभारले. शेतकरी आणि कामगारांना जास्तीत जास्त सुविधा देण्यात नागनाथअण्णांचे मोठे कर्तृत्व होते. निसर्गाचे संतुलन राखले पाहिजे या भूमिकेचे पुरस्कर्ते असलेल्या नागनाथअण्णांकडे व्यापक दृष्टी होती. माझ्यासाठी नागनाथअण्णा एक आधारस्तंभ होते. त्यांचे माझ्यावर आणि राज्यातल्या दुष्काळी भागावर असलेले उपकार मी कधीही विसरू शकत नाही.

**मा.ना.प्रतीक पाटील,** केंद्रीय कोळसा मंत्री

पद्मभूषण क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या निधनाने केवळ सांगली जिल्ह्याचे नव्हे तर राज्याचे पुरोगामी नेतृत्व हरपले आहे. कष्टकरी,श्रमिकाला स्वतंत्र स्थान निर्माण करून देण्यासाठी,विकास तळागाळातील माणसांपर्यंत पोहचविण्यासाठी पुरोगामी महाराष्ट्राचा विचारांचा वारसा जपण्यासाठी अण्णांनी हयातभर आपल्या तत्त्वाशी कधी तडजोड केली नाही. धरणग्रस्तांचे प्रश्न असोत किंवा दुष्काळी भागातील जनतेला पाणी मिळवून देण्यासाठी आयोजित केलेल्या पाणीपरिषदा असोत,त्यांची तळमळ प्राथमिक व आग्रही राहिली. नागनाथअण्णांच्या जाण्याने सांगली जिल्ह्याच्या समाजकारणाची न भरून येणारी अशी हानी झाली आहे.

**मा.ना.जयंत पाटील,** ग्रामविकास मंत्री,महाराष्ट्र राज्य

देशासाठी ज्यांनी त्याग केला अशा अण्णांचे निधन झाले. त्यागी वृत्तीचे व गोरगरीब जनतेच्या सेवेत आयुष्य व्यतीत करणारे ते थोर क्रांतिकारक होते. सहकार चळवळीच्या माध्यमातून बँका आणि साखर कारखान्यासारख्या संस्थांची उभारणी केली आणि या संस्था यशस्वीपणे चालविल्या. तरुण पिढीला मार्गदर्शक असून त्यांच्या निधनाने प्रखर देशाभिमान स्वातंत्र्ययोद्ध्याचा अंत झाला आहे.

**स्वातंत्र्यसैनिक धोंडीराम बापू माळी**

मी आणि नागनाथअण्णांनी स्वातंत्र्यलढ्यात आणि नंतरही अनेक आंदोलनं एकत्रित केली. दोघांच्यात गाढ मैत्री होती.सामान्य लोकांच्यासाठी त्यांनी खूप काम केले. त्यांच्या आजारपणाच्या बातम्या गेल्या काही दिवसांपासून येत होत्या,आणखी काही वर्षे ते हवे होते.

**क्रांतिवीरांगना हौसाताई पाटील**

माझे ज्येष्ठ बंधू, क्रांतिसिंहांचे मानस पुत्र नागनाथअण्णांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या समाजजीवनात एक पोकळी निर्माण झाली आहे. १९४२ च्या चळवळीतील योद्धा, पत्री सरकारमधील लढवया आणि दुष्काळी जनतेचा पाठीराखा आम्ही गमावला आहे. त्यांच्या कार्याची महती सांगण्यासाठी माझ्याकडे शब्दच नाहीत.

**डॉ.बाबूराव गुरव,** ज्येष्ठ विचारवंत

नागनाथअण्णा स्वत:च्या अखेरच्या श्वासापर्यंत खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याचा शोध घेणारा अवलिया क्रांतिसूर्य हरपला. क्रांतिकारक क्रांति ज्योतीचा अखेरचा तारा निखळला. अण्णांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**स्वातंत्र्यसैनिक नामदेव कराडकर**

नागनाथअण्णा स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यासाठी लढले. नंतर मिळालेल्या स्वातंत्र्याचा कष्टकरी, गोरगरिबांना लाभ व्हावा यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत ते लढत राहिले. कष्टकरी, अंगमेहनती शेतकरी, दलितांच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच आवाज उठवला. हुतात्मा शिक्षण संकुल, हुतात्मा साखर कारखाना व सहकार चळवळीच्या माध्यमातूनही त्यांनी समाजाला नवा आदर्श घालून दिला.

**मा.डॉ.डी.वाय.पाटील,** राज्यपाल त्रिपुरा

स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात प्रतिसरकारच्या माध्यमातून नागनाथअण्णांनी दिलेल्या लढ्यामुळेच त्यांना समाजाने क्रांतिवीर ही उपाधी बहाल केली. स्वातंत्र्योत्तर काळात क्रांतीची तीच मशाल त्यांनी विधायक अंगाने तेवत ठेवली. शिक्षण, सहकारी साखर कारखानदारी आणि पुरोगामी चळवळीतून आपले योगदान दिले आणि आपले आयुष्य शेतकरी व कष्टकऱ्यांसाठी वेचले. अशा थोर स्वातंत्र्यसैनिकाला महाराष्ट्र मुकला आहे.

**खासदार राजू शेट्टी**

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारचे अण्णांनी समर्थपणे नेतृत्व केले. ब्रिटिशांविरोधात ज्या त्वेषाने ते लढले त्याच त्वेषाने त्यांनी कष्टकरी, श्रमिक, दुष्काळी जनतेसाठी लढा दिला. शिक्षण संस्थांतून साखर कारखाना उभारणारे अण्णा एकमेव होते. त्यांच्यामुळे ऊस आंदोलनाला उभारी मिळाली.

**प्रा.डॉ.एन.डी.पाटील,** ज्येष्ठ विचारवंत

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी प्राणाची बाजी लावली, स्वत:च्या घरादारावर निखारे ठेऊन पदोपदी मृत्यूशी हस्तांदोलन करत स्वत:ला त्यात झोकून दिले. अण्णांच्या निधनाने श्रमिक चळवळीत मोठी पोकळी निर्माण झाली असून, ती भविष्यातही भरणे शक्य नाही. स्वातंत्र्य झोपडपट्टीपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी योगदान दिले.

**आमदार गणपतराव देशमुख**

१९४२ च्या लढ्यातील शेवटचा दुवा निखळला. अण्णांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली व जी.डी.बापू लाड यांच्या सोबतीने प्रतिसरकार सुरू केले. इंग्रजांची सत्ता उलथून लावली. सांगली,सातारा व सोलापूर या जिल्ह्यांतील दुष्काळी जनतेसाठी अण्णांचा लढा कधीही विसरता येणार नाही. दुष्काळी भागाला पाणी देणे हीच अण्णांना श्रद्धांजली ठरणार आहे.


**प्राचार्य डॉ.पी.बी.पाटील**

कष्टकऱ्यांना स्वातंत्र्य मिळावे, शेटजी भटजींचे सरकार जावे, यासाठी अण्णांचा अखंड लढा सुरू होता. स्वातंत्र्योत्तर काळात वारणा खोऱ्यात त्यांनी क्रांतीची ज्योत पेटवली. कष्टकरी, कामगार,धरणग्रस्त व दुष्काळग्रस्त यांच्यासाठी ते शेवटपर्यंत लढत रहिले.

अनेक मान्यवरांनी अण्णांना आदरांजली वाहिली. त्याचबरोबर खासदार सदाशिवराव मंडलिक, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन दादासाहेब पाटील, पुढारीचे प्रतापसिंह जाधव, आमदार संभाजी पवार, जिल्हाधिकारी श्याम वर्धने, माजी मंत्री मदन पाटील, आमदार मानसिंगराव नाईक, मा.विलासराव शिंदे, मा.मोहनराव कदम, मा.अजितराव घोरपडे, आमदार संजय काका पाटील, माजी आमदार अनिल बाबर, जिल्हा परिषद अध्यक्ष अमरसिंह देशमुख, सांगली, मिरज कुपवाड चे महापौर इद्रिस नायकवडी, विलासराव जगताप, माजी मंत्री शिवाजीराव नाईक, मा.अरुण अण्णा लाड, डॉ.भारत पाटणकर, पी.आर.पाटील, सुरेश पाटील, आनंदराव पाटील, धरणग्रस्तांचे नेते भारत पाटील, माजी न्यायमूर्ती बी.जी.कोळसे-पाटील, धनाजी गुरव,ॲड.सुभाष पाटील, माजी आमदार राजेंद्रअण्णा देशमुख, भाई संपतराव पवार, कॉ.शंकर पुजारी,

बिराज साळुंखे, बापूसाहेब मगदूम आदी मान्यवरांनीही अण्णांना श्रद्धांजली वाहिली. सकाळचे अशोक घोरपडे, लोकमतचे वसंतराव भोसले, मिना शेषू, महेश कराडकर, जयवंत अहिर (मामा), डॉ.पडिया, डॉ.मिना पडिया, डॉ.टकले, साखराळेचे रघुनाथ पाटील यांनी पुष्पचक्र फुले वाहून दर्शन घेतले.

सूर्य अस्ताला निघाला असताना, भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी ज्यानं आयुष्य वेचलं असा आणखी एक क्रांतिसूर्य मावळला. अण्णांच्या पार्थिवाला हजारो जनसमुदायाच्या साक्षीने अग्नी देण्यात आला ते दृश्य पाहुन अण्णाप्रेमींना अश्रू आवरणे कठीण झाले. 'अमर रहे अमर रहे-नागनाथअण्णा अमर रहे' या जयघोषात अण्णांचे पार्थिव अनंतात विलीन झाले. असा वीर पुन्हा होणे नाही. अशा या भारतमातेच्या सुपुत्रास कोटी कोटी प्रणाम.



**आदरणीय क्रांतिवीर नागनाथअण्णांना** आदरांजली वाहताना
मुख्यमंत्री **पृथ्वीराज चव्हाण** व इतर मान्यवर

# पुरस्कार सूची

१९९३................ **स्व.नेमगोंडादादा पाटील जनसेवा पुरस्कार १९९३**
श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील ट्रस्ट नेमिनाथ नगर,सांगली.

७.६.१९९८.......... **डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील समाज सेवा पुरस्कार**
दक्षिण भारत जैन सभा सांगली,७८ वे अधिवेशन रुकडी ता.हातकणंगले.

१९९८................ **राजर्षी शाहू महाराज पुरस्कार,व मानपत्र**
राजर्षी शाहू महाराज समाज विकास संस्था,पुणे

९.१२.१९९९....... **फुले आंबेडकर सामाजिक कृतज्ञता पुरस्कार**
म.ज्योतिबा फुले सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा प्रतिष्ठान
पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा.

१९९९................ **कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार**
ॲड. रंगनाथ डोळस युगांतर प्रतिष्ठान नाशिक,

२३.१.२०००....... **नेताजी सुभाषचंद्र बोस गौरव पुरस्कार**
जयहिंद मित्रमंडळ, विडणी ता. फलटण, जि. सातारा.

२१.५.२०००........ **अरिहंत पुरस्कार २०००**
जैन युवा ग्रुप, निपाणी

१०.६.२००१........ **प्रतिशाहू पुरस्कार**
अध्यक्ष व समस्त धनगर समाज बांधव

१९.८.२००१....... **क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार २००१**
क्रांतिसिंह नाना पाटील जन्मशताब्दी समिती,विटा,जि.सांगली

१२.३.२००२....... **हरिश्चंद्र-तारामती गौरव पुरस्कार २००२**
संजय पाटील स्मारक लोकसेवा प्रतिष्ठान, संकेश्वर, जि.बेळगाव

२३,२४.३.२००२.. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर रत्न पुरस्कार.**
सन्मानचिन्ह व बुद्ध, फुले, आंबेडकर जागतिक साहित्य संमेलन
आयोजक समता विचार मंच कल्याण-

२८.५.२००२....... **भाई माधवरावजी बागल पुरस्कार २००२**
भाई माधवरावजी बागल विद्यापीठ, कोल्हापूर

२८.८.२००२....... **जीवन गौरव पुरस्कार**
कॉ. व्ही. एन. पाटील स्मृती जीवनगौरव पुरस्कार

२७.१०.२००२..... **मानचिन्ह व रिपब्लिक मित्र पुरस्कार**
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आयोजित लोकराजा
छ. शाहू महाराज आरक्षण शताब्दी महोत्सव

२८.११.२००२..... **शाहीर फरांदे पुरस्कार**
लोकशाहीर पुंडलिक फरांदे प्रतिष्ठान, सातारा

२००२................ **डॉ.बाबासाहेब आंबेडकर रत्न पुरस्कार**-समता विचार मंच
आयोजित बुध्द,फुले,आंबेडकर जागतिक साहित्य संमेलन कल्याण

२००२................ **कै.लक्ष्मीबाई मगर भूमिपुत्र पुरस्कार**
सेवाभूमी विकलांग विकास आणि पुनर्वसन संस्था, लातूर

१४.५.२००३....... **भ.नेमिनाथ पुरस्कार २००२-२००३**
ट्रस्टी, पदाधिकारी अमृत महोत्सव समिती श्री १००८
नेमिनाथ दिगंबर जैन मंदिर, शाहुपुरी कोल्हापूर

१०.१०.२००३..... **महाराष्ट्र गौरव पुरस्कार**-दक्षिण भारत जैन सभा,बेळगाव

२००३................ **समाज भूषण पुरस्कार**
आधार सामाजिक विकास संस्था, कागल जि.कोल्हापूर

४.१.२००४......... **चिकोत्रा भूषण पुरस्कार**-आनंदराव पाटील प्रतिष्ठान, पुणे,
चिकोत्रा खोरे विकास मंच, महिला व शेतकरी मेळावा

.................... **समाजभूषण पुरस्कार**–स्थापत्य विशारद,अर्थतज्ज्ञ आर.जी.गांधी श्रमण संस्कृती साधनापीठ पुरस्कृत, सामाजिक योगदानाबद्दल

.................... **समाज वैभव पुरस्कार**–नारायण मेघाजी लोखंडे प्रतिष्ठान,पुणे

१२.५.२००५.... **जीवन गौरव फुले–शाहु–आंबेडकर लोकमान्य पुरस्कार** जय भवानी तरुण मंडळ, पिपरी चिंचवाड शहर, पुणे

३.२.२००६...... **आद्य क्रांतिवीर उमाजीराव नाईक पुरस्कार–** नरवीर उमाजी नाईक समाज सुधारक मंडळ, महाराष्ट्र राज्य

२७.७.२००६.... **शाहू महाराज पुरस्कार** लोकराजा राजर्षी शाहू महाराज फाउंडेशनच्या वतीने

२०.८.२००६.... **स्व.एस्.आर.पाटील सहकार प्रेरणा पुरस्कार**–रयत सेवा कृषी उद्योग सहकारी संघ व स्व.एस्.आर.पाटील विकास ट्रस्ट कोल्हापूर

७.१०.२००६.... **लोकनेते पुरस्कार**– दै.जागृत लोकनेता व लोकनेता फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने

५.११.२००६.... **प्रथम राष्ट्रीय पुरस्कार**–जैन फाउंडेशन, सांगली

१४.५.२००७.... **सामाजिक कृतज्ञता पुरस्कार** दे.भ. दादासाहेब साखळकर स्मृत्यर्थ

२६.५.२००७.... **आर्यभूषण पुरस्कार**– महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे. ''कै.नरुभाऊ लिमयेस्मृर्ती''

३.६.२००७...... **राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्कार** महाराष्ट्र पत्रकार संघ

३.९.२००७ **किसनवीर सामाजीक पुरस्कार** भुईंज, जि.सातारा

८.१२.२००७ **डॉक्टर ऑफ लेटर्स,(डी.लिट)**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२६.१.२००९ **पद्मभूषण पुरस्कार,भारत सरकार यांच्याकडून**
राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंग पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

२६.१.२०११ **समाज जीवन गौरव पुरस्कार**
अमेरिका स्थित महाराष्ट्र फौंडेशन,पुणे यांच्याकडून सामाजिक कार्यासाठी पुरस्कार देऊन सन्मानित केले.

२२.३.२०१२ **रयत माऊली पुरस्कार**
सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या ८२ व्या पुण्यतिथी दिनी 'रयत माउली' या पुरस्काराने सन्मानित.



**क्रांतिवीर नागनाथअण्णा यांना मिळालेले**
**विविध पुरस्कार व मानपत्र**

# आदरणीय नागनाथअण्णा यांचा उल्लेख केलेली ग्रंथसंपदा

| अ. नं. | पुस्तकाचे नाव (प्रकाशन ता.) | लेखक | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १) | उजळती प्रकाश रेखा (३ ऑगस्ट १९९९) | डॉ. बाबूराव गुरव | क्रांति वैभव प्रकाशन, हणमंत वडिये |
| २) | क्रांतिवीर-किसन वीर | भा.वि.धर्माधिकारी | विश्वकर्मा प्रकाशन, सातारा |
| ३) | महाराष्ट्र ॲन्ड इंडियन फ्रीडम स्ट्रगल (डिसें.१९८५) | के. के. चौधरी गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र | एस.के.सागल,डीजीआयपीआर |
| ४) | सातारचा सिंह (१५ ऑगस्ट १९८६) (३ ऑगस्ट २००२) | राघव शिवणीकर | एस. एम. अधाटे, ४ विजय हौसिंग सोसायटी पुणे - ४११०१६ |
| ५) | सातारचे प्रतिसरकार (मे १९८८) | ल.ग.कुलकर्णी | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ. |
| ६) | जीवन संग्राम (डिसेंबर १९८३) (जून १९८४) | सा.बा.सनदे | -------''------ |
| ७) | मी दत्तूचा 'दत्ता' झालो त्याची गोष्ट | कॉ.दत्ता देशमुख | ग. रा. तांबोळी, कॉ.दत्ता देशमुख पुरोगामी विचारमंच, ८५२ वी सुभाष रोड, कोल्हापूर. |
| ८) | क्रांतिसिंह नाना पाटील (१९८३,२००३) | डॉ.जयसिंगराव पवार | रिया पब्लिकेशन, रॉयल पॅलेस टाकळा राजारामपुरी,कोल्हापूर. |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव (प्रकाशन ता.) | लेखक | प्रकाशन |
|---|---|---|---|
| ९) | मराठी माणसं (३० जुलै१९९८) | डॉ.दिनकर पाटील | कीर्ती प्रकाशन, शांताबाई १०४२ जनता बँक कॉलनी, कोल्हापूर- ४१६०१२ |
| १०) | इच्छापूर्ती (१८एप्रिल १९९९) | सौ.कुसुमताई नायकवडी | किर्ती प्रकाशन, शांताबाई १०४२ जनता बँक कॉलनी, कोल्हापूर- ४१६०१२ |
| ११) | कर्मवीर भाऊराव पाटील (१९८२) | मा.भि.काटकर | सौ.सरोजनी, मा.काटकर, रयत सावली,९ ब,केसकर पेठ,सातारा |
| १२) | दोन दिव्य तारे (२५फेब्रुवारी१९७१) | वि.चामुंडराय | जयवंत अहिर हु.कि.अ.स्मारक समिति, वाळवा. |
| १३) | क्रांतिपर्व (२ ऑक्टोबर १९८७) | डॉ.उत्तमराव पाटील | डॉ.हेमंत भा.देशमुख,लोकमानस साप्ताहिक, दोंडाईचा (धुळे) |
| १४) | वसंतदादा पाटील (१९८६) | भालचंद्र वि. धर्माधिकारी | सौ.सुमती धर्माधिकारी विश्वकर्मा प्रकाशन, सातारा. |
| १५) | या गरिबांनो या, झेंडा हाती घ्या.(२५फेब्रु.९६) | डॉ.भारत पाटणकर | वसंतराव पवार, वाळवा |
| १६) | एक दृष्टिक्षेपात क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी | डॉ.भारत पाटणकर | क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती,वाळवा |
| १७) | मंतरलेले दिवस | ग.दि.माडगूळकर | |
| १८) | क्रांतिसागर (मकर संक्रांत २००४) | प्रा.डॉ.पी.बी.पाटील | शांतिनिकेतन प्रकाशन,सांगली |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव (प्रकाशन ता.) | लेखक | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १९) | राजमती पाटील-बिरनाळे एक क्रांतिकारी, ३१ जानेवारी २००४ | डॉ.सौ.पद्मजा पाटील | डॉ.एम.जी.ताकवले मालती प्रकाशन, माणगाव |
| २०) | कोकरुड ते बर्मिंगह्याम | प्रा.ए.डी.अत्तार | सौ. लांडे श्रीरामपूर |
| २१) | उद्योगरत्न | प्रा.दिनगर पाटील, सौ.शकुंतला पाटील | कीर्ती प्रकाशन |
| २२) | जळते दिवस पेटलेली माणसे (५ डिसेंबर १९८६) | राजाभाऊ कुलकर्णी श्रीपाद केळकर इंदुमती केळकर | गोपाळ मोकाशी सदाशीव बागाईतकर स्मृतिमाला १७६ सदाशीव पेठ पुणे ३० |
| २३) | देशभक्त धोंडीराम (१ मे २००१) | विजय कोगनोळे | सुचेता प्रकाशन २६२ महावीर नगर,सांगली. |
| २४) | क्रांतिसिंह नाना पाटील (फेब्रुवारी १९४७) | आप्पासाहेब लाड डॉ.उत्तमराव पाटील | अनिल म्हमाने निर्मिती विचारमंच |
| २५) | क्रांतिवीर नागनाथअण्णांचे शिलेदार ज्येष्ट स्वातंत्र्य सेनानी खंडू दाजी शेळके (३१ डिसेंबर २०१३) | जयवंत अहिर(मामा) | तानुबाई प्रकाशन,वाळवा |
| २६) | रणरागिणी राजुताई (९ ऑगस्ट १९९८) | विजय कोगनोळे | सुचेता प्रकाशन २६२ महावीर नगर,सांगली. |
| २७) | क्रांतिसिंह नाना पाटील (जानेवारी १९८६) | प्रा.विलास पाटील | क्रांतिवैभव प्रकाशन हणमंत वडिये,जि.सांगली. |
| २८) | आमचा गाव (१० नोव्हेंबर २०१३) | सर्जेराव कचरे | बी.आर.मिरजकर क्रांतदर्शी प्रकाशन,इस्लामपूर |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव (प्रकाशन ता.) | लेखक | प्रकाशन |
|---|---|---|---|
| २९) | कर्मवरी भाऊराव पाटील (१९८७) | बा.ग.पवार | मातृभूमी प्रकाशन,'वंदे मातरम्' भारती नगर,पौड मार्ग,पुणे |
| ३०) | नागनाथ अण्णा (जुलै २०१२) | उत्तम कांबळे | प्रकाश विश्वासराव लोकवाङ्मय गृह भूपेश गुप्ता भवन,मुंबई |
| ३१) | असे आम्ही लढलो (१९९४) | कॅप्टन राम लाड | तुफान प्रकाशन, कुंडल |
| ३२) | प्रतिसरकारचा रोमहर्षक रणसंग्राम (१७ मे १९९८) | कॅप्टन राम लाड | संताजी रामचंद्र लाड तुफान प्रकाशन, कुंडल |
| ३३) | पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य (९ ऑगस्ट १९८६) | जी.डी.(बापू)लाड | अध्यक्ष,क्रांतिअग्रणी जी.डी.(बापू)लाड, समाज प्रबोधनी संस्था कुंडल,जि.सांगली. |
| ३४) | माझी प्रशासकीय वाटचाल (२६ जानेवारी २००९) | वी.पा.राणे | एस.व्ही.तावरे, स्नेहवर्धन, ८३३,सदाशीव पेट, पुणे |
| ३५) | आनंद पर्व (२००९) | संपादक प्राचार्य डॉ. व्ही.एम.चव्हाण | |
| ३६) | क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान (१९२२-१९४७) | प्रा. ए. डी. शिंदे | अमृत महोत्सव समिती, उजळाईवाडी,कोल्हापूर |
| ३७) | क्रांतिवीर | भालचंद्र वि.धर्माधिकारी | क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी गौरव समिती,वाळवा |
| ३८) | क्रांतिवीर नागनाथअण्णा | जयवंत य.अहिर | क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी गौरव समिती,वाळवा |

| अ. नं. | पुस्तकाचे नाव (प्रकाशन ता.) | लेखक | प्रकाशन |
|---|---|---|---|
| ३९) | साताउत्तराची कहानी | ग.प.प्रधान | |
| ४०) | पत्री सरकार | प्रा.शिंदे | |
| ४१) | स्वातंत्र्य संग्रामातील समिधा | प्रमोद मारुती मांडे | प्रफुल्लता प्रकाशन, पुणे |
| ४२) | पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य | जी.डी.बापू लाड | |

इतिहास विभाग मानव नीती व समाज विज्ञान विद्याशाखा,पुणे विद्यापीठ,पुणे.
यांना सादर करावयाचा एम्.फिल पदवी करिता लघुशोध प्रबंध २००८
सादर कर्ता - गायकवाड अमोल दिनकर



**जयवंत अहिर यांना प्रसंग सांगत असताना**
**क्रांतिवीर नागनाथअण्णा**

# संदर्भ ग्रंथ सूची


| अ.नं. | ग्रंथाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| १) | सातारचा सिंह,क्रांतिसिंह नाना पाटील चरित्र...... | राघव शिवणीकर |
| २) | जळते दिवस पेटलेली माणसे......................... | राजाभाऊ कुलकर्णी<br>इंदुमती केळकर |
| ३) | क्रांतिवीर नागनाथ नायकवडी......................... | डॉ. भारत पाटणकर |
| ४) | क्रांतिसूर्य (क्रांतिसिंह नाना पाटील महा.वाळवे)...... | संपादक-प्रा.शशिकांत शिंदे |
| ५) | पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य................ | जी.डी.बापू लाड |
| ६) | कर्मवीर भाऊराव पाटील.............................. | बा.ग.पवार |
| ७) | महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा इतिहास. | |
| ८) | दैनिक पुढारी व अग्रदूत अंक | |

# हुतात्मा किसन अहिर यांचे स्मरणगीत

हुतात्मा किसन अहिर कीं जय ।
कृतार्थ त्यांचे कणकण जीवन, मरणहि मृत्युंजय ।।

निर्वाणीचें वचन महात्मा कळवळुनी बोलला
व्यक्ती व्यक्ती इथून पुढारी, कठीण काळ आला
या आदेशां कृतींत उतरी तरुण वीर निर्भय १

बेचाळीसचा लढा स्वयंभू स्वयंभूच नेते.
अग्रगण्य कीं त्यांत हुतात्मा किसन अहिर होते
गुप्तांदोलन, स्वतंत्र शासन, त्यांचा कृतनिश्चय २

जागविले निज जन्मग्रामां, जनीं जागृति नवी
'वाळव्या' तुनी, भूमिगतांची उफाळली वाळवी
परदास्याचें मूळ पोखरी जनशक्ती अव्यय ३

नवी निर्मिली शासनसंस्था, निवडून लोकाग्रणी
धाक वसवुनी, पार नमविले, गांवांतिल ग्रामणी
असंभाव्य तो सुकर करविला जनसामान्य नय ४

पिडित त्यांना धरीले हातीं, पीडक ते झोडले
शुध्दचरित ते जथ्यास अपुल्या प्रीतीनें जोडले
सुरु जाहले ग्रामराज्य ज्या नव्हते कार्यालय ५

प्रफुल्ल कांती तरुण मल्ल, तो वर्णानें सांवळा
अहिरकुळींचा किसन नव्यानें घडवी जणूं गोकुळां
प्रौढ पराक्रम परी जयाचें, ऐन विशीचें वय ६

परसत्तेचें आरक्षकदल कंस सैनिकांपरी
दऱ्यादऱ्यांतुन भटकत होते त्याच्या मागावरी
सहस्त्राबाहू सत्तेलाही पडले ज्याचे भय ७

कोण्या समयीं सहज वाटले त्यांच्या त्यांच्या मनां
शस्त्रावांचून कठीण यापुढे शास्त्यांशी सामना
ज्ञानावाचून लढतां होतो सामर्थ्याचा क्षय ८

नानक नामक आझाद सैनिक मिळविला त्यांनी
ध्येय–भारल्या सैन्यासाठीं समुचित सेनानी
शस्त्रसाधनीं सहज लाविली अनुयायांची लय ९

सिध्द जाहली निवडक सेना, शस्त्रेंही आली
भूमिगतांची प्रतिसत्ता मग वैभवयुत झाली
सत्तांधां ही प्रगती सांगे कोणीतरी संजय १०

नोकरशाही उखरि नखांनी चवताळून भूमी
दैवच केवळ, एक गवसली संधी निज नामी
उजाड रानीं दृष्टीस पडलें अवचित तरुणत्रय ११

आरक्षी कुणी अनुमानाविण बंदुकीस झाडी
बार उडाले, उडले पक्षी. थरारली झाडी
धुळींत कोसळून पडली तिन्हीं शरिरें रुधिरमय १२

एक त्यांतले दिव्य कलेवर अहिरांचें होते
समाज नेता सरे अचानक नियतीच्या हातें
स्मृतीच केवळ उरली मागें आतां तेजोमय १३

सार्वभौम ही स्वतंत्र आतां भारतीय जनता
असे अलौकिक आत्में लढलें मागें तिज करता
त्या आत्म्यांचा आठव राहो जनांतरी अक्षय १४

किसन अहिरां गातो आम्ही, त्यांना आठवतो
चारित्र्याच्या विशुद्धतेसी अंतरि साठवतो
स्मरण तयांचें हाच आमुच्या स्फूर्तीचा संचय १५

**– ग.दि.माडगूळकर**

# हस्ताक्षर

नवी दिल्ली.
१६-८-१९८०.

प्रिय :- दत्ता, जया, पवार वगैरे

सप्रेम नमस्कार,

श्रीमती इंदिरा गांधी यांच्याबरोबर प्रमुखांशी
दिल्ली येण्याबद्दल निर्णयांचा [illegible] सभा
झाली असावी असे गृहीत धरतो. नंतरचा
तपशील पाठवा.

युवकचे १४-८-१९८० चे [illegible]
तेही पत्र मिळाले.

आज डॉ. पाटणकर यांना पत्र त्यांच्या बंधूच्या
पत्त्याची चौकशी करून त्यांना भेटून त्यांच्याकडून
निवेदने (गोवारी [illegible] पी. बी. ठाकूर
साहेब आबा आणि दादा पवार यांच्याकडून
~~[illegible] ठरलेली चौकशी करावी.~~

मराठी वाङ्मय [illegible] स्वतंत्र निवेदने
[illegible] मध्ये पाठवा म्हणून कुठल्याही [illegible]
घेऊ नका.
जरूर ती [illegible] घेऊन [illegible] दोघे

मशीनरीचे काम आहे पुन्हां [illegible] करावी नको.
आनंदराव पाटील व इलेक्ट्रिकचे ग्रँटचे पैसे त्यांतून घ्यावा
व रेमिटन्स द्या.
इलेक्ट्रिक ग्रँटमधून जे आपण खर्च केलेल्या
ठोकळ आहे ते खर्च करण्याने पुढील
बाकी पैसे देऊं.

रेमिटन्स खर्च केला नसेल तर अथवा
यांचेकडे काही रुपयांचा रेमिटन्स आहे.
गाडी लवकर मिळणे आवश्यक आहे [illegible]
[illegible] व [illegible] यांनी [illegible]
लक्ष घालून काम करून घ्यावे.
[illegible] यांच्या लग्नास मला वार [illegible] नक्की
२६ तारखेच्या सुमारास येईन.
श्री [illegible] यांचे रेकॉर्ड पाठविले सांगावे.
तुमचा, नागनाथ.

नवी दिल्ली.
५ डिसेंबर १९७९.

आगमनानिधनांआहे. प्रिय:- दत्ता, जया, पवार सर

सप्रेम नमस्कार,

आज तारीख ५ बुधवार रोजी दुपारी २।।
वाजेपर्यंत आमच्या तार मनी ऑर्डरची वाट
पाहिली व निश्चित आहे.
कारण समजा आज नाही मनीऑर्डर मिळाली
तर उद्या या दिवशी सुद्धा नाहि तरी असा
वेळ न घालवता आदिवराज असे व
आ. कृष्णा यांना एकूण करून जे आपले
दुःखांना दिसेल आहे सहकारी साखर कार-
खान्याचे काम जेवढे पुढे नेता येईल
तेवढे न्यायचे आहे. साहेबांनी मी
उद्या येथे वेळ घालवीत बसणार नाही.
लवकरात लवकर [illegible] पाहून दुसरे
[illegible] जे पुढे गेलेला गावाच
त्या प्रश्नास वेळ तोडू नये.

विराट जनसागराचा साश्रुपूर्ण नयनांनी
क्रांतिवीर अण्णांना

# अखेरचा निरोप...





लेखक-परिचय

**जयवंत यल्लाप्पा अहिर**

**वाळवा, जि. सांगली.**

वाळवे ता. वाळवे, जि. सांगली येथे माझा शेतकरी कुटुंबात १.३.१९४५ रोजी जन्म झाला माझे वडील माझ्या लहानपणी वारले. माझी आई कृष्णाबाई हिने माझा सांभाळ केला. एकूण आम्ही आठ भावंडे. त्यांपैकी एक बालवयात वारले. थोरला सत्याप्पा, मधला जंबू, बहीण शालन, सोनाबाई, पाचवा राजाराम, गजानन व मी. माझे प्राथमिक तिसरीपर्यंतचे शिक्षण मुंबई दादर येथे झाले. पुढे सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण वाळवे येथे व माध्यमिक शिक्षण हुतात्मा किसन अहिर विद्यालय, वाळवे येथे झाले. आण्णाभाऊ साठे व फकिरा यांचे जन्मगाव वाटेगाव. ते माझे आजोळ. मी एक वर्षाचा असताना सोनवडेची लढाई झाली. त्या लढाईत पै. किसन आत्माराम अहिर हे हुतात्मा झाले. १९५७ च्या निवडणुकीवेळी क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्याशी माझा अल्पसा परिचय झाला. तो १९६४-६५ मध्ये अधिक दृढ झाला.

नागनाथअण्णा व शिक्षण खात्यातील डेप्युटी सेक्रेटरी गायतोंडे यांनी मी ग्रॅज्युएट व्हावे म्हणून खूप आग्रहाने सांगितले होते. पण मला ते जमले नाही. शेवटी अण्णांनी १९६५-६६ या शैक्षणिक वर्षात हुतात्मा किसन अहिर विद्यालयामध्ये लेखापाल म्हणून माझी नेमणूक केली. तेव्हांपासून आदरणीय अण्णांच्या सहवासात असून त्यांच्या प्रत्येक कामाचा मी साक्षीदार आहे. माझी पत्नी जयश्री, जिजामाता विद्यालयावर शिक्षिका आहे व मुलगी ज्योत्स्ना हिने वैद्यकीय क्षेत्रातील एम.डी.(आयुर्वेद) बालरोग तज्ञ ही पदवी संपादन केली आहे. मी दिनांक ३१.३.२००३ रोजी सेवेतून निवृत्त झालो असलो तरी हुतात्मा संकुलामध्ये ऑनररी कार्यरत आहे.